# संत जनाबाई

डॉ. सुहासिनी यशवंत इर्लेकर



२१

# संत जनाबाई

डॉ. सुहासिनी यशवंत इर्लेकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : जून २००२

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सिताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : ४९४५६१५)

मुखपृष्ठ : उदय तानावडे

किंमत : रु. ५०/-

# निवेदन

'संत जनाबाई' हा डॉ. सुहासिनी यशवंत इर्लेकर लिखित ग्रंथ वाचकांच्या हाती देताना मला विशेष आनंद होत आहे.

'संत जनाबाई'वर इतर काही पुस्तके उपलब्ध असताना या पुस्तकाची आवश्यकता काय, असा प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे.

गतकालातील एखाद्या महनीय व्यक्तीवर पुन्हा पुन्हा अशी पुस्तकं लिहिली जातात तेव्हा त्याची दोन कारणं संभवतात. त्यातील एक कारण म्हणजे कालप्रवाहाबरोबर उपलब्ध होणारी साधनं व संबंधीत लेखकानं त्या दिवंगत महनीय व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वाचा व कार्याचा नव्यानं घेतलेल्या शोध.

'संत जनाबाई' या ग्रंथाच्या लेखिका डॉ. इर्लेकर यांनी आपल्या मनोगतात म्हटल्यानुसार या ग्रंथाचे लेखन ही त्यांची जनाबाई आणि त्यांच्या कवितेला घातलेली तिसरी प्रदक्षिणा आहे आणि तरीही आता कुठं जनाबाईंची कविता त्यांना थोडीफार आकळल्याचे जाणवत आहे. जनाबाईची आपल्याला आकळलेली कविता इतरांना आकळावी, तसेच ''जनाबाईच्या प्रेमभक्तीने भारलेली साक्षात्कारी अनुभूतीची गूढरम्य भूमी आणि मला पूर्णतः परिचित झालेली नाही. या स्वप्न आणि सत्य यांच्या सीमारेषेवरील धूसर प्रदेशात मुक्त मनाने संचरत राहाणे, हाही एक अमृतानुभव असल्यामुळे प्रस्तुत ग्रंथाच्या निर्मितीत आपण अनुभवलेला अमृतानुभव'' इतरांनाही अनुभवण्यास उपलब्ध करून द्यावा, असाही त्यांचा या ग्रंथलेखनामागे हेतू आहे.

या ग्रंथाच्या वाचकांनी हा अमृतानुभव अनुभवावा, ही अपेक्षा.

दि. ४-६-२००२

**रा. रं. बोराडे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ

प्रथमावृत्ती : जून २००७

प्रकाशक

मुद्रक

१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,

दादर, मुंबई-४०० ०१४

माझे ज्येष्ठ दीर

कै. के. एम्. देशमुख यांना

-सुहासिनी यशवंत इर्लेकर

# मनोगत

संत जनाबाई आणि त्यांची कविता हा गेल्या पस्तीस वर्षापासून सातत्याने माझ्या चिंतनाचा विषय आहे. १९६५ मध्ये प्रबंधलेखनाच्या निमित्ताने मी जनाबाईंच्या कवितेकडे प्रथम वळले. त्यावेळी जनाबाई आणि त्यांची कविता यांचे एक अपूर्व पण स्थूलरूप असे मला दर्शन घडले. पुढे '१९८४ मध्ये आणि २००० मध्ये 'जनाबाईंचे निवडक अभंग' या ग्रंथाच्या निमित्ताने मी जनाबाईंच्या कवितेकडे पुन्हा वळले. तेव्हा जनाबाईंच्या भक्तिजीवनाचे मला जणू नवदर्शन घडले. जनाबाईंच्या प्रेमभक्तीची नवीच वळणे मला तीव्रतेने जाणवली.

गेल्या शतकाच्या अंतिम चरणात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या विनंतीला अनुसरून मी तिसऱ्यांदा जनाबाईंच्या कवितेकडे वळले. ही माझी जनाबाई आणि त्यांच्या कवितेला घातलेली तिसरी प्रदक्षिणा. दोन शतकांच्या सीमारेषेवरून संत जनाबाईंचे जीवन आणि काव्य यांचा घेतलेला हा वेध. आता कुठे जनाबाईंची कविता मला थोडीफार आकळल्याचे जाणवते आहे.

तरीही जनाबाईंच्या प्रेमभक्तीने भारलेली साक्षात्कारी अनुभूतीची गूढरम्य भूमी मला पूर्णत: परिचित झालेली नाही. ह्या स्वप्न आणि सत्य यांच्या सीमारेषेवरील धूसर प्रदेशात मुक्त मनाने संचरत राहणे हाही एक अमृतानुभवच असतो. प्रस्तुत ग्रंथाच्या निर्मितीत हा अमृतानंद मी पुरेपूर अनुभविला. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने ही अमूल्य संधी मला दिली त्याबद्दल मी मंडळाचे मन:पूर्वक आभार मानते.

प्रस्तुत ग्रंथलेखनाचे बरेचसे काम माझी कनिष्ठ कन्या डॉ. रुपा आणि संजय आडगावकर यांच्या घरी पुणे येथे झाले. त्यांनी माझ्या ग्रंथलेखनास सर्वतोपरी साहाय्य केले त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानते. तसेच माझ्या ग्रंथलेखनात कोणताही विक्षेप येऊ नये यासाठी अखंड जागरुक असणारे श्री. यशवंत इर्लेकर यांचे आभार मानण्यापेक्षा मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छिते आणि मला घडलेले जनाबाईंच्या कवितेचे नवदर्शन मराठी वाचकांना समर्पित करते.

-सुहासिनी इर्लेकर

११-५-२००१

# अनुक्रम


१. पार्श्वभूमी १
२. संत जनाबाईंच्या चरित्राची उपेक्षा ६
३. संत जनाबाईंचा जीवनपट ८
४. 'म्हणे नामयाची जनी' १०
५. 'म्हणोनिया त्याची झाले दासी'
६. जनाबाईंच्या भक्तिजीवनातील विकसनशील परिवर्तने १३
अ - लौकिक व्यथावेदनांचे कथन
आ - सामाजिक विषमता आणि अन्याय याविरुद्ध तीव्र सूर
इ - विठ्ठलभेटीची तळमळ आणि करुणापर अभंग
ई - श्रीविष्णूची पुराणोक्त भक्तवत्सलता आणि जनाबाई
उ - जनाबाईंची साक्षात्कारी सख्यभक्ती
ऊ - दैनंदिन श्रमजीवनातील सगुण साक्षात्कार.
ए - जनाबाईंची सगुण ईश्वरविषयक संकल्पना.
ऐ - जनाबाईंच्या साक्षात्कारी सख्यभक्तीचे मधुराभक्तीत झालेले गूढरम्य परिवर्तन.
ओ - संतजीवनातील अत्युच्च शिखर
औ - दंतकथारुप पावलेली विठ्ठल-जनाबाई यांची प्रेमकथा
अं - यादवकालीन संतकाव्यातील मधुराभक्तीचे दोन आविष्कार.
७. दासीपदापासून संतपदापर्यंत झालेला प्रवास ३४
८. 'सखा माझा ज्ञानेश्वर' ३६
९. सगुण साक्षात्कारांकडून ब्रह्मैक्यस्थितीकडे झेप ४०
१०. 'नवद्वारांते भेदुनी । दशमस्थानी गेली जनी ।' ४५
११. जनाबाईंचे सांप्रदायिक काव्यकर्तृत्व ४८
अ - पुंडलिकमाहात्म्यपर अभंगरचना
आ - पंढरीमाहात्म्य
इ - जनाबाईकृत पांडुरंगवर्णन.
ई - जनाबाईंनी गायिलेले संतमाहात्म्य
उ - 'वैष्णव तो एक'
ऊ - नाममाहात्म्यपर अभंग
१२. संत जनाबाईंनी अभंगमाध्यमातून केलेले समाजप्रबोधन ६२

१३. जनाबाईच्या उपदेशपर अभंगांचे वेगळेपण. ६३
१ - 'भाव धरी मनी'
२ - 'संत तेचि देव देव तेचि संत'
३ - 'मोक्ष नको मुक्ती हवी.'
४ - 'आहे नाहीं देह धरी ऐसा भाव'
५ - 'सुखे संसार करावा'
६ - 'नाम ते स्मरण अमृतसंजीवनी'
७ - 'सद्गुरूचरणा सेवी बापा.'
८ - 'आर्तभूत व्हा रे जनी म्हणे केणे घ्या रे'
१४. समकालीन समाजाच्या जडणघडणीत संत जनाबाईचे योगदान ७३
१५. जनाबाईच्या चैतन्यपूर्ण व्यक्तिविशेषांचे चिरतरुण काव्यदर्शन ७५
१ : समूहभाव प्रकट करणारे अभंग
२ : जनाबाईचा स्वयंबोध
३ : जनाबाईंची स्वयंप्रेरित आत्मसिद्धी आणि अद्वैतसाक्षात्कार
४ : 'स्त्रीजन्म म्हणवुनी न व्हावे उदास'
५ : 'डोईचा पदर आला खांद्यावरी'
६ : 'सुंदर माझे जाते गे'
१६. जनाबाईचे धन्योद्गार ८७
१७. जनाबाईचे मागणे ८९
१ - 'भक्ती जनी मागे देवा'
२ - 'माझे दुःख नाशी देवा'
३ - 'देवा देई गर्भवास'
४ - 'ऐसा पुत्र देई संतां'
५ - 'असावे कल्याण चिरकाल'
६ - 'पांडुरंगाचे आशीर्वचन'
१८. 'जनीने बोलिलें तैसेच लिहिले' ९४
१९. जनाबाईंची संतचरित्रे ९८
अ - जनाबाईकृत नामदेवचरित्र
ब - जनाबाईंची ज्ञानेश्वरस्तुती.
क - अन्य समकालीन संत
२०. जनाबाईंची अन्य स्फुट रचना ११२
२१. जनाबाईंची आख्यायक कविता ११८
२२. समारोप १२८
अभ्यासाची साधने

# पार्श्वभूमी

महाराष्ट्रभूमी ही भारतीय भूमीचा एक घटक आहे. महाराष्ट्राची विशेष संस्कृती आहे. आणि तीही भारतीय संस्कृतीचा एक घटक आहे. ही महाराष्ट्र संस्कृती वरपांगी वेगळी वाटली तरी भारतीय संस्कृतीला जोपासणारी आहे. एखाद्या बागेत अनेक रंगांची, आकारांची आणि सुगंधाची फुले उमललेली दिसली तरी त्यामागे एकच भूमी असते. भारतीय संस्कृतीचीही विविध रुपे दिसतात. पण एकच आत्मा त्यामागे विलसत असतो. विविधतेत एकता आणि एकतेत विविधता हे त्यामुळेच भारतीय संस्कृतीचे प्राणतत्त्व ठरते.

महाराष्ट्राला स्वत:चे वेगळेपण आणि मोठेपण लाभले ते यादवकालात. बाराव्या-तेराव्या शतकापासून महाराष्ट्रभूमीला स्वत:ची संस्कृती, सामर्थ्य, भाषा, साहित्य, स्वातंत्र्य आणि अध्यात्मसाधना यांचे विशेष भान येऊ लागले. मराठी ही देशी भाषा ग्रंथरुपाने प्रकट होण्याइतकी समृद्ध झाली. म्हणूनच श्रीचक्रधर स्वामींच्या महानुभाव पंथातील अनेक पंडितांनी ग्रंथनिर्मिती केली. तिच्यामुळे मराठी गद्याचा विकास झाला. तर पुढे तेराव्या शतकात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी श्रीभगवद्‌गीतेवर भाष्यकाव्यरुपी ग्रंथ लिहून महाराष्ट्रातील वर्णहीन स्त्रीपुरुषांसाठी मोक्षाचे महाद्वार खुले केले. संत ज्ञानेश्वर हे नाथ संप्रदायाचे ज्ञानयोगी होते. श्रीकृष्णभक्तीचा ह्या नाथसंप्रदायानेही स्वीकार व पुरस्कार केला होता. नाथसंप्रदायाचे योगमार्तंड गोरक्षनाथांनीच श्रीकृष्णभक्तीला चालना दिली. त्यांचेच शिष्य गहिनीनाथ होत. महाराष्ट्रातील श्रीकृष्णभक्तीला त्यांनीच खरे प्रोत्साहन दिले. त्यांनीच निवृत्तिनाथांना श्रीकृष्णांच्या उत्कट प्रेमभक्तीचा महामंत्र दिला. आणि श्रीकृष्णाच्या प्रेमभक्तीचा सर्वत्र प्रसार करण्यास सांगितले. श्रीनिवृत्तिनाथांनीही श्रीज्ञानेश्वरांचे ज्ञानवैराग्य आणि उत्कट श्रीकृष्णभक्ती पाहून त्यांना भगवद्‌गीतेवर मराठी भाषेत भाष्य करण्याची आज्ञा केली. परिणामी श्रेष्ठ प्रतिभा लाभलेल्या ज्ञानेश्वरांनी भगवद्‌गीता ह्या श्रीकृष्णोक्त ब्रह्मज्ञानावर प्राकृत मराठी भाषेत भाष्यग्रंथ रचला. तिचे 'ज्ञानेश्वरी' हे नाव पुढे रुढ झाले. गीतेतील ब्रह्मविद्या देशी मराठीत प्रकटली. हजारो वर्षे संस्कृत भाषेत असणारे ब्रह्मज्ञान जनसामान्याच्या भाषेत

अवतरले. तोपर्यंत महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतातही स्त्री-शूद्रांना संस्कृत भाषा शिकण्याचा अधिकार धर्मानेच नाकारला होता. केवळ उच्च वर्णीय पुरुषच वेदविद्या संपादन करू शकत. त्यामुळे समाजातील स्त्रीवर्ग, वैश्य, शूद्र आदी वर्णहीनांना देववाणीतील म्हणजे संस्कृत भाषेतील आत्मज्ञान अपरिचित राहिले.

संस्कृत भाषेची कवाडे उघडून ज्ञानेश्वरांनीच प्रथम गीतेतील ब्रह्मज्ञान देशी भाषेत प्रकट केले. असे करण्याचे कारण मूळ गीतेतच आढळते. मूळ गीतेतच जनसामान्यांच्या उध्दाराची तळमळ आहे. वेदांपेक्षा गीता उदार आहे. श्रीकृष्णांनी ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग, संन्यासयोग, आदी आत्मोद्धाराच्या मार्गांचे दिग्दर्शन केले आहे. त्यातही भक्तियोग हा सर्वसामान्यांसाठी सांगितला असून स्वत: श्रीकृष्णास तो विलक्षण प्रिय आहे. त्यामुळेच भगवद्गीतेस माऊलीपद प्राप्त झाले. आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी जेव्हा संपूर्ण गीताच मराठी भाषेत आणली तेव्हा त्यांच्याकडेही हे माऊलीपद चालत आले. ज्ञानेश्वरी ही ह्या माऊलीचीच वाङ्मयीन मूर्ती आहे.

भगवद्गीतेचा ज्ञानेश्वरीरुपाने मराठी भाषेत असा अवतार होणे ही एक धार्मिक, आध्यात्मिक क्रांती करणारी घटना ठरली. शके १२१२ मध्ये म्हणजे इ. स. १२९० मध्ये ज्ञानेश्वरी हा ग्रंथ पूर्ण झाला. त्याक्षणीच महाराष्ट्राचा भाग्योदय झाला. अज्ञानी, वर्णहीन समाजातील स्त्रीपुरुषांना श्रीकृष्णाचे दयेने ओथंबलेले अंतरंग उमजले. ईश्वरही आपल्या भेटीसाठी तळमळत आहे. या जाणिवेने त्यांची अंत:करणे उत्कट प्रेमभक्तीने उचंबळली. गाय आणि वासरू अनावर ओढीने एकमेकांकडे धाव घेतात. त्याप्रमाणे ईश्वर आणि भक्त यांची ओढ लक्षात घेऊन जणू ज्ञानेश्वरांनी त्यांची भेट घडवून आणली. सामान्य दु:खी, अज्ञानी मानवसमूहाला ईश्वर भेटला आणि भक्तींच्या भेटीसाठी आसुसलेल्या ईश्वरास त्याचे भक्तजन भेटले. श्रीकृष्णाने विश्वोद्धारासाठी अर्जुनास सांगितलेले ब्रह्मज्ञान एरवी गीतेतच कोंडून पडले असते. ज्ञानेश्वर माऊलीने ते सामान्य मराठी माणसाच्या दारातच नव्हे तर घरात आणून ठेवले.

त्यामुळे तेराव्या शतकात महाराष्ट्रातील मराठी माणसांच्या घरीदारी जणू ब्रह्मविद्येची दिवाळीच अवतरली. ज्ञानासाठी, आत्मोद्धारासाठी आणि मुक्तीसाठी पददलितांची मने तळमळत होती. आता ही मने ज्ञानप्रकाशाने उजळली. प्रेमभक्तिरसात नाहू लागली. आत्मानंदात डुलू लागली. अद्‌भुत साक्षात्कारी अनुभवांनी हरखून गेली. विशेष बाब म्हणजे ही मने सुजाण होऊन बोलू लागली. आपल्या मनातील उत्कट प्रेमभाव आणि भक्तिभाव शब्दांत व्यक्त करू लागली. स्वत:च्या सुखदु:खांचा 'अभंग' ह्या लोकछंदात आविष्कार करू लागली. त्यांतील

काही जणांनी आपले संपूर्ण जीवनच ईश्वरास समर्पित केले. त्यांनी त्यासाठी प्रपंचाचाही त्याग केला. अन्य काही जणांनी प्रपंच न नाकारता आपला भक्तिमार्ग मोठ्या निष्ठेने आचरला. त्यांचा मार्ग अपार कष्टांचा होता. काहीना ह्या असीम अशा भक्तिसाधनेसाठी प्रापंचिक संघर्ष करावा लागला. तर काहीना सामाजिक संघर्षास सामोरे जावे लागले. त्यांतील काही जणांनी संतपदापर्यंत प्रवास केला.

समाजातील हे अद्‌भुत परिवर्तन ज्ञानेश्वरीने केले होते. ही किमया संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी करून दाखविली. जनसामान्यास ज्ञानप्राप्तीची दारे खुली होताच धर्मगुरुंचे वा वर्णश्रेष्ठांचे महत्त्वच उणावले. शब्दज्ञानी उच्चवर्णियांची मने फजित झाली. अनुभवाशिवाय ज्ञान फोल होय हे लक्षात आले. केवळ शब्दपांडित्यानेच मोठेपण मिळविणाऱ्या ब्राह्मणसमाजाला आपले जीवन लाजिरवाणे वाटू लागले. शुद्धिपत्रासाठी पैठण येथे गेलेल्या संत ज्ञानेश्वरादी भावंडाची याआधीच पैठण येथील महाजनांनी सत्त्वपरीक्षा घेतली होती. रेड्यामुखी वेदमंत्रांचे उच्चारण करविणारी ज्ञानेश्वरादी भावंडे ईश्वरी अवतार आहेत हेच त्यामधून सिद्ध झाले. पुढे ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहून ज्ञानेश्वरांनी आपले विश्वोद्धाराचे कार्य पूर्ण केले. त्यातून महापांडितांचीही मने ज्ञानेश्वरांनी जिंकली. संत ज्ञानेश्वरांचा श्रीकृष्णभक्तीच्या प्रसाराचा मार्ग मोकळा झाला. श्रीकृष्ण भक्तिप्रेमाने ओतप्रोत भरलेले अभंग रचून ज्ञानेश्वरांनी ज्ञानश्रेष्ठ आणि योगसिद्ध यांना भक्तीचे महत्त्व पटविले. हरिपाठाचे अभंग रचून नामस्मरण कसे करावे याचेही मार्गदर्शन केले.

संत ज्ञानेश्वरांच्या काळातील गोरा कुंभार, विसोबा खेचर, संत नामदेवादी संतांचा मेळाच पुढे पंढरपूर येथे जमला. चंद्रभागेच्या तीरावर विठ्ठलभक्तीचा मळा पिकला. चंद्रभागेसारखीच भक्तिगंगाही अविरत वाहू लागली. त्या घटनेस सातशे वर्षे उलटली. अजूनही भक्तिगंगा मोठ्या वेगाने वाहात आहे. पंढरपूर ही भक्तीची पेठ आहे. येथे श्रीकृष्णभक्तीची देवघेव होते. निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई, नामदेव, चोखामेळा, विसोबा खेचर, सावता माळी आणि जनाबाई यांच्या अभंगांचा नादघोष येथे ऐकू येतो. हे सर्व श्रेष्ठ संत आहेतच. पण श्रेष्ठ कवीही आहेत. उभा महाराष्ट्र त्यांना श्रेष्ठ 'संतकवी' म्हणून ओळखतो. अशा प्रकारे संत ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रात भागवत धर्माचा पाया घातला आणि ते लवकरच वयाच्या अवघ्या बाविसाव्या वर्षी आळंदी येथे समाधिस्थ झाले. त्यांनी केलेल्या कार्याचा भक्तश्रेष्ठ नामदेवांनी आपल्या भक्तिसाधनेने केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर उभ्या भारतात आजन्म विस्तार केला.

संत नामदेवांची भक्तिसाधना श्रीमद्‌भागवतपुराणातील भक्तिसंकल्पनेने जोपासलेली होती. अशाप्रकारे यादवकालीन भागवतसंप्रदायात गीतेतील तत्त्वदर्शन,

नाथ संप्रदायप्रणित योगसाधना आणि अद्वयतत्व तसेच भागवतपुराणातील ऐकान्तिक प्रेमभक्ती यांचा संगम झालेला दिसतो. त्यामुळे महाराष्ट्राच्या लोकजीवनात आध्यात्मिक स्वातंत्र्याची पहाट झाली. लोकजीवनातून पुढे आलेल्या काही संतांना प्रतिभावंत कवीची संवेदनशक्ती लाभली होती. त्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात प्रत्ययास येणाऱ्या साक्षात्कारी अनुभूती आपल्या भाषेत अभंगबद्ध करण्यास प्रारंभ केला. संत नामदेवांची शिष्या संत जनाबाई ह्या त्यांतीलच एक होत.

# संत जनाबाईंच्या चरित्राची उपेक्षा

संत जनाबाईंचे अधिकृत संपूर्ण चरित्र उपलब्ध नाही. यादवकालीन वारकरी संप्रदायातील संतांची अधिकृत चरित्रे आढळत नाहीत. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचे 'आदी', 'तीर्थावळी' आणि 'समाधी' ह्या तीन प्रकरणांत संत नामदेवांनी रचलेले अभंगपर चरित्र ह्यास अपवाद ठरावे. अर्थात संत नामदेवांनी ज्ञानेश्वरचरित्र रचले नसते, तर तेही आज उपलब्ध झाले नसते. नामदेवांनी ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहून जसे महान कार्य केले, तसेच आत्मचरित्र लिहूनही केले. त्यामुळे तेराव्या शतकातील वारकरी संप्रदायाची पायाभरणी आणि जडणघडण करणाऱ्या ज्ञानेश्वर आणि नामदेव ह्या संतश्रेष्ठांची तरी चरित्रे मराठी वाचकांना उपलब्ध झाली.

संत नामदेवांनी समकालीन संतांच्या चरित्रांकडेही लक्ष वेधले आहे. ही चरित्रे त्रोटक आहेत. त्यात संतांचे समग्र चरित्र लिहिण्यापेक्षा त्यांच्या जीवनांतील अलौकिक प्रसंग दर्शविले आहेत. गोरा कुंभार, सावतामाळी, चोखामेळा आदी संतांच्या चरित्रांच्या नोंदी असेच नामदेवांच्या ह्या चरित्रलेखनाचे स्वरुप आहे. त्यातच नामदेवांनी त्यांची शिष्या जनाबाई यांच्यासंबंधीही एक अभंग रचला. ह्या अभंगात पंढरपूर येथे जनाबाईंवर श्रीविठ्ठलाचे पदक चोरल्याचा जो खोटा आरोप आला होता, त्याचा उल्लेख आढळतो एवढेच.

तथापि पुढे सतराव्या शतकातील महिपती ताहराबादकर यांनी पूर्वकालीन संतचरित्राची माहिती मिळवून संतचरित्रे लिहिली. 'भक्तविजय' ह्या त्यांच्या ग्रंथात (निर्णय सागर प्रकाशन, मुंबई १९५०) ही संतचरित्रे संग्रहीत झाली आहेत. 'भक्तविजय' ह्या ग्रंथात महिपतींनी भक्तश्रेष्ठ नामदेवांचे सविस्तर चरित्र लिहिले आहे. संत जनाबाई ह्या नामदेवांच्या कुटुंबियांच्या आश्रयाने राहात होत्या. त्यामुळे नामदेवांच्या चरित्राचा एक भाग म्हणून महिपतींनी संत जनाबाईसंबंधीची उपलब्ध माहिती एकत्र करून त्यांचे चरित्र लिहिले. या दृष्टीने महिपती हे जनाबाईंचे पहिले चरित्रकार ठरतात. महिपतींच्या ह्या संत जनाबाईंच्या चरित्रामुळेच आजच्या मराठी माणसास जनाबाईसंबंधाने थोडी तरी माहिती उपलब्ध झाली आहे. ती अशी.

# संत जनाबाईंचा जीवनपट

आजच्या मराठवाडा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशातील परभणी जिल्ह्यात गोदावरी नदीच्या काठी 'गंगाखेड' या नावाचे गाव आहे. तेराव्या शतकात ह्याच गावी 'दमा' या नावाचा एक शूद्र रहात होता. त्याच्या पत्नीचे नाव करुंड होते. दमा आणि करुंड हे दोघेही विठ्ठलभक्त असल्याने नित्यनेमाने पंढरीची वारी करीत. असा क्रम बरीच वर्षे चालला होता. दमा आणि करुंड ह्यांना अपत्य नव्हते. त्यामुळे ते दोघे मनातून दु:खी होते. एकदा पंढरीस असता 'आम्हास पुत्र व्हावा' अशी त्यांनी पांडुरंगास प्रार्थना केली. त्याच रात्री दमास स्वप्नात असा दृष्टांत झाला. ''तुला पुत्र काही होणार नाही, परंतु एक कन्या फार सद्‌गुणी होईल व ती तुझ्या कुळाचा उद्धार करील. ती कन्या कृतयुगात पद्‌मिनी होती. तीच तुझ्या पत्नीच्या उदरी येईल. 'जनाबाई' असे तिचे नाव ठेव. तिचा नामदेवचरित्राशी संबंध येणार आहे. त्यामुळे नामदेवांचे वडील दामाशेट यांना तुझी ही कन्या अर्पण कर.''

कालांतराने दमास कन्यारत्न प्राप्त झाले. दमा आणि करुंड यांनी तिचे 'जनाबाई' असे नाव ठेवले. जनाबाई पाच-सहा वर्षांची झाल्यावर दमाने तिला दामाशेट यांच्या स्वाधीन केले. त्याआधीच करुंड हिचा मृत्यू झाला होता. पुढे लवकरच दमाचेही निधन झाले. आणि अनाथ झालेली जनाबाई दामाशेटच्या कुटुंबाच्या आश्रयाने राहू लागली. दामाशेटनेही ह्या अनाथ मुलीचे आपल्या कन्येप्रमाणे पालनपोषण केले.

दामाशेटीचे संपूर्ण कुटुंबच विठ्ठलभक्ती करणारे होते. घराण्यात वारकरी संप्रदायाचा आचार व विचार रुढ होता. अशा ह्या पवित्र कुटुंबात संतश्रेष्ठ नामदेवांचा जन्म झाला. नामदेव जनाबाईपेक्षा पाच-सहा वर्षांनी लहान होते. त्यांना अंगाखांद्यावर खेळविण्याचे भाग्य दामाशेटच्या ह्या मानसकन्येस लाभले.

दामाशेट जातीने व व्यवसायाने शिंपी होते. त्यांचे कुटुंब मोठे होते. दामाशेट व त्यांची पत्नी, नामदेव आणि त्यांची पत्नी, नामदेवांची बहीण निर्मला, नामदेवांचे चार पुत्र आणि चार सुना आणि एक कन्या असे नामदेवांचे कुटुंब चौदा जणांचे होते. त्यात जनाबाईंची भर पडून ते पंधरा जणांचे झाले. जनाबाई म्हणतात-

''नामदेवाचे घरी । चौदाजणे स्मरती हरी ॥१॥
चौघे पुत्र चौघे सुना । नित्य स्मरती नारायणा ॥२॥
आणिक मायबाप पाही । नामदेव राजाबाई ॥३॥
आऊबाई लेकी निंबाबाई बहिणी। पंधरावी ती दासीजनी ॥'' (जनाबाईंचे अभंग-अभंक क्र.२७०)

# 'म्हणे नामयाची जनी'

नामदेवांचे पंढरपूर येथील घर म्हणजे यादवकालीन संतांच्या परस्पर संवादाचे केंद्रस्थान होते. त्यामुळे संत जनाबाईंना आयताच संतसहवास लाभला. नामदेवांशी जनाबाईंनी साधलेला ऐक्यभाव तर आश्चर्यकारकच होता. नामदेवांवाचून जनाबाईंना वेगळे असे स्वतःचे जीवन नव्हतेच. 'म्हणे नामयाची जनी' ह्या त्यांच्या प्रत्येक अभंगाच्या अखेरीस येणाऱ्या नाममुद्रेवरून त्याचा प्रत्यय येतो. नामदेवांचे दासीपण जनाबाई बिरुदाप्रमाणे मिरवितात. आणि असे घडणे स्वाभाविकच होते. कारण जनाबाईंना स्वतःचे घर नव्हते, कुटुंब नव्हते. नामदेवांचे घर आणि कुटुंब हेच त्यांनी आपले घर व कुटुंब मानले. त्या नामदेवांच्या कुटुंबाशी पूर्णार्थाने समरस झाल्या. त्या कुटुंबाचा एक घटक झाल्या. नामदेवांच्या जीवनातील सुखदुःखे त्यांनी आपलीच सुख-दुःखे मानली. जनाबाईंची मूळ वृत्तीच ईश्वरपरायण होती. संतश्रेष्ठ नामदेवांच्या विठ्ठल-भक्तीमय झालेल्या कुटुंबाच्या सहवासाने जनाबाईंच्या विठ्ठलभक्तीला बहर आला.

नामदेव हे बालभक्त होते. त्यांच्या जीवनविकासानुसार त्यांची भक्तीही विकसित झाली. उत्कट संवेदनशक्ती लाभलेल्या जनाबाईंनी नामदेवांची भक्तिसाधना विकसित होताना अशी जवळून पाहिली. ईश्वरसाधना कशी करावी, विठ्ठलभक्ती कशी अनुभवावी, विठ्ठलाशी संवाद कसा करावा, त्याच्याशी मनाने कसे समरस व्हावे, ऐक्य कसे साधावे, हे जनाबाईंना नामदेवांच्या अखंड सहवासामुळे शिकता आले. नामदेवांच्या आध्यात्मिक जीवनाचा असा सखोल संस्कार होऊन जनाबाई स्वतःचे आध्यात्मिक जीवन जगू लागल्या. संत नामदेवांचे लौकिक व आध्यात्मिक जीवन हा त्यांच्या अखंड निरीक्षणाचा, चिंतनाचा आणि कुतुहलाचा विषय झाला. त्याचा जणू जनाबाईंच्या मनाला छंदच जडला. एवढेच नव्हे तर आपले अनुभव अभंगांतून कसे व्यक्त करावेत, याची किमयाच जणू जनाबाईंच्या मनानें प्राप्त केली. जनाबाईंच्या आध्यात्मिक जीवनाला अशा प्रकारे प्रारंभ झाला. त्यासाठी नामदेवांकडून गुरुमंत्र घेण्याच्या उपचाराची जनाबाईंना आवश्यकता भासली नाही. कारण तिला तिच्या गुरुच्या अखंड सहवासाचा लाभ

होण्याचे भाग्य प्राप्त झाले होते. नामदेवांच्या लौकिक जीवनाशी समरस होता होता जनाबाई त्यांच्या आध्यात्मिक साक्षात्कारी जीवनाशी, त्यांच्या उत्कट सगुणभक्तीशी आणि त्यांच्या भावोत्कट काव्यजीवनाशीही कशा एकरूप झाल्या, ते पुढील अभंगात प्रत्ययास येते.

''नामदेवा पुत्र झाला । विठो बारशासी आला ॥
आंगडे टोपडे पेहरण । शेला मुंडासा घेऊन ॥
माझ्या जीवीच्या जीवना । नाम ठेवी नारायणा ॥
जनी म्हणे पांडुरंगा । नांव काय ठेवू सांगा ॥'' (अ. क्र. १३७)

''सण दिवाळीचा आला । नामा राऊळासी गेला ॥
हाती धरूनी देवासी । चला आमुच्या घरासी ॥
देव तेथुनी चालिले । नामयाच्या घरा आले ॥
गोणाईने उटणे केले । दामा शेटीने स्नान केले ॥
पदर काढिला माथ्याचा । बाळ पुशिला नंदाचा ॥
हाती घेऊन आरती । चक्रपाणी ओवाळती ॥
जेऊनिया तृप्त झाले । दासी जनीने विडे दिले ॥'' (अ. क्र. २८४)

एक लौकिक घटना जनाबाई अलौकिक पातळीवर जगतात. साध्या घटनेला आध्यात्मिक पातळीवर नेतात आणि हा अनुभव नामदेवांसंबंधीचा असला तरी तो निखळ जनाबाईंच्या मनाचा आहे हे महत्त्वाचे. यावरून भक्तश्रेष्ठ नामदेवांचे जीवन त्यांची भक्ती, त्यांच्या कुटुंबात घडणारे प्रसंग वा घटना ह्या भावोत्कट मनाच्या जनाबाईंच्या भावजीवनाचा अखंड विषय होताना दिसतात.

एवढेच नव्हे तर नामदेवांनी रचलेल्या आत्मचरित्राच्या जनाबाई जणू साक्षी ठरतात. संत नामदेव संत ज्ञानदेवांच्या विनंतीला अनुसरून अनिच्छेने तीर्थयात्रेस जातात. त्यांना विठ्ठलाच्या वियोगाचे दु:ख होत असतेच. पण विठ्ठलाला आपल्या वियोगाचे किती दु:ख होईल आणि ते कसे सहवेल, याचेच अधिक दु:ख वा चिंता वाटत असते. आपल्या वियोगाने तळमळणाऱ्या श्रीहरीचे काल्पनिक चित्र नामदेवांनी तीर्थावळीच्या अभंगात सर्वत्र रेखाटले आहे. विशेष म्हणजे संत जनाबाईंही नामदेवांच्या ह्या अनुभूतीशी समरस होऊन गोपाळाचे सुसंवादी चित्र रेखाटतात. नामदेवांचे भावोत्कट आत्मकथन सत्य असल्याची त्या जणू ग्वाही देत असतात. ती अशी

"वियोग नाम्याचा। न साहे गोपाळा । न जाय राउळा पांडुरंग ॥
पद्माळ्यांत तेव्हा राहे विश्वंभर । कळे समाचार रुक्मिणीसी ॥
चलावे मंदिरी स्वामी पुरुषोत्तमा । येईल गे नामा माझा जेव्हा ॥
तयाविण मज दाही दिशा ओस । न लगे चित्तास गोड काही ॥
जनी म्हणे ऐसी आवड नाम्याची । म्हणोनिया त्याची झाले दासी ॥"

(जनाबाईंची तीर्थावळी-अ. क्र. ३३५)

# 'म्हणोनिया त्याची झाले दासी'

जनाबाईंचे वरील वचन सूचक आहे. जनाबाईंची अद्यापि साधकावस्था सुरू आहे. संत नामदेवांच्या रुपाने त्यांना सहजीच गुरू लाभला आहे. ह्या गुरुमुळे परमेश्वरही हाती आला आहे.

''नोवरीया संगे वऱ्हाडीया सोहोळा ।
मांडे पुरणपोळ्या मिळे अन्न ॥
परीसाचेनि संगे लोहो, होय सोने ।
तयाची भूषणे श्रीमंतांसी ॥
जनी म्हणे जोड झाली विठ्ठलाची ।
दासी नामयाची म्हणोनिया ॥'' (अ. क्र. ३१)

लग्नसमारंभात वधूपक्षाकडील परिवारासही सन्मान लाभतो. विवाहसोहळ्यात सहभागी होता येते. गोडधोड पदार्थांचे भोजन मिळते. परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचेही सोने होते. श्रीमंतास ह्या सोन्याचे अलंकार प्राप्त होतात. नामदेवांसारख्या गोपाळास जिवलग असलेल्या भक्तश्रेष्ठाची जोड झाल्याने जनाबाईंचे जीवनही अद्भुत आनंदाने भरून गेले आहे. वऱ्हाडास सोहाळ्याचा, लोखंडास परिसस्पर्शाने सुवर्ण होण्याचा अद्भुत लाभ होतो. तसाच नामदेवांना अनुसरल्यामुळे जनाबाईंस विठ्ठलाचा लाभ झाला आहे. दुसऱ्या एका अभंगात जनाबाई उघडपणेच नामदेवांचे हे ऋण मान्य करतात.

''नामदेवाचे ठेवणे जनीस लाधले ।
धन सापडले विटेवरी ॥
धन्य माझा जन्म धन्य माझा वंश ।
धन्य विष्णुदास स्वामी माझा ॥'' (अ. क्र. ३६०)

संत नामदेवांच्या घरात चौदा जण होते. चार पुत्र, चार सुना, लेक, बहिण, आई-वडील, पत्नी असा हा परिवार होता. नामदेवांच्या विठ्ठलभक्तीचा संस्कार अवघ्या कुटुंबाच्याच मनावर आणि जीवनावर होणे अपरिहार्य होते. तो तसा

झालाही. त्यामुळे कुटुंबातील प्रत्येकानेच आपल्या भक्तीचा कमी-अधिक प्रमाणात अभंगांतून आविष्कारही केला.

पण त्यांपैकी कोणासही श्रेष्ठ भक्तपद जसे प्राप्त झाले नाही, तसेच संतपदही प्राप्त झाले नाही. संतकवी म्हणून फारशी मान्यताही लाभली नाही. हे भाग्य लाभले नामदेवांच्या घरी एक दासी म्हणून वावरणाऱ्या जनाबाईंना! नामदेवांच्या ह्या सगुण विठ्ठलभक्तीचा वसा घेतला जनाबाईंनी. एक अनाथ पोरकी शूद्रकन्या म्हणून दामाशेटीच्या दारात आश्रयासाठी आलेल्या जनाबाईंनी! जनाबाई ज्या क्षणी दामाशेटीच्या घरात आली त्याच क्षणी तिचा भाग्यलेख लिहिला गेला. त्याच क्षणी महाराष्ट्राला एक अद्भुत आध्यात्मिक जीवन जगणाऱ्या आणि त्याहूनही अद्भुत कविता करणाऱ्या संतश्रेष्ठ अशा कवयित्रीचा लाभ झाला. जनाबाई आणि त्यांची कविता ही भविष्यकालीन महाराष्ट्राची एक भाग्यरेखाच ठरली. कधीही न मिटणारी अशी ही भाग्यरेखा आहे. सातशे वर्षे उलटून गेली तरी महाराष्ट्र शारदेच्या मुकुटातील हे रत्न अजून तसेच झळकत आहे. जनाबाईंचे संत कवयित्री म्हणून असणारे श्रेष्ठत्व अबाधित ठरले आहे. जनाबाई ह्या सर्व संतकवयित्रींत भाग्यवान कवयित्री आहेत. त्यांची कविता चिरतरुण आहे. कारण त्यांची श्रीकृष्णभक्ती अत्यंत उत्कट, साक्षात्कारी आणि प्रतिभांकित होती. आणि अशा सगुण साक्षात्कारी उत्कट भक्तीचे ठेवणे जनाबाईला आयतेच लाभले होते. नामदेवांचेच हे मूळ ठेवणे होते. विठ्ठल हे त्याचे स्वरुप होते. नामदेवांना ते बालपणीच लाभले. आणि नामदेवांची दासी असणाऱ्या जनाबाईंनाही ते विटेवरचे निधान विनासायासच सापडले. हे जनाबाईचे केवढे भाग्य! जनाबाईंना आपल्या जन्माचे सार्थक झाल्यासारखे वाटते. आपला जन्मच नव्हे तर आपले कुळ, आपला वंशही धन्य झाल्याचे समाधान वाटते. हे भाग्य ज्यांच्यामुळे प्राप्त झाले ते विष्णुदास नामदेवही धन्य होत, असा त्या कृतज्ञतापूर्वक उद्‌गार काढतात. ''धन्य माझा जन्म धन्य माझा वंश! धन्य विष्णुदास स्वामी माझा''

जनाबाईंना नामदेवांचे 'ठेवणे' लाभले याचा अर्थ 'परमेश्वर' कसा आपलासा करायचा याची किमयाच प्राप्त झाली. जनाबाईंना विठ्ठलाची स्थूल सगुण मूर्ती तर लाभलीच. पण सगुण मूर्तीमधील परमेश्वराचा आता साक्षात्कारही झाला. जळ आणि लवण यांच्या भेटीत लवणास वेगळे अस्तित्व उरतच नाही. जळ तत्त्वात लवणतत्त्व सामावून जाते. ऐक्य पावते. त्याप्रमाणे जनाबाईंचे झाले आहे. विठोबाची अशी साक्षात्कारी भेट होताच जनाबाईंच्या देहाचा पालट होतो. रात्रंदिवस त्यांचे मन विठ्ठलचरणी जडून जाते. चित्तास अन्य विषय, विकार उरतच नाहीत. नव्हे ते जागच्या जागीच मावळते. लय पावते. विठ्ठलमय होऊन जाते. आता पांडुरंगाच्या

भेटीस उठून जाण्याचे प्रयोजनच उरत नाही. पांडुरंगच स्वत: क्षणोक्षणी जनाबाईंच्या भेटीस येऊ लागतो. जनाबाईंचे मन आता अखंड पांडुरंगभेटीचा आनंद अनुभवीत आहे. मात्र ह्या अद्‌भुत क्षणीही जनाबाईंना नामदेवांचे स्मरण होते. ''धन्य मायबाप नामदेव माझा । तेणे पंढरिराजा दाखविले ।'' असा जनाबाई कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतात हे विशेष. अशा प्रकारे भक्त शिरोमणी संत नामदेवांच्या भक्तिसाधनेचा वारसा संत जनाबाईंनीच खऱ्या अर्थाने पुढे चालविला. एवढेच नव्हे तर स्वत:च्या ऐकांतिक भक्तीने ह्या भक्तिसाधनेत योगदान करून तिचा विस्तारही केला.

# जनाबाईंच्या भक्तिजीवनातील विकसनशील परिवर्तन

संत नामदेवांचे 'विठ्ठल' हे भक्तीचे ठेवणे जनाबाईस सापडले मात्र. त्यानंतर त्यांच्या भक्तिमय आध्यात्मिक जीवनाची स्वतंत्र वाटचाल सुरू झाली. जनाबाईंच्या ह्या स्वतंत्र आध्यात्मिक जीवनाबरोबरच त्यांचे काव्यजीवनही सुरू झाले. जनाबाईंच्या भक्तिजीवनातील आध्यात्मिक विकास आणि भावनिक आंदोलने त्यांच्या अभंगवाणीत नितळपणे प्रतिबिंबीत झालेली दिसतात. ती जशी अभ्यसनीय आहेत तशीच आस्वाद्यही आहेत. त्यामुळे जनाबाई एकाच वेळी श्रेष्ठ संत आणि श्रेष्ठ कवयित्री कशा होत्या ह्याचा प्रत्यय येतो.

## अ - लौकिक व्यथावेदनांचे कथन

भक्तिजीवनाच्या प्राथमिक अवस्थेत जनाबाई आपल्या अनाथपणाचे, पोरकेपणाचे दु:ख विठ्ठलास निवेदन करून त्याची दया, सहानुभूती मिळवू पाहतात.

''माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला ॥
मी तुझें गा लेकरू । नको मजशी अव्हेरू ॥
मतिमंद मी तुझी दासी । ठाव द्यावा पायांपाशी ॥
तुजविण सखे कोण । माझे करील संरक्षण ॥
अंत किती पाहसी देवा । थोर भ्रम झाला जीवा ॥
सकळ जीवाच्या जीवना । म्हणे जनी नारायणा ॥'' (अ. क्र. ५८)

हळूहळू जनाबाईंचे आणि विठ्ठलाचे सख्यत्त्व जुळून येते. आपले लौकिक दु:ख वा तक्रार त्या विठ्ठलाला सांगू लागतात. आता त्यांची भीड चेपली आहे.

''आई मेली बाप मेला । मज सांभाळी विठ्ठला ॥
हरी रे मज कोणी नाही । माझी खात असे डोई ॥
विठ्ठल म्हणें रुक्मिणी । माझें जनीला नाही कोणी ॥
हाती घेऊनी तेलफणी । कैंस विंचरून घाल वेणी ॥
वेणी घालुन दिधली गांठ । जनी म्हणे चोळ बा पाठ ॥'' (अ. क्र. २६६)

आपणास उपेक्षित जीवन जगावे लागते याबद्दल आता जनाबाईंना खंत वाटू लागते. आपण 'नीच' जातीचे आहोत हे शल्य तीव्रतेने बोचू लागते. आपणास नामदेवांच्या घरात स्थान नाही, असलेच तर ते दारातच आहे ही जाणीव जनाबाईंना अस्वस्थ करते.

## आ - सामाजिक विषमता आणि अन्याय याविरुद्ध तीव्र सूर

''राजाई गोणाई । अखंडित तुझे पायी ॥
मज ठेवियले द्वारी । नीच म्हणोनि बाहेरी ॥
नारा गोंदा महादा विठा । ठेवियले अग्रवाटा ॥
देवा केव्हा क्षेम देसी । आपुली म्हणोनि जनी दासी ॥'' (अ. क्र. ६७)

संत नामदेवांच्या घरी विठ्ठलाच्या पायी राजाई गोणाई ह्याच बसतात. नामदेवांचे पुत्र अग्र वाटांवर थांबतात. आपणास मात्र नीच जातीची म्हणून बाहेर दारातच तिष्ठत ठेवले जाते, याचे जनाबाईंना भान येते. आपण वर्णहीन असल्यामुळे समाजव्यवस्थेत आपणास स्थान नाही. नामदेवांच्या कुटुंबाचा आश्रय मिळाला तरी आपली जागा घरात नाहीच, असलीच तर ती फक्त दारात आहे. ह्या सामाजिक विषमतेची जनाबाईंच्या मनास तीव्र जाणीव होते. ती होताच आपणावर होत असलेल्या अन्यायाबद्दलही त्यांचे मन व्यथित होते. विठ्ठलभेटीची उत्कट ओढ लागलेल्या जनाबाईंना नामदेवांच्या कुटुंबियांनी घेरलेल्या विठ्ठलाचे केवळ दर्शनही दुर्लभ होते. आपणही विठ्ठलचरणी लागावे, त्याच्याशी संवादावे, त्याच्या सहवासाचे सुख घ्यावे, असे जनाबाईंना वाटत असते. पण प्रत्यक्षात तसे घडत नाही. त्यामुळे त्यांचे मन कष्टी होते. जिवास श्रम होतात. आपले अनाथपण, एकाकीपण आणि वर्णहीन जीवन आठवून त्यांचे मन निराशेने काळवंडून जाते. 'काळ साह्य नाही आता' हे सत्य त्यांना उमगते. त्यामुळेच आपणास घरात असूनही 'परदेशी' टाकले जाते आहे, याचे भान येते. पण तक्रार तरी कुणाविषयी करायची? अशा कोंडीत जनाबाईंचे मन अडकते. ह्यातून सुटका फक्त विठ्ठलच करू शकतो या जाणिवेने जनाबाई विठ्ठलालाच साकडे घालतात.

''काय करूं पंढरीनाथा । काळ साह्य नाहीं आता ॥
मज टाकिले परदेशीं । नारा विठा तुजपाशी ॥
श्रम बहु झाला जीवा । आता सांभाळीं केशवा ॥
कोण सखा तुजविण । माझे करी समाधान ॥
हीन दीन तुझे पोटीं । जनी म्हणे द्यावी भेटी ॥'' (अ. क्र. ६८)

अशाप्रकारे जनाबाई विठ्ठलाशी आपल्या शूद्रपणाच्या वेदनेतून, एकाकीपणाच्या दु:खातून आणि उपेक्षेच्या व्यथेतून संवादत राहतात. विठ्ठलाच्या करुणेची याचना करतात.

## इ - विठ्ठलभेटीची तळमळ आणि करुणापर अभंग

नामदेवांनी जसा विठ्ठल पूर्णत: स्वाधीन केला तसा तो आपलासा करावा, ही जनाबाईंच्या भक्तमनाची एक तीव्र इच्छाच नव्हे तर आकांक्षाही आहे. नामदेवांनी बालक्रीडा वगळता आपल्या अभंगांत सर्वत्र स्वत:कडे अपत्यभाव घेतला आहे. 'विठ्ठलमाऊली आणि आपण त्याचे सान अजाण लेकरू' ह्या भावबंधात नामदेवांचे मन विशेष रमते. त्यामुळे त्यांच्या करुणापर अभंगांतून बालभक्ताची मानसिकता प्रकट होते. आणि नामदेवांच्या सगुणभक्तीला ती संवादी अशीच आहे.

जनाबाईंच्या काही अभंगांतूनही हा माता-अपत्यभाव प्रकटतो. 'मायबाप तूचि धनी । मला सांभाळी निर्वाणी ॥ (अ. क्र. १८४), 'मी तुझे गा लेकरू । नको मजसी अव्हेरू' ॥ (अ. क्र. ९९), 'मज पाडसाची माय । भक्तिवत्साची ते गाय'॥ (२००२) 'ये ग ये ग विठाबाई । माझे पंढरीचे आई'। (२११), 'का गे निष्ठुर जालीसी' (२१४) वगैरे.

तथापि जनाबाईंचे मन ह्या माता-अपत्यभावात फार काळ रमत नाही हेच खरे. अपत्य भावापेक्षा दासीभाव, सखीभाव अथवा विरहिणीभावात जनाबाईंचे भावोत्कट मन स्वाभाविकपणे विसावते. कारण ते यौवनाच्या वळणावरील एका स्त्रीचे मन आहे. त्यामुळे अपत्यभावाकडून ते सखीभावाकडे, दासीभावाकडे सतत झेपावत राहते. यादृष्टीने जनाबाईंच्या करुणापर अभंगातील पुढील करुणार्त चरण पहा.-

''हात निढळावरी ठेवुनि । वाट पाहे चक्रपाणि ॥
धांव धांव पांडुरंगे । सखे जिवलगे ॥
तुजवांचुनि दाही दिशा । वोस मज जगदीशा ॥'' (१८०)

''येगे माझे विठाबाई । कृपादृष्टीनें तूं पाही॥
तुजविण न सुचे काही । आता रक्षी नानापरी ॥'' (१७९)

''माझी आंधळ्याची काठी । अडकली कवणे बेटीं ॥
आतां सांगू मी कवणासी । धांवे पावें हृषिकेशी ॥
तुजवांचूनी विठ्ठला । कोणी नाहीं रे मजला ॥'' (१८३)

''शिणल्या बाह्या आतां । येऊनिया लावी हातां ॥
तूं माझें वो माहेर । काय पाहातोसी अंतर ॥'' (१९७)

''सख्या घेतलें पदरीं । आतां न टाकावें दुरी ॥'' (१८१)

## ई - श्रीविष्णूची पुराणोक्त भक्तवत्सलता आणि जनाबाई

श्रीविठ्ठलाची भक्तवत्सलता जनाबाई जाणतात. त्यामुळेच पांडुरंग आपला उद्धार करणार याबद्दल त्या आशावादी आहेत. जनाबाईंच्या अभंगांत विठ्ठलाची ही भक्तवत्सलता सर्वत्र विखुरलेली दिसते.

''देव भावाचा लंपट । सांडुनि आला हा वैकुंठ ॥१॥
पुंडलिकापुढें उभा । सम चरणींची शोभा ॥२॥
हातीं चक्र पायीं वांकी । मुख भक्ताचें अवलोकीं ॥३॥
उभा बैसे न सर्वथा । पाहे कोठें भक्तकथा ॥४॥
सर्व सुखाचा सागर । जनी म्हणे शारंगधर ॥५॥''

जनाबाईंनी आपल्या अभंगांत रामायण, महाभारत आणि भागवतपुराणांतील श्रीकृष्णाच्या भक्तवत्सलतेचे विपुल संदर्भ दिले आहेत. भारतीय पुराणग्रंथांनी शतकानुशतके जनसामान्यांच्या मनांत ईश्वरभक्तीची पेरलेली बीजेच कालान्तराने रुजली. महाराष्ट्राच्या मनोभूमीत पुढे तेराव्या शतकात ती अंकुरली. आणि संत ज्ञानदेव तसेच संत नामदेव यांच्या उपदेशामृताचा वर्षाव होताच महाराष्ट्राच्या ह्या मनोभूमीचे भक्तीच्या मळ्यात रुपान्तर झाले! भारतीय पुराणांनी जनसामान्यांच्या मनोभूमीची मशागत केल्यानेच तेराव्या शतकात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर आणि भक्त शिरोमणी नामदेव हे वारकरी संघटनेच्या पुनर्रचनेचे महान कार्य करू शकले, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

जनाबाईसारख्या वर्णहीन, अनाथ आणि उपेक्षित श्रमिक स्त्रीच्या मनातही ह्या महापुराणांनी ईश्वराच्या भक्तवत्सलतेसंबंधीची श्रद्धा रुजवली. त्यामुळे भक्ती हे आत्मोद्धाराचे साधन जनाबाईच्या हाती आले. नामदेवांच्या सहवासात भक्तिमार्गाच्या विविध पायऱ्या त्या सहजतेने चढतात. आत्मसाक्षात्काराच्या पायरीवर अखेर पोहोचतात. ईश्वराची भक्तवत्सलता हा त्यांच्या ह्या संपूर्ण आध्यात्मिक यात्रेचा जणू मूलाधार असतो.

''द्रौपदीकारण । पाठीराखा नारायण ॥
गोरा कुंभाराच्या संगे । चिखल तुडवूं लागे अंगे ॥'' (२३९)

''दु:शासन द्रौपदीसी । घेऊनी आला तो सभेसी ॥
दुर्योधन आज्ञा करी । नग्न करावी सुंदरी ॥
आतां उपाय कृष्णा काय । धांवे माझे कृष्णमाय ॥
निरी ओढितां दुर्जन । जाले आणिक निर्माण ॥
ऐसीं असंख्य फेडिलीं । देवीं तितकी पुरविलीं ॥
तयां संतां राखिलें कैसे । जनी मनीं प्रेमें हासें ॥'' (२३१)

''दुर्योधना मारी । पांडवासी रक्षी हरी ॥
पांडव वनवासी जाये । तयापाठीं देव आहे ॥
उणें न पडे तयाचें । काम पुरवी हो मनाचे ॥
जनी म्हणे विदुराच्या । कण्या भक्षी हो प्रीतीच्या ॥'' (२४४)

''देव तारक तारक । देव दुष्टांसी मारक ॥
गीतेमध्यें आदि अंत । ऐसे बोलतो भगवंत ॥
शत्रूलागीं आधीं मारी । भक्तसंकटी रक्षी हरी ॥
जनी म्हणे कृपा करी । भाव पाहोन अंतरीं ॥'' (२४७)

रामायण, महाभारत वा भागवतच नव्हे तर श्रीभगवद्गीतेतील भगवंताच्या अभयवचनाकडेही जनाबाई आपले लक्ष वेधतात. ''परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतान् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ (४-८) या भगवान श्रीकृष्णाच्या लोकोत्तर उक्तीचाच त्यांनी 'देव तारक तारक' ह्या अभंगात अनुवाद केला आहे.

मात्र जनाबाईंना केवळ श्रीकृष्णाची भक्तवत्सलता पुरेशी वाटत नाही. लौकिक जीवनातील दु:खप्रसंगी वा संकटात विठ्ठलाची भक्तवत्सलताच अनुभविणे हे जनाबाईंच्या आध्यात्मिक जीवनयात्रेचे अंतिम ध्येय नाहीच. आपणास विठ्ठलाचा साक्षात्कार व्हावा, त्याच्याशी एकात्मता अनुभवावी, ह्या ऐक्यावस्थेतील अद्‌भुत आनंदाचा लाभ व्हावा आणि ह्या आत्मानंदातच आपण हरवून जावे ही जनाबाईंच्या संतकविमनाची आकांक्षा आहे. नव्हे ते त्यांच्या मनाने जपलेले एक सुंदर स्वप्न आहे.

### उ - जनाबाईंची साक्षात्कारी सख्यभक्ती

आध्यात्मिक मार्गावरील साधक ज्यासाठी रात्रंदिवस तळमळतात आणि संतांच्या संतत्वाचा जो प्रमुख निकष असतो, ती साक्षात्कारावस्था जनाबाईंनी

सहजतःच प्राप्त केली आहे. मात्र करुणायाचना आणि साक्षात्कार यांतील अंतर जनाबाई कशा चालून गेल्या, याच्या खुणा त्यांच्या अभंगांत तरी फारशा दिसत नाहीत. भक्तवत्सलतेनंतर थेट सगुणसाक्षात्काराकडेच जनाबाई आपणास घेऊन जातात. सगुण साक्षात्काराची किमया जनाबाईंनी कशी हस्तगत केली याबद्दल त्यांच्या प्रतिभेने मौन पाळण्याचे पसंत केले आहे. जनाबाईंच्या आध्यात्मिक प्रवासातील हा प्रदेश त्यामुळे अगम्य राहतो किंवा जनाबाईंच्या जीवनातील हे परिवर्तन घडविणारा एखादा क्रांतिकारक क्षण अनेपक्षितपणे येऊन गेला असणेही शक्य आहे. काहीही असो. जनाबाईंची 'साक्षात्कारी संत कवयित्री' ही प्रतिमाच आपणास ह्यानंतर स्थिरावलेली दिसते.

वस्तुतः संतांच्याही साधकावस्थेत परमेश्वर-साक्षात्कारावस्था तशी दुर्मिळच म्हणावी लागते. म्हणूनच तर तिचे संतमनास अपरुप वाटते. सगुण साक्षात्कारासाठी तळमळणे, त्याची अखंड मार्गप्रतिक्षा करणे, त्यासाठी अस्वस्थ होणे, स्वतःस किंवा ईश्वरास बोल लावणे इत्यादी गोष्टी संतकाव्यात वारंवार दिसतात.

जनाबाईच्या कवितेत मात्र परमेश्वर वियोगाच्या उदासीनतेपेक्षा मीलनाची बेहोषीच अधिक जाणवते. आपलया सख्यभक्तीने जनाबाईंनी श्रीकृष्णास जणू जिंकले आहे. कारण त्याचे रहस्य पूर्णतः जनाबाईंना उमजले आहे. त्यामुळे आता कृष्णच जनाबाईंच्या आधीन झाला आहे. कृष्णाचे आता जनाबाईंपुढे काहीच चालेनासे झाले आहे.

"माझा लोभ नाहीं देवा । तुझी करीं ना मी सेवा ॥१॥
नाहीं अंगीं थोरपण । मिथ्या धरिसी गुमान ॥२॥
रागा येऊनि काय करिसी । तुझें बळ आम्हांपाशीं ॥३॥
नाही सामर्थ्य तुज हरी । जनी म्हणे धरिला चोरी ॥४॥" (अ. क्र. २३८)

"बाळे भोळे ठकविशी । तें तंव न चाले आम्हांपाशीं ॥१॥
गर्व धरिसी नामाचा । सोहं सोहं गर्जे वाचा ॥२॥
आशा तृष्णा तुम्हांपाशीं । नाही म्हणे जनी दासी ॥३॥" (अ. क्र. २४१)

वस्तुतः भक्तशिरोमणी नामदेवांनीही आपल्या बालसदृश निर्व्याजतेने श्रीकृष्णाशी असेच सख्यत्वाचे नाते जोडले होते. नामदेवांच्या सगुणभक्तीचा सख्यभक्ती हा मूलाधार होता. गोकुळातील बाळ गोपाळांचा श्रीकृष्णविषयक असणारा सख्यभावच नामदेवांनी आपल्या अभंगांतून अनुभवरुपाने प्रकट केला. त्याचा संस्कार जनाबाईंच्या वरील अभंगावर झाल्याचे जाणवते. तथापि जनाबाई नामदेवांच्या सगुणभक्तीच्या ह्या वळणाला केवळ स्पर्श करून स्वतःच्या समर्थ

भक्तीची अभिनव दिशा चोखाळतात आणि नामदेवांच्या सख्यभक्तीत अपूर्व, अद्भुत आणि मौलिक भर घालतात.

पंढरीचा विठ्ठल आपल्या भक्तवत्सलतेसंबंधाने प्रसिद्ध आहे. श्रीकृष्णाची पंढरीनाथ, पांडुरंग वा विठ्ठल ही रूढ झालेली नावेही त्याची भक्तांविषयीची उत्कट प्रीती दर्शविणारी आहेत. पुंडलिकाने श्रीकृष्णाला आपल्या अलौकिक भक्तीने जिंकले आणि श्रीकृष्णाच्या भक्तवत्सलतेच्या अनुभूतीनेच विटेवर तिष्ठावयास लावले. मात्र पुंडलिकाने हे सर्व केवळ आत्मोद्धारासाठी केले नव्हते. त्यामागे विश्वोद्धाराची, केवळ महापुरुषाच्या मनातच जन्मणारी प्रेरणा होती. त्यानेच ह्या विठ्ठलाला चंद्रभागेच्या तीरावर अठ्ठावीस युगे भक्तजनांच्या उद्धारार्थ विटेवर उभे राहण्यास भाग पाडले. असा हा पंढरीनाथ म्हणजे गोकुळातील श्रीकृष्णाचे बालरूप होय. हा गोकुळवासी गोपाळांचा जिवलग सखा आहे. सख्यभक्ती हा गोकुळातील श्रीकृष्णचरित्राचा स्थायिभाव आहे. गोपक्रीडा हा त्याचा छंद आहे आणि दुःखनिवारण वा संकटनिवारण हा त्याचा हेतू आहे.

संत नामदेवांप्रमाणेच जनाबाईही श्रीकृष्णाच्या मनातील भक्तांविषयीचा प्रेमभाव जाणतात. त्यामुळे त्या गोकुळातील गोपांच्या भूमिकेतून श्रीकृष्णविषयक सख्यभावही जगू पाहतात. नामदेवांच्या अनुभवाने संस्कारीत केलेला जनाबाईंचा पुढील अभंग यादृष्टीने बोलका आहे.

''धरिला पंढरीचा चोर । गळां बांधोनिया दोर ॥१॥
हृदय बंदिखाना केला । आंत विठ्ठल कोंडिला ॥२॥
शब्दें केली जवाजुडी । विठ्ठल पायीं घातली बेडी ॥३॥
सोहं शब्दाचा मारा केला । विठ्ठल काकुलती आला ॥४॥
जनी म्हणे बा विठ्ठला । जीवें न सोडी मी तुला ॥५॥'' (अ. क्र. ३१६)

जनाबाईंनी विठ्ठलास आपल्या हृदयबंदिखान्यात असे कोंडले आहे की विठ्ठलाने काकुळती यावे. आता विठ्ठल स्वतःच जनाबाईंचा दास झाला. जनाबाई वागवतील तसा तो दास्यभावाने वागत आहे. क्वचित जनाबाईंचा रागही सहन करीत आहे. मात्र तो खरा नाही. कृतक आहे.

''अरे विठ्या विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ॥
तुझी रांड रंडकी जाली । जन्म सावित्री चुडा ल्याली ॥
तुझें गेलें मढें । तुला पाहून काळ रडे ॥
उभी राहूनि आंगणीं । शिव्या देत दासी जनी ॥'' (१६३)

अशी ही विरोधभक्ती संतजनात केवळ जनाबाईंच करू शकल्या.

### ऊ - दैनंदिन श्रमजीवनातील सगुण साक्षात्कार

मराठीतील सर्व संतकवींच्या अनुभवविश्वापेक्षा जनाबाईंच्या कवितेतील अनुभवविश्वाचे वेगळेपण त्यांच्या वास्तवाधिष्ठित स्वरुपात दडलेले आहे. जनाबाई आपल्या आध्यात्मिक जीवनातही आपले जीवनवास्तव विसरू शकत नाहीत. कारण जनाबाईंचे अवघे जीवनच कष्टमय आहे. जनाबाईंचे नामदेवांच्या कुटुंबातील स्थान हे कुटुंबासाठी अहोरात्र कष्ट उपसणाऱ्या एका उपेक्षित श्रमिकेचे आहे. एरवी नामदेवांच्या भक्तिमंदिराची ती द्वारपालिका आहे.

जनाबाईंच्या अभंगांतून प्रकटतात ते एकसारखे कष्ट करणारे त्यांचे हात. हे हात दळत असतात किंवा कांडत असतात. झाडलोट करीत असतात अथवा सडा सारवण करीत असतात. घागर घेऊन पाणवठ्यावर जात असतात, धुणे धूत असतात, सडा शिंपत असतात किंवा रानात शेणी वेचीत असतात. विशेष म्हणजे हे सर्व चालू असतानाच जनाबाईंचे ईश्वरस्मरण, चिंतन आणि आत्मनिवेदनही अखंडपणे सुरू असते. आपल्या ह्या वास्तव श्रमिक जीवनाच्या भाषेतच जनाबाई आपल्या भक्तिभावांचा आविष्कार करीत राहतात हे विशेष. त्यामुळे जनाबाईंची अभंगवाणी त्यांच्या ह्या लौकिक वास्तव जीवनास अनुसरत राहते. जनाबाईंच्या कष्टांच्या, व्यथावेदनांच्या नोंदी त्यांच्या अभंगांत आढळतात. कारण अशा प्रकारच्या शारिरीक कष्टांतून जनाबाईंची सुटका होण्याची शक्यता नसतेच. त्यामुळे जनाबाई विठ्ठलाचा अखंड धावा करतात. करुणा भाकतात. आपल्या दुःखमय जीवनाची त्यास कहाणी निवेदन करतात.

जनाबाईंच्या भक्तिप्रेमाने त्यांच्या आधीन झालेला विठ्ठल मग जनाबाईंच्या साहाय्यार्थ धावून जातो. कारण तो भक्तवत्सल आहे. भक्तांसाठी तिष्ठणारा आहे. दीन, दुःखी भक्तजनांच्या उद्धारासाठीच तर त्याचे अस्तित्व आहे. नव्हे तोच त्याचा अवतारहेतूही आहे. तो केवळ पुराणोक्त भक्तजनांसाठीच अवतरला असे नव्हे. जनाबाईंसारख्या दासीसाठीही तो धावून जातो. जनाबाईही हे उमजून आहेत. जनाबाईंचे कधीही न संपणारे काम आणि त्यांच्यासाठी तिष्ठणारा, त्यांचे श्रम हलके व्हावे म्हणून सतत कामात हातभार लावणारा चक्रपाणी हे त्यांच्या अभंगांतील नित्यपरिचयाचे दृश्य ठरते. जनाबाई आणि चक्रपाणी यांच्यामधील हे नाते थेट, अभिजात आणि स्वतंत्र वाटते ते त्यामुळेच.

''झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ॥१॥
पाटी घेऊनि डोईवरी । नेऊनिया टाकी दुरी ॥२॥
ऐसा भक्तीसी भुलला । नीच कामें करू लागला ॥३॥
जनी म्हणे बा विठ्ठला । काय उतराई होऊं तुला ॥४॥'' (अ. क्र. २१९)

''साळी कांडायास काढी । चक्रपाणी उखळ झाडी ॥१॥
कांडिता कांडिता । शीण आला पंढरिनाथा ॥२॥
कांडीताना घाम आला । तेणें पितांबर भिजला ॥३॥
पायीं पैंजण हातीं कडी । कोंडा पाखडोनि काढी ॥४॥
हाता आला असे फोड । जनी म्हणे मुसळ सोड ॥५॥'' (अ. क्र. २२६)

''धुणे घेऊनि कांखेसी । जनी गेली उपवासी ॥१॥
मागे विठ्ठल धांवला । म्हणें कां टाकिलें मला ॥२॥
धाऊनी देवा कां आलासी । म्हणे नामयाची दासी ॥३॥
खाली घालुनिया मान । मागें चालले जगजीवन ॥४॥'' (अ. क्र. २६२)

''जनी जाय शेणासाठी । उभा आहे तिच्या पाठी ॥१॥
पितांबराची कांस खोवी । मागे चाले जनाबाई ॥२॥
गौऱ्या वेचुनि बांधिली मोट । जनी म्हणे द्यावी गाठ ॥३॥
मोट उचलून डोई घेई । मागे चाले जनाबाई ॥४॥'' (अ. क्र. २६३)

''राना गेली शेणीसाठीं । वेचूं लागे विठो पाठीं ॥१॥
पितांबर ओंचे खोंवी । पायी शोभा पारखावी ॥२॥
पूर्ण भरोनियां मोट । जनी म्हणे द्यावी गांठ ॥३॥'' (अ. क्र. २६४)

''जनी जाय पाणीयासीं । मागे धांवे हृषिकेशी ॥१॥
पाय भिजों नेदी हात । माथां घागरी वहात ॥२॥
पाणी रांजणांत भरी । सडा सारवण करी ॥३॥
धुणे धुऊनियां आणी । म्हणे नामयाची जनी ॥४॥'' (अ. क्र. २६८)

''जाय जाय राउळासी । नको येऊं आम्हांपाशीं ॥
जाऊं आम्हीं बरोबर । जाला तिचा हो चाकर ॥
तिज संगे काम करी । ऐसें जाणा देव हरी ॥
चहूं हाती धुणें केलें । जनी म्हणे बरे जाले ॥'' (अ. क्र. २६०)

भक्तवत्सल श्रीचक्रपाणीलाहीं अहोरात्र कष्ट उपसणाऱ्या जनाबाईंची भेट घ्यायची, तर तिच्या कामांत साहाय्य करावे लागते. विठ्ठलाशी हितगुज करतानाही जनाबाईंचे काम सुरूच असते. त्यामुळे जनाबाई झाडलोट करीत असल्या, तर देव केर भरू लागतो. तिने साळी सडावयास घेतल्या, तर देव पुढे जाऊन उखळ झाडतो. पायांत पैंजण आणि हातांत कडी असणारी श्रीकृष्णाची मूर्ती जनाबाईंजवळ कोंडा पाखडत बसलेली दिसते. कधी जनाबाई काखोंटीस धुण्याचे गाठोडे घेऊन

उपाशीच नदीकडे निघते. तेव्हा कळवळून श्रीकृष्ण तिच्या मागे धावतो. आपल्या चहूहातांनी तो जनाबाईंचे धुणे धुऊन टाकतो. आणि जनाबाईंचे श्रम हलके करतो. सडासारवणासाठी जनाबाईंना कधी शेण गोळा करावे लागते. तेव्हाही पीतांबराचे ओचे खोवून श्रीहरी तिच्यामागे मागे चालत राहतो. तर कधी तिच्यासह रानोमाळ शेण्या गोळा करीत भ्रमंती करीत राहतो. वेचलेल्या गोवऱ्या वस्त्रात गोळा करून त्यांची मोट बांधतो. ह्या मोटेला गाठ कशी द्यावी हेही जनाबाईच त्यास शिकवितात. त्यानुसार चक्रपाणी मोट घट्ट बांधून चांगलीच गाठ देतो. आणि ही मोट डोक्यावर घेऊन जनाबाईंच्या मागोमाग चालत राहतो. अशा वेळी ओचे बांधलेल्या चक्रपाणीचे सुंदर गोजिरे पाय उघडे पडतात. जनाबाई तेव्हा त्याच्या चरणाची शोभा न्याहाळतच राहतात. पाण्यासाठी नदीवर जावे लागते तेही जनाबाईंनाच. घागर घेऊन नदीकडे निघालेल्या जनाबाईंच्या मागे धाव घेतो तोही हा हृषिकेशच. तोच नदीच्या प्रवाहात उतरतो. घागरी भरतो. मात्र असे करताना आपले हात पायही देव भिजू देत नाही, हे केवढे आश्चर्य! देवच मग भरलेल्या घागरी डोक्यावर वाहात नामदेवांच्या घरातील रांजण भरतो. वेळप्रसंगी सडा सारवण करण्यासही तो मागेपुढे पाहात नाही. अशाप्रकारे कधीही न संपणारे जनाबाईंचे काम आणि ते लवकर संपावे म्हणून सतत तिच्यासाठी कष्टणारा श्रीहरी हा वरील अभंगांतील अनुभवविश्वाचा केंद्रबिंदू झाला आहे. भक्तांचा भक्तच नव्हे तर दासही झालेला श्रीकृष्ण जनाबाईंच्या अनुभवविश्वात आपल्या सतत दृष्टीस पडतो. श्रीकृष्णाच्या भक्तवत्सलतेला स्वजीवनाचा एक नवाच संदर्भ देऊन जनाबाईंनी श्रीकृष्णाची पुराणोक्त भक्तवत्सलता स्वकालीन वास्तवात रुजविण्याचे काव्यात्म मौलिक कार्य केले आहे. यादवकालीन वारकरी संप्रदायाच्या भक्तिसाधनेतील सगुण ईश्वराच्या संकल्पनेची जडणघडण करण्याचे अत्यंत मौलिक कार्य भक्तश्रेष्ठ संत नामदेवांनी आरंभिले होते. त्यात संत जनाबाईंचेही महत्त्वाचे योगदान आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

## ए - जनाबाईंची सगुण ईश्वरविषयक संकल्पना

जनाबाईंनी देव असा पूर्णार्थाने कष्टसाध्य केला आहे. एका अनामिक भाग्यशाली क्षणी विठ्ठल आपल्या मागे सावलीसारखा वावरत असल्याची साक्ष जनाबाईंना पटली. तो क्षण त्यांच्या आध्यात्मिक जीवनात क्रांती करणारा ठरला. जनाबाईंना त्यांचा विठ्ठल सापडला आणि त्यांच्या लौकिक आणि आध्यात्मिक जीवनाची कळाच पालटली. त्यांच्या भावजीवनातही परिवर्तन झाले. विठ्ठलाचा लाभ होताच स्वत:स नामदेवांची दासी असे म्हणवून घेण्यातील अर्थशून्यता त्यांना जाणवू लागली.

''पूर्वी काय तप नेणें पैं हो केलें । निधान जोडिलें पंढरीचे ॥
येऊनियां देव दळू लागे अंगे । रखुमाईचा संग दूर केला ॥
तैसाचि पैं संगे येऊनि बाहेरी । वेंचोनियां भरी शेणी अंगें ॥
ओझें जालें म्हणोनि पाठी पितांबरीं । घेऊनियां घरीं आणितसे ॥
ऐसे जेथें काम करी चक्रपाणि । तेथें कैची जनी नामयाची ॥'' (अ. क्र. २२०)

जनाबाईंनी असे आपल्या उत्कट भक्तिभावामुळे आणि कठोर श्रमजीवनामुळे भक्तवत्सल विठ्ठलास पूर्णतः आपलेसे केले आहे. जनाबाईंसाठी विठ्ठलाने रखुमाईचा संग दूर केला, ह्या जनाबाईंच्या मनोधारणेतच त्यांच्या स्वप्नसृष्टीचे मूळ दडले आहे असे वाटते. आता देवानेच जेथे जनाबाईंचे दास्य स्वीकारले, तेथे जनाबाई नामदेवांची दासी तरी कशी असू शकेल?

आपल्या मनातील भावनिक आंदोलनांचा मागोवा घेत अखंड वाटचाल करणाऱ्या जनाबाई त्यांच्या अभंगांत आपणास सतत दिसतात. आपल्या उत्कट, उत्स्फूर्त अशा अनुभवांचा आपल्या दैनंदिन जीवनाच्या भाषेत आविष्कार करणे त्यांना पुरेसे वाटत नाही. त्या अनुभवाचा अर्थ लावीत राहणे हा जनाबाईंच्या मनास जडलेला छंद आहे. ह्या अर्थप्रक्रियेतून जनाबाईंच्या जाणिवा संघटित होतात. आणि त्यामधून त्यांच्या मनाचा विकास होऊ लागतो. त्यामुळे जनाबाईंची कविता नित्यनूतन तर वाटतेच, पण अखंड विकसनशीलही ठरते.

जनाबाईंच्या ईश्वरविषयक जाणिवेतही असेच विकसन प्रत्ययास येते. नव्या जाणिवांबरोबर आपल्या परमेश्वरविषयक भूमिकेची त्या नव्याने मांडणी करू लागतात. केवळ ईश्वरविषयकच नव्हे, तर एकूणच आपल्या आध्यात्मिक प्रवासाकडे साक्षेपी वृत्तीने पाहतात. 'नामयाची दासी' असे स्वतःला संबोधण्यात अभिमान बाळगणाऱ्या जनाबाई 'ऐसे जेथें काम करी चक्रपाणि । तेथे कैची जनी नामयाची ।' असे स्वतःलाच विचारू लागतात. जनाबाईंच्या भूमिकेतील हे विकसन लक्षणीयच नाही तर मौलिकही ठरावे.

वस्तुतः जनाबाईंची ईश्वरविषयक कल्पना संत नामदेवांच्या ईश्वरविषयक कल्पनेवरच मूलतः आधारलेली आहे. यादवकालीन मराठी कवितेच्या आद्य पर्वातील अभंगसृष्टीत श्रीकृष्णाचे मानुषीकरण प्रथम केले ते आद्य अभंगकार संत नामदेवांनी. मात्र नामदेवांचा हा देव एकाच वेळी लौकिक आहे, तसा अलौकिकही आहे. त्याच्या भोवतीचे अद्‌भुततेचे पुराणोक्त स्वरुप नामदेव अबाधित राखतात हे विशेष.

तसा तर जनाबाईंच्या अभंगांतही श्रीकृष्ण हा पीतांबरधारीच असतो. त्याला चार भुजा असतात. त्याने सर्व लेणी परिधान केलेली असतात. श्रीकृष्णाचे पुराणांनी

वर्णिलेले रूप अबाधित राखून जनाबाईही त्याचे पूर्णतः मानुषीकरण करतात. महदंबेपासून श्रीकृष्णाच्या मानुषीकरणाची चाललेली प्रक्रिया अखेर जनाबाईंच्या अभंगात जणू पूर्णत्व पावते. जनाबाईंच्या अभंगांतील ईश्वर असा पूर्ण माणसाळलेला दिसतो. याचे प्रमुख कारण संत जनाबाईंनी जोपासलेले स्वतःचे माणूसपण होय. अशाप्रकारे नामदेव आणि जनाबाई यांच्या ईश्वरविषयक संकल्पना परस्परपूरकच नव्हे तर संवादीही ठरतात. नामदेव आणि जनाबाई ह्या दोघांनीही विठ्ठलास जिंकून त्यास स्वतःचे अनुसरण करण्यास भाग पाडले आहे. नामदेवांनी आपल्या अत्युत्कट बालसदृश मनाच्या नेणीवयुक्त भक्तीने श्रीकृष्णास जिंकले आहे, तर जनाबाईंनी आपल्या एकाकीपणाने आणि श्रमजीवनातील आपल्या व्यथा-वेदनेने भक्तवत्सल देवास जिंकले आहे. नामदेव बालभक्तीने देव आपलासा करतात, तर जनाबाई सख्यभक्तीने. नामदेवांच्या उत्कट भक्तीचा मूळ स्रोत नेणिवेत आहे. तर जनाबाईंच्या सख्यभक्तीचा उगम जाणिवेत आहे. अशा प्रकारे जनाबाईंच्या सख्यभक्तीने नामदेवांच्या बालसदृश मनाच्या भक्तीच्याही पुढे एक पाऊल टाकले आहे.

जनाबाईंनी ईश्वराभोवतीचे अद्‌भुततेचे वलय पुसून टाकून त्यास सामान्य श्रमजीवी माणसाच्या अतिवास्तवाच्या पातळीवरच अखंड वावरण्यास भाग पाडले आहे. लौकिकाला अलौकिक पातळीवर नेण्यापेक्षा जनाबाई अलौकिकालाच लौकिकाच्या पातळीवर अवतरण्यास भाग पाडतात. आपल्या साक्षात्कारी संतत्वाविषयी त्यांनी कुठेही अवाजवी जाणीव व्यक्त केली नाही. तसेच ईश्वराकडूनही स्वतःचा गौरव करवून घेतला नाही. नामदेवांच्या अभंगांत मात्र असा ईश्वराकरवी स्वतःचा गौरव करवून घेतलेला दिसतो. ईश्वराचे अस्तित्व भक्तावरच अवलंबून आहे हे भक्तश्रेष्ठ नामदेवांना त्यातून सूचित करावयाचे असते. जनाबाई मात्र श्रीकृष्णाची भक्तवत्सलताच आपल्या अभंगांतून गौरवत राहतात. अखंड काबाडकष्ट करणाऱ्या श्रमिकांनाही परमेश्वर अविचल भक्तीने आत्मसात करता येतो. केवळ नामस्मरणानेही आत्मोद्धार करता येतो याचे जनाबाई आश्वासन देतात. सामान्यजनांच्या मनात आत्मोद्धारासंबंधी आशावाद निर्माण करून जनाबाईंनी आपले संतत्व सिद्ध केले आहे.

जनाबाईंच्या अभंगसृष्टीकडे सूक्ष्म दृष्टीने पाहता त्या ईश्वरामध्ये मनुष्यरुप पाहतात असे म्हणण्यापेक्षा मनुष्यातच ईश्वररुप पाहतात असे म्हणावेसे वाटते. संत ज्ञानेश्वरांनी पुरस्कारिलेली आणि वारकरी संतांनी आत्मसात करून उपदेशिलेली समदृष्टी संत जनाबाई ईश्वरात माणूस आणि माणसात ईश्वर अनुभवून आचरतात ही अत्यंत महत्त्वाची बाब होय.

''आता पुरे हा संसार । कोठें फेडुं उपकार ॥
सांडुनियां थोरपण । करी दळणकांडण ॥
नारिरुप होऊनी हरी । माझें न्हाणें धुणें करी ॥'' (२६१)

जनाबाईंचे हे उद्‌गार त्यामुळे सूचक ठरतात.

## ऐ - जनाबाईंच्या साक्षात्कारी सख्यभक्तीचे मधुराभक्तीत झालेले गूढरम्य परिवर्तन

आपल्या आजुबाजूस वावरणारी व आपल्या दैनंदिन कष्टमय जीवनात साहाय्य करणारी माणसे ही ईश्वराचीच रुपे आहेत ही जनाबाईंच्या मनाची दृढ श्रद्धा आहे. तोच त्यांच्या कष्टमय जीवनामागील मूलाधार आहे. जनाबाईंच्या साक्षात्कारी कवितेमागील तोच एक प्रेरणास्त्रोतही आहे.

कालांतराने जनाबाईंना आपल्या अवतीभवती वावरणाऱ्या माणसांच्या जागी फक्त श्रीकृष्णच दिसू लागतो. मानवी रुपे श्रीकृष्णरुपात विसर्जित होतात. हा देव, की माणूस, असा संभ्रमही उरत नाही. श्रीकृष्णाची भक्तवत्सलताच ठायी ठायी दिसू लागते.

पण जनाबाईंचा आध्यात्मिक प्रवास येथेच थांबत नाही. जनाबाईंचे मन नामदेवप्रणित सख्यभक्तीतही हळुहळू रमेनासे होते. सख्यभक्तीचे बघता बघता प्रेमभक्तीत परिवर्तन होऊ पाहते. जनाबाईंच्या यौवनसुलभ मनाच्या पाकळ्या उलगडू लागतात. आपल्या अंतरंगातील ह्या परिवर्तनास जनाबाई उत्कट प्रतिसाद देतात हे विशेष.

विशुद्ध भक्तीचे विशुद्ध प्रीतीशी अत्यंत निकटचे नाते असते. खरे तर भक्ती म्हणजे प्रीतीच. त्यातही सख्य भक्ती प्रीतीत रुपांतर पावण्याची अतीव शक्यता असते. कारण सख्यभक्ती आणि प्रीती ह्यांत सीमारेषा नसतेच. असलीच तर ती फार धूसर व निसरडी असते.

शिवाय पुरुष-मनाची सख्यभक्ती आणि स्त्री-मनाची सख्यभक्ती ह्यांतही अंतर पडणे स्वाभाविकच ठरते. गोकुळातील गोपांचे श्रीकृष्णाशी सख्यत्वाचे नाते होते, तसे ते गोपिकांचेही होते. पण गौळणींचा शृंगारभाव वा विरहभाव अधिक उत्कट, देखणा आणि प्रभावी ठरला. कारण त्यामागे असणारे स्त्रीमन होय. स्त्रीमनाच्या भक्तिभावात प्रीतीचा परिमळ सहजत:च दाटू लागतो. भक्तीचे सख्यभक्तीत, सख्यभक्तीचे उत्कट प्रीतीत आणि प्रीतीचे कामनेत परिवर्तन होण्याची शक्यता ज्ञानेश्वरांच्या अभंगांतही प्रकटली. दासी जनीच्या कवितेत ती न प्रकटती तरच आश्चर्य!

आपल्या आध्यात्मिक जीवनाच्या प्रारंभी जनाबाई –

''राजाई गोणाई । अखंडीत तुझे पायीं ॥
मज ठेवियलें द्वारीं । नीच म्हणोनि बाहेरी ॥'' (२०७)

अशी विठ्ठलाकडे तक्रार करीत. पण कालांतराने नामदेवांच्या भक्तिमंदिराच्या ह्या द्वारपालिकेला आपली ही जागाच फलदायी ठरल्याची अनुभूती आली आणि त्यांनी पुढील जन्मातही हीच जागा आपणास लाभावी यासाठी देवास प्रार्थना केली. ती अशी-

'देवा देईं गर्भवास । तरीच पुरेच माझी आस ॥
परि हे देखा रे पंढरी । सेवा नामयाचे द्वारीं ॥
करीं पक्षि का सुकर । श्वान, श्वापद मार्जार ॥
ऐसा हेत माझे मनीं । म्हणे नामयाचे जनी ॥'' (२९६)

'गर्भरुपाने पुन:पुन्हा जन्म दे आणि पंढरीत, तेही नामदेवांच्या द्वारी स्थान दे. मग श्वान कर, पशू कर, मांजर कर अथवा पक्षी कर' ही जनाबाईनी विठ्ठलचरणी केलेली प्रार्थना आश्चर्यकारक वाटू शकते.

गंगाखेडच्या दमा ह्या शूद्राची कन्या पंढरपूर येथील दामाशेटच्या दारी येते आणि नामदेवांच्या भक्तीचे सिंचन होताच तेथे रुजते, ती कायमचीच. नामदेवांच्या घरादाराची ऊब जनाबाईंना लाभताच तिची जीवनेच्छा टवटवीत होते. सगुण भक्तीचे धडे ती येथे द्वारी असतानाच गिरवते. नामदेवांची उत्कट सगुणभक्ती हा जनाबाईंचा आदर्श त्यांना येथेच लाभतो. अशी भक्ती करावी हे त्यांचे स्वप्न नव्हे, आकांक्षाच होती. विठ्ठलाचे नामदेवांच्या घरी असलेले येणे जाणे द्वारपालिका म्हणून जनाबाईंनाच प्रथम कळते. संत ज्ञानेश्वर, निवृत्तिनाथ, सोपान, मुक्ताबाई, गोराकुंभार, चोखामेळा यांचा सहवास ह्या द्वारपालिकेला अनायासेच लाभतो. संत नामदेवांची भक्तिसाधना, संत सहवास, आदींचा लाभ झालेल्या जनाबाईंही आपली भक्तिसाधना प्रारंभित करतात. संतांच्या गुजगोष्टी ऐकतात. त्यांच्या साक्षात्कारी अनुभवविश्वाशी त्या समरस पावता पावता एकरुप होतात. त्यांना नामदेवांच्या घरात अखंड वावर असणाऱ्या विठ्ठलाचेही अपरुप वाटेनासे होते. त्यांच्या विठ्ठलाशी गाठीभेटी वाढतात. संवाद नित्याचाच होतो. जनाबाईंची भेट घेतल्याशिवाय देवास नामदेवांच्या घरात प्रवेशच नसतो. बाहेरही जाताना दारात जनाबाई असतातच. कालांतराने देव आणि जनाबाई यांच्या परिचयाचे मैत्रीत, मैत्रीचे दृढ सख्यभावात रुपांतर होत जाते. नामयाची दासी विठ्ठलाची सखी बनते. तो तिला हरकामात मदत करीत राहतो. अनेकदा जनाबाई अखंड श्रमाने थकतात, कंटाळतात, त्रागाही करतात. देवावर रागाने कठोर शब्दांचे आघात करतात. जनाबाईंच्या काबाडकष्टांत

देव साहाय्य करतो. पण हे सारे का घडावे? देवाने जनाबाईंना शूद्र, अनाथ, निराश्रय केले म्हणूनच ना? देव जनाबाईंचा त्रागा उमजतो. खाली मान घालून अपराध्यासारखा त्यांच्या मागे तरीही चालत राहतो. जनाबाईंचे प्रेम द्विगुणीत होते.

आता विठ्ठलास जनाबाईंवाचून करमेनासे होते. तसेच जनाबाईंनाही देवावाचून करमत नाही. हा नाजुक, हळवा प्रेमभाव आहे, हे दोघेही उमजतात. त्यांना तो उघड तर करता येत नाही. मग जनाबाई आणि देव यांच्या रात्री-अपरात्री चोरून भेटी होऊ लागतात. जनाबाईंवर नितांत प्रेम करणारा देव आता पदोपदी जनाबाईंच्या साक्षात्कारी अभंगसृष्टीत दिसू लागतो.

''जनी बैसली न्हायाला । पाणी नाहीं विसणाला ॥
घागर घेऊनी हातांत । पाणी आणी दिनानाथ ॥
करुनियां येरझार । पाणी भरी सारंगधर ॥
पुरे पुरे रे विठ्ठला । जनिचा अंतरंग धाला ॥'' (२२३)

''एके दिवशी न्हावयास । पाणी नव्हतें विसणास ॥
देव धांवोनिया आले । शीतल उदक घे घे बोले ॥
आपुल्या हातें विसणी । घाली जनींच्या डोयीं पाणी ॥
माझ्या डोईच्या केसांस । न्हाणें नव्हतें फार दिवस ॥
तेणें मुरडी केशांस । कां म्हणे उगीच बैस ॥
आपुल्या हातें वेणी घाली । जनी म्हणे माय आली ॥'' (२२४)

''तुळशीचे वनी । जनी उकलीत वेणी ॥
हातीं घेऊनिया लोणी । डोई चोळी चक्रपाणि ॥
माझे जनीला नाहीं कुणी । म्हणूनी देव घाली पाणी ॥
जनी सांगे सर्व लोकां । न्हाऊं घाली माझा सखा ॥'' (२२५)

अशा प्रकारच्या अभंगात जनाबाईंची सख्यभक्ती तर प्रकटतेच, पण त्याबरोबरच श्रीचक्रपाणीची भक्तप्रीतीही प्रकटते. जनाबाईंनी तर आता आपल्या अनुभवांतून देवविषयक पुढील सिद्धांतच सांगितला आहे.

''ज्याचा सखा हरी । त्यावर विश्व कृपा करी ॥
उणें पडों नेदी त्याचें । वारे सोसी आघाताचे ॥
तयावीण क्षणभरी । कदा आपण नव्हे दुरी ॥
आंगा आपुले ओढोनी । त्याला राखे जो निर्वाणीं ॥
ऐसा अंकित भक्तांसी । म्हणे नामयाची जनी दासी ॥'' (अ. क्र. २२७)

देव भक्तांच्या अंकित कसा होतो, यासंबंधीच्या आपल्या अनुभूती जनाबाईंनी उपरोक्त अभंगांतून साक्षात केल्या आहेत. न्हाणाऱ्या जनाबाईंना विसणाचे पाणी आणून देणारा 'दीनानाथ', घागरीने पाणी वाहून आणणारा, त्यासाठी येरझार करणारा 'सारंगधर', विसण केलेले पाणी जनाबाईंच्या माथ्यावर घालून केस मुरडून देणारा देव, तुळशीच्या वनात न्हाण्यासाठी वेणी उकलून केस मोकळे करणाऱ्या जनाबाईंच्या डोक्यास लोणी चोळून ते स्वच्छ करणारा आणि वेणीही गुंफून देणारा देव, अशी किती तरी भावचित्रे, जनाबाईंच्या ह्या साक्षात्कारी अभंगांतून विखुरलेली आहेत. ह्या भावचित्रांतील जनी आणि चक्रपाणी यांचे विशुद्ध प्रेमनाते दर्शविणारी विलोभनीय दृश्ये जनाबाईंच्या उन्मन अवस्थेवर प्रकाश टाकतात.

आता जनाबाईंचे अवघे जगच त्यांच्या भावविश्वात जणू साखळून येते. जनाबाईंची ती दिवा स्वप्ने होती असे म्हणता येईल का? पण दिवास्वप्ने असत्य कल्पनाचित्रे असतात. जनाबाईंची ही स्वप्नसृष्टी त्यांची वास्तवाधिष्ठित अद्‌भुत साक्षात्कारावस्थाच दर्शविते. प्रत्यक्ष सत्याहूनही अधिक सत्य असणाऱ्या भावसत्यांवर ती उभी आहे. कारण माणसाचे पार्थिव जीवन स्थूल ऐहिक जगात वावरत असले, तरी त्याचे अंतर्जीवन भावविश्वात सामावलेले असते. त्यामुळे जनाबाईंचे अंतर्मन अनुभवीत असलेली ही साक्षात्कारी स्वप्नसदृश अवस्था वस्तुत: साधकाच्या अध्यात्मसाधनेतील विकासाची परिसीमाच दर्शवीत असते.

त्यानंतरची प्रेमजीवनातील अंतिम मानली जाणारी ऐक्यावस्था सूचित करणारी मधुराभक्ती प्रारंभित होते. यादवकालीन संत साहित्यातील जनाबाईंची मधुराभक्ती हे सर्वाधिक अद्‌भुत आणि रहस्यमय प्रकरण ठरावे. संत ज्ञानेश्वरांच्या गौळणी विरहिणीपर अभंगांनी जनाबाईंच्या मनास अशा अनुभवसृष्टीकडे प्रवृत्त केले असेल का? का जनाबाईंच्या भक्तीने अनुभविलेले ते अद्‌भुत आहे, याचा उलगडा अजूनही कुणास करता आलेला नाही. श्रेष्ठ संत कवी ज्ञानेश्वरांची श्रीकृष्ण-प्रीती ही श्रेष्ठतम पातळीवरची असली तरी कल्पनाजन्य मनोभूमीचा आश्रय करणारी आहे. जनाबाई मात्र आपल्या सत्यभूमीवर पाय रोवूनच श्रीकृष्ण प्रेमाचा अद्‌भुत अनुभव घेतात हे विशेष! त्यामुळे ज्ञानेश्वरांच्या गौळणी विरहिणी प्रतिभाश्रित असतात. जनाबाईंच्या प्रेमकवितेत गौळणी व विरहिणीच्या मनोभूमिकांचा आश्रय करण्याची आवश्यकताच उरत नाही. जनाबाई द्वापारयुगातील एखादी गौळण वा विरहिणी होऊन आपले प्रेमभाव व्यक्त करीत नाहीत. जनाबाई जनाबाई म्हणूनच आपल्या ईश्वरविषयक ऐक्यानुभूतींचे प्रथम पुरुषी आत्मनिवेदन करीत असतात. त्यामुळे ज्ञानेश्वरांची मधुराभक्ती रुपकात्म शैलीचा आश्रय करते तर जनाबाईंच्या दृष्टीने ते सत्यकथनच असते.

## ओ - संतजीवनातील अत्युच्च शिखर

भक्तवेडा लावण्यानिधान असा श्रीकृष्ण पुरुषोत्तम आणि कृष्णवेडी, भोळीभाबडी, एकाकी तरुण जनाबाई यांच्या अखंड सहवासातून आणि नित्य नव्या भेटीगाठींतून जे घडावयाचे तेच अखेर घडते. भक्ती आणि प्रीती यांच्या सीमारेषेवरील धुके विरते आणि श्रीकृष्ण-जनाबाईंच्या उत्कट प्रेमजीवनाचे शिल्प झळाळून प्रकटते. जनाबाईंच्या व्यथा-वेदनांचे अमृत होते. उदासीनतेचे सावट दूर होते. शूद्रपणाचे ओझे गळून पडते. उपेक्षेचा आठवही होईनासा होतो. आपणही कुणास प्रिय आहोत; आपणासाठीही कुणीतरी तळमळते, आपल्या भेटीसाठी कुणी आसुसते ह्या सुखद जाणिवेने जनाबाईंचे मन मोहरले आहे. ह्या जाणिवेने त्यांचे वृत्त्यंतर होते. कुरुप कुब्जा श्रीकृष्णाच्या केवळ भक्तीनेच सौंदर्यवान होऊन श्रीकृष्णाची आवडती झाली. तिच्याच कुळात जन्मलेल्या दासी जनीचेही जणू रुपांतर होते. तीही श्रीकृष्णाची प्रिया झाली आहे. जनाबाईंच्या जीवनगाथेतील हे प्रेमजीवन म्हणजे जणू सुवर्णपान आहे. आता देव नामदेवांच्या घरी येतात. पण ते मध्यरात्री. तेही जनाबाईंसाठी. श्रीचक्रपाणी आणि जनाबाई यांच्या ह्या प्रेमसंबंधाचे नामदेव साक्षी ठरतात.

''एक प्रहर रात्र जाली । फेरी विठ्ठलाची आली ॥
नामा म्हणें जनी पाहे । द्वारीं उभा कोण आहे ॥
प्रभा घरांत दाटली । अवघी एकसरा उठली ॥
एकमेकां आलिंगन । नामा म्हणे दासी जनी धन्य ॥'' (अ. क्र. २६७)

''विठोबा चला मंदिरांत । गस्त हिंडती बाजारांत ॥
रांगोळी घातली गुलालाची । शेज म्यां केली पुष्पांची ॥
समया जळती अर्धरात्रीं । गळ्यामध्यें माळ मोत्यांची ॥
नामदेवाला सापडलें माणिक । घेतलें जनीनें हातांत ॥
घेऊनि गेली राउळांत । गस्त हिंडती हकिमाची बाजारांत ॥'' (अ. क्र. २७२)

रात्रीचा एक प्रहर झाला आहे, हीच विठ्ठलाची स्वारी नामदेवांच्या घरी येण्याची वेळ. विठ्ठल येतो. दारातच थांबतो. कारण येथेच जनाबाईंचे स्थान आहे. त्याचे असे दारीच थबकणे जनाबाईंसाठी असते. नामदेवांना हे उमगते. त्यामुळे नामदेव स्वत:च जनाबाईंना साद देतात. जनाबाई येतात. तो दारात देव थांबलेला त्यांना दिसतो. नामदेवांच्या साक्षीने देव आणि जनाबाई परस्परांना आलिंगन देतात. पण विठ्ठलाची प्रभा घरात पसरते. त्यामुळे नामदेवांचे अवघे कुटुंब जागे होते. पण

विठ्ठलाची ही भेट केवळ जनाबाईंसाठीच असते. नामदेव त्यामुळेच 'दासी जनी धन्य' असे उद्‌गार काढतात.

दुसऱ्या अभंगात जनाबाई अधिक धीट झालेल्या दिसतात. कारण त्याच विठ्ठलमंदिरात जाऊन देवास घरी चलण्यासंबंधी विनंती करताना दिसतात. आता गस्तवेळ झाली आहे. बाजारात कुणी जागे नाही. त्यामुळे विठ्ठलाने नि:शंकपणे जनीच्या मंदिरात जाण्यास हरकत नाही. जनाबाईंनी विठ्ठलाच्या स्वागताची केवढी पूर्वतयारी केली आहे! दारात गुलालाची रांगोळी घातली आहे. शेज फुलांनी सजवली आहे. शेजेजवळ दोन समया रात्रभर तेवत आहेत. जनाबाई आज अत्यंत उल्हसित आहेत. त्यांनी गळ्यात मोत्यांची माळ परिधान केली आहे. 'विठ्ठल' हे खरे तर नामदेवांना लाभलेले माणिक! पण आता जनाबाईंनीच ते हस्तगत केले आहे. जनाबाई विठ्ठलास आता आपल्या राउळात घेऊन जात आहेत. गस्त बाजारात फिरतच आहेत. जनाबाई येथे राधा वा कृष्णचरित्रातील एखाद्या गौळणीची भूमिका स्वीकारत नाहीत. आपली दासी जनी ही वास्तव भूमिकाच त्यांना मान्य आहे. जनाबाईंच्या मनास गोकुळातील श्रीकृष्ण अभिप्रेत नाही. कारण आता गोकुळाचे पंढरीत रुपांतर झाले आहे. श्रीकृष्णही आता विठ्ठरुपाने अवतरला आहे. सर्व संत हेच गोपाळ आहेत आणि राधाही मूळ राधा उरलेली नाही. ती झाली आहे जनाबाई.

### औ - दंतकथारुप पावलेली विठ्ठल-जनाबाई यांची प्रेमकथा

यानंतर येते ती एक कथा. जी आता दंतकथा होऊन राहिली आहे. विठ्ठल रात्रीचा आपल्या मंदिरात नसतोच. तो चोरून जनीच्या घरीच असतो. यासंबंधी पंढरीत कुजबूज सुरू झाली आहे. त्यातच पुढील घटना घडते-

''एके रात्रींचे समयीं । देव आले लवलाही ॥
सुखशेजें पहुडले । जनीसवें गुज बोले ॥
गुज बोलतां बोलतां । निद्रा आली अवचिता ॥
उठा उठा चक्रपाणि । उजाडलें म्हणे जनी ॥'' (२८५)

''पदक माळा सकला दे । तेथें टाकिली गोविंदे ॥
देव तांतडी निघाले । वाकळ घेऊनी पळाले ॥
भक्त येती महाद्वारीं । चोर पडले देव्हारीं ॥
नवल जाले पंढरपुरीं । देव राबे दासी घरीं ॥
त्रिभुवनात मात गेली । दासी जनी प्रगटली ॥''(२८६)

''पदक विठ्ठलाचें गेलें । ब्राह्मण म्हणती जनीनें नेलें ॥
अगे शिंपियाचे जनी । नेलें पदक दे आणुनी ॥
देवासमोर तुझें घर । तुझें येणें निरंतर ॥
म्यां नेलें नाहीं जाण । सख्या विठोबाची आण ॥
वाकळ झाडूनि पाहती । पडलें पदक घेऊनि जाती ॥
जनीवरी आली चोरी । ब्राह्मण करिती मारामारी ॥
धाविन्नले चाळीस गडी । जनीवरी पडली उडी ॥
दंडी लाविल्या काढण्या । विठोबा धांव रे धावण्या ॥
चंद्रभागें रोविला शूळ । जनाबाईस आलें मूळ ॥
हातीं टाळी वाजविती । मुखीं विठ्ठल बोलती ॥
विलंब लागला ते वेळीं । म्हणती जनीला द्या रे सुळी ॥
ऐसा येळकोट केला । जनी म्हणे विठो मेला ॥
तव सुळाचें जालें पाणी । धन्य म्हणे दासी जनी ॥'' (अ. क्र. २८७)

''अरे विठ्या विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ॥
तुझी रांड रंडकी जाली । जन्म सावित्री चुडा ल्याली ॥
तुझें गेलें मढें । तुला पाहून काळ रडे ॥
उभी राहूनि अंगणीं । शिव्या देत दासी जनी ॥'' (१६३)

एके दिवशी रात्री देव जनीच्या घरी आले. दोघेही गुजगोष्टी करीत सुखशेजेवर पहुडली. गुजगोष्टी करता करता दोघांनाही गाढ निद्रा लागली. कधी उजाडले ते कळलेच नाही. अवचित जनाबाईना जाग आली. त्यांनी तातडीने 'उठा उठा चक्रपाणी उजाडले' असे म्हणून देवाला उठविले.

तसे देव तातडीने उठले. गळ्यातील रत्नजडित पदक व अन्य अलंकार जिथल्या तिथेच टाकून शेल्याऐवजी जनाबाईची वाकळ घेऊन देव राऊळात आले. तोपर्यंत अवघे विठ्ठलभक्त महाद्वारात जमून विठ्ठलमंदिरात चोरी झाल्याबद्दल नवल करीत होते. विठ्ठल रात्रीचा जनीच्या घरी असतो व तिच्या कामात मदत करतो, ही वार्ता सर्वत्र पसरली होतीच. विठ्ठल आणि दासी जनी यांच्यातील नाजुक आणि चोरट्या प्रेमनात्याचा अखेर गौप्यस्फोट झाला.

भक्तजनात विठ्ठलाचे पदक चोरीस गेल्याची चर्चा सुरू झाली. खरे तर विठ्ठलाचीच ती सत्त्वपरीक्षा होती. पण ब्राह्मणांनी चोरीचा आळ घेतला तो मात्र बिचाऱ्या जनाबाईवर! चाळीस गडी जनाबाईवर तुटून पडले! 'अगे शिंपियाचे जनी । नेलें पदक दे आणुनी ॥ देवासमोर तुझे घर । तुझे येणे निरंतर' असा त्यांनी

आरोप करताच जनाबाई विठ्ठलाची शपथ घेऊन परोपरीने सांगतात- 'म्या नेले नाही जाण । सख्या विठ्ठलाची आण' पण त्यांच्यावर कुणीही विश्वास ठेवत नाही. सर्वजण जनाबाईंच्या घराची झडती घेतात. तेव्हा वाकळ झाडताना त्यांना विठ्ठलाचे पदक सापडते. मग जनाबाईंच्या दंडांस काढण्या लावल्या जातात. जनाबाई कळवळून विठ्ठलाचा धावा करू लागतात. तोपर्यंत चंद्रभागेच्या वाळवंटात शूळ उभा केला जातो. जनाबाईंना मूळ येते. मंडळी मुखाने विठ्ठल-विठ्ठल असा जयघोष करीत आणि हाताने टाळी वाजवीत जनाबाईंसह चंद्रभागेच्या वाळवंटाकडे निघाली आहेत. जनाबाईंना येण्यास विलंब होऊ लागताच त्यांना सुळावर देण्याचा विचार सुरू होतो. जनाबाई आता त्रासून जातात. खरे तर विठ्ठलाच्या चुकीमुळेच त्यांच्यावर हा जीवघेणा प्रसंग ओढवला आहे. तो मात्र करून सवरून नामानिराळा राहतो. आपल्यावर एवढे संकट कोसळले तरी तो धाव घेत नाही, त्याचे हृदय द्रवत नाही. याचे जनाबाईंच्या मनास वैषम्य वाटते. त्या त्राग्याने म्हणतात. ''विठो मेला.'' तोच सुळाचे पाणी होते आपल्या भक्तीची देवाने सत्त्वपरीक्षाच केली. त्यातून आपली भक्तीही तावून सुलाखून निघाली. 'धन्य तो देव विठ्ठल । आणि धन्य त्याची दासी जनी'' असे जनाबाई कृतज्ञतेने आणि कृतार्थतेचे उद्गार काढतात.

## अं - यादवकालीन संतकाव्यातील मधुराभक्तीचे दोन समर्थ आविष्कार

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर आणि 'नामयाची दासी जनी' ही श्रीकृष्णाची प्रेमभक्ती करणारी यादवकालातील दोन समर्थ संतमने होत. त्यांपैकी संत ज्ञानेश्वर हे ज्ञानसूर्य अद्वैतवादी सिद्धयोगी होते. तथापि नाथसंप्रदायाने पुरस्कारिलेली श्रीकृष्णभक्ती हा त्यांना गुरुपरंपरेने लाभलेला भावसमृद्ध वारसा होता. त्यामुळेच त्यांच्या श्रीकृष्णप्रीतीत उपरोक्त सर्व संदर्भ एकवटले आहेत. नाथसंप्रदाय, योगपरंपरा, अद्वैतज्ञाननिष्ठा, स्वतः ज्ञानेश्वरांची स्फुरणवादी भूमिका, भगवद्गीता आणि भागवतनिर्मित श्रीकृष्णचरित्र आदीचे तरल व सखोल संस्कार ज्ञानेश्वरांच्या मधुराभक्तीवर विलसत राहतात. त्यामुळे त्यांच्या कवितेतील विरहिणी ज्ञानचतुर, यौगिक उंची लाभलेली, भागवतप्रणित श्रीकृष्णचरित्रात वावरणारी, सुसंस्कृत, विद्याव्यासंगी आणि महाकवीची प्रातिभ समृद्धी लाभलेली नागर नवयुवती वाटते.

तर जनाबाईंची कृष्णप्रिया ही अनागर श्रमजीवी सामान्य स्त्री वाटते. जनाबाईंच्या अभंगांतून त्यांच्या प्रेमजीवनाच्या तरल, मोहक व सूक्ष्म छटा सर्वत्र विखुरल्या आहेत. त्यातून एक प्रेमकथा साकारत जाते. जनाबाईंच्या आत्मनिवेदनातून ही कथा गतिमान चित्रमय रुप धारण करते. गोकुळातील

श्रीकृष्णाभोवती गोपगोपिकांचे जे वलय असते, त्यात नागर आणि अनागर असे श्रीकृष्णप्रेमिक आणि प्रेमिका दिसतात. वस्तुत: गोकुळवासी गोपाळकृष्णाच्या जीवनातच अनागर, उत्स्फूर्त, निर्व्याज आणि उत्कट प्रेमभक्तीचा प्रभाव जाणवतो. ही संस्कृती अनागरतेचे सर्व रुपवैभव लेऊन प्रकटते. त्यामुळे त्यात विशुद्ध प्रेमभाव ओतप्रोत भरला आहे.

श्रीकृष्णास त्याचे भक्त प्रेमाने जिंकतात, तर प्रेमिका ऐकांतिक भक्तीने जिंकतात. श्रीकृष्णाच्या भक्तवत्सलतेपुढे कोणत्याही प्रकारची विषमता टिकत नाही. स्त्री-पुरुष, बाल-वृद्ध, नागर-अनागर, श्रीमंत-गरीब, ज्ञानी-अज्ञानी, सवर्ण आणि वर्णहीन अशा भक्तांची श्रीकृष्णाभोवती नित्य मांदियाळी जमलेली दिसते. श्रीकृष्णास कुब्जा जेवढी प्रिय, तेवढीच राधा प्रिय असते. तो रुक्मिणीवरही राधेसारखेच प्रेम करतो. श्रीकृष्णाच्या ह्या अद्‌भुत लोकोत्तर समदृष्टीमुळेच त्यास संत ज्ञानेश्वरांची नागर, विद्याविभूषित योगिनी जेवढी प्रिय असते. तेवढीच जनाबाईंची अनागर श्रमिक संस्कृतीत वावरणारी दासीही प्रिय असते. जनाबाईंसाठी तो सगुण असतो आणि ज्ञानेश्वरांसाठी निर्गुण. भक्तमनानुसार श्रीकृष्ण आपले रुप सतत पालटत असतो. तो सावता माळ्यासाठी मळा शिंपतो, चोखामेळ्यासाठी गुरेढोरे ओढतो आणि जनाबाईंसाठी दळणकांडणही करतो. ज्ञानेश्वरांच्या गौळणी-विरहिणीसाठी तो तरल, धूसर, निराकाररुप होतो. तर जनाबाईंसाठी मनुष्यरुपात वावरतो. त्यास ज्ञानेश्वरांच्या गौळणीचा नागर शृंगार प्रिय आहे. सुगंधी फुलांची शेज, चंदनाची चोळी, पंचम सुस्वर, चांदण्या रात्री, शीतल रुणुझुणु वारा, मेघांचा नर्म नाद ह्या सर्वच गोष्टी कृष्णाप्रियेला आवडतात. म्हणून कृष्णालाही आवडत असतात. तो ज्ञानेश्वरांच्या विरहिणीला स्वत:चे वेगळे अस्तित्व उरू देत नाही. एवढे की गौळणीला आरशात स्वत:चे रुपही दिसेनासे होते त्याऐवजी श्रीकृष्णरुप दिसू लागते.

तर जनाबाईंशीही श्रीकृष्ण गुजगोष्टी करतो. त्यांची काहीशी अनागर ग्रामीण जीवनशैली तो आत्मसात करतो. त्यांची रांगडी भाषा त्यास रुचते. तो जनाबाईंची वाकळ पांघरतो आणि चतुर्भुज असला तरी पूर्ण मानवी रुपात द्वैतपातळीवर त्यांना प्रेमदान करतो.

# दासीपदापासून संतपदापर्यंत झालेला प्रवास

जनाबाईंचा आध्यात्मिक प्रवास सगुणभक्तीने प्रारंभित होतो, दास्यभक्ती, सख्यभक्ती आणि प्रेमभक्ती ही वळणे घेत अखेर जनाबाईंची सगुणभक्ती निर्गुणाच्या अंतिम वळणावर येऊन विश्रांत पावते.

संत जनाबाईंचे भाग्य हे की त्यांना संत नामदेवांच्या आश्रयामुळे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर, निवृत्तिनाथ आदींचा सहवास लाभला. जनाबाईंच्या साक्षात्कारी भक्तीची वार्ता ज्ञानेश्वरांपर्यंत पोहोचली. ती अशी-

''काकड आरती । करावया कमळापती ॥
भक्त मिळाले सकळ । रितें देखिलें देऊळ ॥
ज्ञानेश्वर बोले । आतां देव कोठें गेलें ॥
ठावें जाहलें अंतरीं । देव दळी जनीघरीं ॥'' (२५९)

''मग हांसोनि सकळी । पाहूं देव कैसा बळी ॥
आले नामदेवा घरीं । प्रेमें भुललासे हरी ॥
घाली जातिया वैरण । गाय आवडीचें गाणें ॥
पुढे देखे ज्ञानेश्वरा । देव जालासे घाबरा ॥
जनी म्हणे पंढरीनाथा । जाय राउळासी आतां ॥'' (२५७)

''निवृत्ती पुसत । कोठें होते पंढरीनाथ ॥
खूण कळली हृषिकेशी । सांगों नको निवृत्तीसी ॥
उत्तर दिलें ज्ञानदेवें । नवल केवढें सांगावें ॥
शिव वंदी पायवणी । न ये योगियांचे ध्यानीं ॥
द्वारीं उभे ब्रह्मादिक । गुण गाती सकळिक ॥
जनीसवें दळी देव । तिचा देखोनिया भाव ॥'' (२५८)

जनाबाईंच्या अभंगांतून त्यांचे भावचरित्र कसे प्रकटते याचा प्रत्यय वरील अभंगांतूनही येतो. त्यावरून ज्ञानेश्वरांशी जनाबाईंचे भावबंध कसे जुळून आले तेही लक्षात येते. उपरोक्त अभंगांतील प्रसंगातून जनाबाईंच्या साक्षात्कारी सगुण भक्तीचे

श्रेष्ठत्व निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वरांनाही कसे उमगले होते हे तर जाणवतेच. शिवाय त्यास उघड मान्यता देण्यातील ज्ञानेश्वरांच्या अंत:करणाची उदारता, विशालता आणि संत म्हणून असणारी त्यांची श्रेष्ठताही तीव्रतेने लक्षात येते.

एकदा काकड आरतीच्या वेळी सर्व विठ्ठलभक्त जमले. पण मंदिरात ज्ञानेश्वरांना देवच दिसेना! 'देव कोठे गेले बरे' असा ज्ञानेश्वरांना प्रश्न पडला. अंतर्यामी विचार करता विठ्ठल जनाबाईसह त्यांच्या घरी दळण करीत असल्याचे ज्ञानेश्वरांना उमजून आले. ज्ञानेश्वरांनी सकल भक्तांपुढे देव आणि जनाबाई यांच्यातील प्रेमसंबंधाचा गौप्यस्फोट केला.

विठ्ठलाच्या ह्या भक्तवत्सलतेमुळे तो भक्तांच्या किती आधीन होऊ शकतो याची उपस्थितांना कल्पना असतेच. त्यामुळे विठ्ठलाची भक्तवत्सलता त्यांच्या कौतुकाचा, काहीसा थट्टेचाही विषय बनते. विठ्ठलाची हीही चोरी पकडण्यासाठी सर्व भक्तमंडळी नामदेवांच्या घरी येतात. जनीसाठी देव कसा कष्ट करतो, याचे जणू प्रात्यक्षिकच त्यांना अनुभवावयाचे असते. संतमंडळी जनाबाईंना बोलावतात आणि जाते मांडून त्यात वैरण घालण्यास सांगतात. जनाबाई वैरण घालून दळू लागतात. विठ्ठलाच्या आवडीचे गाणेही म्हणू लागतात. पण देव काही प्रकट होत नाही. ज्ञानेश्वरादी संतांना पाहून तो भांबावतो. संकोचतो. घाबरा होतो. जनाबाईंना मात्र तो पुढे साक्षात् दिसत असतो. त्याची अशी करुणाजनक अवस्था पाहून अखेर जनाबाईच देवास राऊळात जाण्याचे सुचवितात.

मंदिरात, देव दिसू लागताच निवृत्तिनाथ ज्ञानेश्वरांना विचारतात. 'देव आतापर्यंत होता तरी कुठे?' देवास संकोच वाटत असल्याने ज्ञानेश्वरांनी आपले गुपित निवृत्तिनाथांना सांगू नये, असा देव ज्ञानेश्वरांना इशारा करतात. ज्ञानेश्वर मात्र जनाबाईंची उत्कट भक्ती पाहून देव त्यांच्याबरोबर जात्यावर दळत होता, असे सांगून भक्त म्हणून जनाबाईंच्या असणाऱ्या श्रेष्ठतेचा गौरव करतात. ''नवल केवढें सांगावें । शिव वंदी पायवणी । न ये योगियांचे ध्यानीं । द्वारीं उभे ब्रह्मादिक । गुण गाती सकळिक। जनीसवें दळी देव । तिचा देखोनिया भाव।।''

'प्रत्यक्ष शिव ज्याचे चरणतीर्थ सेवन करतो, योगीजनांना ध्यानानेही जो वश होत नाही, तो हा श्रीकृष्ण जनीचा प्रेमभक्तिभाव पाहून तिला तिच्या सर्व कामांत साहाय्य करतो. संत ज्ञानेश्वरांनी असा गौरव करून जनाबाईंना उत्स्फूर्तपणे संतपद बहाल करताच उपस्थित भक्तजनांनीही जनाबाईंचे गुणगायन केले. प्रत्यक्ष संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांकडून अशा प्रकारे जनाबाईंच्या श्रीकृष्णभक्तीस अधिकृत मान्यता मिळाली. हा जनाबाईंच्या जीवनातील कृतार्थतेचा अद्‌भुत, परमोच्च क्षण होता. जनाबाईंचे श्रेष्ठत्व अशाप्रकारे प्रथम ज्ञानेश्वरांनाच उमजले. त्यांनीच जनाबाईंना प्रथम संतपद बहाल केले. 'नामयाची दासी जनी' आता 'संत जनाबाई' झाली. जनाबाईंनी दासी पदापासून 'संत' पदापर्यंत केलेला हा प्रवास मराठी संतसाहित्यात तरी अपूर्वच म्हणावा लागेल.'

# ‘सखा माझा ज्ञानेश्वर’

भक्तशिरोमणी नामदेव आणि ज्ञानसूर्य सिद्धयोगी ज्ञानदेव यासारख्या संतांशी जनाबाईंचे भावबंध जुळून आले. नामदेवांची सगुण साक्षात्कारी भक्ती त्यांनी केवळ आत्मसात केली नाही. तर त्या मार्गावर वाटचाल करीत त्यांनी स्वत:ची वेगळी दिशा चोखाळली, देवविषयक संकल्पनेत नवी भर घातली. साक्षात्कारास नवा अर्थ दिला. आध्यात्मिक जीवनच प्रत्यक्ष दैनंदिन जीवनातील अतिवास्तवतेच्या पातळीवर आणून ठेवले. मधुराभक्तीचा सगुण-साकार आविष्कार सिद्ध केला. आणि सगुण भक्तीचे सामान्य भक्ताच्या आवाक्यातील रुप सिद्ध केले. एवढेच नव्हे तर आपल्या अभंगकाव्यातून या अनुभूती व्यक्त करून जनसामान्यांच्या भक्तिभावाचे प्रतिनिधित्वही केले. विशेष म्हणजे जनाबाईंनी हे सर्व जाणीवपूर्वकतेने साधले. नामदेवांच्या भक्तिसाधनेतील नेणिवेचा अर्थ, सामर्थ्य आणि सौंदर्य जनाबाई पुरेशा उमजून आहेत. जनाबाई आपल्या भक्तिसाधनेसंबंधाने पुरेशा जागरुकही आहेत. त्यामुळे त्यांच्या अभंगांत कुठेही भाबडेपणा, अंधश्रद्धादी उणिवा आढळत नाहीत. आपली सगुणसाधना समर्थ असल्याचा प्रबळ आत्मविश्वास त्या वेळोवेळी व्यक्त करतात. ''भक्त जें जें कर्म करिती । तें तूं सोसिसी कृपामूर्ती ॥ हें तो नवल नव्हे देवा । तूं भुललासी भक्तिभावा ॥'' (२२९) आपल्या अध्यात्मसाधनेतील सफलतेचे श्रेय जनाबाई ज्याप्रमाणे विठ्ठलाच्या भक्तवत्सलतेस देतात, त्याप्रमाणे नामदेवांसही देतात हे विशेष.

''नामयाचें ठेवणें जनीस लाभलें । धन सांपडलें विटेवरीं ॥
धन्य माझा जन्म धन्य माझा वंश । धन्य विष्णुदास स्वामी माझा ॥
कामधाम माझें विठोबाचे पाय । दिवसनिशीं माये हारपली ॥
माझ्या वडिलांचें दैवत तो हा पंढरीनाथ । तेणें माझा आर्त पुरविला ॥
संसारींचे सुख नेघे माझ्या चित्तीं । तरीच पुनरावृत्ति चुकविल्या ॥
नामयाचे जनी आनंद पैं जाला । हृदयीं बिंबला पांडुरंग ॥'' (अ.क्र. ३६०)

त्यामुळेच जनाबाईंना नामदेव आपले गुरु आहेत, आपण त्यांची दासी

आहोत याचा सार्थ अभिमान आहे.

''मी तो समर्थाची दासी । मिठी घालीन पायासी ॥
हाचि माझा दृढभाव । करीन नामाचा उत्सव ॥
आम्हा दासीचें हें काम । मुखीं विठ्ठल हरिनाम ॥
सर्व सुख पायीं लोळे । जनींसंगें विठ्ठल खेळे ॥'' (अ.क्र. ३५९)

'विठ्ठल' हे नामदेवांचे 'ठेवणे' असल्याने नामदेवांचे दासीपण स्वीकारताच ह्या ठेवण्याचा (विटेवरील विठ्ठलाचा) आपणास आयताच लाभ झाल्याचे जनाबाई घोषित करतात. एक तर जनाबाईंच्या वडिलांचे दैवतही 'विठ्ठल' हेच होते. जनाबाई ज्या विष्णुदासाची दासी होत्या, ते नामदेवही विठ्ठलभक्तीतच रंगलेले आहेत. त्यामुळे विठ्ठलचरणी स्वतःला समर्पित करणाऱ्या जनाबाईंच्या मनास विठ्ठलाशिवाय दुसरे काम, ध्यास वा छंदच उरलेला नाही. हे मन विठ्ठलभक्तीत जणू हरवून गेले आहे. एवढे की रात्र-दिवसातील भेदही जणू गळून गेला आहे.

मात्र जनाबाईंना संत ज्ञानदेवांच्या अद्वैतवादी भूमिकेचे, निर्गुणवादी दृष्टिकोणाचे आणि आत्मज्ञानाचेही तेवढेच महत्त्व वाटते. ज्ञानदेवांना अनुसरण्याचीही क्षमता संत जनाबाईंच्या अंगी आहे. त्यामुळेच ज्ञानेश्वरांच्या आत्मज्ञानानुभवांचे, अद्वैताधिष्ठित साक्षात्कारी अनुभवांचे एवढेच नव्हे तर ब्रह्मैक्यस्थितीतील योगानुभूतींचेही त्यांच्या मनास अपरूप वाटते.

त्यामुळेच नामदेवांची ही दासी ज्ञानेश्वरांच्या अनुभवविश्वात प्रवेश करते. मोठ्या आत्मविश्वासाने जनाबाई ज्ञानेश्वरांच्या अनुभवविश्वात डोकावतात. त्यांची अद्वैतवादी भूमिका समजून घेतात. ज्ञानेश्वरप्रणित 'निर्गुण' संकल्पना सगुण विरोधी नाही, हे लक्षात घेतात. सगुण आणि निर्गुण ही एकाच ईश्वरतत्त्वाची दोन आविष्काररूपे आहेत, त्यांत कोणताही अंतर्विरोध नाही, ही ज्ञानेश्वरांची भूमिका जनाबाई सहजतः उमगतात. नामदेवांप्रमाणे त्या सगुणांचा आत्यंतिक आग्रह धरीत नाहीत. निर्गुणासंबंधाने त्रागा करीत नाहीत. निर्गुणाला नकारही देत नाहीत. त्यामुळे त्यांची अद्वैतविषयक भूमिका अत्यंत सहिष्णू, स्वागतशील आणि परिपक्व वाटते. जनाबाईंची आध्यात्मिक ज्ञानलालसा, यौगिक अत्युच्च साक्षात्कारी अनुभवांविषयी त्यांच्या मनास वाटणारी ओढ आणि आत्मज्ञान प्राप्त करण्यासंबंधी त्यांची प्रयत्नशीलता यावरून त्यांच्या आध्यात्मिक जीवनाच्या कक्षा कशा रुंदावत होत्या हे लक्षात येते.

जनाबाईंना ज्ञानेश्वरांच्या सगुणसापेक्ष निर्गुणवादी भूमिकेशी असे नाते जोडावेसे वाटते, ह्यात अस्वाभाविक असे काहीच नाही. भक्ती आणि ज्ञान, सगुण आणि

निर्गुण, द्वैत आणि अद्वैत भूमिका ह्यांत मूलत: विरोध नाहीच अशी भारतीय धर्मतत्त्वज्ञानाची भूमिका आहे; त्यामुळे ''भक्त्यर्थं कल्पितं द्वैतं । अद्वैतादपि सुंदरम् ॥'' (नरहरी) अशी भारतीय धर्मशास्त्राची धारणा आहे. त्यामुळे नामदेवांच्या ह्या दासीचे मन ज्ञानेश्वरांच्या आत्मज्ञानाधिष्ठित सगुण-निर्गुणसापेक्ष अद्वैताकडे वळते. ह्यात जनाबाईच्या मनाची लवचिकता, विकसनशीलता आणि संवेदनशीलताच जाणवते. एवढेच नव्हे तर परिपूर्णतेचा त्यांच्या मनास जडलेला अखंड ध्यासही प्रत्ययास येतो.

एका सरळ ठाशीव रेषेत प्रवास करणे संत जनाबाईच्या प्रकृतीस भावत नाही. आपल्या सगुण भक्तीतही त्या अखंड जागृत, सावधान आणि विवेकनिष्ठ दृष्टी प्रकट करतात. त्यामुळे त्यांची सगुण भक्तीपर कविता आपले वेगळेपणच नव्हे तर श्रेष्ठपणाही सिद्ध करते. जनाबाईंच्या अभंगवाणीचा प्रवासही त्यामुळे एकाच दिशेने होत नाही. कारण जनाबाईंची अभंगवाणी ही त्यांच्या विलक्षण सजग, साक्षात्कारी अनुभवसृष्टीस अनुसरणारी आहे आणि हे अनुभवनिष्ठ मन सदैव परिपूर्णतेच्या दिशेने धाव घेणारे चैतन्यपूर्ण असे मन आहे.

जनाबाईंचे मन सर्वांगांनी फुलते. विलक्षण संवेदनशील, साक्षात्कारी आणि स्वागतशील अशा जनाबाईंच्या मनाला आध्यात्मिक अनुभवविश्वातील सर्व दिशांना कवेत घ्यावे असे वाटते. सगुण साक्षात्कारानुभवाप्रमाणेच निर्गुण साक्षात्कारानुभवही मौलिक वाटतात. नामदेवांच्या बालसदृश मनाची स्वप्नसृष्टी त्यांना जवळची वाटली, तरी दास्यभक्तीही त्यांनी आचरली आहे. गोपिकांनी आचरलेल्या आणि गोपाळकृष्णास प्रिय असणाऱ्या सख्यभक्तीचीही जनाबाईच्या अनुभववेड्या मनास विशेष ओढ आहे. सख्यभक्तीचा विलोभनीय आविष्कार करणारी जनाबाईंची कविता वास्तव जीवनाचे रुपाकार घेऊन प्रकटली आहे. जनाबाई स्वत:च्या वास्तवजीवनासंबंधाने विलक्षण आत्मजागृत आहेत. त्या निवेदन करतात ते अवघे अनुभव त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमनातून प्रस्फुरित झालेले असतात. त्यांचे शूद्र म्हणून उपेक्षित असणारे जीवन, त्यांची श्रमजीवी अनुभवसृष्टी, त्यातील त्यांची सुखदु:खे, घटना-प्रसंग, चढउतार, हर्ष-विमर्ष इत्यादी सर्वच अनुभूती जनाबाई आपल्या अस्सल वास्तव व दैनंदिन जीवनसरणीच्या भाषेत बोलतात. त्यामुळे त्यांची वास्तव कविताही साक्षात्कारी वाटू लागते. त्यातही विशेष म्हणजे जनाबाई ह्या मधुराभक्तीचाही आद्य आविष्कार करणाऱ्या संत कवयित्री आहेत.

अशी नितांत सुंदर सख्यभक्ती जनाबाईंनी ज्ञानेश्वरांचीही केली आहे. 'ज्ञानेश्वर' हा जनाबाईच्या अखंड कौतुकाचा, कुतुहलाचा, चिंतनाचा आणि अनुभूतीचाही विषय आहे. ज्ञानेश्वरांचे अद्‌भुत जगावेगळे जीवन तर त्यांना वंदनीय

वाटतेच. पण त्याहूनही अधिक अद्‌भुत आणि वंदनीय वाटते ते त्यांनी केलेले गीताभाष्य.

''भावअक्षराची गांठी । ब्रह्मज्ञानानें गोमटी ॥
ते हे माय ज्ञानेश्वरी । संतजना माहेश्वरी ॥'' (४०३)

''गीतेवरी आन टीका । त्यांनी वाढियेली लोकां ॥
रत्नकनक ताटामाजीं । त्याने वोगरिले कांजी ॥
एका ज्ञानेशावाचोनी । म्हणे नामयाची जनी ॥'' (४०४)

''ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ॥
मरोनियां जावें । बा माझ्या पोटीं यावें ॥
ऐसें करी माझ्या भावां । सख्या माझ्या ज्ञानदेवा ॥'' (४०५)

''मायेहूनि माय मानी । करी जिवाची ओंवाळणी ॥
परलोकींचें तारुं । म्हणे माझा ज्ञानेश्वरू ॥'' (४०६)

# सगुणसाक्षात्कारांकडून ब्रह्मैक्यस्थितीकडे झेप

संत जनाबाईंना ज्ञानेश्वरांचा जो अल्पसा सहवास लाभला त्याचे त्यांनी अमृतानुभवांत रुपांतर केले. ज्ञानेश्वर-मुक्ताबाईंच्या आत्मसाक्षात्कारी अनुभवसृष्टीचे जनाबाईंनी सूक्ष्मपणे निरीक्षण केले. ज्ञानेश्वरांच्या आत्मज्ञानानुभवांमागील भूमिका, आत्मज्ञानाची अनुभवप्रक्रिया, ज्ञान आणि योग यांचे परस्परांशी असणारे निकटवर्ती नाते, ध्यानावस्थेतील ब्रह्मैक्यस्थिती, तीत होणारे तरल आणि अद्‌भुत असे साक्षात्कार, अशा प्रकारच्या साक्षात्कारासंबंधीची परिभाषा, त्यांतील रहस्य आणि गूढता इत्यादीसंबंधाने जनाबाईंच्या मनास विशेष आस्था वाटते.

जनाबाईंच्या शूद्रपणाने त्यांना सर्वत्यागाची शिकवण दिली. त्यांच्या अनाथ-निराश्रित असण्याने त्यांना जन्मजात वैराग्याचे धडे दिले. प्रपंचाचा त्यांना स्पर्शही झाला नाही. अखंड श्रमजीवनाने अखंड नामस्मरणाची जणू त्यांना संधी दिली. उपेक्षेने त्यांच्या अहंकाराच्या मुळावरच घाव घातला. नामदेवांच्या घराच्या दारातच त्यांचे स्थान होते. त्यामुळें नामदेवांच्या कौटुंबिक संघर्षापासून, कौटुंबिक व्यथावेदनांपासून दूर असे जीवन त्या जगू शकल्या.

त्यामुळेच जनाबाईंना आपल्या कायिक, वाचिक व मानसिक शक्ती ईश्वरभक्तीवर केंद्रित करता आल्या. त्यांची सगुण विठ्ठलाशी असलेली समरसता त्याचमुळे अबाधित राहिली. त्यांची 'दळितां कांडिता' चालत असलेली भक्तिसाधना कधी भंग पावली नाही. आपल्या अखंड श्रमांतच त्यांना समाधिसुख अनुभविता आले. त्यामुळे विठ्ठलाशी त्यांनी साधलेले ऐक्य कधीच विचलित झाले नाही. पुढे पुढे तर आपल्या मनाने निर्मिलेल्या ह्या अद्‌भुत सृष्टीतच भारावलेल्या अवस्थेत त्या जगत राहिल्या. तीच त्यांची सहजस्थिती झाली. हे सर्व जनाबाईंना आपल्या साक्षात्कारी प्रतिभेमुळे, उत्कट संवेदनशीलतेमुळे, अविचल अध्यात्मनिष्ठेमुळे आणि असाधारण बौद्धिक क्षमतेमुळे साधता आले होते.

या पार्श्वभूमीवर जनाबाईंच्या जीवनात संत ज्ञानेश्वरांच्या रुपाने ज्ञान, वैराग्य, योग, संतत्व आणि कवित्व आदींचे सर्वोच्च शिखर गाठणारे अलौकिक, अद्‌भुत असे देवतुल्य व्यक्तिमत्त्व प्रवेश करते आणि जनाबाईंचे पाहता पाहता जणू रुपांतर

होते. जनाबाईंच्या एकाकी जीवनातील सर्वंकष शून्यता ज्ञानेश्वरांच्या केवळ आगमनाने भरून निघते. त्यांचे हे वृत्यंतर तीव्रतेने लक्षात आल्याशिवाय राहात नाही.

विशेष म्हणजे 'नामयाची दासी जनी' अशा स्वरुपाचा स्वत:चा उल्लेख करून आपली अभंगरचना संपविणाऱ्या जनाबाई हळूहळू 'नामदेव' विसरून केवळ आपले दासीपणाच लक्षात ठेवताना आणि अखेर हे दासीपणही विसरून आत्मानुभूतींच्या अद्‌भुत विश्वात हरखून जाताना दिसतात. त्याचा प्रत्यय देणारे जनाबाईचे पुढील अभंग पहा.

''दळूं कांडू खेळुं । सर्व पाप ताप जाळूं ॥
सर्व जीवांमध्ये पाहूं । एक आम्ही होऊनी राहूं ॥
जनी म्हणे ब्रह्म होऊं । ऐसें सर्वां घटीं पाहूं ॥'' (३१७)

''देव खाते देव पिते । देवावरी मी निजतें ॥
देव देते देव घेते । देवासवें व्यवहारितें ॥
देव येथें देव तेथें । देवाविणें नाही रितें ॥
जनी म्हणे विठाबाई । भरुनि उरलें अंतरबाही ॥'' (३२८)

प्रस्तुत अभंगांत जनाबाई आपण 'नामयाची दासी' असल्याचा उल्लेख करताना दिसत नाहीत. त्याचप्रमाणे निखळ सगुण भक्तीच्या पलीकडे त्या जाऊ पाहात आहेत हेही जाणवते. एक पाय सगुण भक्तिविश्वात आणि दुसरा निर्गुण-ज्ञानविश्वात रोवून जनाबाईंचा अभंग उभा आहे. सहजपणे जगताना सर्व पाप-ताप कसे जाळावे, सर्व जिवांमध्ये परमात्मा कसा अनुभवावा आणि ब्रह्मैक्यास्थिती कशी साधावी, यासंबंधाने जनाबाई येथे बोलत आहेत.

ब्रह्मैक्यास्थितीतील निराकार भाव अद्यापि न साधलेला. तरीही परमेश्वरतत्त्व चराचरात भरून राहिले असल्याची प्रतीती दुसऱ्या अभंगात प्रकटते. देव म्हणजे अन्न, पाणी, भूमी, वस्तू वगैरे सर्व काही. देव सर्वत्र भरून राहिला आहे. त्यामुळे जनाबाईंच्या जीवनात तो अंतर्बाह्य भरून राहिला आहे.

आत्मज्ञानातील काही नवजाणिवा जनाबाईंच्या अभंगांत आता डोकावतात. त्यावरून जनाबाईंचा आध्यात्मिक प्रवास द्वैताकडून अद्वैताकडे, सगुणाकडून निर्गुणाकडे आणि भक्तीकडून ज्ञानाकडे मोठ्या गतीने होत असल्याची सुचिन्हे दिसू लागतात. ज्ञानेश्वरांच्या सहवासातून त्यांच्या ज्ञानाचे, अनुभूतींचे आणि कवितेचे संस्कार जनाबाईंच्या मनावर झालेले येथे स्पष्ट दिसतात.

येथूनच जनाबाईंच्या आध्यात्मिक जीवनातील परिवर्तनास प्रारंभ झाला आहे.

पूर्वार्धातील भक्तीची जागा उत्तरार्धात ज्ञानानुभवांनी घेतली आहे. सगुण सापेक्ष अशी पूर्वकालीन स्वप्नसृष्टी मावळून गेली आहे. आता जनाबाईंना तिचे फारसे अपरुपही वाटेनासे होते. विठ्ठलमूर्तीत आता जनाबाई विठ्ठलतत्व अनुभवितात. अणू-परमाणूतही भरून उरणारे परमात्मतत्त्व केवळ विठ्ठलमूर्तीत कसे पाहता येईल, याचे भान जनाबाईंच्या मनास आले आहे. ईश्वर सर्वत्र आहे. ह्या नव्या जाणिवेने हरखून गेलेले त्यांचे मनच 'देव खाते । देव पिते' ह्या अभंगात बोलत आहे. जनाबाईंच्या मनात प्रवेश करून स्थिरावणाऱ्या ह्या नवजाणिवांमुळे त्यांच्या कवितेतही परिवर्तन प्रारंभित झाले आहे. आशय आणि अभिव्यक्ती अशा कवितेच्या दोन्ही प्रमुख घटकांत हे परिवर्तन जाणवते. जनाबाईंच्या कवितेची आता शब्दकळाच बदलते.

''जोड जाली रे शिवाशी । भ्रांत फिटली रे जिवाची ॥
आनंदची आनंदला । आनंद बोधचि बोधला ॥
आनंदाची लहरी उठी । ब्रह्मानंदें गिळिला पोटीं ॥
एकपण जेथें पाहीं । तेथें विज्ञप्ति उरली नाहीं ॥
ऐसी सद्‌गुरुची करणी । दासी जनी विठ्ठलचरणीं ॥'' (३२३)

''देहभाव पूर्ण जाय । तेव्हा हें धैर्य सुख होय ॥
तयां निद्रे जे निजले । भाव जागृती नाहीं आले ॥
ऐसी विश्रांति लाधली । आनंद कळा संचरली ॥
तेथें सर्वांग सुखी जालें । लिंगदेह विसरलें ॥
त्या एकीं एक होतां । दासी जनी नाहीं आतां ॥'' (३२२)

विठ्ठलास क्षणभरही न विसंबणाऱ्या जनाबाईंना आता आत्मज्ञानाने शिवतत्त्वाची जोड झाली आहे. ज्ञानयोग्यासही दुर्मिळ असणाऱ्या ब्रह्मानंदात जनाबाईंचे मन हरवून गेले आहे. आता जीवनाचे सार्थक झाले. जिवाची जन्म-मरणचक्रातून होणारी भ्रमंती संपुष्टात आली. मनातील संभ्रमावस्थेचे धुके मावळले. आता उरला आहे फक्त आनंद! अंतर्बाह्य आनंदात जनाबाई आकंठ बुडाल्या आहेत. ह्या ब्रह्यैक्यस्थितीमुळे सुख-दु:खादी सर्व विकार विलय पावले. संकल्प-विकल्पाचे महाजाल फिटले. आशा-तृष्णा मावळल्या. आनंदरुपजीव महाआनंदरुप शिवात विलय पावला. आता आनंदणार तरी कोण? आनंदच आनंदत आहे. आनंदबोधालाच आनंदबोध होत आहे. आनंदमहासागरातील लहरीही आनंदरुपच आहेत. अखेर ब्रह्मानंदात हा आनंदसागरही विलय पावतो. अशा अवस्थेत मी-तूपणा उरतोच कोठे? विठ्ठलचरणी असलेल्या जनाबाईंना ही अद्‌भुत आनंद देणारी

ब्रह्मैक्यस्थिती केवळ सद्‌गुरुमुळे प्राप्त झाली आहे. सद्‌गुरुची केवढी ही किमया!

त्यापुढील अभंगात जनाबाई ह्या ब्रह्मैक्यस्थितीचे काहीसे विश्लेषण करू पाहतात. जो आत्मज्ञानी धैर्यवान असतो, तोच ब्रह्मैक्यास्थितीपर्यंत चालत जातो. त्याचा देहभाव पूर्णतः मावळलेला असतो. आपल्या देहभावासंबंधीच्या प्रगाढ निद्रेत जणू तो निजलेलां असतो. भावजागृतीच्या अवस्थेत तो पुन्हा कधीही परतत नाही. अशी अविचल विश्रांती म्हणजे जणू समाधिस्थितीच होय. ह्या समाधीचे सुख-आनंद वेगळाच असतो. सर्वांगसुखाचा त्यामुळे लाभ होतो. एवढेच नव्हे लिंगदेहाचाही विसर पडतो. मग अशा जीव-शिव-सामरस्यात जनाबाई कुठे उरणार?

ब्रह्मैक्यास्थितीतील आनंदाचा महापूर हा एका दृष्टीने स्वरुपाचाही पूर असतो. कारण परमेश्वरतत्त्व वा ब्रह्मतत्त्व हे जिवाच्या अतीत कुठे असते? ते तर त्याच्या आत्मतत्त्वातच असते. जीवात्मा-परमात्मा यांची ऐक्यावस्था अंतरात्म्यामुळेच अनुभविता येते. तेव्हा आनंदाच्या लहरींचे खरे उगमस्थान बाह्यविश्वात नव्हे, तर अंतरात्म्यात असते. याची जनाबाईंना पुरती ओळख झाली आहे.

जनाबाई आता ज्ञानवतींच्या भाषेत बोलू लागल्या आहेत. शब्दज्ञान हे फसवे असते. म्हणून केवळ शब्दाने निर्देशिलेले ब्रह्मही लौकिक पातळीवर राहते. खरा ज्ञानी कोण अथवा विज्ञानी कोण, याचा निवाडा कोण करणार? त्यास ज्याचे त्याचे आत्मतत्त्वच साक्षी असणार. शिवाय जो खरे आत्मज्ञान प्राप्त करतो आणि आत्मसुखाने तृप्त होतो, तो तर विदेही झालेला असतो. मग तो अशी परीक्षा कशी करणार? असा आत्मज्ञानी योगी ह्या इहलोकात असूनही नसतो. त्याचे ह्या ऐहिक जगाशी कोणतेही लौकिक नाते उरत नाही. जनाबाई म्हणतात, त्यांचीही नेमकी अशीच अवस्था झाली आहे. जनाबाईंचे आत्मतत्त्व परमेश्वरातत्त्वात मिळून गेले आहे. सागरास मिळालेली नदी कधी परतते का? जनाबाईंनीही आपल्या परतीची वाट मुळातच पुसून टाकली आहे.

''शब्दांचे ब्रह्म लौकिक हो दिसे ।
जैसे ते फांसे मईंदाचे ॥
ज्ञानी तो कोण विज्ञानी तो कोण ।
दोहींचा आपण साक्षभूत ॥
स्वयें सुखें धाला आपणातें विसरला ।
तो योगि राहिला नाही येथें ॥
नामयाची जनी सागरीं मिळाली ।
परतोनि मुळीं केवि जाय? ॥'' (३२६)

जनाबाईंनी येथे अपूर्व, अलौकिक आणि अद्‌भुत असे अनुभवविश्व प्रकट केले आहे. उपरोक्त अभंगात आत्मसाक्षात्काराने हरखून गेलेल्या जनाबाईंचे आपणास दर्शन होते. सगुण साक्षात्कारानुभवांची भाषा बोलणाऱ्या जनाबाईंनी आत्मज्ञानपथावर घेतलेली गरुड झेप स्तिमित करते. पुढील अभंगातही स्वरुपाचा पूर येताच दीपून गेलेल्या जनाबाईंनी आपला अनुभव कसा शब्दांकित केला आहे ते पहा-

''नित्य हातानें वारावें । ह्रदय अंतरीं प्रेरित जावें ॥
ऐसा स्वरुपाचा पूर । आला असे नेत्रांवर ॥
स्वरुपाचा पूर आला । पाहता डोळा झांकुळला ॥
जनी म्हणे ऐसा पूर । पाहे तोचि रघुवीर ॥'' (३३२)

प्रस्तुत अभंगातून होणारे जनाबाईचे नवदर्शन स्तिमित करून टाकणारे आहे. ईश्वरास मनुष्यरुपांत पाहणाऱ्या जनाबाईंना आता स्वरुपातच ईश्वरसाक्षात्कार झाला आहे. मात्र सगुणसाक्षात्कारापेक्षा स्वरुपसाक्षात्काराचे रुप, अनुभव आणि आनंद पूर्णत: वेगळा आहे. म्हणजेच तो आकारविहीत, अरुप आणि अव्यक्त स्वरुपाचा आहे. त्याचा उगम सगुण मूर्तीत नाही, तर निर्गुण, निराकार आत्मतत्त्वात आहे. त्यामुळे तो मूर्त नाही, तर अमूर्त आहे. तसेच तो ऐंद्रिय नसून निरिंद्रिय आहे. असा हा आत्मानंद फक्त अनुभूतीचाच विषय जरी असला तरी ती अनुभूतीही अमूर्त सूक्ष्म अशीच असते. मग आत्मानंदरुप अनुभूती असते तरी कशी? निरिंद्रिय अनुभूती शब्दांतून कशी निवेदन करता येईल? कवितारुपाने ती अभिव्यक्त करता येते का? अशा प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे संत जनाबाईंनी प्रत्यक्ष अभंगरचनेनेच दिली आहेत. 'नित्य हाताने वारावे । ह्रदय अंतरी प्रेरित जावे ॥' या अभंगात त्याची प्रतीती येते. त्यावरून आत्मसाक्षात्कारातून होणाऱ्या आत्मानंदाचे स्वरुप, प्रकृती आदींचे सूचन केले जाते.

जनाबाईंच्या दृष्टीने आत्मसाक्षात्कारातून होणाऱ्या आनंदाचे स्वरुप महापुरासारखे असते. त्यातही हा महापूर प्रकाशाचा पूर यावा त्याप्रमाणे अति प्रखर, तेजस्वी आणि सर्वव्यापी स्वरुपाचा असतो. हा प्रकाशाचा पूर अंत:करणास अनावर होतो. सहवत नाही. एका हाताने त्यास प्रतिबंध करावा लागतो. ह्रदयात अंतरात तो प्रेरित करता येतो. अशा प्रकाशपुराचा स्वीकार करताना अंत:करण भांबावून जाते. घायकुतीला येते. जनाबाईंच्या तर नेत्रावरच हा प्रकाशपूर कोसळला आहे. स्वरुपाचा हा पूर पाहता पाहता जनाबाईंचे डोळे झाकळून गेले. पण तरीही त्यांनी तो अनुभविला. आत्मस्वरुपाचा महापूर अनुभविण्यास साधकाचे मन समर्थ हवे.

जनाबाईंनी हे सामर्थ्य प्राप्त केले आहे. कारण नामदेवांसारख्या भक्तशिरोमणीची जनी दासी आहे आणि ज्ञानसूर्य ज्ञानेश्वरांची ती सखी आहे. ह्या समर्थांच्या दासीने आत्मज्ञानातून आणि ऐकांतिक सगुण भक्तीतून आत्मसाक्षात्काराचा आनंद सहजतः प्राप्त केला आहे. जनाबाई म्हणतात, असा आत्मसाक्षात्काराचा महापुरासारखा घेरणारा अनुभव सामान्य साधकास लाभत नसतोच. जो समर्थ आत्मज्ञानी 'रघुवीर' असतो त्यासच हा अनुभव प्राप्त होतो.

# 'नवद्वारांतें भेदुनी । दशमद्वारीं गेली जनी ॥'

जनाबाईंचा आध्यात्मिक प्रवास येथेच थांबत नाही. यापुढे त्या यौगिक अनुभूतींनाही कवेत घेऊ पाहतात. सिद्धयोगी ज्ञानेश्वरादी भावंडांच्या अल्पकालीन सहवासात जनाबाई योगमार्गावर काही काळपर्यंत प्रवास करतात. ह्या योगी जनांच्या योगानुभूतींचे श्रवण करतात, योगनिपुणता आत्मसात करू पाहतात. योगाची परिभाषा जाणून घेतात आणि सिद्ध योगीजनांच्या अद्‌भुत विश्वात काही काळ फेरफटका मारून येतात. ह्या प्रवासातील त्यांच्या काही अनुभूती पुढील अभंगांत व्यक्त झाल्या आहेत.

''शून्यावरी शून्य पाहे । तयावरी शून्य आहे ॥
प्रथम शून्य रक्तवर्ण । त्याचे नाव अध:शून्य ॥
उर्ध्वशून्य श्वेतवर्ण । मध्यशून्य श्यामवर्ण ॥
महाशून्य वर्ण नीळ । त्यांत स्वरुप केवळ ॥
अनुहात घंटा श्रवणीं । ऐकुनी विस्मित जाहली जनी ॥'' (अ. क्र. ३३६)

''ज्योत पहा चमकली । काय सांगू त्याची बोली ॥
प्रवृत्ति निवृत्ति दोघीजणी । लीन होती त्याच्या चरणीं ॥
परा पश्यती मध्यमा । वैश्वरीची जाली सीमा ॥
चारी वाचा कुंठित जाहली । सोहं ज्योत प्रकाशली ॥
ज्योत परब्रह्मी जाणा । जनी म्हणे निरंजना ॥'' (३३७)

''ज्योत परब्रह्मीं होय । खेचरी दर्पणीनें पाहे ॥
ईडा पिंगळा सुशुम्ना । तिन्ही पाहे हृदयभुवना ॥
हळूहळू रीघ करी । सूक्ष्म हृदय अंतरीं ॥
हृदयकमळावरी जासी । जनी म्हणे मुक्त होसी ॥'' (३३८)

''रक्तवर्ण त्रिकुट स्थान । श्रीहाट पाहे श्वेतवर्ण ॥
श्यामवर्ण तें गोलाट । निळबिंदू औट पीठ ॥

वरी भ्रमरगुंफा पाहे । दशमद्वारीं गुरू आहे ॥
नवद्वारातें भेदुनी । दशमद्वारीं गेली जनी ॥'' (३३५)

येथे जनाबाई मुक्ताबाईंप्रमाणे आपल्या ब्रह्मैक्यावस्थेतील अनुभूती योगाच्या गूढ परिभाषेचा आश्रय करून प्रकट करतात, ही विलक्षण बाब होय.

नाथसंप्रदायपुरस्कृत योगमार्गात कुंडलिनी शक्तीला आत्यंतिक महत्त्वाचे स्थान आहे. 'चित्तवृत्तींचा निरोध करून त्यांचा स्वत:मध्ये लय साधून दृष्टा जेव्हा स्वस्वरुपानुभवात निमग्न होतो, तेव्हा त्याच्या स्थितीस 'योग' असे म्हणतात.' अशी पतंजली यांनी योगाची व्याख्या केली आहे. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि अशी ह्या योगाची आठ अंगे आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय, आर्जव, क्षमा, धृती, अपरिग्रह, दया, शौच आहार आणि ब्रह्मचर्य यांच्या पालनास 'यम' म्हणतात. तर नियमात संतोष, तप, साधनाभ्यास, ईश्वरप्रणिधान यांचा समावेश होतो. योगाचे तिसरे अंग 'आसन'. त्यात श्वास आत घेणे व बाहेर सोडणे असा प्राणायाम होतो. त्यातून 'अभ्यासकला' सिद्ध होते. तिलाच 'हठयोग' असे म्हणतात. प्रत्याहार, धारणा, ध्यान आदींतून 'समाधिकला' सिद्ध होते. ही समाधिकला आणि प्रारंभीची 'वैराग्यकला' यांच्या संयोगाने 'राजयोग' सिद्ध होतो.

ज्ञानेश्वर ज्या नाथपंरपरेचे पाईक आहेत, त्या परंपरेचे प्रमुख प्रवर्तक योगमार्तंड श्रीगोरक्षनाथ यांचा प्रमुख भर वैराग्य आणि 'कुंडलिनीयोगावर' आहे. कुंडलिनी ही एक सर्पाकार शक्ती आहे. ती साडेतीन वेटोळी घालून नाभीच्या खाली निद्रिस्त असते. योगप्रक्रियेत ही कुंडालिनी शक्ती जागृत होऊन मार्गस्थ होते. कुंडालिनी मूळाधार, स्वाधिष्ठान, मणिपुर, अनाहत, विशुद्ध आणि आज्ञाचक्र अशा चक्रांतून प्रवास करते. ही पिंडाची सहा चक्रे भेदून कुंडालिनी त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ भ्रमरगुंफा व ब्रह्मरंध्र ह्या ब्रह्मांड षड्चक्रांचाही भेद करते. सर्वोच्च शिखरावर सहस्त्रदलचक्राचे स्थान आहे. हेच परमात्म्याचे विश्रांतीस्थान असून त्यासच 'उन्मनीचे लावण्य' 'तुर्यचे तारुण्य' 'मोक्षाचा एकांत', 'आनंदाचे चैतन्य' आदी शब्दांत योगश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी गौरविले आहे. 'सत्रावी जीवनकला' वा 'अमृताचे तळे' ते हेच स्थान होय. येथील चंद्रामृताचे प्राशन करणे हेच योगविद्येचे प्रमुख उद्दिष्ट असते. त्याचा अनुभव घेताना योगमार्गावरील साधकाला शून्य-महाशून्याचा, अनाहतनादाचा, विविध वर्णांच्या ज्योतींचा आश्चर्यकारक प्रत्यय येतो. ह्या अद्‌भुत अनुभवांचे प्रभावी शब्दांत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत (अध्याय सहावा) व योगमालापर अभंगांत वर्णन केले आहे. मुक्ताबाई तर श्रेष्ठ योगिनीच होत्या. त्यांच्या समग्र अभंगवाणीचे प्रमुख लक्ष्य 'शिवशक्तिसामरस्य' हेच होते.

मुक्ताबाईही नाथसंप्रदायाच्या अधिकारी भाष्यकार आहेत. मुख्यत: त्यांची 'योगिनी' हीच प्रतिमा आहे. आपल्या अल्पसंख्य अभंगरचनांतून मुक्ताबाईंनी आपली मुक्तावस्था आणि योगपथावरील गूढ साक्षात्कार यांना अभिव्यक्त करण्याचा केलेला प्रयत्न अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

जनाबाई आणि मुक्ताबाई ह्या दोघीही समकालीन श्रेष्ठ कवयित्री. दोघीही एकाच वारकरी संप्रदायाच्या संतपरंपरेतील साक्षात्कारी संत म्हणून मान्यता पावलेल्या. परस्परांच्या सहवासात काही काळ रमलेल्या, विसावलेल्या. ह्या साहचर्यांचा जनाबाईंच्या संवेदनशील मनावर विशेष प्रभाव पडल्याचे त्यांच्या योगपर अभंगरचनांवरून जाणवते.

त्यांपैकी पहिल्या अभंगात जनाबाईंनी लक्ष्यवस्तूत चित्ताची एकाग्रता झाल्यावर येणारी अनुभूती प्रकट केली आहे. रक्तवर्णरुप अध:शून्य, श्वेतवर्ण असलेले उर्ध्वशून्य, श्यामवर्णीय मध्यशून्य ह्यांतून मार्गस्थ होत जनाबाईंचे मन अंतिम नीलवर्ण महाशून्यातील स्वरुपस्थानी विश्रांत पावले आहे. आता जनाबाईंचे मन विश्वव्यापक अनाहत नादाचे प्रतिध्वनी ऐकून विस्मित होते. दुसऱ्या अभंगात जनाबाई, निराकार, साक्षीभूत असणाऱ्या निर्गुण ब्रह्मज्योतीचा हृदयाकाशात होणारा साक्षात्कारानुभव व्यक्त करीत आहेत. ह्या निरंजन ज्योतीच्या प्रकाशातच प्रवृत्ती-निवृत्ती लीन होतात. परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी या वाणींची परिसीमा होते. जनाबाई सांगतात की निरंजन परब्रह्मज्योत म्हणजेच 'सोऽहं' ज्योत होय. तिसऱ्या अभंगात कुंडालिनी जागृत झाल्यावर सुषुम्ना नाडीतून मार्गस्थ होते आणि भूमध्यचक्रात ईडा आणि पिंगळा यांच्याशी संयोग पावते, त्यासंबंधीची अनुभूती प्रकटते. ही हृदयाकाशात प्रकटणारी ज्योत योगी खेचरी मुद्रेने पाहतात. जो योगी ही हृदयांतरीची ज्योत पाहतो, तो मुक्त होतो, असा जनाबाईंचा निर्वाळा आहे. चौथ्या अभंगात जनाबाई त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट आणि औटपीठ ही ब्रह्मांडचक्रे भेदून भ्रमरगुंफेत योगप्रक्रियेने पोहोचल्या आहेत. अशा प्रकारे पिंड आणि ब्रह्मांडाची नवचक्ररुप द्वारे उघडून जनाबाईंनी आता दशमद्वारात प्रवेश केला आहे. त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ ही महाकारणे ब्रह्माचा साक्षात्कार घडविणारी आहेत. योगाच्या अभ्यासाने स्थूल, सूक्ष्म व कारण देहांचा निरास करून महाकारणांत प्रवेश करावा लागतो. जनाबाईंच्या प्रस्तुत अभंगांवरून त्यांनी योगमार्गावर केलेली प्रगती आणि घेतलेली झेप विस्मित करून टाकते.

सगुण साक्षात्कारी भक्त असणाऱ्या संत जनाबाईंची योगविश्वातील ही गरुडझेप अद्‌भुतच नव्हे, तर अपूर्वही म्हणावी लागेल!

❀

# जनाबाईंचे सांप्रदायिक काव्यकर्तृत्व

संत जनाबाई हे मूलतः एक अभिजात भक्तमन होय. संत ज्ञानेश्वरादी योगश्रेष्ठांच्या सहवासात जनाबाई योगसिध्दीच्या दिशेने वाटचाल करतात. मात्र योगानुभूतींच्या अत्युच्च शिखरावर फार काळ विसावणे ही जनाबाईंची प्रतिभाप्रकृतीच नव्हती, त्यामुळे जनाबाई पुन्हा आपल्या अभिजात विठ्ठलभक्तीकडे वळतात, कृष्णभावात विश्रांत पावतात आणि अधिक सुजाणपणे आपल्या भक्तिभावांचा आविष्कार करू लागतात. भक्तिभावांचा एकीकडे आविष्कार करतानाच त्या दुसरीकडे सांप्रदायिक कविता लिहून भागवत संप्रदायाची जडणघडणही करतात.

नाममाहात्म्य, पंढरीमाहात्म्य आणि संत व संतसंगमाहात्म्य, ह्या संत ज्ञानदेव-नामदेवादींनी रूढ केलेल्या भागवत सांप्रदायिक काव्यविषयांचा संत जनाबाईंनीही आश्रय केला आहे. ज्ञानदेव-नामदेवांच्या समकालीन संतमंडळीत तुलनेने बहुसंख्य अभंगरचना जनाबाईंच्याच नावावर आढळते, ही बाब लक्षणीय होय. एवढेच नव्हे तर यादवकालीन संत कवयित्रींतही बहुसंख्य अभंगरचना करून आपल्या निखळ भक्तिपूर्ण काव्यकर्तृत्वाने 'श्रेष्ठ संत कवयित्री' हे पद प्राप्त करणारी कवयित्री संत जनाबाई हीच होय. विशेषतः आपल्या योगसिद्धीमुळे विख्यात असलेल्या संत मुक्ताबाईंच्या कवितेहून वेगळी अशी भावोत्कट, आत्माविष्कारप्रवण, विमुक्त, स्त्रीत्वाचा समर्थ आविष्कार करणारी, वास्तवनिष्ठ, कथानिवेदनपर आणि सांप्रदायिकतेची लेणी अंगाखांद्यावर मिरवून वारकरी संप्रदायाच्या जडणघडणीत स्वेच्छेने व जाणीवपूर्वकतेने आपले योगदान करणारी कविता फक्त संत जनाबाईंचीच दिसते. ह्या दृष्टीने संत जनाबाईही वारकरी संप्रदायाच्या एक प्रमुख उद्गात्या ठरतात. त्यामुळेच त्या उपेदशपर अभंगरचनाही अधिकारवाणीने करू शकल्या आहेत. परिणामी संत जनाबाई ह्या वारकरी संप्रदायाच्या केवळ पाईकच नव्हेत, तर जनसामान्यांची जडणघडण समर्थपणे करणाऱ्या अभिजात शिल्पकारही ठरतात. या दृष्टीनेच जनाबाईंच्या सांप्रदायिक अभंगरचनांचा विचार करणे योग्य ठरते.

## अ) पुंडलिकमाहात्म्यपर अभंगरचना

मध्ययुगीन यादव राजवटीनेच महाराष्ट्राला प्रथम अस्तित्वाचे भान दिले. तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर-नामदेवांनी वारकरी संप्रदायाच्या प्रवर्तनाने महाराष्ट्राची अस्मिता सर्वांगांनी फुलवली. श्रीमद्‌भागवत ह्या पुराणाने प्रवर्तित केलेल्या भक्तिचळवळीचाच वारकरी संप्रदाय हा देशी आविष्कार होता. पुंडलिक मुनींच्या मातृपितृ-सेवेचा उदात्त संदर्भ लाभलेल्या ईश्वरभक्तीवर लुब्ध झालेला श्रीकृष्ण ह्या पुंडलिकासाठी 'पंढरीनाथ' बनला. पुंडलिकाने आसनार्थ भिरकावलेल्या विटेवर उभा राहिल्याने श्रीकृष्ण 'विठ्ठल' झाला. अठ्ठाविस युगे लोटली. पुंडलिकाने 'विश्वाचे आर्त' मनी बाळगून ह्या पंढरीनाथास दीन, पतीत, दुःखार्त भक्तांचा केवळ दृष्टिपाताने उद्धार करण्याची प्रार्थना केली आणि पंढरीस अखंड वास्तव्य करण्यास विठ्ठलास भाग पाडले. त्यामुळेच पुढील संत-माहात्म्यांना महाराष्ट्रभूमीत भक्तीचा मळा पिकविता आला.

संतश्रेष्ठ निवृत्तिनाथांपासून जनाबाईपर्यंतचे सर्व संतसाधू महामुनी पुंडलिकाचे ऋण बाळगताहेत ते त्याचमुळे होय. पंढरीनाथाच्या दर्शनासाठी प्रथम चंद्रभागेचे तीर्थ प्राशन करून महात्मा पुंडलिकाचे दर्शन घ्यावे लागते. त्यानंतर नामदेवांच्या पायरीला स्पर्श करून निखळ भक्तीच्या मार्गावरून चालत जाऊनच पंढरीनाथास भेटावे लागते. अशाप्रकारे वारकरी संप्रदायातील भक्तप्रधानतेचे बीज ह्या पुंडलिक-श्रीकृष्ण कथेत साठवले आहे: प्रत्येक मराठी संत त्याचे संस्मरण करतो. आपल्या उत्कट भक्तीने आणि त्याहून उत्कट भक्तिकाव्याने संत जनाबाईनीही पुंडलिकाची अनन्यसाधारण भक्ती गौरविली आहे. पुंडलिकाची मातृपितृसेवापरायणता, त्यामुळे मिळवलेला अलौकिक असा अधिकार, पतितोद्धारासंबंधीची तळमळ, विश्वार्त मनात बाळगून श्रीकृष्णास पंढरीस अखंड वास्तव्य करण्याचे मागितलेले वरदान यासंबंधाने आपल्या अभंगांतून संस्मरण करून जनाबाईंनी वारकरी संप्रदायाचा आणि सांप्रदायिक कवितेचा एक संकेत दृढ केला आहे.

वारकरी संप्रदायाने पुंडलिकाचे महत्त्वपूर्ण कार्य पायाभूत ठरवले आहे. परिणामी पुंडलिकाचे माहात्म्यगायन संतकवींनी अनिवार्य आणि अवश्यमेव मानले आहे. पुंडलिक-पंढरी आणि पंढरीनाथ हे समीकरण त्यातून सिद्ध होते. पुंडलिक-माहात्म्य अपरिहार्यपणे पंढरीमाहात्म्य वा पंढरीनाथमाहात्म्य ह्यांत रुपान्तर पावते ते त्यामुळेच. संत जनाबाईच्या कवितेत ह्या सर्व गोष्टींचा प्रत्यय येतो. तो असा.

''पुंडलिक भक्तबळी । विठो आणिला भूतळीं ॥
अनंत अवतार केवळ । उभा विटेवरी सकळ ॥'' (अ. क्र. १६०)

''भक्त भला पुंडलिका । तुझ्या भावार्थाचा शिक्का ॥
भले घालूनियां कोडें । परब्रह्म दारापुढें ॥
घाव घातला निशाणीं । ख्याती केली त्रिभुवनीं ॥
जनी म्हणे पुंडलिका । धन्य तूंचि तिन्हीं लोकां ॥'' (अ. क्र. १६१)

''पंढरींचे सुख पुंडलिकासी आलें । तेणें हे वाढिलें भक्तालागीं ॥
भुक्ति मुक्ति वरदान दिधलें । तेंहि नाही ठेविलें आपणापाशीं ॥
उदार चक्रवर्ती बाप पुंडलिक । नामें विश्व लोक उद्धरिलें ॥'' (अ. क्र. १६२)

''पुंडलिकें नवल केलें । गोपिगोपाळ आणिले ॥
हेचि देई ऋषिकेशी । तुझें नाम अहर्निशीं ॥
नलगे आणिक प्रकार । मुखीं हरी निरंतर ॥
रुप न्याहाळिन डोळां । पुढें नाचेन वेळोवेळां ॥
सर्वांठायी तुज पाहे । ऐसें देऊनि करी साह्य ॥
धांवा करितां रात्र झाली । दासी जनीसी भेट दिली ॥'' (अ. क्र. २१८)

''भक्तामाजीं अग्रगणी । पुंडलिक महामुनी ॥
त्याचे प्रसादें तरले । साधुसंत उद्धरिले ॥
तोचि प्रसाद आम्हांसी । विटेवरी ऋषिकेशी ॥
पुंडलिक मायबाप । दासी जनी वंदी पाय ॥'' (अ. क्र. ३०४)

पुंडलिकाने आपल्या अनन्य भक्तिबलाने विठ्ठलास भूतळावर आणून विटेवर चिरकाल स्थिर केले, याकडे जनाबाई आपले लक्ष वेधतात. ज्या विष्णूचे अनेक अवतार झाले, ज्याने श्रीकृष्णावतारात अनंत लीला केल्या, त्यास केवळ एका विटेवर स्थिर उभे करणे हा पुंडलिकाचा अद्भुत पराक्रमच होय. जनाबाईंना पुंडलिकाविषयी वाटणारा आदर दुसऱ्या अभंगात व्यक्त झाला आहे. पुंडलिक धन्य भक्तश्रेष्ठ होय. त्याने श्रीविष्णूस गोपालकृष्णरुपात पंढरीस विटेवर जखडून ठेवण्याचे त्रिकालाबाधित पुण्यकर्म केले. पंढरीच्या विठ्ठलावर पुंडलिकाच्या भक्तिभावार्थाचा अमीट शिक्काच ठसला आहे. केवढे हे नवल! पुंडलिकाने गोपाळकृष्णास असे काही कोडे घातले की हे परब्रह्म थेट त्याच्याच दारापुढे त्याची वाट पाहात तिष्ठत राहावे। खरे तर भक्ताने ईश्वराची प्रतिक्षा करायची. पण पंढरीस पुंडलिकाने वेगळाच चमत्कार करून दाखवला. ह्या भक्ताने भेटीसाठी आलेल्या श्रीकृष्णरुप परब्रह्माकडे स्वागतार्थ तिष्ठत राहण्यासाठीच केवळ एक वीट भिरकावली. आणि त्याच्याकडे पाठ फिरवून तो आईवडिलांची सेवा करण्यात मग्न

झाला. पुंडलिकाने ईश्वराचे वरदान मिळविण्यापेक्षा ईश्वरासच अंकित केले. असा त्याने 'निशाणीच घाव घातला!' (१६१)

आपल्या दारी चालत आलेले परब्रह्मसुख पुंडलिकाने असे सार्वकालीन भक्तांना वाटून त्रिभुवनांत ख्याती केली. भुक्ती-मुक्तीचे वरदानही त्याने आपल्यापाशी न राखता सर्वांना देऊन टाकले. असा हा उदार पुंडलिक भक्तिसाम्राज्याचा जणू चक्रवर्तीच होय. त्याने केवळ उच्चारानेच उद्धार होईल अशी नामभक्ती जगतास दिली. (१६२)

पुंडलिकाने एक नवलच केले! गोपालकृष्णास 'पंढरी' ह्या भूलोकीच्या वैकुंठास आणले. गोपालककृष्ण येथे येताच गोपी गोपाळ कुठे जाणार? तेही पंढरीस आले. आता तेही बरे झाले. आम्हास अन्य भक्तीचे प्रकार करण्याची मुळी गरजच उरली नाही. डोळ्यांनी पंढरीनाथाचे रुप पाहात मी आता हरिनामाचा निरंतर उच्चार करीत राहीन. पंढरीनाथापुढे भक्तीने कीर्तन-नर्तन करीत राहीन. पंढरीनाथा! आता सर्वांठायी तुझेच रुप मला दिसावे, असे वरदान मला दे. (२१८)

पुंडलिक हा सर्व भक्तांत श्रेष्ठ आहे. जनसामान्य भक्तच नव्हेत तर साधुसंतही पुंडलिकाच्या ह्या प्रसादाने तरुन गेले आहेत. विटेवरील सगुण साकार परब्रह्म म्हणजे पुंडलिकाने दिलेला प्रसादच होय. तो स्वीकारून दासी जनी मायबाप पुंडलिकाच्या चरणी वंदन करीत आहे. (३०४)

## आ) पंढरीमाहात्म्य

जनाबाईंना पंढरी वाराणसीहूनही श्रेष्ठ वाटते. एका प्रदीर्घ अभंगात त्या लिहितात-

''पंढरी सांडोनि जाती वाराणसी । काय सुख त्यांसी आहे तेथें ॥
तथा पंचक्रोसीं म्हणती मरावें । मरोनियां व्हावें जीवन्मुक्त ॥
नको गा विठोबा मज धाडूं काशी । सांगेन तुजपाशीं ऐक आता ॥''

काशीच्या पंचक्रोषात मरण आले असता जीवनमुक्ती मिळते खरी, पण त्यासाठी अनंत यातनाचक्रातून जावे लागते. श्रेष्ठ अमरादिकांचेही मन त्यांतून जाताना भांबावलेले असते. पण त्यांना मुक्तीचा मोह आवरत नाही.

ही कष्टसाध्य मुक्ती पंढरीत सर्वत्र खेळते आहे. येथील संतांच्या चरणी लागताच जीवमात्रास ती लाभते. पंढरीतील पांडुरंगमंदिराच्या शिखराचे केवळ दर्शन घेताच मोक्षप्राप्ती होते हे केवढे पंढरीचे माहात्म्य! भीमा तीरावरील पुंडलिकमुनीच्या पायी लागताच मोक्षप्राप्ती होत असल्याने काशीस लाभणाऱ्या जीवनमुक्तीचे महत्त्वच उणावते. त्यामुळे पंढरीस येऊन मुक्ती शोकाकूल होते. आपले अस्तित्व

व्यर्थ होय असे वाटून ती हिरमुसते. शिवाय पंढरीत साम्राज्य करणाऱ्या मोक्षाला मुक्तीचे आगमन रुचतही नाही. तो मुक्तीला पंढरीबाहेर घालवू पाहतो. मग मात्र मुक्ती मोक्षाला शरण येते आणि त्याच्या चरणी लोळण घेते.

अशी मुक्ती आणि मोक्ष यांच्याकडे पंढरीतील संतश्रेष्ठ पाठ फिरवून केवळ विठ्ठलसन्मुख होतात. मोक्ष आणि मुक्ती म्हणजे समर्थ संतश्रेष्ठांच्या दारी प्राप्त होणारी भिक्षा होय. जनाबाई म्हणतात-

'समर्थांचे घरीं भिक्षा नानापरी । मागल्या पदरीं घालिताती ॥ अंबोल्या सांडोनी कोण मागे भीक । सामराज्याचे सुख तुझे ॥' (अ. क्र. १७७)

मोक्ष अथवा मुक्ती हा भारतीय धर्मशास्त्राने पुरस्कारिलेला अंतिम पुरुषार्थ होय. धर्म, अर्थ आणि काम हे अन्य पुरुषार्थ मोक्षसापेक्ष आणि मोक्षपर्यवसायी मानले गेले आहेत. तथापि तेराव्या शतकातील वारकरी संप्रदायाने आरंभिलेल्या भक्तिचळवळीत ह्या सर्वश्रेष्ठ मोक्ष पुरुषार्थाचेही महत्त्व गौण ठरविले. ही क्रांतिकारी बाब म्हणावी लागेल. भक्ती स्वतःच आनंदपरिपूर्ण आहे. भक्ती भक्तिविषयाहूनही अधिक मौलिक असते. कारण ती भक्ताच्या जीवनाचे सर्वांगीण उन्नयन साधते. उच्च नैतिकतेत तिचे सहज पर्यवसान होते. ती निर्भयी, निरपेक्ष आणि स्वायत्त झाल्याने भक्तिविषयावरही तिचीच अधिसत्ता प्रस्थापित होते. वारकरी संप्रदायाने भक्तीचे हे वैशिष्ट्य हेरले आणि विकसित केले. परिणामी भक्तीला स्वयंभूत्व प्राप्त झाले. सर्वच मराठी संतांनी भक्तीचे हे सामर्थ्य लक्षात घेऊन त्याचा पुरस्कार केला. संत जनाबाईंनीही भक्तीचा गुणगौरव केला आहे. अशा भक्तीचे 'पंढरी' हे माहेरघरच होय.

दुसऱ्या एका अभंगात मागणे मागताना जनाबाईंनी मोक्षापेक्षा पुनःपुन्हा गर्भवासच विठ्ठलाजवळ मागितला आहे. त्याचे कारण मनुष्यरुपाने जन्म घेऊन पुनःपुन्हा विठ्ठल-भक्तीचे सुख अनुभवावे हेच विशुद्ध भक्तीचे अंतिम ध्येय असते.

''देवा देई गर्भवास । तरीच पुरेल माझी आस ॥
परि हे देखा रे पंढरी । सेवा नामयाचे द्वारीं ॥
करीं पक्षि कां सूकर । श्वान श्वापद मार्जार ॥
ऐसा हेत माझे मनीं । म्हणे नामयाची जनी ॥'' (२९६)

जनाबाईंना पुढील जन्मही पंढरीसच व्हावा आणि नामदेवांच्या द्वारी दासी म्हणूनच असावे, मग हा जन्म मनुष्याचा असो किंवा पक्षी, सूकर, श्वान, पशू वा मांजर यांचा असो, असे वाटते. याचा अर्थ परंपरेने प्रतिष्ठित केलेला मोक्ष वा मुक्ती त्या इच्छित नाहीत. जीवनमुक्तापेक्षा निखळ भगवद्भक्त असणे श्रेष्ठ होय,

ही वारकरी संप्रदायाने जोपासलेली जाणीव त्या येथे व्यक्त करतात.

## इ) जनाबाईकृत पांडुरंग वर्णन

वारकरी संप्रदायाच्या सर्वच संतांनी पंढरीनाथाची रेखीव वर्णने केली आहेत. ही विठ्ठलमूर्ती संतांच्या दृष्टीने केवळ पाषाणमूर्ती राहात नाही. ती त्यांच्या अभंगांतून सजीव होते. ती त्या संतांशी बोलू-खेळू लागते. त्यांची सुखदु:खे श्रवण करते. त्यांच्याशी संवाद करते. त्यांतून भक्तांचे विठ्ठलप्रेम जेवढे व्यक्त होते, त्याहून अधिक विठ्ठलाचे भक्तविषयक प्रेम आणि करुणा अधिक व्यक्त होते. भक्त जसे पंढरीनाथासाठी तळमळतात, तसा पंढरीनाथही भक्तांसाठी तळमळतो, भक्तांची सुखदु:खे विठ्ठलाचीच होतात. त्यांच्या संकटांत तो धावून जातो. त्यांच्या श्रमजीवनात तो सहभागी होतो. त्याचा प्रत्यय जनाबाईंच्या साक्षात्कारी अभंगांत सर्वाधिक येतो.

यादवकालीन संतांनी पंढरीनाथाची आपल्या अभंगांतून सजीव अक्षरशिल्पे कोरली आहेत. त्यांत एकसूत्रीपणा दिसतो. त्यांच्या विठ्ठलवर्णनांतून विठ्ठलाचे स्थूलमानाने एकच व्यक्तिचित्र साकार होत जाते. भक्तवत्सल, करुणामूर्ती, संवेदनशील आणि प्रेमपूर्ण असे ह्या विठ्ठलाचे अस्तित्व सर्व संतकाव्यांतून प्रत्ययास येते. संत जनाबाईंनीही आपल्या अभंगांतून विठ्ठलाचे सगुण-साकार मानवी रुप वर्णन केले आहे. ते असे.

''अनंत लावण्याची शोभा । तो हा विटेवरी उभा ॥
पितांबर माळ गांठी । भाविकासी घाली मिठी ॥
त्याचे पाय चुरी हातें । कष्टलीस माझे माते ॥
आवडी बोले त्यासी । चला जाऊ एकान्तासी ॥
ऐसा ब्रह्मींचा पुतळा । दासी जनी पाहे डोळां ॥'' (अ. क्र. १६८)

''पाय जोडुनी विटेवरी । कर ठेऊनी कटावरी ॥
रुप सांवळे सुंदर । कानीं कुंडलें मकराकार ॥
गळां वैजयंती माळा । तो हा मदनाचा पुतळा ॥
गरूड सन्मुख उभा । जनी म्हणे धन्य शोभा ॥'' (अ. क्र. १७८)

ह्यांपैकी पहिल्या अभंगात विठ्ठलाच्या सगुण रुपाच्या लावण्याचा उल्लेख आहेच. शिवाय विठ्ठल स्वत:च भाविकास प्रेमभराने मिठी मारत असल्याचाही जनाबाईंनी उल्लेख केला आहे. विठ्ठलरुपी गोपालकृष्ण आपल्या भाविकांशी मित्रत्वाचे म्हणजे समत्वाचे नाते राखतो. त्यामुळेच भक्ताचे पाय चुरण्यात त्यास

कमीपणा वाटत नाही. आपल्या भक्तांशी परमेश्वर आवडीच्या गोष्टी करतो. एकान्तात गुजगोष्टी करीत राहतो. असा भक्तांसाठी कष्टणारा देव खरे तर ब्रह्माचा पुतळाच होय.

सांप्रदायिक विषयांवर अभंग रचना करीत असूनही जनाबाई आपल्या अभिजात कविप्रतिभेचा ठसा मराठी अभंगविश्वावर सहजत:च कशा उमटवितात, याचा त्यांच्या पुढील अभंगात प्रत्यय येऊ शकेल.

''विठो माझा लेंकुरवाळा । संगे लेंकुरांचा मेळा ॥
निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ॥
पुढें चाले ज्ञानेश्वर । मागें मुक्ताई सुंदर ॥
गोरा कुंभार मांडियेवरी । चोखा जीवा बरोबरी ॥
बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी ॥
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ॥'' (अ. क्र. १७४)

जनाबाईंचा हा एक साक्षात्कारी अभंग होय. मराठी संतांची, त्यांतही विशेषत: जनाबाईंची ईश्वर सगुण रुपात अनुभविण्याची शैली त्यातून प्रकटते. जनाबाईंचा विठ्ठल जनाबाईंच्या मनाची भावरुपे घेऊनच सजीव होतो. संत जनाबाईंच्या प्रतिभाचक्षूला विठ्ठल मानवी रुपात प्रत्ययास येतो हे विशेष!

येथे समकालीन संतांच्या गोतावळ्यातील विठ्ठल जनाबाई अनुभवितात. यादवकालातील कोणत्याही घरातील कुटुंबवत्सल कर्त्या पुरुषाचेच खरे तर ते दर्शन आहे. स्वत: जनाबाई मुलाबाळांनी भरलेल्या आणि नात्यागोत्यांनी समृद्ध असणाऱ्या नामदेव-कुटुंबात रात्रंदिवस वावरत होत्या. त्यामुळे बाळगोपाळांनी वेढलेल्या नामदेवांची कुटुंबवत्सल भावदर्शने त्यांनी जवळून अनुभविली होती. संतांच्या गोतावळ्यात वावरणाऱ्या विठ्ठलरूप श्रीकृष्णाचे जनाबाईंच्या मनावर नेमके हेच भावरुप ठसले आहे. हे भावरुप दर्शन मराठी अभंगविश्वात अपूर्व, अद्‌भुत आणि अर्थपूर्ण ठरल्याने चिरसंस्मरणीय झाले. प्रस्तुत अभंगातून जनाबाईंची उत्कट, कौतुकमिश्रित विठ्ठलप्रीती तर प्रकटतेच, शिवाय समकालीन संतां-संबंधीचा त्यांचा आदरयुक्त भक्तिभावही प्रकटतो.

ह्या सर्व संतांचे विठ्ठलाच्या भक्तिदरबारातील स्थानही जनाबाईंनी उचितपणे नोंदविले आहे. श्रीसंतश्रेष्ठ निवृत्तिनाथांना विठ्ठलाने बहुमानाने खांद्यावर धारण केले आहे. सोपान काहीसे हळुवार प्रकृतीचे. विठ्ठलाने त्यांचा हात धरून ठेवला आहे. श्रीज्ञानेश्वर साक्षात ज्ञानसूर्य. श्रेष्ठ प्रज्ञावंत, तसेच प्रतिभावंतही. साक्षात विष्णूचाच अवतार! विठ्ठलाचेच ते रुपडे. विश्वाचे आर्त मनी बाळगून विश्वकल्याणार्थ विश्वात्म

मनाने पसायदान मागणारे गीताभाष्यकार! ते पुढे चालत आहेत त्यात औचित्यच आहे. सुंदर, नाजुक पण लवलवती चिद्ज्योत मुक्ताई मागूनच पण स्वतंत्रपणे अनुसरत आहे. गोरा कुंभार सर्व संतांत वय आणि वैराग्य ह्यांत ज्येष्ठ. विठ्ठलाने त्यांना मांडीचे आसन दिले आहे. चोखा तर विठ्ठलाचा दुसरा प्राणच. बंका अजून अजाण असल्याने त्यास विठ्ठलाने आपले कडेवरच घेतले आहे. नामदेव अजाण, शुद्ध बालभक्तीत रमणारे, त्यांची विठ्ठलाने करांगुळी धरली आहे. विठ्ठलाने भक्तांचा केलेला हा सोहळा जनाबाई प्रेमपूर्ण दृष्टीने, कौतुकाने आणि आनंदाने मनोमन अनुभवीत सुखावत आहेत.

ह्या अभंगाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यात जनाबाईंनी समकालीन संतांची केवळ औचित्यपूर्ण नोंद केली आहे असे नाही. तर त्यांनी त्यांचे विठ्ठलासह एक समूहचित्रही रेखाटले आहे. जणू ते भक्तांच्या मांदियाळीतील विठ्ठलाचे चलत चित्रदर्शन आहे. या संपूर्ण सोहळ्याकडे प्रेमपूर्ण दृष्टीने पाहणाऱ्या जनाबाई चित्रात दर्शनरुपाने प्रत्ययास येतात.

गोपालकृष्णाला यादवकालीन संतकवींनी जी सगुण मानवी भावरुपे दिली, त्यांतील अत्यंत प्रेमळ, भक्तवत्सल असे रुप जनाबाईंच्या वरील अभंगात असून ते संतसाहित्यात तरी चिरतरुण ठरले आहे.

## ई) जनाबाईंनी गायिलेले संतमाहात्म्य

जनाबाईंनी गायिलेले संतमाहात्म्यही त्यांच्या अभिजात प्रज्ञेचा व प्रतिभेचा सुजाण आविष्कार आहे. संतांचे पारंपारिक, पसरट असे वर्णन करण्यापेक्षा 'संतत्व', 'वैष्णव' अथवा 'वारकरी' ह्या संज्ञांमागील संकल्पना शब्दांत बांधण्याचा आणि त्यातील आत्मानुभूती व्यक्त करण्याचा जनाबाईंचा प्रयत्न विस्मित करतो. 'संत' संकल्पना जनाबाईंच्याच शब्दांत पहा.

''संत हे कोण तरी देवाचे हे डोळे । पूजेविण आंधळे देवाचिये ॥
कोण्या नेत्रे देव पाहे तुजकडे । यासाठी आवडे संत करी ॥

संत ऐसे करी देवांचें काम । सांडियेल्या ध्यान कोण ऐकें ॥
संत पुससी तरी देवाचे ते पाय । आगमा न गमे सोय मागाडी ये ॥

संत जरी पुससी तरी देवाचे वदन । माझें तें वचन संत जाले ॥
परादी या चारी सांडूनी मीपणी । संत बोले वाणी विठोबाची ॥

परेचिया चारी आनंदामाझारीं । संत जाले अंतरी पडजीभ देवा ॥
क्षर जे नासिलें अक्षर ते काढिलें । नि:शब्दाचें जाले बोले संत ॥

शब्द तो उडाला नाद तो बुडाला । भेद तो आटला मायाभावी ॥
विठो वटावरी पारंबिया जाले । केश ते वाढले माय संत ॥
कुरळ होऊनिया देती ते सुढाळ । म्हणे जनी वोवाळ जीवेंभावें ॥'' (अ.क्र. ३०३)

प्रस्तुत अभंगात जनाबाई संत आणि देव यांच्यातील अतूट नात्याचा अनेक अंगांनी शोध घेत आहेत. ह्या संपूर्ण चराचरातील व्यवहाराकडे संतरुपी डोळ्यांनी जणू ईश्वर पाहात असतो. जगतातील प्राणिमात्र आणि ईश्वर यांना जोडणारा दुवा म्हणजे संत. ईश्वरास जगताचे ज्ञान संतांमुळे होते. तर जगतातील जीवमात्रांना ईश्वराचे ज्ञानही संतामुळेच होते. त्यामुळे साधकांनी प्रथम संतांचे पूजन करणे आवश्यक आहे. संतांना नाकारून ईश्वराची केलेली पूजा म्हणजे आंधळ्याची पूजा होय. अशी आंधळेपणाने केलेली देवपूजा देवास कशी भावणार?

शिवाय ईश्वर एक असला तरी संत अनेक आहेत. कोणत्या संताच्या डोळ्यांनी देव आपणाकडे पाहतो आहे, हे साधकास कसे उमजणार? यासाठी साधकाने संतविषयक आवडी मनात बाळगावी.

खरे तर संत इहलोकीचे ईश्वरच होत. ते तेथे ईश्वराचेच कार्य करतात. साधकाचे हित-अहितही तेच पाहतात. त्यांची अवहेलना केली तर साधकाचे ध्यान व्यर्थच ठरते.

संत म्हणजे देवाचे पाय होत. देव संतरुपी पायानेच सर्वत्र संचार करून भक्तांचा उद्धार करीत असतो. जेथे वेदांनाही गती नाही, तेथे संतांचे वास्तव्य असते. वेदांनाही अनाकलनीय ते संत पूर्णत: उमजून असतात. संत म्हणजे ईश्वरवदन होय. संतवाणी म्हणजे देववाणीच. संत देववदनीची पडजीभ होय. परादी चारी वाणींच्या अतीत असणारे ज्ञान संतांना अवगत असते. संतवचने ही ईश्वरवचनेच होत. संतवाणी 'क्षर' नाकारते, अक्षर स्वीकारते आणि नि:शब्दतेनेच बोलते. अशाप्रकारे शब्द लोप पावतात, शब्दांचा नादही अखेर लुप्त होतो. अविद्येने निर्मिलेला भेद गळून पडतो.

विठोबावडाच्या पारंब्या म्हणजे हे संत होत. वेटाळलेल्या पारंब्या शोभिवंत (हितकारक) आधार देतात तसे ईश्वराचे संत दीनपतितांचा उद्धार करतात.

पंढरपूर ही विठ्ठलभक्तीची पेठ होय. येथे संतांचे अखंड वास्तव्य असते. पंढरीत कीर्तनाचा गजर होत असता देव साक्षात प्रकटतो. त्यामुळे संतांच्या कीर्तनात रंग भरतो. हरिदास प्रेमभरे नाचतात. एवढे सामर्थ्य नामदेवांचा प्राण असणाऱ्या ज्ञानेश्वरांत आहे. अशा संतांना आपण शरण गेले पाहिजे.

उ) 'वैष्णव तो एक'

जनाबाई 'संत' ही संकल्पना जशी स्पष्ट करतात तशीच 'वैष्णव' ही संकल्पनाही विशद करतात. यावरून जनाबाईंचे साक्षेपी मन लक्षात येते. प्रत्येक संकल्पना, संज्ञा जनाबाई नीट समजून घेतात, उमजतात आणि इतरांना विशद करू पाहतात. हीच जनाबाईंची अध्ययन-अध्यापन पद्धती होय. आपल्या आकलनाला त्या अनुभूतींची जोडही करून देतात. त्यामुळे जनाबाईंचे संतस्तुतीपर वा वैष्णववस्तुतीपर अभंग केवळ स्तोत्ररुप धारण करीत नाहीत. त्यांना नवनिर्मितीची चैतन्यमय कांती प्राप्त होते.

वैष्णव तोच होय ज्याने विष्णुमुद्रा धारण केली आहे. ही विष्णुमुद्रा म्हणजे बाह्यत: केलेला उपचार नव्हे. जनाबाई 'मुद्रा' ह्या संज्ञेचा बाह्य रुढ लौकिक अर्थ नाकारतात हे विशेष. अशी 'मुद्रा' देणे, हा एक लौकिक उपचार झाला. जनाबाईंच्या मते 'वैष्णव' ही एक वृत्ती आहे, जीवननिष्ठा आहे. नव्हे तो एक जीवनयज्ञच आहे. ज्याने अहंकार जाळून 'सोहं' ज्ञानाचे भस्म अंगी लावले आहे, ज्याचे जीवनच तीर्थ बनले आहे. ज्याच्या मनावर भक्तीची मुद्रा ठसलेली आहे. जो पंचायतन पूजा करतो आणि ज्याने तुळसीमंजिरी प्रेमाने कानावर धारण केली आहे, तोच खरा वैष्णव होय. यावरून जनाबाई भक्तीच्या बाह्यांगाला नाकारतात आणि भक्तीचे अंतरंग स्वीकारतात हे लक्षात येते.

याचबरोबर वैष्णवाचे सोंग घेणारा दांभिक कसा ओळखावा, हेही जनाबाईंना सांगावेसे वाटते.

''वैष्णव तो एक इतर ती सोंगे । ठसे देऊनी अंगें चितारिती ॥
जिचे योनि जन्मला तिसी दंडू लागला । तीर्थरुप केला देशोधडी ॥
नाइकोनी ब्रह्मज्ञान जो का दुराचारी । अखंड द्वेष करी सज्जनांचा ॥
विद्येच्या अभिमानें नाइके कीर्तन । पाखांडी हें म्हणे करिती कायी ॥
पंचरस पात्रा कांता बुडविती । उद्धरलों म्हणती आम्ही संत ॥
कीर्तनाचा द्वेष करी तो चांडाळ । तयाचा विटाळ मातंगीसी ॥
वैष्णव तो एक चोखामेळा महार । जनी म्हणे निर्धार केला संती ॥'' (अ. क्र. ३०९)

वैष्णवाची लक्षणे सांगताना वैष्णवाचे सोंग घेणाऱ्या पाखंड्याची अवलक्षणे सांगणेही जनाबाईंना आवश्यक वाटते. कारण समाजात खरा वैष्णव एखादाच असतो. बहुसंख्य असतात ती वैष्णवाची सोंगेच. केवळ विष्णुमुद्रा अंगावर ठसवणे म्हणजे वैष्णव होणे नव्हे. कारण वैष्णवाचे जीवन अंतर्बाह्य शुद्ध, पवित्र आणि नीतिमान असते. आईचा छळ करणे, वडिलांना देशोधडीस लावणे, ब्रह्मज्ञानाच्या

गोष्टींचा तिरस्कार करणे, संत सज्जनांची अखंड निंदा करणे, आपल्या विद्येचा अखंड गर्व करून कीर्तनाची निंदा करणे, ही पाखंड्याची लक्षणे होत. स्वत:ला संत म्हणविणारे हे पाखंडी स्त्रीलंपटही असतात. ते उच्चवर्णीय असले तरी शूद्रही त्यांना क्षुद्र लेखतात. जनाबाईंच्या मते चोखामेळा महार असला तरी तोच खरा वैष्णव होय. सर्व संतानीच निर्धारपूर्वक हे घोषित केले आहे.

प्रस्तुत अभंगात खरा वैष्णव व पाखंडी यांचे विरोधात्मक चित्रण केलेले दिसते. ते करताना जनाबाईनी केलेले जीवनभाष्य लक्षवेधक आहे. उच्च वर्णीय हा संत असतोच असे नव्हे. संतत्व वा वैष्णवत्व शुद्ध आचारविचारांवर अवलंबून असते. त्यामुळे एखादा उच्चवर्णीयही क्षुद्र ठरू शकतो. तसेच चोखामेळ्यासारखा एखादा महारही श्रेष्ठ वैष्णव ठरू शकतो. संत जनाबाईंच्या विचारांवर समकालीन श्रेष्ठ संतांचे संस्कार झाल्याचे येथे स्पष्टपणे जाणवते. त्याशिवाय जनाबाईंनी हे संस्कार समर्थपणे आत्मसात केल्याचेही प्रत्ययास येते.

### ऊ) नाममाहात्म्यपर अभंग

सर्वच भारतीय संतांप्रमाणे मराठी संतकवींनी हरीचे नाममाहात्म्य वर्णन केले आहे. नामदेव तर श्रीविठ्ठलनामाचा अखंड पुरस्कार करताना दिसतात. ज्ञानेश्वरांनीही हरिपाठाचे अभंग रचून तत्कालीनच नव्हे तर सार्वकालीन समाजाला हरिनामाची जणू दीक्षाचं दिली. वारकरी संप्रदायाचा उगम ज्या श्रीमद्‌भागवत पुराणातून झाला, त्यानेही कलियुगात केवळ नामच जीवमात्रास तारक असल्याचे घोषित केले आहे. ज्ञानयोग, कर्मयोग, अष्टांगयोग आदी, साधना कष्टसाध्य असल्याचे सर्व संतांनी नामयोगाचा आश्रय अव्यभिचारी निष्ठेने करावा असे जनसामान्यास उपदेशिले आहे. यादवकालीन संतश्रेष्ठ ज्ञानदेव-नामदेव ज्या अधिकारवाणीने नाममाहात्म्य वर्णन करतात, त्याच अधिकारवाणीने जनाबाईंनीही नाममाहात्म्य गायिले आणि उपदेशिले आहे. जनाबाईंच्या गाथ्यातील अभंगांना नाममाहात्म्यानेच प्रारंभ झाला आहे हे विशेष!

जनाबाईंच्या ह्या प्रकारच्या अभंगांतून त्यांची नामस्मरणावर व नामकीर्तनावर असलेली अढळ निष्ठा सातत्याने प्रकट होते. ती अशी-

''गाता विठोबाची कीर्ति । महापातकें जळतीं ॥'' (अ. क्र. १४५)

''वाचे नाम विठ्ठलाचें । तेणें सार्थक देहाचें ॥
ऐसा नामाचा महिमा । शेषां वर्णितां जाली सीमा ॥
नाम तारक त्रिभुवनीं । म्हणे नामयाची जनी ॥'' (अ. क्र. १४६)

''नाम फुकट चोखट । नाम घेतां न ये वीट ॥
जड शिळा ज्या सागरी । आत्माराम नामें तारी ॥
पुत्रभाव स्मरण केलें । तया वैकुंठासीं नेलें ॥
नाममहिमा जनी जाणे । ध्यातां विठ्ठलाचे होणे ॥'' (अ. क्र. १४७)

''येक नाम सर्व सार । वरकड अवघे तें असार ॥
म्हणोनियां परतें करा । आधीं विठ्ठल हे स्मरा ॥
जनी म्हणे देवाधिदेव । एक विठ्ठल पंढरीराव ॥'' (अ. क्र. १४८)

''काय हें करावें । धनवंतादि अवघे ॥
तुझें नाम नाही जेथें । नको माझा वास तेथें ॥
तुजवीण बोल न मानी । करी ऐसे म्हणे जनी ॥'' (अ. क्र. १४९)

संतश्रेष्ठांनी रुजविलेल्या आणि वारकरी सांप्रदायिकांनी आजन्म मिरविलेल्या निष्ठा जनाबाई येथे व्यक्त करीत आहेत. वारकरी संप्रदाय हा सर्वसामान्य प्रापंचिकांना जवळचा वाटणारा, आचरण्याजोगा आणि त्यांची मानसिकता व जीवनसरणी यांच्याशी संवाद साधणारा असा यादवकालीन भक्तिसंप्रदाय आहे. आपले दैनंदिन जीवन जगण्याच्या प्रक्रियेतच भक्तिप्रक्रियाही साधणारा असा हा आध्यात्मिक संप्रदाय होय. आपले कौटुंबिक, दैनंदिन आणि व्यावसायिक जीवनच आध्यात्मिक पातळीवर जगण्याची आकांक्षा वारकरी संप्रदायाने सर्वसामान्य जनमानसात जागवली. त्यासाठी नामस्मरण, नामपठण, नामउच्चारण ही अत्यंत सहज सोपी अशी साधना जनसामान्यांपुढे ठेवली. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर आणि भक्तश्रेष्ठ नामदेव यांनी नामभक्तीचा अखंड पुरस्कार केला. त्याचे प्रतिध्वनी जनाबाईंच्या काव्यातही उमटलेले वरील अभंगचरणांत दिसतात.

संत ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्या तुलनेने संत जनाबाई जनसामान्यांना जवळच्या आहेत. त्या जनसामान्यांच्या भाषेतच नामस्मरणाचे महत्त्व वर्णन करीत आहेत. वाचेने विठ्ठलाचे नाम घेणे म्हणजे आपल्या जन्माचे सार्थक करणे होय. नाममहिमा तो हाच होय. शेषासही तो वर्णन करता आला नाही. असे हे हरिनाम इहलोकातच नव्हे तर त्रैलोक्यातही तारक आहे. म्हणूनच केवळ विठ्ठलनामोच्चाराने माणसाची महापातकेंही जळतात. (१४५, १४६)

शिवाय विठ्ठलनाम शुद्ध, चोखट आणि विनामूल्य प्राप्त होते हे विशेष! अखंड हरिनामाचा कधीही कंटाळा येत नाही. रामायणात रामनामाचा जप करून वानरसेनेने पाण्यात टाकलेल्या शिला तरल्या. हे केवढे आश्चर्य! पुत्रभावाने नारायणाचे स्मरण करणाऱ्या आसन्नमरण जिवाला त्या नामानेच केवळ तारून

वैकुंठात नेले. जनाबाई नाममहिमा जाणून आहेत. म्हणून त्या नामस्मरण करतात. जो विठ्ठलाचे नामस्मरण करतो, तो विठ्ठलच होतो असा जनाबाईंचा मुळी अनुभवच आहे. (१४७)

ह्या मानवी जीवनाचे हरिनाम हेच सार आहे. अन्य सर्व फोलकट आहे. म्हणून माणसाने नामाव्यतिरिक्त सर्व गोष्टी दूर साराव्यात. अखंड विठ्ठल नामाचे स्मरण करावे. कारण विठ्ठल हाच देवाधिदेव आहे. सर्व देवांचा पांडुरंग हा राजा आहे. (१४८)

तेव्हा अन्य श्रीमंतांचा तेथे काय पाड? जेथे हरिनामाचा गजर आहे, तेथेच जनाबाईंचे मन रमते. विठ्ठलाशिवाय अन्य कोणाचीही स्तुती जनाबाईंच्या मनाला भावत नाही. (१४९)

अखंड नामस्मरण करणाऱ्या भक्ताचे सामर्थ्य यानंतर जनाबाईंना वर्णन करावेसे वाटते. जो अखंड हरिनामात रंगलेला असतो, त्याच्या तोंडरात श्रीहरीच रुमझुमत असतो. तो काम करतो असे वाटले तरी मनात पूर्णत: निष्काम असतो. नव्हे, तो संतश्रेष्ठ पूर्णकामीच असतो. हरिभजनात तल्लीन असणाऱ्या अशा संताच्या चरणास जनाबाई वंदन करतात. त्याच्या नामघोषात त्याही नि:शंक नाचू लागतात. (१५१)

जनाबाईंना वैष्णवांच्या मेळ्यात हरिकीर्तन करण्यात अपार सुख लाभते. सर्व भक्तांच्या समुदायात जनाबाईही सहभागी होतात. सर्वांसह हरिकीर्तन करतात. वैष्णव संप्रदायाने सत्संगाचे महत्त्व वर्णिले आहेच. भक्ताचे केवळ एकाकी राहून साधना करणे भक्तिसंप्रदायाने पुरेसे मानलेले नाही. समूहरुपाने केलेला नामघोष श्रीहरीस विशेष प्रिय असतो अशी वैष्णव संतांची दृढ धारणा आहे. जनाबाईंनीही ती पुढील अभंगात प्रकट केली आहे.

''येऊ ऐसें जाऊं । जनासंगें हेंचि दाऊं ॥
आपण करूं हरिकिर्तन । जाणोनी भक्तीचे जीवन ॥'' (अ. क्र. १५७)

जगण्याच्या प्रत्येक क्षणी हरीला आठवावे. त्याच्या नामस्मरणानेच दिवसास प्रारंभ करावा. विठ्ठलास पदोपदी आठवावे. कारण नाम हेच ह्या प्रपंचात एकमेव तारक आहे. त्यासाठी जनाबाईंनी अजामेळाचे पारंपारिक उदाहरण दिले असले तरी दुसऱ्याच क्षणी नामभक्तीने चोखामेळ्यास मुक्ती लाभल्याचेही नमूद केले आहे. समकालीन संत चोखामेळा ह्यास मुक्ती प्राप्त झाल्याचा जनाबाईंनी दिलेला निर्वाळा त्यांच्या मनाच्या ठाम श्रद्धेवर व धिटाईवर प्रकाश टाकतो. चोखामेळ्याचा हा अनुभव लक्षात घेऊनच जनाबाई 'दळणी-कांडणी' विठ्ठलास आळवत राहतात.

''नाम विठोबाचे घ्यावें । मग पाऊल टाकावें ॥
नाम तारक हें थोर । नामें तारिले अपार ॥२॥
अजामेळ उद्धरिला । चोखामेळा मुक्तीस नेला ॥३॥
नाम दळणीं कांडणीं । म्हणे नामयाची जनी ॥४॥'' (अ. क्र. १५२)

नामभक्ती भक्तांच्या उद्धारास कशी साह्यकारी आहे हे जनाबाईंनी आपल्या अभंगात परोपरीने वर्णन केले आहेच. एका आगळ्या रुपकात्म अभंगात जनाबाई नामरुपी नाणे अस्तित्वात कसे आले याचे अर्थपूर्ण विवेचन करताना दिसतात. तो अभंग असा.

''निराकारीचें नाणें । शुद्ध ब्रह्मीचें ठेवणें ॥
प्रयत्ने काढिलें बाहेरी । संतसाधु सवदागरीं ॥
व्यास वसिष्ठ नारदमुनी । टांकसाळ घातली त्यांनीं ॥
उद्धव अक्रूर स्वछंदीं । त्यांनीं आटविली चांदी ॥
केशव नामयाचा शिक्का । हारप चाले तिन्ही लोकां ॥
पारख नामयाची जनी । वरती विठोबाची निशाणी ॥'' (अ. क्र. १५३)

हरिनाम हे जणू निराकार नाणे आहे. ते या अर्थाने की 'नाम' ज्या नामीचा निर्देश करते तो मूलत: निराकार आहे. नाम म्हणजे नामीच असल्याने तोही निराकार आहे. नाणे व्यवहारात राजमुद्रेमुळेच चालते. नाण्यावरील राजमुद्रा म्हणजे प्रत्यक्ष राजाची त्यास असलेली मान्यता होय. असा राजा प्रत्यक्षात अस्तित्वात असतो. पण 'नाम' ज्याचे सूचन करते ते परमेश्वरतत्त्व मात्र निराकार, निर्गुण, निर्लेप असते. म्हणूनच नाम हे निराकारीचे नाणे होय.

असे 'नाम'शुद्ध ब्रह्मतत्त्वाचे निधान होय. कारण ब्रह्मतत्त्वाचे मूल्य, महत्त्व, महिमा ह्या 'नाम'रुपी नाण्यामुळेच व्यवहारात लक्षात येतो. मात्र शुद्ध ब्रह्मतत्त्व हे स्वत: निराकार असून निष्क्रिय असते. स्वयंप्रेरणेने ते अवतरत नाही. कारण ते भक्तसापेक्ष असते. भक्तच त्याला रुप, आकार, गुणविशेष आदी वैशिष्ट्ये प्रदान करतात. एवढेच नव्हे तर त्यास नामरुपही भक्तच देतो. परिणामी निराकार साकार होते. अरुपाला रूप लाभते. अनामाला नाम प्राप्त होते. त्यासच परमेश्वराचे अवताररुप मानले जाते. तेव्हा परमेश्वरापेक्षा भक्तांचेच येथे महत्त्व वाढते. संत-साधू हे सौदागर होत. ते ईश्वरनिधानाचा शोध लावतात. त्याचा जगतात व्यवहार करतात. निराकारीच्या निधानाची नाममुद्रा तयार करतात. आणि ती अज्ञानी, पददलितांना विनामूल्य वाटतात. संपूर्ण जगात ईश्वरतत्त्वाचा असा व्यवहार चालतो. व्यास, वसिष्ठ आणि नारदमुनी यांनी परब्रह्मतत्त्वाचा असाच नामव्यवहार केला. आपल्या

बरोबरच जगाचाही त्यांनी उद्धार केला. त्यानंतर उद्धव-अक्रूर यांनी परब्रह्म तत्त्वांची निधानरुपी चांदी आटवली आणि केशवनामाचा शिक्का असलेली नाणी व्यवहारात आणली. आता जगात सर्वत्र विठ्ठलनाममुद्रेच्या नाण्यांची चलती आहे. ही नाणी चोख आहेत की बनावट हे पारखण्याचे कार्य जनाबाईंनी स्वीकारले आहे.

जनाबाईंनी ह्या अभंगात रुपकाची केलेली मांडणी आणि हाताळणी त्यांच्या प्रज्ञेवर व प्रतिभेवर विशेष प्रकाश टाकते.

# संत जनाबाईंनी अभंगमाध्यमातून केलेले समाजप्रबोधन

भारतीय अध्यात्मशास्त्राने संतांचे अनन्यसाधारण महत्त्व मानले आहे. ज्ञानी अथवा योगी यापेक्षा संत हा अधिक समाजसन्मुख असतो. अथवा 'संत' ही संकल्पनाच समाजसापेक्ष आहे. संत ज्ञानी वा योगी असू शकतो. तथापि सर्वच ज्ञानी वा योगी संत असतातच असे नाही. ज्ञानी ज्ञानयोगाने वा योगी योगमार्गाने आत्मोद्धार करून मुक्ती मिळवू शकतो. त्याची वाटचाल त्याच्यापुरतीच मर्यादित असू शकते.

तथापि संत आत्मोद्धाराबरोबरच लोकोद्धार करण्याचे ध्येय मनाशी बाळगतो. तो जनसामान्यात वावरतो. त्यांच्या भाषेत अध्यात्मज्ञान सांगू पाहतो. संतमन अहोरात्र जनकल्याणाची चिंता बाळगते. ज्ञानेश्वरांसारखे विश्वात्म संतमन विश्वमांगल्याचे ईश्वराला पसायदान मागते. संत हे अपरिहार्यपणे कवीही असताना दिसतात. कारण कवीची संवेदनशीलताच संतमनाला लाभलेली असते. 'बुडती हे जन न देखवे डोळा। येतो कळवळा म्हणोनिया' अशी अज्ञानी प्रापंचिकांसंबंधी त्यांच्या मनाची करुणार्त अवस्था असते. त्यामुळेच उपदेश करणे संतांना अपरिहार्य वाटते.

ह्या जगताची निर्मिती करणाऱ्या, जगताचे प्रतिपालन करणाऱ्या परमेश्वरासंबंधीचा भक्तिभाव वा प्रेमभाव निर्माण करणे, सर्व प्राणिमात्र समान असल्याच्या जाणिवेने भूतदयावाद मनात जागविणे, दया, शांती, प्रेम, अहिंसा, त्याग, करुणा यासारख्या श्रेष्ठ जीवनमूल्यांची पेरणी समाजमनात करून समाजाला कल्याण आणि शाश्वत सुखाच्या दिशेने प्रवर्तित करणे, आदी प्रेरणा मनाशी बाळगून संत जनसामान्यांना उपदेश करीत राहतात. परमेश्वर आणि त्याने निर्मिलेले जग ह्यांत सुसंवाद साधण्यासाठी संत स्वत:च्या जीवनास माध्यमरूप देतात. त्यामुळे भारतीय भक्तिपरंपरेतील सर्वच संत उपदेश करतात. ते संतकवी असतील तर काव्यमाध्यमातून उपदेश करतात. त्यासाठी आत्मानुभूतींचे निवेदनही करतात. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाच्या ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, जनाबाई, चोखामेळा, मुक्ताबाई, बहिणाबाई यासारख्या सर्वच संतकवींनी आत्माविष्कारार्थ तसेच उपदेशार्थ कविता लिहिलेली दिसते. त्यातूनच मराठीत संत कवितेचा विस्तृत पट सिद्ध झाला आहे.

❀

# जनाबाईंच्या उपदेशपर अभंगांचे वेगळेपण

सर्वच संतकवी काही सांप्रदायिक विषयांचा काव्यनिर्मितीसाठी आश्रय करताना दिसले तरी प्रत्येक संत आपली प्रकृती, व्यक्तिमत्त्व, अध्यात्मसाधना आणि समकालीन जीवनवास्तव इत्यादी गोष्टींना अनुसरून काव्यनिर्मिती करतो. त्यामुळेच समान विषयांवरील त्यांच्या सांप्रदायिक काव्यात पृथगात्मता, विविधता आणि अभिजातता प्रत्ययास येते. जनाबाईंच्या समग्र कवितेतच याची अनुभूती येते. जनाबाईंचे व्यक्तिमन इतके सतेज व संवेदनप्रधान आहे, त्यांची प्रज्ञा एवढी प्रखर आहे, समकालीन वास्तवाचे त्यांचे आकलन एवढे अचूक आहे आणि अखेर त्यांनी स्वीकारलेल्या सांप्रदायिक निष्ठा एवढ्या दृढ आहेत की त्यामुळे त्यांची उपदेशपर कविताही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सहजत: निर्देश करू लागते. शिवाय जनाबाईंची भाषा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अवघे सत्त्व व गुणविशेष घेऊन प्रकटते. त्यांची जीवनविषयक आकलने त्यांच्या कवितेंतून सतत प्रकटत राहतात. त्यांचे मन सश्रद्ध असले तरी ते यत्किंचतही भाबडे नाही. त्यामुळे त्यांचे विचार सुस्पष्ट आणि रेखीव असतात. त्यामुळे त्यांच्या कवितेला भावविवशतेचा स्पर्शही झालेला दिसत नाही. उत्कट भावप्रवाहात ते हरवत नाही. आत्मस्तुतीपासून ते दूर आहे. एक अभिजात अशी विवेकशक्ती जनाबाईंना लाभली आहे. त्यामुळे त्या स्वत:च्या संतत्वाचा रास्त अभिमान बाळगूनही एक अखंड समतोल आपल्या जीवनात आणि कवितेतही साधू शकल्या आहेत. त्यांचा तीव्र प्रत्यय जनाबाईंच्या उपदेशपर कवितेतूनही येत राहतो.

परिणामी जनाबाईंचा प्रत्येक उपदेशपर अभंग वेगळेपणाने लक्षात राहतो. त्यात पुनरावृत्ती, पसरटपणा वा तोचतोचपणा यत्किंचितही जाणवत नाही.

जनाबाईंचे उपदेशविषय तरी कोणते आहेत?

### १ : ''भाव धरा मनी''

''भक्तिभावें वोळगा देव । महाराज पंढरिराव ॥

पंढरीसी जावें । संतजनी भेटावें ॥

भक्ति आहे ज्याचें चित्तीं । त्याला पावतो निश्चिती ॥
भाव धरा मनीं । म्हणे नामयाची जनी ॥'' (३६६)

मानवी जीवन ईश्वरभक्तीने पवित्र होते. म्हणून भक्तिभावाने महाराज पंढरिरावास भेटावे. पंढरीस जाऊन संतजनाच्या सहवासाचे अद्‌भुत सुख घ्यावे. हा पंढरीनाथ साधाभोळा आहे. जो त्याला उत्कट भक्तिभावाने भजतो त्याला तो निश्चितपणे पावतो. असा भाव माणसाने मनात बाळगावा असे जनाबाई सांगत आहेत.

विठ्ठल-रुक्मिणी यांचे अखंड स्मरणही तारक आहे. जो विठ्ठलाचे नामस्मरण करतो, त्याला जगात उणे काय आहे? सारे त्रिभुवन त्याचे सोयरे बनते. तो भवसिंधू सहजत: पार करतो. ज्याचे मन विठ्ठलचरणावर जडले आहे, त्यास साराचेही सार असलेले परब्रह्मतत्त्व विनासायास लाभते. (अ. क्र. ३७५)

विठ्ठलाचे नामस्मरण केल्याने नरदेहाचे सार्थक होते. असा नाममहिमा शेषासही वर्णन करता येत नाही. त्रिभुवनातील सर्व शास्त्रांनीही नाममाहात्म्य गायिले आहे. (३८८)

जेथे विवेकाची पेठच उघडी आहे अशा पंढरीस तू जा. तेथे कोणतीही दिशाभूल होत नाही. देव तेथे उठाउठी भेटतो. आपल्या भक्तीने देवास जिंकता येते. ऋणी करता येते. ईश्वरभक्तीसाठी मरणही पत्करावे. पण विठ्ठलाला आपलेसे करावे. (३८९)

नाना व्रते, तप वा दान या गोष्टी हरिनामापुढे तुच्छ आहेत. एक भक्तिभाव मनात असावा. देव भक्ताच्या अंतरीची इच्छा पुरविल्याशिवाय राहात नाही, असा विश्वास मनात धरावा. चक्रपाणी कृपावंत आहेच. एवढेच नव्हे तर ज्याचा भक्तिभाव परिपूर्ण आहे; त्याच्या भेटीसाठी स्वत: देव त्याच्याकडे धावतो. म्हणूनच 'लक्ष लावा पायांपाशी' असा जनाबाई उपदेश करतात. (अ.क्र.३९१)

परमेश्वरप्राप्तीसाठी भक्ती आवश्यक खरी. पण केवळ ती पुरेशी नाही. कारण विशुद्ध भक्तीने साधकात अन्य सात्त्विक गुणही प्रकट होणे आवश्यक आहे. भक्ताचा अहंभाव गळून पडल्याशिवाय त्यास विठ्ठलप्राप्ती होणे अशक्य असते. याचा जनाबाई पुढील अभंगात इशारा देतात. जनाबाईंनी त्यासाठी दिलेले दृष्टांत जनाबाईंच्या व्यक्तिमत्त्वातील चोखपणा, निर्भिडपणा आणि धिटाई व्यक्त करणारे आहेत हे विशेष.

''शूरांचे ते शस्त्र कृपणाचे धन । विध्वंसिला प्राण हातां न ये ॥
गजमाथां मोतीं सर्पाचा तो मान । आसलीया प्राण हातां न ये ॥

सिंहाचे ते नख पतिव्रतेचे स्तन । गेलियाही प्राण हातां न ये ॥
वीराल्यावांचुन देह अहंभाव । जनी म्हणे देव हातां न ये ॥'' (अ. क्र. ३९२)

शूराचे शस्त्र, कृपणाचे धन, गजमस्तकातील मोती, सर्पमणी, सिंहनख, पतिव्रतेचे प्रेम आदी गोष्टी प्राण गेल्यावरही हाती येत नाहीत. त्याप्रमाणे अहंकार नष्ट झाल्याखेरीज देव हाती येण्याची शक्यताच नसते. या अभंगातील दृष्टांतातर्गत प्रतिमा अभिनव वाटतात तशाच धीटही वाटतात.

भक्ताच्या अंगीचा देहअहंकार गेला पाहिजे हे खरे असले तरी ते पुरेसे नाही. त्याच्या अंगी दया, क्षमा, शांती, करुणा सर्वांभूती समत्त्वभाव आदी गुणही अपेक्षित आहेत. असे भक्तश्रेष्ठ ब्रह्मादिकांनाही वंदनीय असतात. स्वत: देव संतांची सेवा करतो. त्याला भक्तांचे नामकीर्तन विलक्षण प्रिय असते. तो विनम्रपणे संतचरणीही लागतो. हे भक्तश्रेष्ठ स्वपुत्राप्रमाणे चराचरावर प्रेम करतात. भक्ताच्या हातून बरेच अपराध झाले तरी देव त्याचे रक्षण करतो. (३७७) त्यामुळे भक्तांनी अखंड समाधानात राहावे. संतांचे समाधान हेच त्यांचे भजन होय. इंद्र, ब्रह्मदेव हे सर्व संसारिकांसारखेच असमाधानी असतात. मग अन्य सामान्य प्रापंचिकाचा पाड तो काय? प्रापंचिक सदैव सचिंत, लोभी आणि असमाधानी असतात. म्हणून सत्संग महत्त्वाचा ठरतो. (३७३)

## २ : ''संत तेचि देव देव तेचि संत''

वारकरी संप्रदायातील प्रत्येक संताने 'संत हेच देव' ही दृढ श्रद्धा आपल्या उपदेशपर अभंगातून सातत्याने व्यक्त केली आहे. जनाबाईंही आपल्या उपदेशपर कवितेतून ही श्रद्धा अधोरेखित करतात. आणि सांप्रदायिक श्रद्धा बळकट करतात. त्या अशा-

''संत आणि देव मानी जो वेगळे । तेणें तेथें आगळ केले दोष ॥
माता ते वेगळी कुच ते उरीचें । म्हणोनियां त्याचें मर्दन करी ॥
पाप तें वेगळे पुण्य तें आगळें । म्हणोनी गरळें पितो मद ॥
दिवस उगवतां पाहो नये त्यातें । जेणें हो संतातें द्वेषियेलें ॥
तयाचा विटाळ वाहे रजस्वला । म्हणे जनी चांडाळा बोलू नका ॥'' (अ.क्र.३८२)

''पाणी तेंचि मेघ मेघ तेंचि पाणी । काय या दोन्हीपणी वेगळीक ॥
माती तेंचि धूळ धूळ तेंचि माती । भेंडा आणि भिंती काय दोन ॥
साखरी ते गोडी गोडी ते साखरेसी । थिजले तुपासी काय दोन्ही ॥
डोळा तें बुबुळ बुबुळ तो डोळा । शांति ज्ञानकळा काय भिन्न ॥

वदन ते ओठ ओठ ते वदन । क्षेम आलिंगन काय दोन ॥
जीभ ते पडजीभ पडजीभ ते जीभ । आशा आणि लोभ काय दोन ॥
संत तेचि देव देव तेचि संत । म्हणे जनी मात गोष्टी भिन्न ॥'' (अ.क्र.३८३)

''आम्ही आणि संत संत आणि आम्ही ।
सूर्य आणि रश्मि काय दोन ॥१॥
दीप आणि सारंग सारंग आणि दीप ।
ध्यान आणि जप काय दोन ॥२॥
शांति आणि विरक्ति विराक्ति आणि शांति ।
समाधान आणि तृप्ति काय दोन ॥३॥
रोग आणि व्याधी व्याधी आणि रोग ।
देह आणि अंग काय दोन ॥४॥
कान आणि श्रोत्र श्रोत्र आणि कान ।
यश आणि मान काय दोन ॥५॥
देव आणि संत संत आणि देव ।
म्हणे जनी भाव एक ऐसा ॥६॥'' (अ.क्र.३८१)

संत म्हणजेच देव होत. ह्या श्रद्धेला जो छेद देतो तो महान पापी होय. माता आणि तिचे स्तन वेगळे असते का? असे मानतो तो पापपुण्यातही फरक करीत नाही. अशा माणसाचे दिवस उगवता तोंडही पाहू नये. कारण तो संतांचा पर्यायाने देवाचाच द्वेष करीत असतो. रजस्वलेलाही त्याचा विटाळ होतो. अशा चांडाळाशी भल्या माणसाने बोलूही नये.

एखादा विचार दृढ करण्याची जनाबाईंची शैली लक्षणीय आहे. त्यासाठी जनाबाई समर्पक, परिचित रुपकांचा आश्रय घेताना दिसतात. मेघात जल असते आणि जलामुळेच मेघ अस्तित्वात येतात. त्यांची बाह्य रुपे विभक्त भासली तरी एकच जलतत्त्व त्यात असते. साखरेत गोडी असते. ती साखरेहून वेगळी काढता येत नाही. येथे साखर आणि गोडी ह्यांत अद्वैतच असते. तशी संत आणि देव ह्यांतही एकरुपता असते. मातीचीच धूळ त्याप्रमाणे ईश्वराचीच संत ही रूपे असतात. डोळ्यांत बुबुळ असते. म्हणूनच डोळा पाहू शकतो. बुबुळाशिवाय डोळे अर्थशून्य होत. त्याप्रमाणे संत हे बुबुळासारखेच डोळस असतात. देवरुप डोळे बुबुळरुप संतांमुळेच जगताचे निरीक्षण, परीक्षण, उद्धरण करू शकतात. असे ते परस्परावलंबी, परस्परसापेक्ष असतात. देव वदन मानले तर संत ओठ असतात. केवळ वदन बोलू शकत नाही. त्यात बुबुळरूप दृष्टी पाहिजे. तसेच संतरुप ओठ

असतील तर देव बोलू शकतो. खरे तर देवच संतमुखाने बोलत असतो. देव आणि संत विभक्त भासले तरी ते कधीही विभक्त नसतात. संत आणि देव यांचे अखंड क्षेमालिंगनच प्रत्ययास येत असते. जीभ आणि पडजीभ, आशा आणि लोभ वेगळे नसतात. त्याप्रमाणे संत म्हणजेच देव आणि देव म्हणजेच पुन्हा संत असतात.

संत जनाबाईंनी संत आणि देव ह्यांतील अभेद सांगण्यासाठी मानवी शरीर आणि जीवसृष्टी ह्यांचा आधार घेतला आहे. सर्वसामान्य माणसांना पटेल अशा रीतीचे दृष्टांत निवडल्याने जनाबाईंची उपदेशपर अभंगवाणी आवाहक आणि प्रत्ययकारी वाटते. पुढील अभंगात सूर्य आणि रश्मी, दीप आणि सारंग, ध्यान आणि जप, शांति आणि विरक्ती, तृप्ती आणि समाधान, रोग आणि व्याधी, देह आणि अंग, कान आणि श्रोत्र, यश आणि मान यांतील अभेद सांगता सांगता मोठ्या कुशलतेने जनाबाई देव आणि संत ह्यांतील अभेद श्रोत्यांच्या वा वाचकांच्या मनांत रुजवताना दिसतात.

ह्या अभंगाचे प्रथमदर्शनीच जाणवणारे वैशिष्ट्य म्हणजे अभंगात जनाबाईंचा नकळत झालेला आत्मानुप्रवेश होय. संत आणि देव हे एकच असतात असे सांगू पाहणाऱ्या जनाबाई ''आम्ही आणि संत, संत आणि आम्ही, सूर्य आणि रश्मि काय दोन'' असा श्रोत्यांनाच प्रश्न विचारताना दिसतात. जनाबाईंनी संतपद लाभल्याची जाणीव येथे रास्तपणे व्यक्त केली आहे. संत आणि देव यांची एकरुपता ही जनाबाईंच्या केवळ निरीक्षणातून त्यांना जाणवलेली बाब नाही. जनाबाई साक्षात्कारी संत असल्याने हे अद्वैत त्यांनी स्वत: अनुभविलेले आहे. त्यामुळेच त्यांना उपदेश करण्याचा अधिकारही प्राप्त झाला आहे. स्वानुभवांवर आधारलेली असल्यामुळे जनाबाईंची उपदेशपर अभंगवाणी मौलिक ठरते.

## ३ : ''मोक्ष नको मुक्ती हवी''

वारकरी संप्रदाय मोक्ष नव्हे तर मुक्ती हे जीवनाचे अंतिम ध्येय मानणारा भक्तिपंथ आहे. स्वर्ग अथवा मोक्ष कष्टसाध्य असतो. असा मोक्ष प्राप्त करण्यासाठी आसुसलेल्या साधकांना विपरीत मार्गाने देहदंड करण्यास भाग पाडणारे भोंदू साधू-संत अथवा वेषधारी संन्यासीही असतात. ते सामान्य अज्ञानी जनास पीडा देतात व त्यांना दक्षिणेसाठी छळतात. अशांना जनाबाईंनी येथे सावध केले आहे.

''बांधोनियां हात गयावळ मारिती । दंड ते करिती मोक्षासाठीं ॥
गेले ते पितर मोक्षालागी तुझे । आतां देई माझे दक्षिणेसी ॥
बापुडे केश बोडिती मिशी दाढी । मग दक्षणा हिरडी खातसे हे ॥
फार काय सांगू मेल्याविण मुक्ति । नाहीं ते वांछिती स्वप्नसुख ॥

अनंत जन्म मृत्यु होतां जैसे दुःख । त्याहुनी विशेष आहे तेथें ॥
भांबावले जन धांवे आटाआटी । सांडूनिया कोटि अनंत पद ॥
न लगे गाळावें न लगे तळावें । न लगे मरावे मुक्तीसाठीं ॥
मुक्ती लागे पायां जाऊनिया पाहे । जीव आता देह जनी नाही ॥'' (अ.क्र.३६७)

विठ्ठलभक्तीने 'ह्याचि देही' मुक्ती प्राप्त होत असल्याने सामान्य प्रापंचिकांनी भक्तिपंथाने जावे. विठ्ठलाचे अखंड नामस्मरण करावे. सत्संग धरावा. गुरू अथवा संत ह्यांच्या ठायी देव अनुभवावा असा जनाबाईंचा जनसामान्यांना आकळेल असा साधा-सरळ उपदेश आहे. असे न करता भांबावलेले जन ढोंगी साधु-संतांच्या भजनी लागतात आणि अधिकच दुःखांत वा संकटांत सापडतात. तेव्हा त्यांची स्थिती केविलवाणी होते. ''भांबावले जन धांवे आटाआटी । सांडुनिया कोटी अनंतपद'' अशा शब्दांत जनाबाईंनी दुःखी आणि अज्ञानी जनासंबंधी कळवळा व्यक्त केला आहे. तो त्यांच्या संतपदास शोभेसाच आहे. एवढेच नव्हे तर जनाबाईंच्या ह्या शब्दांनी उत्तरकालीन तुकारामांच्या 'बुडती हे जन न देखवे डोळा' ह्या उक्तीची आठवण येते. संत तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वावर आणि कविमनावर संत जनाबाईंच्या अभंगवाणीचे झालेले संस्कार अभ्यासनीय ठरतात.

### ४ : ''आहे नाहीं देह धरी ऐसा भाव''

माणसाला कुमार्गाकडे वळावेसे का वाटावे? याचे प्रमुख कारण म्हणजे देहाची आसक्ती आणि प्रबळ वासना. त्यामुळे जनाबाई येथे साधकांना देहभाव टाकून देण्याचा उपदेश करीत आहेत. त्यासाठी त्यांनी आम्रफळाच्या आस्वादाचा दृष्टांत योजला आहे. वस्तुतः नरदेह दुर्मिळ आहे. आत्मोद्धार करून घ्यावा म्हणून जिवास दुर्मिळ आणि अमौलिक असा मनुष्यदेह लाभलेला असतो. पण जीव मानवी देहाची आत्मोद्धारासाठी योजना न करता देहभावातच गुंतून राहतो. जनाबाई म्हणतात-

''शरीर हे जायाचें नश्वर आणिकांचे ।
म्हणाल जरी त्याचें काय काज ॥१॥
आंबरसें चोखिला बिजसालें सांडिला ।
पुढें तेणें उभविला दुजा एकू ॥२॥
समूळ साल माया सांडुनिया दिजे ।
वरि अहं बीज जतन करा ॥३॥
ते बीज भाजोनि करा ओवाळणी ।
संतांचे चरणीं समूळ देह ॥४॥

पुढें त्या बीजाची न करावी दुराशा ।
न धरावी आशा पुढिलांची ॥५॥
आहे नाहीं देह धरीं ऐसा भाव ।
म्हणे जनी देव सहज होसी ॥६॥'' (अ. क्र. ३९०)

आम्रफळाचे बीज दुसरा आमवृक्ष उभा करतो. मात्र फळाची आसक्ती टाकून आम्रबीज भाजून टाकले म्हणजे ते पुन्हा उगवत नाही. पुढीलांची आशा धरू नये. त्याप्रमाणे आपल्या देहाचीही आसक्ती टाकून द्यावी. देहभावाचे बीज भाजावे. त्यामुळे साधकास इहलोकीच्या जीवनाची जशी आसक्ती उरत नाही त्याप्रमाणे पुनर्जन्माचीही अभिलाषा वाटत नाही. देहभावच गळाला म्हणजे आपोआपच त्यास देवभाव लाभतो. तो जणू देवच होतो.

## ५ : ''सुखे संसार करावा''

ईश्वरप्राप्तीसाठी घरादाराचा त्याग करण्याची आवश्यकता नाही असे वारकरी संप्रदायाचे सांगणे आहे. नामदेव, एकनाथ, तुकाराम, बहिणाबाई आदी संतांनी प्रपंचाचा त्याग न करताच ईश्वरप्राप्ती केली आणि आत्मोद्धार साधला. निष्काम वृत्तीने संसार केला, देहभाव टाकून जीवनव्यवहार केला, संतसाधूंचा संग धरून अखंड नामभक्ती केली म्हणजे प्रापंचिकही देवप्राप्ती करून घेऊन आत्मोद्धार साधतो असे जनाबाईंचे अन्य संतांप्रमाणेच सांगणे आहे. स्वत: जनाबाईंनीही दळिता कांडिता विठ्ठलाचे स्मरण केले, पांडुरंगावर दृढ श्रद्धा ठेवली. संतसज्जनांच्या सहवासात भक्तिपंथाची वाटचाल केली. त्यामुळे ईश्वराचा अखंड साक्षात्कार लाभून जनाबाईंना संतपद लाभले. जनाबाई म्हणतात-

''सुखे संसार करावा । माजीं विठ्ठल आठवावा ॥
असोनियां देहीं नाहीं । छाया पुरुष जैसा पाहीं ॥
आहो सूर्य घटकासी । तैसी देहीं जनी दासी ॥'' (२७६)

अखंड विठ्ठलनाम स्मरत सुखाने संसार करावा. देही असूनही नसावे. आपल्या देहाकडे छाया म्हणून पाहावे. सूर्य घटाकाश भरून टाकतो, त्याप्रमाणे देह विठ्ठलतत्त्वाने भरून टाकावा. स्वत: जनाबाईही देही असून विदेही स्वरुपात राहतात. 'देह नेऊनी विदेही केले । शांति देऊनि मीपण नेलें ॥' (अ.क्र.३४०)

## ६ : ''नाम ते स्मरण अमृतसंजिवनी''

संपूर्ण चराचर पांडुरंगाने भरले आहे. ह्या जगताचा अवघा पट पांडुरंग तंतूने

विणलेला आहे. हा भाव मनात धरून विठ्ठलभक्ती करावी. अन्यथा भयभावनाच मनात दाटते. अवघे चराचर विठ्ठलमय झाल्याचा अनुभव येताच मग पाहण्याजोगे काही उरतच नाही. कारण जगतातील वस्तू भिन्न भासल्या तरी प्रत्यक्षात त्या एकरुपच असतात. तेथे स्त्री-पुरुष हा भेदही गळून पडतो. (अ.क्र.३७९)

म्हणून जनाबाई म्हणतात- ''जन हो, अत्यंत आर्ततेने हरिनामाचा आक्रोश करा. तेव्हा तो पुरुषोत्तम तुम्हावर क्षमेचा वर्षाव करील. ही परमेश्वरी क्षमा पृथ्वीलाही क्षमागुणात न्यूनता आणील. अंतर अखंड शुद्ध ठेवा. लोणीही कठोर भासेल अशी मृदुता हृदयात आणा. जे वचन बोलाल ते अत्यंत हळुवार असावे. सुमनांना सुगंधही जडभारी वाटावा अशी सुकुमारता अंतरात अनुभवावी. नामस्मरण करा. नामपाठ ही भक्तीची अमृतसंजीवनीच होय. तेव्हा साधकांनी केवळ नामस्मरणाने मुक्ती मिळवावी.'' (अ. क्र. ३८०)

## ७: ''सद्‌गुरुचरणा सेवी बापा''

'सद्‌गुरुची भक्ती' ही संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला दिलेली प्राणभूत देणगीच होय. नामदेवांची विठ्ठलभक्ती गुरुप्रसादामुळेच डोळस बनली. गुरुप्रसादाच्या अपरिहार्यतेची जाणीव नामदेवांमुळे जनाबाईंच्या व्यक्तिमनावर ठसली आणि त्यांच्या अभंगांतून व्यक्त झाली. जनाबाई म्हणतात-

''संसारी निधान लाधले जनां । सद्‌गुरुचरणा सेवी बापा ।
कायावाचामनें तयास देऊन । वस्तु मागून घे अगोचर ।
ते गोचर नव्हे जाण गुरुकृपेंवीण । एऱ्हवी ते आपणामाजीं आहे ।
असतां सम्यक परि जना चुकामूक । भुलली निष्टंक मंत्रे तंत्रें ॥
माळ वेष्टण करीं टपोर घेतीं शिरीं । नेम अष्टोत्तरीं करिताती ।
जो माळ करविता वाचेसि वदविता । तया हृदयस्था नेणे कोणी ॥
सोहं आत्मा प्रगट जो दाखवी वाट । सद्‌गुरू वरिष्ठ तोचि जाणा ।
तया उत्तीर्णता व्हावया पदार्थी । न देखों सर्वथा जनी म्हणे ॥'' (अ.क्र.३९३)

ह्या जगातील मनुष्यजातीचे भाग्य असे की त्यास सद्‌गुरूचरणसेवारुपी निधान सहजच लाभते. सद्‌गुरूच माता-पिता, मित्र-बंधू सर्व काही असतो. जिवास तो आत्मज्ञान देतो. त्यास मुक्ती प्राप्त करण्याचे भाग्य सद्‌गुरूमुळेच लाभते. म्हणून आत्मोद्धारार्थ तळमळणाऱ्या साधकाने आपल्या सद्‌गुरूची कायावाचामनाने सेवा करावी. आणि आत्मज्ञान प्राप्त करावे. मूलतः अगोचर असणारे आत्मतत्त्व सद्‌गुरूच्या कृपेमुळेच साधकास गोचर होते.

खरे तर आत्मतत्त्व, प्रत्येक व्यक्तिमात्राच्या ठिकाणीच अस्तित्वात असते. अंतरात्मा ज्याच्या त्याच्या ठिकाणी वसत असतोच. संपूर्ण परमेश्वरतत्त्व आत्मतत्त्वाच्या रुपाने जीवमात्राच्या ठिकाणी असतेच. पण मनुष्यास त्याच्या ठिकाणचे आत्मतत्त्व ओळखता येत नाही. जणू जन्मापासूनच त्याची आणि आत्मतत्त्वाची चुकामूक होते. आपल्याच अंतरीचे आत्मतत्त्व जाणण्याचे सामर्थ्य मनुष्याच्या ठिकाणी नसल्याने तो ढोंगी साधूसंताच्या आहारी जाऊन मंत्रतंत्राच्या जाळ्यात अडकतो. असे भोंदू साधू माळ धारण करतात. भगवी वस्त्रे परिधान करतात. मस्तकावर टपोर धारण करतात. नित्यनियमांचे कटाक्षाने पालन करतात. मात्र असे भोंदू कर्त्याकरवित्या आत्मतत्त्वास मात्र जाणत नाहीत.

तेव्हा साधकाने अखंड सावधचित्त असावे. अगोचर-अप्रकट 'सोऽहं' (आत्मतत्व) जो गोचर रुपात दर्शवितो तोच श्रेष्ठ सद्‌गुरू असल्याचे त्याने जाणावे. त्यास अनन्यभावाने शरण जावे. त्याच्या कृपेने आत्मज्ञान मिळवावे. आत्मतत्त्व अनुभवावे आणि आत्मप्राप्ती करून आत्मोद्धार साधावा.

### ८ : ''आर्तभूत व्हा रे, जनी म्हणे केणे घ्या रे॥''

संत ज्ञानेश्वर, नामदेव आदी संतांनी रचलेले उपदेशपर अभंगही श्रेष्ठ काव्यरुपे धारण करतात. कारण त्यामागे विश्वोद्धाराची आर्तता बाळगणारे कविमनही असते. उपदेश करणे हा त्यांच्या दृष्टीने एक उत्कट अनुभवच असतो. त्यामुळे हा अनुभव प्रतिमारुपांत प्रकटतो. कधी संपूर्ण अभंगात एकच रुपक योजिलेलेही दिसते. जनाबाईंनीही अशा स्वरुपाची सांग रुपकात्म अभंगरचना केली आहे हे विशेष!

''जहाज तारिलें तारिलें । शेवटी उगमासीं आलें ॥
भाव शिडासी लाविला । नाम फरारा सोडिला ॥
कथा भरियेलें केणें । घ्या रे नका दैन्यवाणें ॥
एका नामाचा विसार । आधी देऊनी निर्धार ॥
केणे देतो फुकासाठीं । आर्तभूत व्हावें पोटीं ॥
आर्तभूत व्हा रे । जनी म्हणे केणें घ्या रे ॥'' (अ. क्र. ३७२)

जनाबाईंची ही एक श्रेष्ठ अभंगरचना आहे. येथे जनाबाई संपूर्ण उपदेश सांग रुपकाच्या भाषेत करतात. हा उपदेश भवसागराच्या काठावर उभ्या असणाऱ्या अज्ञानी, दीन-दु:खी प्रापंचिकांना उद्देशून केलेला आहे. हे दीनवाणे दु:खी जीव आत्मोद्धारासाठी भुकेले आहेत.

सनातन भागवत संप्रदाय हेच एक जहाज आहे. दीन दु:खी आणि अज्ञानी

जिवांचे दैन्य दु:ख दूर करण्यासाठी ते आपण स्वत:च किनाऱ्याकडे आले आहे. भक्तिभाव हेच त्याचे शीड असून हरिनामाचा त्यावर फरारा सोडला आहे. संतसाधूंनी ह्या जहाजात हरिकथांचे विपुल केणे भरले आहे. हे जन हो तुम्ही त्यांचे श्रवण करा. कथा कीर्तनाचा अद्‌भूत आनंद घ्या. आपले दैन्य त्यामुळे नष्ट करा. श्रीहरीस पूर्णार्थाने शरण जा. त्यास स्वत:ला समर्पित करा. निर्धाराने नि:शंक होऊन विठ्ठलाचे अखंड नाम स्मरण करा. परमेश्वरास एवढा विसार पुरेसा आहे. तो तात्काळ तुम्हास उद्धरून पैलतीरावर नेईल. लोक हो, विठ्ठलाचे स्मरण करा, पांडुरंगाचा आर्त मनाने नामघोष करा आणि आत्मोद्धार साधा. श्रीहरीचे नाम मोफत. आहे. आर्त व्हा. नाम घ्या आणि मुक्त व्हा.

प्रस्तुत अभंगात दीन दु:खी प्रापंचिकांसंबंधीचा जनाबाईंच्या मनातील कळवळा उत्कटतेने प्रकट झाला आहे. संत जनाबाईंच्या मनातील लोकोद्धारासंबंधीची आर्तताही त्यातून प्रकटते. जनसामान्यांशी नाते जोडून, त्यांच्या दु:खांकडे सहानुभूतीने पाहणाऱ्या जनाबाई जनभाषेचा आश्रय करून त्यांना उपदेश करतात. जनाबाईंचा हा लोकसंवाद लक्ष वेधून घेणारा आहे.

❀

# समकालीन समाजाच्या जडणघडणीत संत जनाबाईंचे योगदान

यादवकालीन सर्व संतमंडळीत जनाबाईंचे स्थान, त्यांचे जीवन, व्यक्तिमत्त्व आणि सामाजिक बांधिलकी ह्यामुळे स्वतंत्र आहे. तसेच ते वैशिष्ट्यपूर्णही आहे. नामदेव हे प्रापंचिक असले तरी ते प्रापंचिक बांधिलकी स्वीकारण्यास अनुत्सुक होते. आपले संपूर्ण जीवन त्यांनी उत्कट सगुण भक्तीत व नामसंकीर्तनात व्यतीत केले. संत निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वरादींना प्रापंचिक बंधने नव्हतीच. जी होती ती मूलतःच गळून पडली होती. ह्या संतांचे जीवनच जणू समाधिरूप होते. त्यामुळे चोखामेळ्याचा अपवाद करता आपल्या दैनंदिन प्रापंचिक वा व्यावसायिक बंधनाचा कांच जनाबाईंनाच सहन करावा लागला.

कारण जनाबाई हे वर्णहीन समाजाच्या निकृष्ट पातळीवर जन्मास आलेले एक जीवन होते. त्या अस्पृश्यच समजल्या जात होत्या. त्यातही बालपणीच आईवडील निर्वतल्याने मातृपितृसुखासही वंचित झाल्या होत्या. नामदेवांच्या घरी पोरक्या जनाबाईंना आश्रय मिळाला. तरी तेथेही अखंड काबाडकष्ट केल्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते. अखेर त्या एक स्त्री होत्या. 'वर्णहीन' असल्याचे आणि 'स्त्री' असण्याचे भागधेय लाभल्याने त्यांचे जीवन कष्ट, दुःख आणि उपेक्षा ह्यांनी काळवंडून गेले होते. अशा सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीत जनाबाईंनी पांडुरंगावर दृढ श्रद्धा ठेवून नामभक्ती आचरण्यास प्रारंभ केला. उत्कट संवेदनशीलता अभिजात प्रतिभा, नेटकी विचारसरणी, अढळ श्रद्धा आणि ईश्वराचा अखंड ध्यास आदींमुळे जनाबाई भक्तीच्या सर्व पायऱ्या झपाट्याने सहजी चढून गेल्या. अखेर 'साक्षात्कारी संत' म्हणून ज्ञानेश्वरांच्याही गौरवास त्या पात्र झाल्या. एका निरक्षर, उपेक्षित, वर्णहीन अनाथ दासीस 'संत जनाबाई' हा अम्लान लौकिक प्राप्त झाला.

परिणामी वर्णहीन समाजाच्या सर्व स्तरांतील स्त्री-पुरुषांत उत्कट व अविचल विठ्ठलभक्तीने आत्मोद्धार करता येतो, ही जाणीव दृढमूल झाली. चोखामेळ्याप्रमाणेच जनाबाईंही उपेक्षितांच्या आकांक्षेचे प्रतीक ठरल्या. समकालीन

उपेक्षितांचे आध्यात्मिक नेतृत्व त्यांच्याकडे चालत आले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांना ज्या रीतीची अध्यात्माधिष्ठित समता अभिप्रेत होती, तिची संत जनाबाई ही जणू परिपूर्ती होती. जनाबाईंना गौरविण्यात नामदेवांपेक्षा निवृत्तिनाथ-ज्ञानेश्वरांचाच सिंहाचा वाटा होता, ही गोष्ट लक्षणीय आहे. नामदेवांनी जनाबाईंची संतत्वाच्या दिशेने जडणघडण केली आणि ज्ञानेश्वरांनी जनाबाईंचे संतत्व घोषित केले. समकालीन दोन संतश्रेष्ठांचा जनाबाईंच्या आध्यात्मिक जीवनातील सहभाग अद्‌भुतच म्हणावा लागेल!

जनाबाईंचे हे संतत्व समकालीन समाजाच्या आध्यात्मिक जागरणास, परिवर्तनास आणि उद्धरणास साह्यकारी ठरले. तसेच ते मार्गदर्शकही ठरले. ज्ञानेश्वर, नामदेवांपेक्षा तत्कालीन वर्णहीन समाजातील स्त्रीपुरुषांना जनाबाई-चोखामेळा जवळची वाटणे स्वाभाविकच होते. ज्ञानेश्वर-नामदेवांच्या तुलनेने चोखामेळा वा जनाबाई यांनी अनुसरलेला मार्ग सहज-सोपा असल्याने जनसामान्यांना अनुसरणसुलभ ठरला. ज्ञानेश्वरांनी प्रेरित केलेल्या वारकरी संप्रदायाच्या निर्मितीमागील प्रमुख उद्दिष्ट लोककल्याण, लोकमंगल आणि लोकोद्धार हेच होते. जनाबाई-चोखामेळा आदी दुसऱ्या आघाडीतील संतांच्या जीवनमाध्यमातून ज्ञानेश्वरांचा हा हेतू जनसामान्यात संक्रमित झाला. जनाबाईंची भक्तिशैली, भक्तिभावानुभूती तत्कालीन व उत्तरकालीन स्त्रीजनांना विशेष जवळची वाटली. कारण जनाबाईंच्या अभंगांतील अनुभवविश्व, आशयद्रव्ये, भाषा, प्रतिमा यांचा स्त्रीजीवनाशी मूलतःच भावबंध जोडलेला होता. जनाबाईंच्या अभंगवाणीचे स्त्रीजनाशी असणारे नाते आजही तितक्याच तीव्रतेने जाणवते. जनसामान्यातील पुरुषवर्गात तुकारामांच्या अभंगवाणीला जसे अढळ स्थान आहे, तसे स्त्रीवर्गात जनाबाईंच्या अभंगवाणीला असल्याचे प्रत्ययास येते. आजही ग्रामीण वा अर्धनागरी स्त्रीजन आपल्या सुखदु:खांच्या, भावभक्तीच्या आविष्कारासाठी जनाबाईंच्या अभंगांतून बोलताना दिसतात. त्यावरून जनाबाईंच्या अभंगवाणीची लोकसंवादक्षमता आवाहकता आणि परिणामकारिता लक्षात येते. जनाबाई अशा स्वत:च्या कालातही आपल्या साक्षात्कारी भक्तीने आणि अद्‌भुत आत्मोद्धाराने एक दंतकथा होऊन राहिल्या होत्या. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि अभंगवाणीची अजाण-सुजाण स्त्रीपुरुषांच्या मनांवर असणारी मोहिनी आजही तितकीच टवटवीत आणि चैतन्यमयी वाटते.

# जनाबाईंच्या चैतन्यपूर्ण व्यक्तिविशेषांचे चिरतरुण काव्यदर्शन

## १ : समूहभान प्रकट करणारे अभंग

जनाबाई हे समूहात रमणारे मन आहे. संतसाधूंचा मेळा आणि वैष्णवांचा मेळावा, तसेच दिंडीचा सोहळा ह्यांत जनाबाईंचे संतमन विशेष रस घेते. नामसंकीर्तनात हे मन देहभान हरवते. सर्वसामान्यात सामान्य होऊन हरिगजरात पंढरीस जाणाऱ्या आणि पांडुरंगास आलिंगन देणाऱ्या जनाबाईंचे विलोभनीय दर्शन पुढील अभंगात होऊ शकेल.

''चला पंढरीसी जाऊं । रखुमादेवीवर पाहूं ॥१॥
हातीं टाळीं मुखीं हरी । गात जाऊं महाद्वारीं ॥२॥
स्नान करूं भिवरेसी । पुंडालिका पायांपाशीं ॥३॥
डोळे भरून पाहूं देवा । तेणे विसरूं देहभावा ॥४॥
ऐसा निश्चय करूनी । म्हणे नामयाची जनी ॥५॥'' (अ. क्र. ३४३)

संतसज्जनांच्या सहवासात रमणारे संत जनाबाईंचे मन जनांवर कृपा करून त्यांचे उद्धरण करण्यास आसुसलेले दिसते.

''करूं हरीचें कीर्तन । गाऊ निर्मळ ते गुण ॥१॥
सदा धरुं संतसंग । मुखीं म्हणूं पांडुरंग ॥२॥
करुं जनांवरी कृपा । रामकृष्ण म्हणवूं लोकां ॥३॥
जनी म्हणे कीर्ति करूं । नाम बळकट धरुं ॥४॥'' (अ. क्र. ३५५)

वारकरी संप्रदाय हा सर्वस्तरीय समाजाला स्वत:त सामावून घेणारा भक्तिसंप्रदाय आहे. ह्या वारकऱ्याचे ध्येय कोणते? त्यांना मिळणाऱ्या आनंदाचे स्वरुप कोणते? त्यांना विठ्ठलभक्ती कोणते सुख देते? ह्या सामान्य माणसांचे काहीच फारसे मागणे नाही. हातांनी टाळ्यांचा गजर करीत आणि मुखाने

हरिनामाचा घोष करीत ही दिंडीतील माणसे पंढरीला निघालेली आहेत. तेथे पंढरीनाथ त्यांना भेटणार आहे. तो 'रखुमादेवीवर' डोळ्यांनी पाहावा एवढीच त्यांची आकांक्षा आहे. दिंडीत सहभागी होऊन गात नाचत पंढरीस जावे, तेथे महाद्वारी उभे राहून रखुमादेवीवरास साद घालावी, भिवरेत स्नान करून पावन व्हावे, पुंडलिक या आद्य विठ्ठलभक्ताच्या चरणास स्पर्श करावा आणि अखेर पांडुरंगास भेटावे, त्याला डोळे भरून पाहताना स्वर्गसुख अनुभवावे, हेच सामान्य वारकऱ्याचे स्वप्न असते. जनाबाईंही सामान्य वारकरी बनून हे अद्‌भुत सुख अनुभविताना दिसतात.

पंढरीत हरीचे कीर्तन करावे, परमेश्वराचे रुप-गुण आठवावे, संत सज्जनांच्या सहवासाचे सुख लुटावे, अखंड पांडुरंगाचा जप करावा, जनावर कृपादृष्टीने पाहून त्यांचे उद्धरण करावे, जगसागरास रामकृष्ण हा मंत्रजागर करावयास शिकवावे आणि श्रीहरीचे नाम पंढरीत दुमदुमत ठेवावे, हेच संत म्हणूनही आपले ध्येय आहे असे जनाबाईंना वाटते. रामकृष्णहरी नामाचा अखंड गजर करावा हे प्रत्येक संताने आपले कर्तव्यच मानले आहे.

## २ : जनाबाईंचा स्वयंबोध

''भ्रांती माझे मन प्रपंची गुंतलें । श्रवण मनन होऊनि ठेलें ॥
बापे बोधिलें बापें बोधिलें । बोधुनी कैसी तदरुप जालें ॥
निजध्यासें कैसा अवघाचि सांपडला । कीं विश्वरुपीं देखिला बाईयांनो ॥
नामयाची जनी स्वयंबोध जाला । अवघाचि पुसला ठाव देखा ॥''

प्रस्तुत अभंगाचे वैशिष्ट्य हे की त्यात जनाबाई आपणास स्वयंबोध झाल्याचे नमूद करतात. खरे तर जनाबाईंना स्वत:चा असा प्रपंच नव्हताच. नामदेवांच्या घरी कष्ट करता करता त्या नामदेवांच्या कुटुंबियांशी एकरुप झाल्या. अनेकदा आपण ह्या घरातही उपेक्षित आहोत याची तीव्र जाणीव जनाबाईंना होई. तेव्हा त्या विलक्षण उदास होत. शरीरश्रम असह्य होत, तेव्हा त्या विठ्ठलाचा धावा करीत. हळूहळू विठ्ठल आपणास साह्यकारी होत असल्याचा साक्षात्कार त्यांना होऊ लागला. तशी त्यांची विठ्ठलभक्ती दृढ आणि उत्कट होत गेली. त्यातूनच विठ्ठल आणि संत जनाबाई यांचे सख्यत्व साकार झाले. आणि त्याचे बघता बघता प्रेमभावात रुपांतर झाले. जनाबाईंच्या मधुराभक्तीस अशा रीतीने प्रारंभ झाला.

जनाबाईंनी देवास असे उत्कट प्रेमभक्तीने जिंकले. त्यामुळे नाथसंप्रदायास अभिप्रेत असणारा गुरुबोध त्यांना लाभला नाही. नामदेवांचे दास्यत्व जनाबाईंनी मिरविले तरी नामदेवांनी गुरुबोध केल्याची नोंद ना नामदेव गाथ्यात आढळते ना जनाबाईंच्या अभंगात! मुक्ताबाई आणि जनाबाई ह्या दोघीही समवयस्क,

समकालीन आणि सांप्रदायिक सहप्रवासी. तरीही मुक्ताबाईंनी जनाबाईंना बोधित केल्याचा उल्लेखही आढळत नाही. मुक्ताबाई संत नामदेवांसंबंधी विपुलतेने लिहितात. पण जनाबाईंची एखादी नोंदही मुक्ताबाईंच्या अभंगांत सापडत नाही याचे वैषम्य वाटते. निवृत्तिनाथ-ज्ञानेश्वर यांनी जनाबाईंच्या साक्षात्कारी प्रेमभक्तीची मुक्तकंठाने स्तुती केल्याचे जनाबाईंनी सांगितले आहे. तथापि त्यांनी जनाबाईंना उपदेश केल्याची नोंद मात्र कुणीच केलेली दिसत नाही.

अशाप्रकारे जनाबाईंच्या अभंगविश्वात समकालीन सर्व संतांच्या गौरवपूर्ण नोंदी आढळतात. मात्र अन्य संतांनी जनाबाईंचा उल्लेख केल्याचे दिसत नाही. याचे आश्चर्य वाटते. त्यामुळेच जेव्हा 'नामयाची जनी स्वयंबोध जाला' असा जनाबाई उल्लेख करतात. तेव्हा तेच सत्य असल्याची खात्री पटते.

हा स्वयंबोध जनाबाईंना कसा झाला? याचे सूचन जनाबाईंनी उपरोक्त अभंगात केले आहे. प्रपंचात भ्रांतीने गुरफटलेल्या जनाबाईंनी परमेश्वराचे नामस्मरण, श्रवण आणि मनन दृढतेने केले. त्या विठ्ठलाशी एवढ्या एकरूप झाल्या की त्यांना प्रत्येक क्षणी, प्रत्येक व्यक्तीत आणि चराचरात देवाचाच साक्षात्कार होऊ लागला. त्याचेही उत्कट दर्शन जनाबाईंनी अनेक अभंगांतून केले आहे.

''देव खाते देव पिते । देवावरी मी निजतें ॥१॥
देव देते देव घेते । देवासवें व्यवहारितें ॥२॥
देव येथें देव तेथें । देवाविणें नाहीं रितें ॥३॥
जनी म्हणे विठाबाई । भरुनि उरलें अंतरबाही ॥४॥'' (अ. क्र. ३२८)

हा सुप्रसिद्ध अभंग त्यातीलच एक होय.

तेव्हा केवळ अनन्य भक्तीनेही परमेश्वरप्राप्ती होऊ शकते याचे 'जनाबाई' हे एक श्रेष्ठ उदाहरण होय. आणि जनाबाईंची देवभक्ती हा ह्या श्रेष्ठ भक्तिसाधनेचा आदर्श वस्तुपाठ होय.

श्रेष्ठ भक्ताच्या अशा साक्षात्कारी अवस्थेत अन्य गुरूकडून उपदेश घेण्याची आवश्यकता कोठे उरते, असा जनाबाईंच्या मनाला पडलेला प्रश्न आहे. त्यामुळे गुरुपदेशासाठी तळमळणाऱ्या जनाबाई आपणास त्यांच्या अभंगांत दिसत नाहीत. सद्गुरूची महती गाणाऱ्या, गुरु अथवा साधुसंतांच्या सहवासाचे माहात्म्यगायन करणाऱ्या जनाबाईंना स्वत: मात्र अशा सद्गुरूच्या उपदेशास वंचित व्हावे लागले असे दिसते. तथापि त्याविषयीचे दु:ख व्यक्त करण्यापेक्षा समकालीन सर्वच संतश्रेष्ठांना सद्गुरू मानून जनाबाई त्यांचे श्रेष्ठत्व वर्णन करताना, त्यांचा मुक्तकंठाने गौरव करताना दिसतात.

आपणास विठ्ठलानेच बोधिले. त्यामुळे आपण तद्‌रुप झालो. आपण विठ्ठलाचा निजध्यास केला. परिणामी अवघा देवच आपल्या हाती आला. असा देव हाती आला की जो अवघ्या विश्वात कोंदलेला दिसू लागला. चराचरात त्याचीच रुपे प्रकट होऊ लागली. साक्षात देवच पुढे उभा राहिला, तर मग अन्य बोध तो कोठे उरला? देवाने जनाबाईंना असा स्वयंबोध केला. जनाबाईंना वेगळा ठाव वा अस्तित्व उरलेच नाही. आता देवासवे ऐक्याचा सोहळा अनुभविण्याचे भाग्य जनाबाईंना प्राप्त झाले. जनाबाई त्यामुळेच धन्योद्‌गार काढतात.

''बाई मी लिहिणें शिकलें सद्‌गुरुरायापाशी'' (अ. क्र. ३२४) ह्या सुप्रसिद्ध अभंगात जनाबाईंनी जो बोध वर्णन केला आहे तो उघडच नाथसंप्रदायाने आत्यांतिक महत्त्वाचा मानलेला 'आत्मज्ञानबोध आहे. तथापि तो करणाऱ्या सद्‌गुरूरायाच्या नावाचा उल्लेख मात्र अभंगात आढळत नाही. अभंगाच्या अखेरीस जनाबाईंनी केलेला उल्लेख महत्त्वाचा आहे. जनाबाई म्हणतात-

''नामदेवाचे प्रताप । शिरीं विठोबाचा हात ॥
जनी म्हणे मात । पुसा ज्ञानेश्वरासी ॥'' (अ. क्र. ३२४)

जनाबाईंना लाभलेल्या स्वयंबोधात भक्त श्रेष्ठ नामदेवांचा विठ्ठलांस जिंकण्याच्या प्रतापाचा, हे विठ्ठलनिधान आयतेच लाभलेल्या जनाबाईंच्या अनन्य भक्तीचा आणि योगश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी केलेल्या आत्मज्ञानबोधाचा समावेश आहे. याचा अर्थ श्रेष्ठ सगुणभक्ती, श्रेष्ठ निर्गुणसाधना आणि श्रेष्ठ नामभक्ती यांचे अद्वैत जनाबाईंच्या स्वयंबोधात झाले आहे. त्याचे रहस्य फक्त ज्ञानेश्वरच जाणतात. ज्ञानदेवप्रणित अद्वैतज्ञान, आत्मज्ञान आणि जीव-शिव सामरस्य अनुभूती यांसंबंधाने जनाबाई इतक्या सहजतेने, आत्मप्रतीतीने आणि अधिकारवाणीने येथे बोलतात की आपले मन स्तिमित व्हावे. येथे जनाबाई श्रेष्ठ सगुणभक्तीचा आदर्श असणाऱ्या नामदेवांची दासी जनी आहे असे वाटण्यापेक्षा श्रेष्ठ सिद्धयोगी ज्ञानेश्वरांची शिष्या आहे असेच वाटू लागते.

## ३ : जनाबाईंची स्वयंप्रेरित आत्मसिद्धी आणि अद्वैत साक्षात्कार

असाच प्रत्यय जनाबाईंच्या पुढील अभंगांत येऊ शकेल.

''ज्योत परब्रह्मी होय । खेचरी दर्पणीने पाहे ॥१॥
इडा पिंगळा सुषुम्ना । तिन्ही पाहे हृदयभुवना ॥२॥
हळूहळू रीघ करी । सूक्ष्म हृदय अंतरी ॥३॥
हृदयकमलावरी जासी । जनी म्हणें मुक्त होसी ॥४॥'' (अ. क्र. ३३८)

''नाही आकाश घडणी । पाहा स्वरुपाची खाणी ॥१॥
स्वरूप हे अगोचर । गुरू करिती गोचर ॥२॥
गोचर करिताती जाणा । दृष्टि दिसे निरंजना ॥३॥
नाही हातपाय त्यासी । जनी म्हणे स्वरुपासी ॥४॥'' (अ. क्र. ३३९)

ह्यांपैकी पहिल्या अभंगात योगसमाधीप्रत नेणाऱ्या कुंडलिनी प्रक्रियेचा निर्देश केला आहे. इडा, पिंगळा आणि सुषुम्ना यांची झेप हृदयभुवनाकडे असते. कुंडलिनी ही सूक्ष्म शक्ती हृदयकमलावर स्थित होताच साधकास मुक्तीचा लाभ होतो, असा जनाबाईंचा अनुभव आहे. तो जनाबाईंनी प्राप्त केलेल्या आत्मज्ञानाचा व योगानुभूतींचा निर्देश करतो. खरे तर जनाबाईंची सगुणभक्ती जितकी अभिजात आणि स्वयंप्रेरित आहे, तितकीच त्यांची योगानुभूतीही अभिजात आणि स्वयंसाधित मानावी लागते. कारण दोन्ही मार्गांवर भक्तश्रेष्ठ नामदेव आणि योगश्रेष्ठ ज्ञानदेवांचे जनाबाईंना मार्गदर्शन लाभल्याचे जाणवले तरी ते अप्रत्यक्ष स्वरुपाचेच होते, हे विसरून चालणार नाही. संत निवृत्तिनाथ-ज्ञानदेव यांनी अप्रत्यक्षपणे मुक्ताबाईंची आत्मज्ञानप्राप्तीच्या मार्गावरील वाटचाल संस्कारित केली खरी. तरी त्यांच्याकडून जनाबाईंना प्रत्यक्षात गुरुपदेश लाभल्याचे मात्र प्रत्ययास येत नाही. जनाबाईंनी ही वाटचाल नामदेव-ज्ञानदेवांना अनुसरून आणि प्रत्यक्ष विठ्ठलावर अवघा भार टाकून केली आहे, हे वास्तव स्वीकारावेच लागते. ह्या दृष्टीने संत जनाबाईंची आध्यात्मिक वाटचाल एकाकीच ठरते.

दुसऱ्या अभंगात (क्र. ३३९) जनाबाई परब्रह्मतत्त्वाचे स्वरुप वर्णन करताना दिसतात. आकाश ज्याप्रमाणे निराकार असल्याने वर्णनातीत आहे, त्याप्रमाणे ब्रह्मतत्त्वही अवर्णनीय आहे. आकाश घडवता येत नाही. आकाश हे स्वत:च स्वरुपाची खाण आहे. पण हे स्वरुप बाह्य चक्षूंना अगोचर आहे. गुरूकृपा होताच ते गोचर होते. सद्गुरूस शरण गेल्यावर आणि त्यांचा प्रेमप्रसाद लाभल्यावरच परब्रह्मतत्त्वाचे स्वरुप स्वच्छपणे दिसू लागते. हे स्वरूप निरंजन असल्याचे अंतर्दृष्टीस जाणवते. ते निर्गुण, निराकार, निर्लेप आहे. सगुण मूर्तीहून ते भिन्न आहे. त्यास हातपाय आदी मानवी देहाचे अवयव नाहीत. ते स्वयंभू, स्वयंप्रकाशी आणि चिदानंदरूप असते.

येथेही जनाबाई आत्मसिद्धी लाभलेल्या योगिनीसारख्या बोलतात. जनाबाईंचे हे बोलणे पढिक ज्ञान्यासारखे तत्त्वप्रचुर नाही. त्यांच्या ब्रह्मस्वरुपासंबंधीच्या बोलण्यात आत्मप्रतीतीचे तेज व साक्षात्कारी योग्याचे चैतन्य विलसू लागते.

जनाबाईंना मुक्ताबाईंसारखा ज्ञानप्राप्तीचा अधिकार, आत्मज्ञानसाधनेसाठी संपूर्ण स्वतंत्र जीवन आणि सद्गुरूचा कृपाप्रसाद लाभला असता तर त्यांनी

आध्यात्मिक क्षेत्रात केवढी झेप घेतली असती? असा विचार येथे मनात आल्याशिवाय राहात नाही.

### ४ : 'स्त्रीजन्म म्हणवुनी न व्हावे उदास'

संत जनाबाईंना आपल्या जीवनात अनेक खडतर अनुभव आले. अखंड कष्ट उपसावे लागले, सातत्याने उपेक्षाही सहन करावी लागली. त्याचे कारण त्यांचे 'स्त्रीपण' हेही होते. तरीही आपल्या प्राप्त जीवनात भक्ती-संजीवन ओतून त्यांनी जीवन अमृतमय करून टाकले. साक्षात्कारी भक्ती आणि चोख अद्वैतभाव यांची एकाच वेळी प्राप्ती करून घेऊन अद्वैतभक्तीचा अवघड घाट त्या सहजी चढून गेल्या.

ह्या आध्यात्मिक प्रवासात आपले 'स्त्री' असणे कुठेही आड आल्याचे आपणास जाणवत नाही, असा जनाबाईंचा निर्वाळा आहे. खरे तर अध्यात्मसाधनेत स्त्री-पुरूष हा भेद टिकतच नाही. निदान भारतीय अध्यात्मशास्त्राने तरी स्त्री-पुरुषच नव्हे, तर अन्य कोणतेही भेद परमेश्वरप्राप्तीच्या आड येत नाहीत असे घोषित केले आहे. मग तो भक्तियोग असो, कर्मयोग असो अथवा ज्ञानयोग असो. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी दूरदृष्टीने नाथसंप्रदायाची सर्वंकष समतेची ही क्रांतिकारी जाणीव वारकरी संप्रदायाला देऊन त्यास जीवनसन्मुख केले असेच म्हणावे लागते.

प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णानेही गीतेत सर्वांगीण समतेचा, सहिष्णुतेचा आणि विश्वात्म जीवनप्रणालीचा निश्चयात्मक बुद्धीने अखंड पुरस्कार केला आहे. श्रीमद्‌भागवतगीतेतील नवव्या अध्यायात भक्तांचे वा भक्तीचे श्रेष्ठत्व वर्णन करताना भगवान् श्रीकृष्ण म्हणतात-

''समोऽहं सर्व भूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रिय: ।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥
अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेवच मन्तव्य: सम्यग्व्यवसितो हि स: ॥
क्षिप्रं भवति धर्मात्माशश्वच्छान्तिं निगच्छति ।
कौन्तेय प्रति जानीहि न मे भक्त: प्रणश्यति ॥
मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्यु: पापयोनय: ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्तिं परां गतिम् ॥'' (गीता - अ. ९ - श्लोक २९, ३०, ३१, ३२)

भगवान म्हणतात - मी सर्व भूतमात्रांच्या ठिकाणी समत्वाने वसतो. त्यांत कोणीही मला प्रिय अथवा अप्रिय नसते. दुराचरणी जर अनन्यभावाने माझी सेवा

करील तर मी त्यास साधूच मानेन. असा भक्त अल्पकाळात धर्मात्मा होऊन त्यास शाश्वत शांती लाभते. माझा भक्त कधीही नाश पावत नाही. माझी भक्ती करणाऱ्या स्त्रिया, वैश्य, शूद्र तसेच पापयोनीत जन्मास आलेले भक्तही परागतीस प्राप्त होतात. भगवान् श्रीकृष्णांनी भगवद्गीतेत दिलेले हे आश्वासन गीताप्रवचनांतून तसेच संत ज्ञानेश्वरांच्या गीताभाष्यातून जनाबाईपर्यंत पोहोचलेले दिसते. गीतावचनांवर वा ज्ञानेश्वर- वचनांवर दृढ श्रद्धा जडलेल्या संत जनाबाईंच्या अभंगांतून ही जाणीव त्यामुळेच व्यक्त झाली आहे. जनाबाईंच्या संवेदनक्षम अंतर्मुख मनाने उपरोक्त जाणीव आत्मसात केली आहे याचा प्रत्यय त्यांच्या पुढील अभंगात येतो.

''स्त्रीजन्म म्हणवुनी न व्हावे उदास ।
साधुसंतां ऐसें केलें मज ॥१॥
संतांचे घरची दासी मी अंकिली ।
विठोबानें दिली प्रेमकळा ॥२॥
विदुर सात्त्विक माझिये कुळीचा ।
अंगिकार त्याचा केला देवें ॥३॥
न विचारितां कुळ गणिका उद्धरिली ।
नामें सरती केली तिहीं लोकीं ॥४॥
ऋषींची कुळें उच्चारिलीं जेणें ।
रौरवीं तेणें वस्ती केली ॥५॥
नामयाची जनी भक्ती तें सादर ।
माझें तें साचार विटेवरी ॥६॥'' (अभंग क्रमांक - ३१२)

जनाबाई म्हणतात साधुसंतांनी मला अशी शिकवण दिली आहे की स्त्रीजन्म म्हणून उदास होऊ नये. मी तर आपले संपूर्ण जीवनच संतांना समर्पित केले आहे. संत नामदेवांसारख्या भक्तशिरोमणीच्या घरची मी दासी आहे. साक्षात विठ्ठलाने मला आपली प्रेममुद्रा दिली आहे. होय. मी शूद्र आहे. पण श्रीकृष्णाचा निस्सीम भक्त विदूरही शूद्र नव्हता का? त्याचा देवाने अंगिकार केला होता. एवढेच नव्हे कुळाची विचारणा न करता देवाने गणिकेचा उद्धार केला. देवाने फक्त तिची भक्ती पाहिली, कुळ नाही. तसेच काही ऋषींची कुळे अत्यंत हीन आहेत. एवढी की त्यांचा उच्चार करणाऱ्यास नरकप्राप्ती व्हावी. तथापि देवाने त्यांचाही स्वीकार केला. असे असता संत नामदेवांच्या घरी अहोरात्र सेवा करणारी भक्त जनी उद्धरून जाणार ह्यात शंका ती कोणती? प्रत्यक्ष विठ्ठलच जिथे माझ्या दृष्टीपुढे साकार होतो, माझ्याशी संवाद करतो, माझ्या कष्टांचे ओझे वाहतो, एवढेच नव्हे तर माझ्यावर

निस्सीम प्रेम करतो, ज्यास मी जीवनातच प्राप्त करून ह्रदयात बंदिस्त केले आहे, त्यास माझा उद्धार करणे क्रमप्राप्तच आहे. तेव्हा स्त्रीजन्माचा अडसर आत्मोद्धाराआड येत नाही हेच खरे!

## ५ : 'डोईचा पदर आला खांद्यावरी''

जनाबाईंचे जीवन चढउतारांनी भरलेले होते. अनाथपण, शूद्रपण, स्त्रीपण इत्यादींनी त्यांच्या जीवनात फुलांपेक्षा काटेच अंथरले गेले. नामदेवांच्या ह्या दासीला अहोरात्र श्रमजीवनास सामोरे जावे लागले. अशाही परिस्थितीत नामदेवांचे विठ्ठलनिधान जनाबाईंच्या हाती आले. दळिता-कांडिता त्यांची नामसाधना सुरू झाली. आपल्या आजुबाजूच्या माणसांत विठ्ठलरुप पाहण्याची जीवनशैली त्यांनी अंगिकारली. जनाबाईंचे हे ईश्वरसाक्षात्कार केवळ सगुणच नाहीत तर मानवीही आहेत, हे विशेष.

जनाबाई हे विलक्षण सतेज बुद्धी लाभलेले एक सजग स्त्रीमन आहे. तितकेच ते भावसंपन्नही आहे. मुक्ताबाईंपेक्षा जनाबाई भावसमृद्धीत वरचढ आहेत. त्यांची म्हणून एक जीवनशैली आहे. जीवनव्यवहारपद्धती आहे. तिच्यातून त्यांची भाषा घडली आहे. स्वत: जनाबाईंची उत्कट सुखदु:खे आहेत. जीवघेणे संघर्ष आहेत. पदोपदी पडणारे पेच आहेत, त्यांची ध्यासस्वप्ने आहेत. भासविश्व आहे. त्यांच्या संवेदनशील मनाने उभे केलेले एक अनुभवविश्वही आहे. त्यात त्या अहोरात्र हरवून जातात. त्यातून जनाबाईंचे साक्षात्कारानुभव जन्म घेतात. विठ्ठलाशी अपत्यनाते, सख्यत्वाचे नाते, भक्तीचे नाते जोडता जोडता जनाबाई आणि विठ्ठल यांचे प्रेमसंबंध जुळून येतात. ह्या सर्व भावबंधांमुळे जनाबाईंचे अभंगविश्व भावसमृद्ध बनते. जनाबाईंनी विठ्ठलास जिंकले आहे. आता विठ्ठलच जनाबाईंचे दास्य करू लागला आहे. विठ्ठल आणि जनाबाई यांच्या चोरट्या प्रेमसंबंधांचाही पंढरपुरात अखेर सर्वत्र बोभाटा होतो. परिणामी जनाबाईंना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहावे लागते. विठ्ठलाचे पदक चोरल्याचा त्यांच्यावर आरोप होणे अटळच ठरले. जनाबाईंना सुळावर जाण्याची शिक्षाही होते. मात्र सर्व काही करून सवरून विठ्ठल नामानिराळा होतो. जनाबाईंना कुणीच कैवारी दिसत नाही. त्यामुळे त्यांच्या मनाचा तोल जाऊन त्या संघर्षाची भाषा बोलू लागतात. त्यावेळी केवळ एक संतमन बोलत नसते. तर प्रतिकूल परिस्थितीने गांजलेले बहुजन समाजातील विद्रोही स्त्रीमन अत्यंत सात्विक संतापाने निर्भिडपणे आत्मसमर्थन करीत असते. जनाबाईंच्या पुढील अभंगात जनाबाई कुणाला फटकारीत आहेत हे पारदर्शकपणे व्यक्त होते. त्यामुळे संपूर्ण अभंग बोलका वाटतो.

''डोईचा पदर आला खांद्यावरी ।
भरल्या बाजारीं जाईन मी ॥१॥
हातीं घेईन टाळ खांद्यावरी वीणा ।
आतां मज मना कोण करी ॥२॥
पंढरिच्या पेठे मांडियेलें पाल ।
मनगटावर तेल घाला तुम्ही ॥३॥
जनी म्हणे देवा मी जाले वेसवा ।
रिघाले केशवा घर तुझें ॥४॥'' (अ. क्र. ३६२)

आपल्या दैनंदिन जीवनाच्या भाषेत अभंगरचना करणारी जनाबाई ही आद्य मराठी जीवननिष्ठ संत कवयित्री होय. त्यामुळे संत तुकारामांच्या अभंगरचनेवरही जनाबाईंच्या भाषाशैलीचा प्रभाव जाणवतो.

उपरोक्त अभंगाची सुरुवातच मुळी एका वाक्प्रचाराने झाली आहे. त्यामुळे अभंग प्रारंभीच आपले लक्ष वेधून घेतो. 'डोईचा पदर खांद्यावर' येणे हा सनातन भारतीय कृषिजीवनातील स्त्रीविषयक सभ्यतेचा एक संकेत आहे. सामान्यतः स्त्रियांना सन्मान देणे ही एक जनरीत आहे. स्त्रीविषयक सभ्यतेच्या मर्यादांचा जर भंग झाला, तर स्त्रीही आपल्या मनोभंगाने दुखावली जाऊन आक्रमक बनते. डोईचा पदर जेव्हा खांद्यावर येतो, तेव्हा ग्रामीण स्त्रीही सभ्यतेच्या मर्यादा ओलांडून संघर्षाचा पवित्रा धारण करू शकते. अभंगाच्या आरंभीच 'डोईचा पदर खांद्यावर' आल्याने संपूर्ण अभंगच एक स्फोटक प्रारंभक्षण सूचित करतो. त्यामुळे ह्या अभंगाचा प्रारंभच नाट्यात्म वाटतो. पुढील अभंगातील संपूर्ण आशय नाट्यरुप धारण करणार याचे सूचन केले जाते.

आणि घडतेही तसेच. संपूर्ण अभंगात जनाबाईंची एक तात्कालिक पण अभिनव अशी नाट्यपूर्ण भूमिका बोलत राहते. उमजते की जनाबाईंना येथे सात्त्विक संताप आला आहे. त्या खूपच दुखावल्या गेल्या आहेत. त्यांच्या बोलण्यातून त्यांच्या मानभंगाचे स्वरुप पुरेसे सूचित होते.

नामदेवांच्या घरी अहोरात्र कष्ट उपसणाऱ्या जनाबाईंच्या संवेदनशील भक्तमनास आपणही कथा-कीर्तनात, हरिभजनात वा दिंडीत सामील व्हावे आणि भगवद्भक्तीचा आनंद मुक्तपणे अनुभवावा असे वाटते. पण प्रपंचहीन असूनही त्या प्रापंचिक व्यवहारात सतत गुरफटत राहतात. त्यामुळे त्यांच्या मनाची सतत तगमग होते. त्यातच त्यांना कुणी तरी त्यांच्या स्त्रीपणाची व त्यामुळे येणाऱ्या रुढ सभ्यतेच्या बंधनांची कठोरपणे जाणीव करून देते. त्यामुळे जनाबाईंचा सात्त्विक संताप उफाळून येतो. मूळचा फटकळ स्वभाव जागृत होतो. ह्या ग्रामीण स्त्रीची

अस्सल जीवनाची भाषा सजग होते. सर्व लौकिक बंधने झुगारुन जनाबाई आपल्या विमुक्त ग्रामीण जीवनशैलीचा आश्रय करून बोलू लागतात,

''डोईचा पदर आला खांद्यावरी.'' अती झाले आणि हसू आले. आता संकोच, भीडभाड टाकल्यावर कुणाची भिती? घरंदाजपणाच टाकल्यावर भरल्या बाजारात जाण्यास कोण मज्जाव करेल? आता मी मनासारखेच वागणार. हाती टाळ घेईन, खांद्यावर वीणा घेईन आणि मुक्त मनाने भक्तजनांच्या दिंडीत सामील होईन. आता स्वतंत्र झाल्यावर मला मना तरी कोण करणार?

पंढरी ही हरिनामाचा व्यापार चालणारी पेठच होय. ह्या पेठेत हरिनामाच्या विक्रीचे माझेही एक पाल असेल. आता कितीही निंदा केलीत तरी मी भीक घालणार नाही. भय, लज्जा मी पुरती सोडून नि:संग झाले आहे. पांडुरंगा मी तर तुझ्या प्राप्तीसाठी प्रपंच टाकून जनदृष्टीने 'वेसवा' झाले आहे. प्रपंचातून तर उठलेच. पण जनातूनही उठले आहे. ना घर राहिले, ना दार! अवघी निंदा स्वीकारली. आता तार अथवा मार! मी तर तुझ्या घरातच येऊन थांबले आहे. केशवा आता तूच माझा एकमेव जीवनाधार आहेस'' प्रस्तुत अभंग वाचताना जनाबाईंचे स्तिमित करणारे एक अपूर्व दर्शन घडते. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक अपरिचित पैलू झळाळून उठतो. एवढेच नव्हे तर सतराव्या शतकातील संत तुकारामांच्या प्रसिद्ध विराण्यांचे निनादही जनाबाईंच्या ह्या अत्यंत लोकप्रिय अभंगातून ऐकू येऊ लागतात. हा अभंग त्यामुळे तुकारामांच्या विराण्यांची गंगोत्री ठरते. श्रेष्ठ कवी असणाऱ्या तुकारामांना प्रभावित करणाऱ्या जनाबाईंचे महत्त्व त्यामुळे कितीतरी पटीने वाढते.

## ६ : 'सुंदर माझे जाते गे'

जनाबाईंनी रुपकरचना काही अपवाद वगळता केलेली नाही. जनाबाईंच्या कवितेत अत्यंत प्रांजळ असा थेटपणा जाणवतो. जनाबाईंना जे काही आपल्या अभंगमाध्यमातून सांगायचे असते ते थेट, प्रासादिक भावोत्कट असे प्राधान्याने भावानुभव असतात. दोन पातळ्यांवर अनुभव घेणे वा तो व्यक्त करणे जनाबाईंना फारसे रुचत नाही. त्यांची प्रतिभाप्रकृती रुपकात्म अनुभवप्रक्रियेस फारशी अनुकूल नाही. आणि जनाबाईंचे वैशिष्ट्य म्हणजे स्वत:च्या प्रतिभा-प्रकृतीशी त्या विलक्षण एकनिष्ठ आहेत. त्यामुळे जनाबाईंचे अभंग हे केवळ जनाबाईंचेच असतात. त्यात कोणतीही उसनवारी आढळत नाही. मात्र सांप्रदायिक काव्यसंकेत त्या साक्षेपाने सांभाळतात. त्यामुळे जनाबाईंची अभंगवाणी यादवकालीन अन्य श्रेष्ठ संतकवींप्रमाणे त्यांची वाङ्मयीन मूर्ती ठरते.

उत्तरकालात 'भारूडे' ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या काव्यप्रकाराचे

यादवकालीन रूप म्हणजे 'रुपक'रचना होय. ही रूपके अभंगरुपाने रचली गेली तशीच ओवीरुपानेही रचली गेली आहेत. निवृत्तिनाथ–ज्ञानेश्वरांनीच त्यांचा यादवकालीन मराठीत प्राधान्येकरून आश्रय केला. ज्ञानदेवांचे 'घोंगडीचे' रूपक प्रसिद्ध आहेच. पुढे नामदेवांनीही 'रुपक'रचना केली. वारकरी संप्रदायाच्या लहानमोठ्या कवींनीही कमी अधिक संख्येने रुपकपर काव्यरचना केली. ह्या रुपकपर कवितेला खऱ्या अर्थाने लोकसन्मुख केले ते एकनाथांनी. लोकजीवनातील उणिवा, विसंगती, अनैतिकता, जीवनमूल्यांची परवड यावर कठोर पण हास्यकारक भाष्य करण्यासाठी संत एकनाथांनी लोकजीवनातील आकृतीबंधाचा, लोकभाषेचा आणि विनोदाचा आश्रय करून पारंपारिक रुपकरचनांचे अभिनव रुपांतर साधले. त्यातून आध्यात्मिक उपदेश साधला तरी समाजजीवनावर भाष्य करणे नाथांनी अधिक महत्त्वाचे मानले. त्यामुळे रुपकपर रचना हे नाव मागे पडून हा काव्यप्रकार भारूडे ह्या नावाने ओळखला जाऊ लागला.

वारकरी संप्रदायाचा यादवकालीन काव्यनिर्मितीचा हा संकेत संत जनाबाईंनीही आचरला आहे, हे त्यांच्या काही रुपकात्म अभंगरचनेवरून लक्षात येते. जनाबाईंचे जात्याचे अभंग हेही रुपकपर अभंगरचनाच ठरतात. ते असे-

''सुंदर माझें जातें गे फिरे भंवते ।
ओव्या गाऊं कौतुकें, तूं ये रे बा विठ्ठला ॥१॥
जीवशिव दोनीं खुंटे गे प्रपंचाचे नेटें गे ।
लावुनी पांची बोटें गे, तूं ये रे बा विठ्ठला ॥२॥
सासू आणि सासरा दीर तो तिसरा ।
ओव्या गाऊं भ्रतारा, तूं ये रे बा विठ्ठला ॥३॥
बारा सोळा गडणी अवघ्या कामिनी ।
ओंव्या गाऊं बसुनी, तूं ये रे विठ्ठला ॥४॥
प्रपंच दळण दळिलें पीठ भारिलें ।
सासुपुढें ठेविलें, तूं ये रे बा विठ्ठला ॥५॥
सत्त्वाचे आधाण ठेविलें पुण्य वैरिलें ।
पाप तें उतूं गेलें, तूं ये रे बा विठ्ठला ॥६॥
जनी जातें गाइल कीर्त राहिल ।
थोडासा लाभ होईल, तूं ये रे बा विठ्ठला ॥७॥'' (अ. क्र. ३६४)

येथे 'जाते' हे प्रपंचाचे प्रतीक आहे. प्रपंचाची गतीही जात्यासारखीच चक्राकार आहे. हे जाते ओढण्यासाठी जीव आणि शिव हे दोन खुंटे आहेत. त्या खुंट्यांना

पाची बोटांनी धरून प्रपंचाचे जाते नेटाने ओढावे लागते. अर्थात त्यास विठ्ठलाचे सहाय्य हे हवेच.

प्रपंच रुपी जाते ओढताना श्रमपरिहारार्थ ओव्या म्हणायच्या त्या कोणाला? सासूरूप आशा तृष्णा, लोभ-क्रोध रूप सासरा अथवा मोहरूप दीर यांना नव्हे. तर पतिरुप परमेश्वराला! ह्या परब्रह्मतत्त्वरुप सूर्य वा चंद्राच्या बारा सोळारूप कला ह्याच आता दळताना जनाबाईंच्या मैत्रिणी झाल्या आहेत. त्यांच्यासह जनाबाई विठ्ठलाला ओव्या गात आहेत.

आता प्रपंचदळण पुरते सरले आहे. सारे पीठ भरून सासूपुढे ठेवले आहे. सत्त्वाचे आधण ठेवून त्यात पुण्य वैरिले आहे, पाप होते ते उतू गेले. पुण्य हाती उरले. ही किमया विठ्ठलाची. तो धावून आला म्हणून जनाबाईंचे दळण सरले. थोडी कीर्ती उरेल. तोच लाभ असे जनाबाईंना वाटते.

''वैराग्य अभिमाने फिरविले जाते ।
म्हणवोनि यातें भाव खुंटा ॥१॥
संचित मातृका वैरण घातली ।
अव्यक्ति दळली व्यक्ताव्यक्त ॥२॥
नाम तें रुपा दळियेलें सर्व ।
पीठ भरी राव पंढरीचा ॥३॥
नवल हा देव बैसला दळणीं ।
नाही केली जनी नामयाची ॥४॥'' (अ. क्र. ३६५)

ह्या अभंगातील रुपक अधिक सूक्ष्म अर्थ व्यक्त करणारे आहे. प्रपंच दळण दळताना साधकाला स्वत:च्या वैराग्यासंबंधी अभिमान वाटण्याची शक्यता असते. म्हणून भावरूप खुंटा महत्त्वाचा ठरतो. कारण भावखुंटाच नसेल तर केवळ वैराग्याच्या अभिमानाने जाते फिरणार नाही. जो साधक वैराग्याचा वृथा अभिमान बाळगतो, त्याचे प्रपंचदळण कधीही पूर्ण होणार नाही. कारण भवसागर तरुन जाण्यास केवळ वैराग्य पुरेसे नाही. तर हरिभक्तीचीही त्यास जोड मिळणे आवश्यक आहे. साधक केवळ कठोर विरागी असला तरी तो मृदू-कोमल वृत्तीचा भगवद्भक्तही असणे अवश्यमेव असते. त्यामुळे जनाबाई विरागी वृत्तीने प्रपंचाचे दळण दळताना ईश्वरभक्तीचे ऐश्वर्यही अनुभवितात.

ह्या प्रपंचरुप दळणात जनाबाईंनी मायेने अथवा प्रारब्धाने लाभलेले पूर्वसंचिताचे वैरण जात्याच्या मुखात घातले आहे, त्यामुळे यापुढे मायेच्या वा प्रारब्धाच्या उपाधींचे पीठ होऊन त्यांचा नाश होईल. परिणामी मूळ मायेच्या वा प्रारब्धाच्या

बंधनांतून जनाबाईंना मुक्ती मिळेल.

हे व्यक्त-अव्यक्त जगत ज्यात अंतिमत: विश्रांत पावते ते परब्रह्मतत्त्व होय. जसे प्रपंचदळणात संचित- मातृकांचे पीठ होते. त्याप्रमाणे व्यक्त-अव्यक्त मायिक उपाधींचा परब्रह्मप्राप्तीत विनाश होतो. व्यक्ताव्यक्त त्या विशुद्ध, चैतन्यमय आनंदरुप अव्यक्त तत्त्वात विलय पावते. जीव शिवरुप होतो.

जनाबाई म्हणतात मी तरी माझ्या दृष्टीने नाम-रुपात्मक जगताचे दळण पूर्ण केले आहे. प्रपंचाचे दळून अगदी पीठ केले. केवढे आश्चर्य! हे पीठ भरण्यास साक्षात विठ्ठल-पंढरीचा राजा मला साहाय्य करीत आहे. एवढेच नव्हे तर मी दळत असता तोही माझ्याबरोबर दळू लागला. ज्याने प्रपंचाचे दळण मांडले त्याला हा पंढरीनाथ दळण्यात साहाय्य करीत असतो, असा जनाबाईंचा निर्वाळा आहे. शिवाय एकदा दळण सुरू केले की, तो दळणाऱ्याचे लौकिक अस्तित्वच पुसून टाकतो. हेही केवळ आश्चर्य? सगुण भक्त जनाबाईंची आत्मज्ञानप्राप्तीतील ही झेप स्तिमित करणारी नाही असे कोण म्हणेल?

❀

# जनाबाईंचे धन्योद्गार

जनाबाईंना आता आपले जीवन कृतार्थ झाले असे वाटते. सगुण भक्तिमार्ग नामदेवांच्या दिंडीत सहभागी होऊन त्या चालत गेल्या आणि साक्षात विठ्ठल त्यांनी आपल्या अंकित केला. तेथून पुढे योगसिद्ध ज्ञानेश्वरांच्या अद्वैतमार्गावर वाटचाल करून त्यांनी आत्मज्ञानप्राप्ती करून घेऊन आत्मोद्धार साधला. आता मिळवण्याजोगे काहीच उरले नाही. आपल्या मनुष्यदेहाचे सार्थक झाले असे त्यांना रास्तपणे वाटू लागले. त्या म्हणतात-

''माझे मनीं जें जें होतें । तें तें दिधलें अनंतें ॥१॥
देह नेऊनी विदेही केलें । शांति देऊनि मीपण नेलें ॥२॥
मूळ नेलें हें क्रोधाचें । ठाणें केलें विवेकाचें ॥३॥
निज पदीं दिला ठाव । जनी म्हणे दाता देव ॥४॥'' (अ. क्र. ३४०)

''धन्य माझा जन्म धन्य माझा वंश ।
धन्य विष्णुदास स्वामी माझा ॥१॥
कामधाम माझें केशवाचें पायीं ।
दिननिशीं पाहे हारपली ॥२॥
शुक सनकादिकां जेणें सुखी केलें ।
तें सुख राहिलें माझ्या मनीं ॥३॥
जनी म्हणे जगीं अलभ्य लाभ झाला ।
हरी सांपडला विटेवरी ॥४॥'' (अ. क्र. ३४१)

यांपैकी पहिल्या अभंगात आपल्या मनातील सर्व हेतू विठ्ठलाने पूर्ण केले असे जनाबाई म्हणतात. जनाबाईंचे हे हेतू कोणते होते. हे पुढील चरणांत त्यांनी नमूद केले आहे. अनंताने त्यांची देहबुद्धी नाहिशी करून त्यांना विदेही-जीवनमुक्त केले. त्यांच्या मीपणाचे हरण करून चिरशांती दिली आणि चिदानंदावस्थेत नेऊन ठेवले. क्रोधाचे मूळ स्थान असलेल्या मनास विवेकाचे स्थान करून टाकले. आणि अखेर ह्या जनीला आपल्या चरणी चिरस्थान दिले. आता जनाबाईंचा देव असा

त्यांच्यावर प्रसन्न झाला असता त्यांना उणे ते काय असणार?

म्हणूनच दुसऱ्या अभंगात जनाबाईंनी मुक्तपणे धन्योद्‌गार काढले आहेत. जनाबाईच्या ब्रह्मप्राप्तीने त्यांचा जन्मच नव्हे तर वंशही धन्य झाला आहे. आपणास पांडुरंगासारखे दैवत प्राप्त करून देणाऱ्या स्वामी संत नामदेवांसंबंधानेही जनाबाई धन्यतेचे उद्‌गार काढतात हे विशेष. कारण जनाबाई आणि पांडुरंग यांची गाठभेट घडवून आणून नामदेव त्यांच्या विश्वातून सहजपणे बाजूला होतात. नव्हे, केवळ नामदेवांचे दासीपण स्वीकारल्यानेच जनाबाईंना सगुण ईश्वर, ईश्वर भक्ती, भक्तिमार्गाचे सुख, सगुण साक्षात्कार आणि ईश्वरप्राप्ती झाली आहे. आता जनाबाईंचे दासीपणही फिटले आहे. आता विठ्ठलरुप केशीराज आणि जनाबाई यांचा रात्रंदिवस सुखसंवाद चालू आहे. आता दिवस कधी मावळतो आणि रात्र कशी संपते तेच जनाबाईंना उमगेनासे झाले आहे. रात्रच दिवस होऊन जाते आणि दिवस रात्र!

अहो केवढे आश्चर्य! शुक-सनकादी श्रेष्ठ ऋषी-मुनी यांना ज्या परब्रह्मतत्त्वाने अखंड सुखनिधान प्राप्त करून दिले, त्यानेच जनाबाईंसारख्या अनाथ, शूद्र दासीलाही अढळ ब्रह्मपदी सामावून घ्यावे ना! जनाबाईंच्या मनातच आता ईश्वराचे सुखनिधान वसतीस आले आहे. या जाणिवेने जनाबाईंचे मन हर्षातिशयाने नाचू लागते. आपल्याला अलभ्य लाभ झाल्याच्या प्रतीतीने जनाबाई हरखून गेल्या आहेत. हे परब्रह्मतत्त्व, हा अलभ्य लाभ, हे सुखनिधान म्हणजे दुसरे काही नसून विटेवर भक्तांच्या उद्धारासाठी अठ्ठावीस युगे तिष्ठत राहणारा विठ्ठल होय, असा गौप्यस्फोट अभंगाच्या अखेरीस जनाबाई करून टाकतात. तोही अज्ञानी जनांच्या उद्धारासाठीच होय.

जनाबाईंचे हे अभंग म्हणजे त्यांचे आत्मसंवादच आहेत. स्वतःच्या भावावस्थांचे असे उत्कट आणि अर्थपूर्ण अभंगाविष्कार करण्याचे जनाबाईंच्या प्रतिभेचे सामर्थ्य आश्चर्यकारक आहे! जनाबाई ह्या श्रेष्ठ संत आहेतच, पण त्या श्रेष्ठ कवयित्रीही कशा आहेत, याचे दर्शन प्रस्तुत अभंगांतून घडते, हेच त्याचे वैशिष्ट्य.

# जनाबाईंचे मागणे

## १ : ''भक्ती जनी मागे देवा''

वस्तुतः परब्रह्माची प्राप्ती झालेल्या सिद्ध पुरुषाला उत्तरकालात ईश्वराजवळ मागण्याजोगे काही उरतच नाही. तसे जनाबाईंनाही विठ्ठलाजवळ स्वत:साठी काही मागण्यासारखे उरलेले नाही. असे असूनही जनाबाईंचे मागणे सरलेले नाही. जोपर्यंत देह आहे तोपर्यंत आत्मोद्धारासाठी मागणे सरत नाही. तसेच आत्मोद्धार म्हणजे जनोद्धार नव्हे. आत्मोद्धारानंतरच खऱ्या अर्थाने संतांचे लोकोद्धाराचे कार्य सुरू होते. कारण आता संत केवळ उपकारापुरतेच भूतलावर उरलेले असतात. संत जनाबाईंचे मागणेही जनोद्धाराशीच निगडित आहे.

''साधु आणि संत । जन्म द्यावी जी कलींत ।
मागणें तें हेंचि देवा । कृपा करी हो केशवा ॥'' (२९४)

''देव भावाचा अंकित । जाणे दासाचें ते चित्त ।
भक्ति जनी मागे देवा । तिचा मनोरथ पुरवा ॥'' (२९५)

भक्ताचे श्रेष्ठत्व त्याच्या निस्सीम हरिभक्तीत आहे. त्यामुळे परमेश्वरप्राप्ती होऊनही भक्तीची साधना अवश्यमेव ठरते. त्यात कोणतीही शिथिलता येता कामा नये. याचे जनाबाईंना भान आहे हे विशेष. परमेश्वराची प्राप्ती ही भक्तिसाधनेची फलश्रुती असली तरी त्यानंतर तीच भक्ताची जीवनशैली होणे अपेक्षित असते. हे जनाबाईंने जाणले आहे. त्यामुळेच परमेश्वराजवळ त्या पुन्हा अढळ भक्तिसाधनेचीच मागणी करतात.

## २ : ''माझे दु:ख नाशी देवा''

जनाबाईंना परमेश्वरप्राप्तीनंतरही कोणते दु:ख उरले आहे? जनाबाईंनी स्वत:च ते स्पष्ट केले आहे. ते असे-

''माझे दु:ख नाशी देवा । मज सुख दे केशवा ॥१॥
आम्हां सुख ऐसें देई । तुझी कृपा विठाबाई ॥२॥

चरणी अनन्यशरण । त्यासी नाहीं जन्ममरण ॥३॥
जनी म्हणे हेंचि मागे । धण्या तुज सर्व सांगे ॥४॥'' (२९८)

पहिल्या चरणात दु:खाचा नाश होऊन सुखप्राप्ती व्हावी असे म्हणताना विठ्ठलाच्या कृपेचा अखंड लाभ व्हावा अशी जनाबाई विनवणी करतात. जो भक्त विठ्ठलास अनन्य भक्तिभावाने शरण गेला आहे, त्याची जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्तता व्हावी अशी जनाबाई विठ्ठलास प्रार्थना करीत आहे.

''माझे दु:ख नाशी देवा'' असे प्रथम चरणात मागणे मागणाऱ्या जनाबाई दुसऱ्या चरणातच 'आम्हां सुख देई' असे उद्‌गारतात. जनाबाई स्वत:च्या व्यक्तिगत कोषात अडकून पडत नाहीत हे विशेष! भक्त ईश्वरप्राप्तीनंतर केवळ भक्त उरत नाही. तर त्याचे संतपदात रुपांतर होणे अटळच असते. त्याचे जगणे आता स्वत:साठी नसतेच तर जगदोद्धारासाठी असते. नसता त्याचे जगणे अर्थशून्य ठरेल. त्यामुळे जनाबाईंचे 'माझे' चे 'आम्हा सुख ऐसें देई' ह्या चरणात झालेले अनेक वचनी रुपांतर मोहक आणि अर्थपूर्ण वाटते. भक्त हा व्यक्तिगत पातळीवर जगतो. तर संत समष्टीच्या पातळीवर जगताना समूहमनाने समूहाचे प्रबोधन करतो. समष्टीला सन्मार्गी लावतो. त्यास अज्ञानांध:कारातून शाश्वत प्रकाशाकडे नेतो. आत्मसाधनेचा सहज सोपा मार्ग असलेल्या भक्तिमार्गावर नेऊन पोहोचवितो आणि आत्मोद्धारार्थ हरिपाठाचा मंत्र देतो.

आता त्याचे मागणे स्वत:साठी नसते तर जगतासाठी असते. त्याचे सुख समष्टीचे सुख असते आणि दु:खही समष्टीचेच असते. भक्ताचे संतात रुपांतर होण्याची हीच प्रक्रिया होय.

जनाबाईंच्या ह्या अभंगांतील मागण्यांत ती प्रकर्षाने प्रत्ययासही येते.

## ३ : ''देवा देई गर्भवास''

वैष्णव वा वारकरी संप्रदायाची जी अनेक वैशिष्ट्ये आहेत त्यांतील एक म्हणजे मुक्तीला नकार आणि पुन:पुन्हा लाभणाऱ्या मानवी जीवनाचा आनंदाने स्वीकार होय. नव्हे पुन:पुन्हा गर्भवास लाभावा हीच विठ्ठलास केली जाणारी विनवणी!

अशी मागणी फक्त वारकरी संतच करताना दिसतात. नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि अन्य लहानमोठ्या संतांनीही अशी मागणी केलेली दिसते. ज्यांनी आपल्या इहलोकीच्या जीवनातच विठ्ठलप्राप्ती केली, एवढेच नव्हे तर त्यास आपल्या विशुद्ध उत्कट भक्तीने जिंकून हृदयात बंदिवान केले, अशा संतांना ना जीवनाची आसक्ती उरली, ना मृत्यूचे भय. ते ह्या जीवनातच विदेही झालेले दिसतात.

मग पुन;पुन्हा गर्भवासाची, नरदेहाची ते का बरे विठ्ठलास मागणी करतात? त्याचे उत्तर स्वत: जनाबाईंनीच पुढील अभंगात दिले आहे.

''देवा देई गर्भवास । तरीच पुरेल माझी आस ॥१॥
परि हे देखा रे पंढरी । सेवा नामयाचे द्वारीं ॥२॥
करीं पक्षि का सूकर । श्वास श्वापद मार्जार ॥३॥
ऐसा हेत माझे मनीं । म्हणे नामयाचे जनी ॥४॥'' (अ. क्र. २९६)

संत जनाबाईंच्या भक्तमनाला पंढरी, पंढरीनाथ, नामदेवांच्या घरचे दासीपण ह्या सर्व गोष्टींचा विलक्षण मोह वाटतो. विठ्ठलासारखा भक्तास उभाउभी भेटणारा सगुण, सुंदर, प्रेमळ आणि भक्तवेडा ईश्वर जगाच्या पाठीवर कुठेही नाही. तो स्वत:वर प्रेम करण्याचे, संवाद करण्याचे, मनुष्याप्रमाणे व्यवहार करण्याचे अतीव दुर्मिळ सुख भक्तांस देतो. त्यामुळेच विठ्ठलावर सर्व संतांची प्रेमभक्ती जडली आहे. पंढरीनाथ हा देव देवासारखा मुळी भक्तांशी व्यवहारतच नाही. माणसाने माणसाशी वागावे तसा हा देव भक्तजनांशी वागतो आणि वागवूनही घेतो. नामदेवांनी तर त्याला विशेष जोखले आहे. म्हणून नामदेवांसारखा भक्त विठ्ठलावर रुसतो, रागावतो आणि प्रसंगी विठ्ठलाशी भांडतोही. त्यामुळेच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी भक्तश्रेष्ठ नामदेवांना 'पंढरीरायाचा प्रेमभांडारी' असे गौरविले. संत नामदेवांनी द्वापारयुगातील गोकुळातील कृष्णगोपांची प्रेमभक्ती यादवकालात पंढरीत अनुभविली. द्वापारयुग यादवकालात पंढरीत सजग केले. त्यांनी समकालीनच नव्हे, तर उत्तरकालीन संतजनांना आणि भक्तमनांना प्रेमभक्तीचे हे सुख वाटून टाकले. तसेच स्वर्गस्थ देव-देवतांना आणि ऋषिमुनींना ह्या प्रेमभक्तीस आपण मुकल्याचा विषाद वाटावा, असा प्रेमभक्तीचा कीर्तनांतून सोहळा साजरा केला.

प्रेमळ भक्त नामदेवांनी आपल्या भक्तिसामर्थ्याने ह्या पंढरीनाथास हृदयात बंदिवान करून त्याच्या वर 'सोऽहं' शब्दाचा मारा केल्याने विठ्ठलाची स्थिती अगदी केविलवाणी झाली. असे हे निधान नामदेवांची सेवा करणाऱ्या दासी जनीस आयतेच लाभले. ते सोडून मुक्ती ती कोणती? ती कशासाठी मिळवायची? भक्तीचे सुख मुक्तीत कोठे आहे? असे सर्वच संतांना वाटते. तसेच जनाबाईंनाही वाटते. हे भक्तिसुख मनुष्य जन्मातच लाभत असेल तर नको तो स्वर्ग अथवा मुक्ती. त्यापेक्षा गर्भवासच देवाने द्यावा. असे समग्र वैष्णवजनांचे मागणेच जनाबाई मागतात आणि 'वैष्णव संत' हा आपला लौकिक प्रकट करतात.

हा जन्म मनुष्याचा असेल तर उत्तमच! तो मिळाला नाही तर पक्षी, सूकर, श्वान, श्वापद असा कोणताही गर्भवास पत्करण्याची जनाबाईंच्या मनाची तयारीही आहे. पण त्यांना वास्तव्य मात्र संत नामदेवांच्या दारीच असावेसे वाटते.

'नामयाची दासी जनी' हे जनाबाईंचे बिरूद किती सार्थ आहे याचा येथे प्रत्यय येतो.

### ४ : 'ऐसा पुत्र देई संतां'

''ऐसा पुत्र देई संतां । तरी त्या आवडी पंढरिनाथा ॥१॥
गीता नित्य नेमें । वाची ज्ञानेश्वरी प्रेमें ॥२॥
संतांच्या चरणा । करी मस्तक ठेंगणा ॥३॥
कन्या व्हावी भागिरथी । तुझें प्रेम जिचे चित्तीं ॥४॥
ऐसे करी संतजना । दासी जनीच्या निधाना॥'' (२९७)

जनाबाईंचा हा एक अभिनव अभंगाविष्कार आहे. येथे जनाबाई स्वत:साठी नव्हे, तर आपल्या संतमंडळासाठी देवास मागणे मागत आहे. जनाबाई स्वत:च संत असल्या तरी जे मागणे त्या स्वत:साठी मागू शकत नाहीत ते संतांसाठी मागत आहेत. ह्यातील त्यांचा आत्मविस्तार लक्षणीय आहे.

जनाबाईंना स्वत:चा असा प्रपंच नाही. पण तो त्यांना नकोच होता असे नव्हे. नामदेवांच्या घरी त्यांचे मन रमते ते तेथील मुलांबाळांमुळेच होय. शिवाय जनाबाईंचा अतृप्त मातृत्वभावही तीव्र आहे. नामदेवांच्या मुलाबाळांत त्यामुळेच त्या विशेष रमतात. एवढेच नव्हे तर सर्व संतांनी घेरलेल्या विठ्ठलास पाहून त्यांच्या मातृमनातील वात्सल्यभाव सजग होतो आणि-

''विठो माझा लेंकुरवाळा । संगें लेकुरांचा मेळा''

असा कल्पनाजन्य साक्षात्कारानुभव त्या उत्स्फूर्तपणे प्रकट करतात.

त्यामुळे स्वत:चा नसला तरी संतांचा प्रपंच फुलावा-फळावा असे जनाबाईंना उत्कटतेने वाटते. मग ह्या संतांना पुत्र वा कन्या कशा लाभाव्यात, त्याचेही जनाबाईंचे वत्सल मन चित्रण करू पाहते. संतांप्रमाणे संतपुत्रासही पंढरीनाथाची आवड असावी. त्याने नित्य नेमाने गीतापठण करावे; ज्ञानेश्वरी वाचावी, संत जनांपुढे नममस्तक होऊन चरणवंदन करावे. कन्या असावी तर भागिरथीसारखी पवित्र, प्रसन्न आणि प्रेमळ. तिच्या चित्तात अखंड विठ्ठलप्रीती असावी.

आणि हे सर्व जनाबाई संतासाठी मागतात! त्यामुळे त्यास केवढा तरी अवकाश प्राप्त होतो!

### ५ :'असावे कल्याण चिरकाळ!'

संतसाहित्यातील एक अभिनव विस्मयकारी मागणे या दृष्टीने जनाबाईंच्या ह्या अभंगातील मागणे चिरस्मरणीय आहे. ते असे-

''रुक्माई आईचें आहे ऐसें भाग्य ।
असावें आरोग्य चिरकाल ॥१॥
सख्या पुंडलिका आवडतें स्थल ।

असावें चिरकाळ स्वस्तिक्षेम ॥२॥
अहो संतजन आवडतें धन ।
असावे कल्याण चिरकाळ ॥३॥
जन्मोजन्मीं हेंच मागे गोविंदासी ।
म्हणे जनी दासी नामयाची ॥४॥'' (२९१)

विशेष आश्चर्याची गोष्ट ही की जनाबाई परमेश्वराचे अखंड स्वस्तिक्षेम असावे, असे परमेश्वरालाच मागणे मागत आहेत! त्यातही त्यांचे स्त्रीमन प्रकटल्याशिवाय राहात नाही. 'रुक्माई आईचे' सौभाग्यच असे आहे की पतीला अखंड आरोग्य प्राप्त व्हावे. विठ्ठलाचे जसे त्या चिरकाल स्वस्तिक्षेम इच्छितात, तसेच पुंडालिकाचे आवडते स्थल असलेल्या पंढरीचेही चिरकाल स्वस्तिक्षेम असावे असे मागणे मागतात. सर्व संतजनांचे आवडते धन जो विठ्ठल त्याचे चिरकाल कल्याण असावे अशी जनाबाई ईश्वरालाच प्रार्थना करीत आहेत! शिवाय हे मागणे या जन्मापुरते मर्यादित नसून ती जनाबाईंची जन्मोजन्मोचीच मागणी असल्याने तिला विशेष मोल प्राप्त होते.

## ६ : 'पांडुरंगाचे आशीर्वचन'

जनाबाईंच्या उपरोक्त मागण्यांस पांडुरंगाने दिलेले आशीर्वचनही जनाबाईंनी अभंगबद्ध केले आहे. ते असे-

''जनीचें बोलणें वाची नित्य कोणी ।
तयाचे अंगणी तिष्ठतसे ॥१॥
जनीचिया पदा अखंडीत गाये ।
तयाचे मी पायें वंदी माथा ॥२॥
जनीचें आवडे जयासी वचन ।
तयासी नारायण कृपा करी ॥३॥
पांडुरंग म्हणे ऐक ज्ञानदेवा ।
ऐसा वर द्यावा जनीसाठी ॥४॥'' (२९२)

जो जनाबाईंचे बोलणे नित्य वाचतो, त्याच्या अंगणातच ईश्वराचे वास्तव्य असते. जो जनीची अभंगपदे अखंडित गातो, त्याचे ईश्वर चरणवंदन करतो. जनाबाईंच्या अभंगवाणीवर प्रेम करणाऱ्यावर प्रत्यक्ष नारायण कृपा करतो. अखेर पांडुरंग म्हणतात, ''ज्ञानदेवा जनीला असाच वर आपण द्यावा.''

आपणास असा पांडुरंगाने वर दिला ही जनाबाईंची अनुभूती असून तीच जनाबाईंच्या भक्तिसाधनेची आणि अभंगनिर्मितीचीही फलश्रुती आहे.

# 'जनीनें बोलिलें तैसेच लिहिले'

जनाबाईंच्या हृदयाचे बोल प्रत्यक्ष विठ्ठलाने शब्दबद्ध केल्याचे केवळ जनाबाईंच सांगतात असे नव्हे. तर संत ज्ञानदेवांनीही ते ओळखून समग्र संतमंडळास सांगितले. विशेष म्हणजे स्वत: विठ्ठलानेही ते उघडपणे कबूल केलेले दिसते.

१) यांपैकी प्रथम जनाबाईंनीच आपले अभंग विठ्ठलाने लिहिले असे घोषित केले. मात्र ते प्रसंगाच्या संदर्भात. आत्मस्तुती म्हणून नव्हे. जनाबाई ह्या समकालीन घडामोडीच्या भाष्यकारही आहेत. प्रसंगानुसार काही माहिती नोंदविण्याचा त्यांचा साक्षेप अनेकदा प्रकट झाला आहे. प्रस्तुत अभंगात जनाबाई समकालीन संतमंडळातील संतांच्या अभंगांचे लेखन कसे झाले, ते कुणी कुणी केले, यासंबंधी सत्यकथन करणारा तपशील अभंगात नोंदवीत आहेत. जनाबाईंच्या ह्या अभंगावरून संतवचने लिहून घेण्याच्या तत्कालीन प्रथेवर तर प्रकाश पडतोच. शिवाय कोण कोणाचे लेखक बनले, हा तपशीलही लक्षात येतो.

''ज्ञानेश्वर अभंग बोलिले ज्या शब्दां ।
चिदानंद बाबा लिही त्यांस ॥१॥
निवृत्तीचे बोल लिहिले सोपानें ।
मुक्ताईचीं वचनें ज्ञानदेवें ॥२॥
चांगयाचा लिहिणार श्यामा तो कांसार ।
परमानंद खेचर लिहित होता ॥३॥
सांगे पूर्णानंद लिही परमानंद ।
भगवंत भेटी आनंद रामानंद ॥४॥
सावत्या माळ्याचा काशिबा गुरव ।
कूर्म्याचा वासुदेव काईत होता ॥५॥
चोखामेळ्याचा अनंत भट्टअभ्यंग ।
म्हणोनी नामयाचे जनीचा पांडुरंग ॥६॥'' (४०८)

जनाबाई म्हणतात त्याप्रमाणे संत ज्ञानेश्वरांचे अभंगही चिदानंदबाबाने लिहून

घेतले. निवृत्तिनाथांसाठी सोपानदेव लेखक बनले. मुक्ताईचे अभंग संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी लिहिले. तर श्यामा कासार हा चांगदेवांचा लेखक झाला. परमानंदासाठी खेचर लेखक झाला. तर पूर्णानंदासाठी परमानंद. सावत्या माळ्याची वचने काशिबा गुरव यांनी लिहिली. तर कूर्म्याची वसुदेव काईताने! चोखामेळ्यास अनंत भट्ट हे लेखक लाभले. म्हणूनच जनाबाईसाठी प्रत्यक्ष विठ्ठल लेखक बनला.

जनाबाईंनी येथे आपले अभंग विठ्ठलाने लिहिले एवढेच नमूद केलेले नाही. तर समकालीन सर्व महत्त्वाच्या संतांच्या अभंगांचे लेखन कुणी केले हेही आवर्जून नोंदविले आहे. आणि ते नोंदविण्याच्या ओघात आपले अभंग विठ्ठलाने लिहिल्याचे जनाबाई मोठ्या कौशल्याने निवेदन करतात. जणू चोखामेळ्याचे अभंग अनंतभटाने लिहिणे हे जेवढे स्वाभाविक तेवढेच जनाबाईंचे अभंग विठ्ठलाने लिहिणे आपणास स्वाभाविक वाटावे.

येथे सत्य वास्तव आणि अद्‌भुत ह्यांतील सीमारेषा जनाबाईंनी बेमालूमपणे पुसून टाकली आहे. कारण ह्यात काही अद्‌भुत आहे हे जनाबाईंना जणू मान्यच नसावे. कारण प्रत्यक्ष जगण्याच्या प्रक्रियेत जेथे जनाबाई अद्‌भुतास वास्तव पातळीवर आणतात, तेथे अभंगलेखनात त्यास अपवाद कसा असणार?

अलौकिक आणि लौकिक, अद्‌भुत आणि वास्तव, अथवा सत्य आणि कल्पित यांचे धागे परस्परांत गुंफून देऊन एका नव्या वास्तवाची निर्मिती कशी करायची, याचा संत नामदेवांचे जीवन आणि कविता हा आदर्श वस्तुपाठच होता. आणि जनाबाईंना हे वेगळे निधानही आयतेच लाभले होते. हे केवढे त्यांचे भाग्य!

जनाबाईंचा हा अभंग जसा जनाबाईंच्या दृष्टीने महत्त्वाचा, तसाच अन्य संतांच्या नोंदीमुळे ऐतिहासिक दृष्टीनेही मौलिक ठरतो. जनाबाईंच्या ठिकाणी वास्तवाचे, ऐतिहासिकतेचे असलेले हे तीव्र भान तुलनेने दुर्मिळ ठरल्याने अत्यंत महत्त्वाचे वाटते.

२) पांडुरंगानेच जनाबाईंची अभंगपदे लिहिली ह्यास दुसरी, अत्यंत विश्वसनीय असलेली साक्ष प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांचीच आहे. 'ज्ञानेश्वर-स्तुती' करताना जनाबाईंनी यासंबंधीचे ज्ञानेश्वरांचे वचनच अभंगात सादर केले आहे. ते असे-

''संत राउळा चालिले । ज्ञानेश्वर तंव बोले ॥१॥
केवढें नवल सांगावें । दासी जनीचे पद ल्याहावें ॥२॥
पाय जोडूनी विटेवरी । कटीं हात उभा हरी ॥३॥
रुप सावळें सुंदर । कानी कुंडल मनोहर ॥४॥
सोनसळा वैजयंती । पुढें गोपाळ नाचती ॥५॥
गरुडपारीं सन्मुख उभा । जनी म्हणे धन्य शोभा ॥६॥'' (अ. क्र. ४०७)

संतसमागमे ज्ञानेश्वर विठ्ठलमंदिराकडे चालले आहेत. त्यावेळी संतमंडळात जनाबाईविषयीच गोष्टी चालल्या आहेत. तेव्हा ज्ञानेश्वर म्हणतात- ''केवढे हे नवल! साक्षात विठ्ठल दासी जनीचे बोल अभंगबद्ध करीत आहे! धन्य जनाबाईचा भक्तिभाव.''

ज्ञानेश्वरांचा हा अभंग ज्ञानेश्वर गाथ्यात नाही. तो असण्याची शक्यताही नाही. कारण 'ज्ञानेश्वरी'प्रमाणे 'ज्ञानेश्वरगाथाही' त्यांच्या लौकिक जीवनापासून मुक्त आहे. ज्ञानेश्वरांच्या कुटुंबातील व्यक्तीचेच जेथे उल्लेख नाहीत, तेथे समकालीन संतासंबंधीचे उल्लेख कसे येणार?

३) जनाबाईचे अभंग विठ्ठलानेच लिहिले याची अत्यंत महत्त्वाची साक्ष स्वत: विठ्ठलाचीच असावी हे जनाबाईचे केवढे भाग्य? ह्या प्रसंगासंबधी जनाबाई लिहितात-

''जनीने बोलिलें तैसेंच लिहिलें ।
साध्य परिसिलें तुम्ही संतीं ॥१॥
अहो ज्ञानदेवा असावें तुम्हा ठावें ।
येणें काय लहाणीव आणिली आम्हां ॥२॥
माझी मज आण सांगतें प्रमाण ।
सेवितें चरण तुझे स्वामी ॥३॥
जनीचे हो बोल स्वानंदाचें डोल ।
स्वामि मुखीं बोल दुणावती ॥४॥
शुद्ध सत्त्व कागद नित्य करी शाई ।
अखंडित लिही जनीपाशीं ॥५॥
हांसोनि ज्ञानदेवें पिटीयेली टाळी ।
जयजयकार सकळीं केला थोर ॥६॥'' (अ. क्र. २८१)

जनाबाईची पदे स्वत: विठ्ठलच लिहितो, ह्याचा ज्ञानेश्वरांनी संतमंडळात गौप्यस्फोट करून नवल व्यक्त केले. हे विठ्ठलास कळल्याशिवाय कसे राहील? त्यामुळे विठ्ठल मनात अस्वस्थ झाला. दासी जनीची पदे कोण लिहिणार? जनाबाई स्वत: तर ती लिहू शकत नाहीत. मग इतक्या उत्कट, आर्त, लडिवाळ व प्रेमपूर्ण भक्तमनाची वचने वाऱ्यावर जाऊ द्यायची का? हे जनाबाईचे आत्मानंदावस्थेतील साक्षात्कारी बोल. त्यातही प्रेमरसाने ओथंबलेले. त्याचा निदान विठ्ठलास मोह होणार नाही, तर मग कुणाला होणार? विठ्ठल तर जनाबाईच्या प्रेमात पडलेला. त्यांच्यासाठी अहोरात्र कष्ट उपसणारा. त्यास तरी जनाबाईच्या प्रेमभक्तीपूर्ण पदांचा

लोभ होणे स्वाभाविकच होते. म्हणूनच तर ती विठ्ठलाने लिहून काढली. पंढरीनाथ भक्तवेडा तर आहेच. ते त्रिभुवनातच प्रसिद्ध आहे. मग जनाबाईसाठी नामदेवांचे दास्य करणाऱ्या विठ्ठलाने तिचे अभंग लिहिले तर कोणता अपराध घडला?

विठ्ठलास वाटते की ज्ञानेश्वर त्यामुळे आपणास बोल लावतील, त्यामुळे आपणास कमीपणा येतो असे ज्ञानेश्वरांना वाटते का? विठ्ठलाचे मन आता संभ्रमित झाले आहे. त्यामुळे आत्मसमर्थनाचा सूर वरील अभंगात ऐकू येऊ लागतो.

विठ्ठलाने परोपरीने काकुळती येऊन स्वतःच्या कृतीचे समर्थन करणे, ज्ञानेश्वरांनी तरी आपला भाव समजून घ्यावा अशी अपेक्षा करणे, जनाबाईंनीही आपल्या उत्कट भक्तीचेच हे फलित असल्याचे सूचित करणे आणि अखेर ज्ञानेश्वरांनी विठ्ठल घायकुतीला आलेला पाहून हासून टाळ्या वाजवीत त्याचा जयजयकार करणे, ह्यांतून ह्या अभंगातर्गत प्रसंगाचे गांभीर्य कमी होते व संपूर्ण प्रसंगास सुखान्त अशी नाट्यात्म कलाटणी मिळून प्रसन्न वातावरणात अभंगाची समाप्ती होते. ह्या अनेकविध वैशिष्ट्यांमुळे जनाबाईंचा हा अभंगानुभव संस्मरणीय झाला आहे.

❀

# जनाबाईंची संतचरित्रे

संत नामदेवांचा अपवाद वगळता यादवकालातील कोणत्याही संताने समकालीन संतांचे चरित्रलेखन केले नाही, ही मोठीच उणीव जाणवते. संत नामदेवांनी ज्ञानेश्वरांचे 'आदी' 'तीर्थावळी' आणि 'समाधी' असे त्रिप्रकरणात्मक चरित्र लिहिले नसते तर महाराष्ट्रच नव्हे, तर अवघे जग ह्या अद्‌भुत जीवन लाभलेल्या संतश्रेष्ठास विसरून गेले असते. संत नामदेवांनी काही समकालीन संतांची चरित्रे लिहिण्याचा प्रयत्न केला. पण तो फारसा यशस्वी झालेला दिसत नाही. कारण एक तर ही संपूर्ण संतचरित्रे नाहीत. ती विलक्षण स्फुट आणि अपुरी आहेत. शिवाय संतांच्या लौकिक जीवनाचा आलेख काढण्याचा त्यातील प्रयत्न अत्यंत क्षीण आहे. संतचरित्रातील एखादा अद्‌भुत प्रसंग नमूद करण्यावरच नामदेवांनी त्यात भर दिला आहे. त्यामुळे नामदेवकृत संतचरित्रे अत्यंत त्रुटित, अद्‌भुत व आध्यात्मिक जीवनापुरतीच मर्यादित ठरतात.

नामदेवकृत संतचरित्रांचा हाच आदर्श दृष्टीपुढे ठेवून जनाबाईंनीही काही समकालीन संतांची अत्यंत त्रुटित चरित्रे अभंगबद्ध केली आहेत. ती अपुरी ठरली तरी संतचरित्रलेखनाची जबाबदारी जनाबाई स्वेच्छेने स्वीकारतात ही अत्यंत दुर्मिळ आणि मौलिक बाब त्यातून प्रकट होते. त्यातून जनाबाईंचे ऐतिहासिकतेचे भान प्रकटते हे महत्त्वाचे.

दुसरे असे की काही चरित्रांत जनाबाई असा एखादा तपशील नोंदवून जातात की तो पुढील अभ्यासकांस अथवा संशोधकांस मार्गदर्शक ठरावा. तसा दुसरा तपशील उपलब्धच नसल्याने तोच एक प्रमाणही मानला जावा.

तिसरे असे की संतांची ही चरित्रे म्हणजे क्षणचित्रे ठरावीत, असे त्यांचे स्वरुप जाणवते. चरित्रग्रंथात क्षणचित्रांनाही त्यांचे म्हणून एक महत्त्वपूर्ण वेगळेपण असते. जनाबाईंच्या ह्या संतचरित्रांना ते खचितच लाभते.

जनाबाईंनी रचलेल्या अशा चरित्रकाव्यांतील प्रमुख दोन चरित्रकाव्ये उघडच संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर यांची आहेत.

## अ) जनाबाईकृत नामदेवचरित्र

संत नामदेव यांच्यासंबंधी लिहिताना जनाबाईंनी नोंदविलेली माहिती नामदेवांच्या आत्मचरित्रकथनास पूरक अशीच ठरते. संत जनाबाईंच्या नामदेवचरित्रपर अभंगांमुळे नामदेवांच्या आत्मचरित्रास विश्वसनीयताही लाभते. कारण जनाबाई नामदेवांच्या आत्मकथनाच्या प्रत्यक्षसाक्षी ठरतात. नामदेवांना त्यांनी दीर्घकाळ जवळून पाहिलेले आहे; बालपणापासूनचा त्यांचा संत म्हणून जीवनविकास अनुभविलेला आहे. भक्तश्रेष्ठ म्हणून नामदेवांच्या चरित्रातील दंतकथावजा अद्‌भुतता जनाबाईंनी वास्तव म्हणूनच चित्रित केली आहे. कारण स्वत: जनाबाईंच्या जीवनांतही सत्य आणि कल्पित अथवा वास्तव आणि अद्‌भुत यांचे असेच संमिश्रण जाणवते. नामदेव वा जनाबाई यांच्या साक्षात्कारावस्थांचा त्यास प्रबळ आधार असतो हेही महत्त्वाचे. जनाबाईंनी नामदेवविषयक अभंगांत त्यांच्या आत्मकथनाची पुनरावृत्ती केलेली नाही हे विशेष! उलट अभंग क्रमांक ४१५ ते ४३१ अशा केवळ सतरा अभंगरचनांतून भक्तश्रेष्ठ नामदेवांच्या आत्मकथनातील काही कोऱ्या जागा भरून काढल्या आहेत.

प्रारंभी नामदेवांसाठी गोणाईने पंढरीनाथास विठ्ठलभक्त पुत्र लाभावा म्हणून नवस केल्याचा उल्लेख जनाबाई करतात. (४१५) नंतर नामदेवांच्या अत्युत्कट विठ्ठलभक्तीचे स्वरुप एका प्रासंगिक अभंगातून जनाबाई दर्शवितात. स्थळ आहे नामदेवांचे घर. पात्रे आहेत नामदेव, गोणाई आणि जनाबाई. प्रसंग आहे भोजनाचा. नामदेवास माता गोणाई भोजनास प्रारंभ करण्याचा आग्रह करीत असल्याचा. नामदेव मात्र विठ्ठलाच्या आगमनाची वाट पाहात आहेत. विठ्ठलास येण्यास उशीर होतो. तेव्हा त्यास पुढे घालून घेऊन येण्याचे काम नामदेवांनी जनाबाईंवर सोपविले आहे. त्यावरून दासी जनीच्या कामकाजाचे स्वरुप लक्षात यावे. गोणाईचे मन नामदेवात अडकते, तर नामदेव पूर्णत: विठ्ठलात रमलेले आहेत. मग दासी जनीही नामदेव, विठ्ठल यांच्यातील प्रेमभक्तीच्या संबंधात गुरफटत जाते. नामदेवांच्या ह्या दासीला नामदेवांमुळेच देव असा आयता फावला आहे.

नामदेव जनाबाईंना सूचना देत आहेत. ''बघ आधी राउळात जा. तेथे भक्तांच्या उद्धारासाठी त्यांना भेट देण्यासाठी त्याला थांबावेच लागते. तो तेथेच असणार. सांग, की नामदेव जेवणासाठी तिष्ठत आहे. तुला लवकर लवकर बोलविले आहे. कदाचित त्याला राग येईल. पण तो सहन कर. सांग, तुला नामदेवाने त्वरित बोलाविले आहे. जेवणासाठी तो थांबला आहे. राउळात नसेल तर मग ज्ञानेश्वरांच्या घरी तो खचितच असणार. बसला असेल ज्ञानदेवांशी गुजगोष्टी करीत. जा जनी. जा लवकर.''

नामदेव विठ्ठलास पूर्णत: ओळखून आहेत. ते म्हणतात तसेच असते. देव

देवळात नसतोच. तो असतो ज्ञानदेवांच्या घरी. जनी लगबग करीत तेथेही जाते आणि नामदेव भोजनास खोळंबला असल्याचे सांगून विठ्ठलास उठविण्याची लगबग करते.

''माझा हा विठोबा येईल गे जेव्हां ।
जेवीन मी तेव्हां गोणाबाई ॥१॥
त्वरे राउळासी जाऊनीयां पाहे ।
लवकरी बाहे भोजनासी ॥२॥
भरलिया रागें क्रोध त्याचा साहे ।
लवकरी बाहे भोजनासी ॥३॥
ज्ञानेश्वरा घरीं असेल बैसला ।
जाऊनी विठ्ठला पाहे तेथें ॥४॥
जनी म्हणे देवा चला पुरुषोत्तमा ।
खोळंबला नामा भोजनासी ॥५॥'' (अ. क्र. ४१६)

– 'देवा, चला पुरुषोत्तमा, खोळंबला नामा भोजनासी' असे सांगून ज्ञानदेवांच्या घरी देवाला उठविण्याचे धैर्य जनाबाईंशिवाय दुसरे कोण दर्शविणार? जनाबाईंचे दासीपण येथे सार्थकी लागते. नामदेवांची विठ्ठलावर असणारी प्रेमसत्ता, विठ्ठलाचे भक्तासंबंधीचे हळवेपण आणि ज्ञानेश्वरांचे अभिजात प्रेमसौजन्य यांचा लाभ येथे जनाबाईंना होतो. जनाबाई ह्या तिघांनाही चांगलेच जाणतात. शिवाय त्यांच्या स्वत:च्या प्रेमभक्तीचेही विठ्ठलावर दडपण असते ते वेगळेच! विलक्षण धिटाई, वृत्तीचा मोकळेपणा, सर्वांचे मर्म जाणून त्यांना आपल्या पद्धतीने वागण्यास भाग पाडण्याची कुशलता, फटकळपणा, आपल्या भक्तिप्रेमाचा इतरांवर दबाव टाकण्याचे तंत्र आणि देवाशी आणि भक्ताशी असणारे काहीसे आक्रमक असे सलगीचे नाते इत्यादी व्यक्तिविशेष जनाबाईंच्या व्यक्तिमत्त्वात मोहक रंग भरतात. आपणास हे सर्व अधिकार दासीपणातून लाभले आहेत याची स्वत: जनाबाईंनाही जाणीव आहे. त्यामुळेच आपल्या दासीपणाविषयी खंत व्यक्त करण्यापेक्षा त्यासंबंधीचा अभिमान जनाबाईंना वागवावासा वाटतो.

### ''वेडीपिशी दासी त्याची जनी''

''गोणाई राजाई दोघी सासू सुना । दामा नामा जाणा बापलेक ॥
नारा विठा गोंदा महादा चवघे पुत्र । जन्मले पवित्र त्याचे वंशी ॥
लाडाई गोडाई येसाई साखराई । चवघी सुना पाही नामयाच्या ॥
लिंबाई ती लेकी आऊबाई बहिणी । वेडिपीशी दासी त्याची जनी ॥''
(अ.क्र.४१७)

येथे जनाबाई नामदेवांच्या कुटुंबासंबंधी एक महत्त्वाची नोंद करीत आहेत. ह्या कुटुंबात एकूण पंधरा माणसे नांदत होती. दामा-नामा बापलेक, गोणाई-राजाई सासू-सून, नारा-विठा-गोंदा-महादा हे चार नामदेवपुत्र, लाडाई-गोडाई-येसाई-साखराई ह्या चार सुना, लेक लिंबाई, बहिण आऊबाई आणि दासी जनी.

येथे जनाबाईंनी नामयाची दासी म्हणून स्वत:ला त्यांच्या कुटुंबातील एक व्यक्ती म्हणूनच पाहिले आहे हे विशेष. त्यातून नामदेवांच्या कुटुंबाविषयीचा जनाबाईंचा जिव्हाळा, आत्मीयता, समरसता आणि प्रेमभाव नितळपणे व्यक्त होतो.

येथे स्वत:चा उल्लेख जनाबाईंनी 'वेडीपिशी' अशा शब्दांत केला आहे, त्यातून नामदेवांच्या कुटुंबियांचा जनाबाईंकडे पाहण्याचा दृष्टिकोन तर सूचित होत नाही?

## ''सुंबाचा करदोडा रकट्याची लंगोटी''

प्रस्तुत सुप्रसिद्ध अभंगात जनाबाईंनी कथाकीर्तनात देहभान हरवलेल्या नामदेवांचे एक बोलके क्षणचित्र रेखाटले आहे. ते असे.

''सुंबाचा करदोडा रकट्याची लंगोटी ।
नामा वाळवंटी कथा करी ॥१॥
ब्रह्मादिक देव येवोनि पाहती ।
आनंदे गर्जति जयजयकार ॥२॥
जनी म्हणे त्याचें काय वर्णू सुख ।
पहाती जे मुख विठोबाचे ॥३॥'' (४१८)

संत नामदेव श्रेष्ठ भक्त तर होतेच पण श्रेष्ठ संतही होते. उपरोक्त अभंगातील प्रथम चरणात त्यांचे जनाबाईंनी जे वर्णन केले आहे त्यातून नामदेवांचे कठोर वैराग्यही प्रकट होते. 'सुंबाचा करदोडा' आणि जुन्या लक्तरांची लंगोटी' हा वाळवंटात कथाकीर्तनात हर्षभराने नाचणाऱ्या नामदेवांचा वेष आहे. हे लक्षात घेणे आवश्यक ठरते. ह्या कठोर वैराग्यानेच संत नामदेवांना प्रपंचाकडे पाठ फिरवावयास लावली होती.

नामदेवांचे हरिकीर्तन श्रवणीय तर होतेच, पण प्रेक्षणीयही होते. म्हणूनच ब्रह्मादिक देव हे कथाकीर्तन ऐकण्यास व पाहाण्यास आनंदभरीत होऊन दाटीवाटीने उपस्थित होते. नामदेवांचा ते जयजयकार करताना जनाबाईंना दिसले.

ह्या प्रसंगी स्वत: विठ्ठल अदृश्यपणे तेथे उपस्थित होता. नामदेवांच्या कथाकीर्तनाने सुखावलेला विठ्ठलाचा चेहरा जनाबाईंना स्पष्ट दिसत आहे. हे त्यांचे भाग्यच.

यानंतरच्या क्रमांक ४१९ ह्या अभंगात नामदेवांसारखे भक्त कोणीही नाही, त्यांच्यासारखी उत्कट, प्रेमळ आणि चैतन्यपूर्ण अभंगवाणी कुणासही लाभली नाही हे जनाबाईंना सांगावेसे वाटते.

भीवरेला पूर येऊन पाणी मंदिराच्या पायरीला लागले असता संतजनांच्या विनंतीला मान देऊन नामदेवांनी भीवरेला उतार देण्याची विठ्ठलास प्रार्थना केली. आणि केवढे आश्चर्य! नदीचे पाणी लगेच ओसरु लागले. हा नामदेवांच्या विठ्ठलभक्तीचाच चमत्कार होय असे जनाबाईंना वाटते. (४२०)

दिवाळीचा सण येताच नामदेव राउळात जातात आणि विठ्ठलाच्या हातास धरून आग्रहाने आपल्या घरी घेऊन येतात. सर्व मंडळी देवास चंदनपाटावर बसवतात. गोणाई देवास उटणे लावते, दामाशेट त्यास न्हाऊ घालतो. आपल्या माथ्यावरील पदराने ह्या नंदाच्या बाळास जनाबाई पुसतात. नंतर त्यास पंचारतीने औक्षवण केले जाते. देव भोजनास बसतात. तृप्त होतात. दासी जनी सर्वांना विडे देते. हा साक्षात्कारानुभव जेवढा नामदेवांचा तेवढाच जनाबाईंचा आहे. अथवा नामदेव आणि जनाबाई यांच्या साक्षात्कारानुभवांचे विश्व वेगळे नव्हतेच. ते एकरुपच होते. (४२१)

भक्तवेड्या देवाची अवस्था करूण झाली आहे. तो भक्तीसाठी स्वत:स जणू विकतो. नामदेवांनी भक्तिसामर्थ्याने देवास हृदयबंदिखान्यात कोंडले आहे. आता नामदेवांच्या प्रेमाखातर देवाने त्यांची मजुरीही करण्यास प्रारंभ केला आहे. तो मोळ्या बांधतो. भिंती रचतो. त्यांच्या घराचे छप्पर शाकारतो. आणि त्यावर पाणीही टाकतो. नामदेवांची भक्ती धन्य होय, असे जनाबाईंना म्हणावेसे वाटते. (४२२)

असाच एकदा मुसळधार पाऊस आला. त्यामुळे नामदेवांच्या घराचे छप्पर मोडले. तेव्हा हाती चक्र, गदा धारण करणारा श्रीहरीच मातृहृदयाने नामदेवांच्या घरी धावला. त्याने चौफेर वासे लावून नामदेवांचे घर क्षणार्धात उभे केले. अचानक नामदेवांना जाग आली. तर दारात श्रीहरी उभा! नामदेवांचे हृदय भरून आले. विठ्ठलाच्या पायावर त्यांनी डोके ठेवले. जनाबाईंनी श्रमलेल्या विठ्ठलाचे पाय चुरले. (४२३)

## ''जनी म्हणे आतां समजलें मज''

भक्तशिरोमणी नामदेवांची साक्षात्कारी विठ्ठलभक्ती ही ज्ञानेश्वरांच्या कुतूहलाचा कौतुकाचा आणि आदराचाही विषय आहे. नामदेवांचा ज्ञानेश्वरांनी प्रसंगी 'पंढरीरायाचा प्रेमभांडारी' असा उचित गौरवही केला.

तथापि ज्ञानेश्वर हे निर्गुणोपासक ज्ञानमार्गी, अद्वैतज्ञानाचे पुरस्कर्ते आणि

नाथसंप्रदायाचे सिद्धयोगी होते. सगुणोपासनेला त्यांचा विरोध नव्हता. पण केवळ सगुणभक्ती त्यांना पुरेशी वाटत नव्हती. त्यामुळे आपल्या प्रेमभक्तीने विठ्ठलास जिंकणाऱ्या नामदेवांना ज्ञानेश्वरांचा काहीसा धाक वाटत होता. ह्याहून आश्चर्याची बाब म्हणजे स्वत: विठ्ठलालाही ज्ञानदेवांचा धाक वाटावा, ही आहे. त्यामुळेच जनाबाईंच्या कामकाजात आपण साहाय्य करतो अथवा त्यांची पदे लिहितो ही गोष्ट उघड होणे हे विठ्ठलालाही रुचत नाही. अनेकदा त्यासंबंधाने ज्ञानेश्वरांपुढे विठ्ठलास आत्मसमर्थनही करावे लागते.

प्रस्तुत अभंगातही ज्ञानेश्वरांनी विठ्ठलास 'तू नामदेवांबरोबर जेवतोस की काय?' असे थेटपणे विचारले असता विठ्ठल 'नाही' असे खोटेच उत्तर देतो. पण ज्ञानेश्वर अंतर्यामी सर्व काही जाणतात. विठ्ठलाचे 'बोलणे एक आणि करणे दुसरे' हे ज्ञानेश्वरांनी जाणल्याने देव घाबरा झाला आहे. कुणी तरी तातडीने हाक मारल्याचे निमित्त करून विठ्ठल ज्ञानेश्वरांजवळून उठतो आणि जनाबाईंना 'नामदेवांचा निरोप एकांतात असताना सांगावा. चारचौघात तो सांगितला तर अनावश्यक बोभाटा मात्र होतो', अशी सूचना करतो. नामदेवांनाही विठ्ठलाने उद्धाराचे आश्वासन दिले आहेच. जनाबाईंना सारा घोटाळा समजून येतो. आता यापुढे मी उमज धरून वागेन, असे जनाबाईंनी विठ्ठलास आश्वासन दिले आहे. (४२४)

अभंग क्र. ४२५ ते ४३० अशा सहा अभंगांत नामदेवचरित्रातील एका अद्‌भुत प्रसंगाची कथा येते. आषाढी एकादशीस पूर्णत: उपवास करणाऱ्या नामदेवांच्या घरी विठ्ठल ब्राह्मणरुपाने जातो असा एक प्रसंग आला आहे.

विठ्ठल ब्राह्मणरुपाने येऊन राजाईस द्रव्य देतो. राजाई त्याचा स्वीकार करते. नामदेवांना घरी आल्यावर ही गोष्ट कळते तेव्हा ते व्यथित होतात. 'या द्रव्यास आम्ही मनानेही स्पर्श करीत नाही. हातांत टाळ आणि ओठांत दिंडीगान हेच आमचे धन होय', असे ते ब्राह्मणास सांगतात. राजाई मनात दु:खी होते. पण जनाबाई मात्र मनात हसत असते.

मग ब्राह्मण नामदेवांकडे भोजनाची मागणी करतो. 'आषाढी एकादशी असल्याने इच्छित फराळ करावा. पण भोजनाची मागणी करू नये' अशी नामदेव ब्राह्मणास विनंती करतात. तेव्हा ब्राह्मण अन्नावाचून अन्य काहीही खाण्यास नकार देतो. ब्राह्मणरुपाने आलेला चक्रपाणी मग एक नाट्य घडवून आणतो. त्याचे प्राण भुकेने कासाविस होतात. त्याचे हातपाय वळतात. शरीर संकोचते. आणि अखेर तो प्राण सोडतो.

हळूहळू गावकरी जमा होतात. सारेजण ब्रह्महत्या केल्याचा नामदेवांवर आरोप करून त्याचा धिक्कार करू लागतात. त्यातील ब्राह्मणवृंद विप्रास पाचारण करून

त्यास मृत ब्राह्मणाचे शव चंद्रभागेच्या वाळवंटात नेऊन अग्निसंस्कार करण्याची विनंती करतात.

आता मात्र परीक्षा ब्राह्मणरूप धारण केलेल्या चक्रपाणीचीच असते. अंगास अग्नीचे चटके बसू लागताच, हृषिकेशी घाबरा होतो. प्रकरण अंगाशी आलेले पाहून तो निजरुप प्रकट करतो. सोनसळा पीतांबर, गळ्यात वैजंयती माळ, कोटी सूर्यांचाही लोप करेल असे देवाचे लावण्यतेज असा हा देव हसत उभा असलेला पाहून नामदेव त्याच्या चरणी मस्तक ठेवतात. 'भला अंत रे पाहिला' असे देवास उद्देशून म्हणताच हृषिकेशी नामदेवांचा हात धरून त्यांची पाठ थोपटतात. जनाबाईंही मग देवास वंदन करतात. देव राउळात परततो. (४२५ ते ४३०)

**''ऐका हो नामयाचा जन्म मूळसंचित''**

जनाबाईकृत नामदेवचरित्रातील ह्या अखेरच्या अभंगात जनाबाईंनी नामदेव आणि जनाबाई ह्या दोघांच्याही पूर्वजन्मकथा सांगितल्याने ह्या अभंगास विशेष महत्त्व प्राप्त होते. कारण जनाबाई आपले नामदेवांशी जन्मजन्मांतरीचे नाते असल्याचे त्यातून सूचित करतात.

''ऐका हो नामयाचा जन्म मूळसंचित ॥धृ॥
हिरण्यकश्यपकुळी नामा प्रल्हाद ।
पद्मीणी नाम माझें श्रेष्ठ दासीचें पद ॥१॥
दुसरा जन्म याचा अंगद रामभक्त ।
मंथरा नाम माझे भरतें मारिली लाथ ॥२॥
द्वापारी कृष्णसेवा उद्धव जन्मला ।
कुब्जा नाम माझें देवें उद्धार केला ॥३॥
कलींत नामदेव विठ्ठलचरणीं ।
त्याचीच सेवेलागीं जन्मली जनी ॥४॥'' (४३१)

जनाबाई सांगतात, नामदेव 'प्रल्हाद' हा श्रेष्ठ विष्णुभक्त होता, त्यावेळी आपण त्याची श्रेष्ठ दासी होतो. जेव्हा तो रामभक्त अंगद होता, तेव्हा आपण मंथरा दासी होतो. द्वापारात नामदेव कृष्णसखा उद्धव होऊन जन्मला. त्यावेळी आपणच कुब्जा दासी होतो. तेव्हाही देवाने आपला उद्धार केला. आता कलियुगात हा नामदेव विठ्ठलभक्त म्हणून जन्मला आहे आणि आपण नामदेवांच्या सेवेसाठी जन्मास आलो आहोत. यावरून नामदेवांप्रमाणेच जनाबाईंची कृष्णभक्तीही जन्मजन्मांतरीची आहे हे सूचित होते.

## 'तीर्थावळी'तील नामदेव चरित्र

जनाबाईच्या नावावर अभंग क्रमांक ४६९ ते ४७२ असं एकूण चार तीर्थावळीचं अभंग असले तरी त्यांना स्वतंत्र स्वरुपाचे निर्मितीमूल्य लाभल्याचं फारसं जाणवत नाही. संत नामदेवांच्या 'तीर्थावळी' प्रकरणातील काही अभंगांचे क्षीण प्रतिसाद जनाबाईच्या ह्या तीर्थावळीच्या अभंगात प्रत्ययास येतात एवढेच.

दुसरं असं की जनाबाईच्या ह्या अभंगांना, त्या नामदेवचरित्राच्या प्रत्यक्षसाक्षी असल्यानं विश्वसनीयता प्राप्त होते. 'तीर्थावळी' ही एक निखळ काल्पनिक कथा आहे, असं मत असणाऱ्या आधुनिक अभ्यासकांना जनाबाईच्या तीर्थावळीच्या ह्या अभंगाची दखल घ्यावी लागेल. थोडक्यात नामदेव आणि जनाबाई यांची 'तीर्थावळी' परस्परपोषक ठरते.

## ब) जनाबाईची ज्ञानेश्वरस्तुती

जनाबाईनी अभंग क्रमांक ४०३ ते ४१३ अशा एकूण अकरा अभंगांत ज्ञानेश्वरादीसंबधी संमिश्र स्वरुपाच्या नोंदी केल्या आहेत. त्यास ज्ञानदेवांचं चरित्र असं म्हणता येत नसलं तरी अन्य संतांच्या तुलनेनं ज्ञानेश्वरांसंबंधीची काही महत्त्वाची माहिती त्यात दिसते. शिवाय त्यांतील बरेच अभंग विशेष प्रसिद्धी लाभलेले आहेत.

ह्या अकरा अभंगांपैकी जनाबाई-ज्ञानेश्वर ह्यांचे भावबंध प्रकट करणाऱ्या अभंगांची संख्या सहा असून तीन अभंगांत जनाबाई सोपानांची स्तुती करतात. उर्वरित दोन अभंग त्यातील मौलिक नोंदीमुळे संतसाहित्याच्या अभ्यासकांना विशेष महत्त्वाचे वाटतात.

**ज्ञानेश्वर-**

जनाबाईना ज्ञानेश्वरीचं महत्त्व कसं जाणवते, याचा प्रत्यय पुढील अभंगातून येतो.

''भाव अक्षराची गाठी । ब्रह्मज्ञानानं गोमटी ॥१॥
ते हे माय ज्ञानेश्वरी । संतजना माहेश्वरी ॥२॥
ज्ञानेश्वर मंगळ मुनी । सेवा करी दासी जनी ॥३॥'' (अ. क्र. ४०३)

''गीतेंवरी आन टीका । त्यांनी वाढियेली लोकां ॥१॥
रत्नकनक ताटामाजीं । त्यानें वोगारिलें कांजी ॥२॥
एका ज्ञानेशावांचोनी । म्हणे नामयाची जनी ॥३॥'' (अ. क्र. ४०४)

जनाबाईंनी 'भावअक्षराची' गांठी अशा रुपकात्म शब्दांत ज्ञानेश्वरीचे वर्णन केले आहे. ज्ञानेश्वरीतील अक्षरे 'भावाक्षरे' आहेत. भाव आणि अक्षरे यांचे ज्ञानेश्वरीत जणू अद्वैत सिद्ध होते. त्यातील ब्रह्मज्ञानामुळे ही 'भावाक्षरसिद्धी' सौंदर्याने उजळून जाते. जनाबाईंची ज्ञानेश्वरस्तुती अशी 'ज्ञानेश्वरी'स्तुतीत रुपांतर पावताना दिसते. ही प्रक्रिया येथेच थांबत नाही हे विशेष! जनाबाईंनी ज्ञानेश्वरीचा उल्लेख 'माय ज्ञानेश्वरी' अशा शब्दांत केला आहे. ज्ञानेश्वरी ही ज्ञानेश्वरांचीच वाङ्मयीन मूर्ती असल्याने ज्ञानेश्वरांचे माऊलीपण जनाबाईंच्या अभंगांत असे ज्ञानेश्वरीकडे चालत आले आहे. ज्ञानेश्वरी ही 'मायमाऊली' आहेच, पण त्याचबरोबर संतसाधूंच्या दृष्टीने ती माहेश्वरीही आहे. जनाबाईंना ज्ञानेश्वर 'मंगळ मुनी'सारखे भासतात. नामयाची ही दासी ज्ञानेश्वरांचेही दास्य करू इच्छिते.

जनाबाईंची ज्ञानेश्वरांवरील भक्ती सजग आहे. तीत भाबडेपणाचा लवलेशही नाही. संत, कवी, योगी आणि भाष्यकार ह्या चारही भूमिका ज्ञानेश्वरीत एकात्म पावतात. ज्ञानेश्वरीमागील भूमिका लोकोद्धार करणाऱ्या आणि विश्वमंगळ इच्छिणाऱ्या संताची आहे. ज्ञानेश्वरीचे स्वरुप गीताभाष्याचे असून तीत तत्त्वज्ञान, प्रतिभा आणि विश्वात्मकता यांची परिसीमा झाली आहे. ज्ञानेश्वरीचा भाष्यकार हा सिद्धयोगी महात्मा आहे. म्हणून आध्यात्मिक आशयाला ज्ञानेश्वरीत सतत योगसंदर्भ लाभून तिची पृथगात्मता सिद्ध होते.

'ज्ञानेश्वरी' हे तिच्यासारखे तेच असे श्रेष्ठ भाष्यकाव्य होय. मराठी सारस्वतातच नव्हे, तर भारतीय साहित्यपरंपरेतही ज्ञानेश्वरी हे अपूर्व, अतुल आणि अक्षरत्व पावलेले भाष्यकाव्य ठरते. त्याचे वेगळेपण 'भावअक्षरांची गांठी । ब्रह्मज्ञानाने गोमटी' असा शब्दांत जनाबाईंनी अचूकपणे टिपले आहे.

'ज्ञानेश्वरी' म्हणजे ज्ञानी-अज्ञानी, बाल-वृद्ध, सवर्ण आणि वर्णहीन, स्त्री-पुरुष अशा सर्वांना आत्मोद्धार साधता यावा यासाठी ज्ञानेश्वरांनी केलेली अमृतासिद्धी होय.

त्यामुळे ज्ञानेश्वरीनंतर कुणी गीताभाष्य रचले, तर त्याने रत्नकनकाच्या ताटात कांजी वाढली अशीच अभद्र कृती ठरेल, असा संत जनाबाई समकालीन आणि उत्तरकालीन ग्रंथकारांना इशारा देत आहेत.

पंधराव्या शतकातील संत एकनाथही तेराव्या शतकातील ह्या नामदेवांच्या दासीच्या शब्दांत थोडासा फेरफार करून लिहितात-

''ज्ञानेश्वरीपाठी । जो वोंवी करील मऱ्हाठी ।
तेणें रत्नखचिताचिया ताटीं । जाण नरोटी ठेविली ।''

तेराव्या शतकातील ज्ञानेश्वर-नामदेवांचीच नव्हे तर नामयाची दासी जनाबाईंची

अभंगवाणीही उत्तरकालीन संतांना कशी प्रेरक ठरली, याचे हे एक उदाहरणच पुरेसे आहे.

यापुढील तीन अभंगांतून जनाबाई आणि ज्ञानेश्वर यांच्यातील भावबंध प्रकाशमान होतात. नामदेवांचा दैनंदिन सहवास जनाबाईंना लाभला. तथापि आपल्या दासीपणाच्या मर्यादांचा भंग करून जनाबाई नामदेवांशी सख्यत्वाचे नाते जोडताना त्यांच्या अभंगवाणीत कोठेही दिसत नाहीत. त्यांच्या अभंगांतून सातत्याने प्रकटते ते त्यांचे दासी म्हणून असणारे अखंड श्रमजीवन!

तथापि असे विशुद्ध, अकृत्रिम आणि उत्कट सख्यत्व जनाबाईंनी ज्ञानेश्वरांच्या संदर्भात मोकळेपणाने व्यक्त केले आहे हे विशेष.

''ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ॥१॥
मरोनिया जावें । बा माझ्या पोटा यावें ॥२॥
ऐसे करी माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा ॥३॥
जावे वोवाळुनी । जन्मोजन्मी दासी जनी ॥४॥'' (४०५)

'ज्ञानाचा सागर' असलेल्या ज्ञानेश्वरांना जनाबाई 'सखा माझा ज्ञानेश्वर' असे अनौपचारिक स्नेहार्त भावाने येथे संबोधतात. जनाबाईंनी सख्यत्व जोडण्यासाठी ज्ञानेश्वरांची केलेली निवड वैशिष्ट्यपूर्णच नव्हे तर अर्थपूर्णही आहे. तिच्यामुळे ज्ञानेश्वरांच्या विशुद्ध, सहिष्णू आणि प्रेमपूर्ण व्यक्तिमत्त्वावर प्रकाश तर पडतोच. शिवाय जनाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाची उंची कळण्यासही साहाय्य होते.

जनाबाईंचे मन ज्ञानेश्वरांत पूर्णतः समरसले आहे. ज्ञानेश्वरांना कोणत्या प्रकारे आपलेसे करावे ह्या संभ्रमात हे मन सापडले आहे. त्यामुळेच केवळ सख्यत्व ह्या मनास पुरेसा संतोष देत नाही. त्यांच्यातील स्त्रीला ज्ञानेश्वरांच्या मातृपदाची जणू तहान लागते. वास्तवात ते शक्य नसतेच. पण पुढील जन्मात तरी ज्ञानेश्वर पुत्ररुपाने आपल्या पोटी यावेत, अशी उत्कट इच्छा जनाबाई व्यक्त करतात. येथे जनाबाईंचे स्त्रीपण आणि त्यांच्या मातृत्वाची आकांक्षा लखलखीत स्वरुपात प्रकटते. पण असे भाग्य प्राप्त होण्याइतका जनाबाईंचा भाव विशुद्ध हवा. जनाबाई त्याचीच परमेश्वराजवळ याचना करीत आहे. आपला प्रत्येक जन्म ज्ञानेश्वरांवरून ओवाळून टाकावा, एवढी ज्ञानेश्वरासंबंधीची भक्ती जनाबाईंच्या मनात दाटून येते.

तर लगेच पुढील अभंगात जनाबाईंना ज्ञानेश्वर माऊलीच्या रुपात दिसतात. प्रत्यक्ष मातेहूनही ज्ञानेश्वरमाऊली अधिक प्रेमळ आहे. नव्हे ज्ञानेश्वर म्हणजे 'परलोकीचे तारुच' होय. ते जणू येथील दुःखी जनास तारण्यासाठी आले आहे.

ज्ञानेश्वर हेच आपले वित्त, गोत, चित्त होय. असे सांगता सांगता जनाबाई अनपेक्षितपणे बोलून जातात. 'पतिव्रते जैसा पती' जनाबाईना येथे अधोरेखित करावयाचे आहे ते पतिपत्नी नाते नव्हे. तर पतिव्रतेच्या मनातील पतीविषयीचा अखंड ध्यास, एकनिष्ठा, प्रेमाची उत्कटता होय.

''मायेहूनि माय मानी । करी जिवाची ओंवाळणी ॥१॥
परलोकीचे तारु । म्हणे माझा ज्ञानेश्वरू ॥२॥
वित्त गोत चित्त पाहे । सत्य वंदी गुरुचे पाय ॥३॥
पतिव्रते जैसा पती । जनी म्हणे सांगो किती ॥४॥'' (अ. क्र. ४०६)

यापुढील (क्र.४०७) अभंगात जनाबाईंनी एक प्रसंग चित्रित केला आहे. संतजन विठ्ठलाच्या मंदिराकडे निघाले आहेत. त्यात ज्ञानेश्वरही आहेत. संतांच्या ह्या वाटचालीतच ज्ञानेश्वर साक्षात विठ्ठल दासी जनीचे अभंग लिहीत असतो, याची वाच्यता करून आश्चर्यभाव प्रकट करतात. जनाबाई हे ऐकतात तेव्हा त्यांच्या दृष्टीपुढे विठ्ठलाचे घवघवीत रुप उभे राहते. ते असे.

''संत राउळा चालले । ज्ञानेश्वर तंव बोले ॥१॥
केवढे नवल सांगावे । दासी जनीचें पद ल्याहावे ॥२॥
पाय जोडुनी विटेवरी । कटीं हात उभा हरी ॥३॥
रुप सावळें सुंदर । कानीं कुंडल मनोहर ॥४॥
सोनसळा वैजयंती । पुढें गोपाळ नाचती ॥५॥
गरुडपारीं सन्मुख उभा । जनी म्हणे धन्य शोभा ॥६॥'' (अ. क्र. ४०७)

श्रीकृष्णाच्या विठ्ठलरुपातच मराठी संत मनांचे अवघे भावविश्व सामावलेले आहे. श्रीविठ्ठलमूर्तीत परब्रह्माचे ज्योतिर्रुप पाहण्याची श्रद्धा संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथांनीच मराठी संतमनांत प्रवर्तित केली होती.

## जनाबाईंचा सोपानविषयक जिव्हाळा

ज्ञानेश्वरानंतर जनाबाईंना विशेष जिव्हाळा वाटतो तो सोपानांसंबंधी. श्रीनिवृत्तिनाथ आणि श्रीज्ञानेश्वर यांची अलौकिक व्यक्तिमत्त्वे आणि मुक्ताबाई ही महाज्ञानी कनिष्ठ भगिनी ह्यांच्या तेजस्वितेमुळे असावे, सोपानांचे व्यक्तिमत्त्व काहीसे झाकोळून जाते. ह्या भावंडातील निवृत्तिनाथ ज्येष्ठ बंधू आणि सद्गुरू म्हणून वंदनीय आहेत. ज्ञानेश्वरांची भाष्यकवी, योगसिद्ध आणि अद्‌भुत प्रतिभावंत म्हणून त्रिखंडात कीर्ती आहे. मुक्ताबाई कुटुंबातील एकमेव स्त्री. तीही सर्वांत

लहान. पण तरीही ज्ञानवती-योगिनी म्हणून तिचाही विशेष बोलबाला आहे. सोपानांचे व्यक्तिमत्त्व ह्या सर्वांमुळे दबून गेले आहे का?

मात्र नामदेव, चांगदेव आणि जनाबाईंच्या अभंगांतून सोपान आपणास सतत भेटत राहतात. सोपानच नामदेवांचा गुरू होता असे जनाबाईंनी म्हटले आहे. जनाबाईंना सोपानांसंबंधी बोलताना प्रेमाचा गहिवर येतो. जनाबाईंच्या अभंगांमुळे सोपानांचे धूसर असले तरी एक व्यक्तिचित्र प्रकट होण्यास निश्चितपणे लक्षणीय साहाय्य झाले आहे. जनाबाई सोपानांसंबंधी लिहितात-

''सोपानाची ऐशी मूर्ति । विश्वकर्ता ब्रह्मा म्हणती ॥१॥
ऐसे बोले पुराणांत । सृष्टिकर्ता भगवंत ॥२॥
जनी म्हणे हा सोपान । ब्रह्मा अवतरला पूर्ण ॥३॥'' (अ. क्र. ४१०)

''नामयाचा गुरु । तो हा सोपान सद्‌गुरू ॥१॥
कऱ्हेवरी करुनी वस्ती । ब्रह्मपुरी तिशी म्हणती ॥२॥
माझ्या जीवीच्या जीवना । हृदयी राहे तू सोपाना॥३॥
चीत्त उधवण्याची सत्ता । जनी म्हणे माझ्या ताता ॥४॥'' (अ. क्र. ४११)

''वाचे म्हणतां सोपान । प्राप्त वैकुंठाचे जाण ॥१॥
सोपानदेव करिता जप । समूळ नासे त्रिविध ताप ॥२॥
सोपानदेव धरिता ध्यानें । पुन: जन्मा नाहीं येणें ॥३॥
दासी जनी तल्लिन जाली । सोपानचरणी विनटली ॥४॥'' (अ. क्र. ४१२)

जनाबाईंच्या दृष्टीने सोपान ही विश्वकर्त्या ब्रह्मदेवाचीच मूर्ती होय. समकालीन संतांनी ज्ञानेश्वर, भावंडांत ब्रह्मा, महेश आणि विष्णु यांची अवताररुपे पाहिली. ज्ञानेश्वरांच्या काळातच जनमानसात ह्या श्रद्धेचा सर्वत्र प्रसार झाला होता. जनाबाईंही ही श्रद्धा अभंगबद्ध करताना दिसतात.

''सदाशिवाचा अवतार । स्वामी निवृत्ति दातोर ॥१॥
महाविष्णूचा अवतार । सखा माझा ज्ञानेश्वर ॥२॥
ब्रह्मा सोपान तो जाला । भक्तां आनंद वर्तला ॥३॥
आदि शक्ती मुक्ताबाई । दासी जनी लागे पायी ॥४॥'' (अ. क्र. ४०९)

जनाबाईंनी सोपानच नामदेवांचा गुरू असल्याचा निर्वाळा स्पष्टपणे पुढील शब्दांत दिला आहे.

''नामयाचा गुरू । तो हा सोपान सद्‌गुरू ॥'' सोपान यांनी कऱ्हेकाठी वस्ती केली आणि अखेर तेथेच समाधी घेतली. ते स्थळही 'ब्रह्मपुरी' ह्या नावानेच

ओळखले जाते. सोपानांच्या स्मृतीने जनाबाईंचे मन गहिवरते. 'जीवीच्या जीवना' असे सोपानांना संबोधून आपल्या हृदयस्थानी निवास करण्याची त्या सोपानांना प्रार्थना करतात.

जनाबाईंनी सोपानांची प्रस्तुत अभंगात (४११) उल्लेखिलेली महानता लक्षात घेण्यासारखी आहे. ती म्हणजे योगसाधनेत चित्त उंचावण्याची क्षमता सोपानांच्या ठिकाणी होती. त्यामुळे साधकास त्यांचे मौलिक साहाय्य होत असावे. जनाबाईंना याची जाणीव असल्याने त्यांना सोपानासंबंधी विशेष आदरभाव वाटतो.

जनाबाईंच्या मनातील सोपानविषयक भक्तीची परिसीमा पुढील अभंगात होते. केवळ 'सोपान' असा नामोच्चार करताच साधकास वैकुंठप्राप्ती होते. सोपानांच्या नावाचा जप केल्याने त्रिविध तापांचा समूळ नाश होतो. त्यांच्या मूर्तीचे ध्यान केल्यास जन्ममरणांच्या चक्रातून मुक्तता लाभते. जनाबाईंचे मन सोपानात विशेष रमते. तल्लीन होते. त्यामुळेच त्यांनी स्वत:ला सोपानचरणी समर्पित केले आहे.

## ज्ञानेश्वरादी भावंडांच्या जन्मविषयक नोंदी

जनाबाईंचा विशेष प्रसिद्धी पावलेला आणि मध्ययुगीन मराठी साहित्याच्या तमाम अभ्यासकांस साहाय्यकारी ठरणारा अभंग ज्ञानेश्वरादी भावंडांच्या जन्मतिथींच्या नोंदी असणारा आहे. यादवकालीन संतांनी ज्ञानेश्वरांची भक्ती केली, महिमा गायिला पण ज्ञानेश्वर आदींच्या चरित्रांतील मौलिक ठरणाऱ्या जन्मतिथींची नोंद करावी असे मात्र त्यांना वाटले नाही. अशी एकमेव ठरणारी नोंद फक्त जनाबाईंना करावीशी वाटली. ह्यातच जनाबाईंचे मोठेपण आणि त्यांच्या अभंगाची मौलिकता प्रत्ययास येते. तो सुप्रसिद्ध अभंग असा-

''शालिवाहन शके अक्राशें नव्वद ।<br>
निवृत्ति आनंद प्रगटले ॥१॥<br>
त्र्याण्णवाच्या सालीं ज्ञानेश्वर प्रगटले ।<br>
सोपान देखिले शाण्णवांत ॥२॥<br>
नव्याण्णवाच्या सालीं मुक्ताई देखिली ।<br>
जनी म्हणे केली मात त्यांनीं ॥३॥'' (अ. क्र. ४१३)

जनाबाईंनी प्रस्तुत अभंगात ज्ञानेश्वरादी भावंडाच्या जन्मतिथीसंबंधी जशी महत्त्वाची नोंद केली आहे, त्याप्रमाणेच विविध संतांच्या अभंगाचे लेखन कुणी केले यासंबंधीही महत्त्वाच्या नोंदी करून ठेवल्या आहेत. त्यासंबंधीचा अभंग असा-

''ज्ञानेश्वर अभंग बोलिले ज्या शब्दां ।
चिदानंदबाबा लिही त्यांस ॥१॥
निवृत्तीचे बोल लिहिले सोपानें ।
मुक्ताईची वचनें ज्ञानदेवें ॥२॥
चांगयाचा लिहिणार शामा तो कांसार ।
परमानंद खेचर लिहित होता ॥३॥
सांगे पूर्णानंद लिही परमानंद ।
भगवंत भेटी आनंद रामानंद ॥४॥
सावत्या माळ्याचा काशिबा गुरव ।
कूर्म्याचा वसुदेव काईत होता ॥५॥
चोखामेळ्याचा अनंतभट्ट अभ्यंग ।
म्हणोनी नामयाचे जनीचा पांडुरंग ॥६॥'' (अ. क्र. ४०८)

## क) अन्य समकालीन संत

जनाबाईंनी सेना न्हावी, चोखामेळा आणि गोरा कुंभार आदी समकालीन अन्य संतांचीही चरित्रे अत्यंत स्फुट स्वरुपात लिहिली आहेत. जनाबाईंना त्यांची अभंगांतून नोंद करावीशी वाटते, ही बाबच विशेष महत्त्वाची होय.

### सेना न्हावी

ह्यांपैकी सेना न्हाव्याचे चरित्र त्यांनी तेरा चरणांच्या प्रदीर्घ अभंगात निवेदिले आहे. अर्थात सेनाच्या चरित्राची उभारणी जनाबाईंनी सुप्रसिद्ध दंतकथेच्या आधारेच केली आहे. 'सेना न्हावी भक्त भला । तेणें देव भुलविला ।'' अशा शब्दांत ह्या चरित्राला प्रारंभ होतो. आणि राजाने सेनाच्या केलेल्या गौरवात चरित्राची समाप्ती होते.

### चोखामेळा

जनाबाईंना संत चोखामेळ्याच्या भक्तीविषयी विशेष आदरभाव वाटतो. नामदेववादी संतांप्रमाणेच संत चोखामेळाही स्वत:च्या काळात एक दंतकथा झाला होता. आपल्या दोन अभंगांत जनाबाई चोखामेळ्याचा गौरव करताना दिसतात-

''यातिहीन चोखामेळा । त्यासी भक्तांचा कळवळा ॥१॥
त्याचा जाला म्हणीयारा । राहे धरी धरी थारा ॥२॥
देव बाटविला त्याणें । हांसे जनी गाय गाणें ॥३॥'' (२३५)

''चोखामेळा संत भला । तेणें देव भुलवीला ॥१॥
भक्ति आहे त्याची मोठी । त्याला पावतो संकटीं ॥२॥
चोखामेळ्याची करणी । तेणें देव केला ऋणी ॥३॥
लागा विठ्ठलचरणी । म्हणे नामयाची जनी ॥४॥'' (अ.क्र.२३६)

चोखामेळा यातिहीन संत असल्यामुळे उपेक्षित जीवन जगणाऱ्या जनाबाईंना त्याच्याविषयी जिव्हाळा वाटतो. जनाबाईंप्रमाणे चोखामेळ्यानेही आपल्या अनन्य विठ्ठलभक्तीनें त्यास जिंकले आहे. विठ्ठल आता चोखामेळ्याचा म्हणीयारा (दास) झाला आहे. सवर्ण मात्र चोख्याने देव बाटविला असे म्हणतात. तेव्हा जनाबाईंना हसू येते. अशा वेळी त्या गाणे म्हणून आपला मनोभाव व्यक्त करतात.

## गोरा कुंभार

जनाबाईंनी गोरोबांवरही एक अभंग (२५०) रचला असून त्यात त्यांच्या सत्त्वपरीक्षेचा उल्लेख केला आहे.

# जनाबाईंची अन्य स्फुट रचना

## १) पदरचना

जनाबाईंनी अल्प प्रमाणात पदरचना केली असली तरी ती मौलिक ठरते. ''पुण्यवंत तो पाताळ लोकीं नेला । दरिद्री तो भाग्यवंत केला ॥'' या चरणानें प्रारंभित होणारे पद जनाबाईंनी रचले आहे. परमेश्वराची लीला अगाध आहे. त्याच्या भक्तांना देवाच्या ह्या खेळाचे कोडे उलगडत नाही. त्यामुळे ते संभ्रमित होतात. त्याच्या वागण्यातील विसंगतीचा अर्थबोध होत नाही.

''वैरियासि दिधली मोक्षसिद्धि ।
कपटिया दिधली महानिधी ॥
सेवकाच्या दुंगा न मिळे चिंधी ।
चाळकासी त्रैलोक्य भावें वंदी ॥
सत्यवानाचा बहु केला छळ ।
कीर्तिवानाचे मारियेले बाळ ॥
सखा म्हणविसी त्याचें नासी बळ ।
जनी म्हणे मी जाणें तुझे खेळ ॥'' (४७४)

जगात देवभक्तांना दारिद्र्य लाभते तर देवाच्या वैऱ्यांना वैभव! असे असले तरी जनीला देवाचा हा खेळ पुरता उमजला आहे.

जनाबाईंचे दुसरे पद विशेष प्रसिद्ध आहे. पुढे पंधराव्या शतकातील एकनाथांच्या पदरचनांत ज्याचे प्रतिध्वनी ऐकू येतात ते जनाबाईंचे सुप्रसिद्ध पद असे-

''माझें अचडे बचडे । छकुडे गे राधे रुपडे ॥
पांघरू घालीती कुंचडे ॥धृ॥
हरि माझा गे सांवळा । पायीं पैंजण वाजे खुळखुळा ॥
याने भुलविल्या गोपिबाळा ॥
हरि माझा गे नेणता । करी त्रिभुवनाचा धांगता ॥
जो का नांदे त्रिभुवनी ॥''

प्रस्तुत पदातील नादाकृती आणि शब्दाकृती यांतील सुसंवादामुळे संपूर्ण अभंग नादलयीने गेय झाला आहे. प्रसाद, माधुर्य आणि नादलय ही ह्या पदाची वैशिष्ट्ये ठळकपणे नजरेत भरतात. यमक, अनुप्रास, नादाक्षरांची पुनरावृत्ती ह्यामुळे अभंग भावगीतरुप धारण करतो. शिवाय त्यांतील भावनाट्यही वेधक आहे.

''विठोबा मला मूळ धाडा । धावत येईन दुडदुडा ॥'' हे जनाबाईंचे असेच रसिकमान्य गीत होय. जनाबाईंच्या ह्या पदातही अंतर्बाह्य गोडवा भरून राहिलेला जाणवतो. त्यातील विठ्ठलमूर्तीचे वर्णन रेखीव व चित्रमय स्वरुपाचे आहे. 'नामदेवाचें कौतुक मला सांपडले माणिक' असा कृतज्ञतापूर्ण उल्लेख येथेही दिसतो.

## २) भारुडांची आठवण करून देणारी रुपकरचना

संत ज्ञानेश्वर, चांगदेव व मुक्ताबाई यांनी रचलेल्या रुपकपर अभंगरचना आणि कूटरचना यांच्या जनाबाईंच्या प्रतिभेवर झालेल्या संस्कारांची फलश्रुती म्हणजे जनाबाईंची रुपकरचना होय. असे असले तरी जनाबाईंची ही कविता उत्तरकालीन भारुडांशी जवळकीचे नाते सांगते. उदा-

''नवल वर्तलें नवल वर्तलें नवलें गुरुचे पायी ॥  
कापूर जळूनि गेला तेथें काजळी उरली नाही ॥१॥  
साखर पेरूनी ऊस काढीला कान जाला डोळा ।  
निबर बायको भ्रतार तान्हा सासरा तो भोळा ॥२॥  
नवल वर्तले नवल वर्तले अनाम चक्रपाणि ।  
गोकुळ चोरून नेलें तेथें कैची दासी जनी ॥'' (४७७)

दोन पदांत विरोधलय साधून रचलेले हे रुपक गुरु-शिष्य वा ईश्वर-भक्त ह्यांतील अद्वैत सूचित करते. गुरुप्रसादाने वा ईश्वरकृपेने असाध्य ते साध्य होते. साधनेचा प्रवास परतीच्या दिशेने प्रारंभित होतो. भक्ताचे अस्तित्वच पुसून टाकणारी गुरुकृपा नवल कसे घडविते याचा प्रत्यय येथे येतो.

दुसरी रुपकरचना तर एकनाथांच्या गाथ्यात भारुडरुपाने झकळताना दिसते.

''खंडेराया तुज करिते नवसू । मरूं दे रे सासू खंडेराया ॥  
सासू मेल्यावरी तुटेल आसरा । मरुं दे सासरा खंडेराया ॥  
सासरा मेलिया होईल आनंद । मरूं दे नणंद खंडेराया ॥  
नणंद मरता होईन मोकळी । गळां घालीन झोळी भंडाराची ॥  
जनी म्हणे खंडे अवघे मरूं दे । एकटी राहू दे पायापाशी ॥'' (४७८)

उपदेशाचा चढा स्वर न लावणारे आणि तात्त्विकतेचा ध्यास न घेणारे हे यादवकालीन मराठीतील एक विशुद्ध भारूड होय. त्याचा एकनाथांनी विशेष विस्तार केला. तरी एकनाथांची भारुडरचना चमत्कृती आणि तात्त्विकता यांचा भार झाल्याने आपले स्वाभाविक सौंदर्य हरवून बसलेली दिसते.

### ३) कूट

जनाबाईंनी एक कूट रचनाही केली असून तीत बुद्धिबळाच्या खेळाचे रुपक योजले आहे.

''मांडियला खेळ । रंग बुद्धिबळ ॥१॥
कैंचा शह आला । प्याद्याखालीं फर्जी मेला ॥२॥
शहबाजू जाली । जनी म्हणे मात केली ॥३॥'' (४८२)

### ४) पाळणा

''जो जो जो जो के गोरक्षा । जगदोद्धारा जगदिशा ॥१॥
शब्दसुमनांची सेज । भक्तिभावें आंत नीज ॥२॥
माता उन्मनी केवळ । निजीं निजले गोपाळ ॥३॥
मागे घालुनि आनंदा । सुखें निजे बा गोविंदा ॥४॥
अद्वय नाम गीती गाता । दासी जनीं कैंची आता ॥५॥'' (अ.क्र. ४७३)

जनाबाईंच्या समकालीन ज्ञानेश्वरभगिनी संत मुक्ताबाई ह्या ज्ञानपरिपूर्ण आणि सिद्धयोगिनी होत्या. चौदा वर्षांच्या मुक्ताबाईंचे शिष्यत्व चौदाशे वर्षांचा चांगदेव स्वीकारतो. याचे कारण मुक्ताबाईंचा ज्ञानवती आणि योगिनी म्हणून असलेला अलौकिक अधिकार होय. अशा वयोवृद्ध शिष्यास उद्देशून मुक्ताबाईंनी गुरुमाऊलीच्या भूमिकेतून पाळणे वा अंगाईगीते रचली. समकालीन, समवयस्क आणि अध्यात्ममार्गावर सहप्रवासी असणाऱ्या मुक्ताबाईंच्या ह्या अंगाईगीतांनी जनाबाईंचे लक्ष वेधून त्यांना 'पाळणा' रचण्याची प्रेरणा दिली असणे शक्य आहे.

असे असले तरी जनाबाईंचा 'पाळणा' म्हणजे मुक्ताबाईंच्या 'पाळणा'रचनेचे अनुकरण नव्हे. प्रकृतीदृष्ट्या ह्या दोघींच्या पाळण्यांत साधर्म्यापेक्षा वैधर्म्येच अधिक जाणवतात.

मुक्ताबाईंनी आपल्या 'चांगदेव' ह्या शिष्यास उद्देशून गुरुमाऊलीच्या भूमिकेतून 'पाळणे' वा अंगाई गीते रचली. जनाबाई आपल्या 'नामयाची दासी' ह्या भूमिकेतच आयुष्यभर वावरल्या. हे 'दासीपण' त्यांनी एखाद्या लेण्यासारखेच

मिरवले. कारण त्यामुळेच त्यांचे जीवन कृतार्थ झाले. नामामृतानं भरून राहिले. जनाबाईच्या लौकिक उपेक्षित जीवनातूनच त्यांना संतत्व लाभले. आपल्या दैनंदिन श्रमजीवनाचे अद्भुत अशा साक्षात्कारी आध्यात्मिक पातळीवर उन्नयन करण्याची किमया जनाबाईंनी करून दाखविली. सारांश 'गुरू' पदाचा ध्यास त्यांनी कधी धरला नाही. त्या दासी जनीच अखेरपर्यंत राहिल्या. त्यामुळे त्यांनी रचलेला पाळणा केवळ एका स्त्रीमनाच्या मातृभावाचा स्वाभाविक सुंदर असा आविष्कार आहे. जनाबाई गुरुमाऊलीच्या नव्हे तर निखळ माऊलीच्या भूमिकेतूनच पाळणा गात आहेत असे दिसते.

दुसरे असे की मुक्ताबाई आपल्या शिष्यास उद्देशून अपत्यभावाने पाळणा गातात. जनाबाई गुरुमाऊली जशा नाहीत, तसाच ज्यास उद्देशून त्या पाळणा गातात तो जनाबाईंचा शिष्यही नव्हे.

जनाबाई नाथसंप्रदायाचे प्रमुख प्रवर्तक असणाऱ्या 'योगमार्तंड गोरक्षनाथासच उद्देशून पाळणा गात आहेत. ही बाब विस्मयकारक वाटली तरी अर्थपूर्ण आहे. वारकरी संप्रदायाचे प्रवर्तनच नाथसंप्रदायाने केले आहे, ही वस्तुस्थिती आहे. ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाच्या प्रवर्तनकालीच शैवाधिष्ठित नाथसंप्रदाय आणि वैष्णवसंप्रदाय यांचे ऐक्य दर्शविणारी विचारधारा ज्ञानेश्वरीतून आणि अभंगरचनांतून जोपासली होती. त्यामुळेच नामदेवांची शूद्र दासी जनाबाईही ह्या प्रवर्तनप्रक्रियेतील नाथसंप्रदायाचे महत्त्व उमजून होती. ज्ञानेश्वरादी भावंडांनी स्वीकारलेला नाथसंप्रदाय, योगसाधना, शिव-शक्तिसामरस्य संकल्पना, शैववैष्णवांच्या ऐक्याचा ध्यास, भक्तिसाधनेसंबंधी उत्कट ओढ आणि योगविषयक अतीव निष्ठा इत्यादी संबंधानेही जनाबाई सजग आहेत. त्या सकारात्मक भूमिकेतून ह्या परिवर्तनाचे स्वागत करतात. त्यात सहभागी होऊन आपले स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण योगदानही करतात. प्रस्तुत 'पाळणा' त्याचेच प्रतीक आहे.

आदिनाथाच्या बोधरहस्याचा मृत्यूलोकातील अज्ञानी जिवांना लाभ व्हावा यासाठी प्रयत्नशील असलेला पहिला महापुरुष श्रीगोरक्षनाथच होय. जनाबाईंना गोरक्षनाथांचे सांप्रदायिक कर्तृत्व ज्ञात आहे. आदिनाथांनी पार्वतीस निविदेलेले बोधरहस्य श्रीविष्णूनी मत्स्येंद्ररुपाने ऐकले. त्यांच्याकडून ते गोरक्षनाथांना प्राप्त झाले. गोरक्षनाथांकडून ते गहिनीनाथांना प्राप्त होताच जगदोद्धारार्थ गहिनीनाथांनी ते निवृत्तिनाथांकडे सुपूर्त केले. निवृत्तिनाथांनी आपल्या भावंडांना ते देऊन सर्वत्र प्रसारित करण्याची आज्ञा केली. ह्या परंपरेत नामदेवही सहभागी झाल्याने ते जनाबाईपर्यंत पोहोचले. ह्या दृष्टीने जनाबाईही नाथसंप्रदायाच्या पाईक ठरतात. त्यामुळे संप्रदायाच्या आदि पुरुषास उद्देशून त्यांना पाळणा गावासा वाटतो.

ह्या पार्श्वभूमीवर जनाबाईकृत पाळण्याचे अर्थसंदर्भ समृद्ध वाटू लागतात, श्रीगोरक्षनाथ समाधिस्थ आहेत. हा जगदोद्धारक समाधिसुखाचा अनुभव घेत योगनिद्रेत स्थिरावला आहे. जनाबाईंना त्याचे मातृत्व स्वीकारावेसे वाटते. गोरक्षांसाठी जनाबाईंनी पाळण्यात शब्दसुमनांची शेज सिद्ध केली असून भक्तिभावाने गोरक्षांनी त्यावर निद्रा करावी असे त्या सुचवितात.

उन्मनी अवस्था म्हणजे योग्याची माऊलीच होय. योगी समाधिस्थ असतो म्हणजे उन्मनी अवस्थेत विश्रांत पावलेला असतो. आता तर गोरक्षस्थानी जनाबाईंना निजी निजलेले भगवान श्रीगोपाळकृष्णच दिसू लागतात. ही गोष्टही अर्थपूर्णच ठरते. गोरक्षनाथांना जोजावणारे जनाबाईंचे हे अंगाईगीत अनपेक्षितपणे 'मागें घालुनी आनंदा, सुखे निजे बा गोविंदा' अशा शब्दांत एक नवे वळण घेते. नाथ-संप्रदायाचा मूलस्रोत असणारे आदिनाथ आणि भागवत संप्रदायाचा मूलस्रोत असणारे श्रीविष्णू यांच्यांतील अतूट नात्यावरही हे अंगाईगीत प्रकाश टाकू लागते. आदिनाथांनी पार्वतीस दिलेले बोधामृत मत्स्यरुप श्रीविष्णूनाच प्रथम लाभले. आणि त्यांनीच ते पुढे गोरक्षनाथांस दिले असल्याची नाथसंप्रदायाची धारणा आहे. त्यामुळे नाथसंप्रदाय आणि वैष्णवसंप्रदाय हे परस्पर विरोधी नसून त्यांत परमार्थानें संवाद असल्याची श्रद्धा निवृत्तिनाथांनी प्रस्थापित केली आणि ज्ञानेश्वरादी संतांनी ती जनमानसात रुजविली. तीच श्रद्धा संत जनाबाईंच्याही मनात रुजली असल्याने गोरक्ष आणि गोविंद ह्यांतील साम्य पाळणा रुपाने त्या सूचित करतात.

अशाप्रकारे जनाबाईंचा हा पाळणा म्हणजे अद्वयगीतच आहे. हे अद्वयगीत गाणाऱ्या जनाबाईंना तरी गोरक्ष - गोविंदाहून वेगळे अस्तित्व कुठे उरले आहे? 'अद्वय नाम गीती गातां। दासी जनी कैंची आतां?' असा जनाबाईंचा प्रश्नही अर्थपूर्ण ठरतो. एका गूढ, अर्थसंपृक्त आणि व्यामिश्र अशा अद्वैतानुभवाची अभिव्यक्ती करणारा जनाबाईंचा हा पाळणा संतसाहित्यात संस्मरणीय झाला आहे.

## ५) भूपाळी

'काकड आरती' या नावाने रुढ असलेला पण प्रकृतीने 'भूपाळी' असणारा जनाबाईंचा हा अभंगही विशेष लोकप्रिय आहे. भूपाळीत देवतेला आणि तिच्या भक्तगणांना विशेष महत्त्व असते. येथे पांडुरंगाला उठविण्यासाठी विष्णूचा अवघा भक्तगण उपस्थित असल्याचे जनाबाई सांगतात. वैष्णवांचा मेळा गरुडपारी दाटला आहे. वाळवंटापासून महाद्वारापर्यंत दुतर्फा शुकसनकादी ऋषिमुनी आणि नारद तुंबरादी मुनीजन हात जोडून उभे आहेत. मंदिरात सुरवरांची दाटी होते. रंभादी अप्सरा नृत्य करुन हात जोडून थांबल्या आहेत. साक्षात गिरिजापती त्रिशूळ

नाचवीत व डमरू वाजवीत आला आहे. दैवस्त्रिया पंचप्राणांनी पांडुरंगास ओवाळण्यासाठी सिद्ध झाल्या आहेत. त्रिखंडात 'भक्तप्रेमी, कनवाळू' अशा रीतीने ओळखल्या जाणाऱ्या देवापुढे चौयुगाचे प्रसिद्ध भक्तशिरोमणी नामदेव उभे आहेत. आणि त्यांच्यामागे त्यांची दासी जनी डोळे मिटून पांडुरंगाचे ध्यान करीत तल्लीन अवस्थेत उभी आहे.

भूपाळी येथे अभंगरचना आणि ओवी यांचे संमिश्र रुप धारण करून प्रकटते. मराठीत भूपाळीला तिचे स्वत:चे वैशिष्ट्यपूर्ण रुप असते. श्रीकृष्णजीवनातील एक भावबंध येथे उलगडला जातो. श्रीकृष्ण हा केवळ गोपगोपिकानायकच नव्हे तर चराचराचा ही नायक आहे. श्रीविठ्ठल हा भूलोकीचा विश्वनायक आहे. त्यामुळे श्रीकृष्णासंबंधीचे भाव विठ्ठलासंबंधीचेही होतात. विष्णुलोक आणि भूलोक यांची सरमिसळ होते. भूलोकीच्या विठ्ठलाला जागवण्यासाठी भक्तजनांनी गायिलेल्या भूपाळीत विष्णू आणि श्रीकृष्ण यांचे भक्तगण मिसळून जातात. त्यामुळे हा भूलोक आहे की विष्णुलोक असा संभ्रम निर्माण करणारे, भक्तिभावनेने प्रेमार्त झालेले आणि संगीत, नृत्यादी कलाविष्कारांनी सौंदर्य आणि चैतन्य ह्यांनी निथळणारे एक अद्भुत वास्तवशिल्प साकारत जाते. डोळ्यांत प्राण आणून भक्तगण बंद दारापुढे तिष्ठत आहेत. कुणी दार किलकिले करून डोकावत आहेत. घननीळ पांडुरंगास उठविण्याबद्दल रुक्मिणीला याचना केली जात आहे. जनाबाईच्या साक्षात्कारी प्रतिभेचा हा एक मोहक आविष्कार आहे.

### ६) झोपाळ्यावरील ओव्या

संत साहित्याचे एक ज्येष्ठ अभ्यासक आणि इतिहासकार कै. ल. रा. पांगारकर यांनी आपल्या 'मराठी वाङ्मयाचा इतिहास- खंड पहिला' ह्या ग्रंथात संत जनाबाईनी प्रसंगी पांडुरंगास गायिलेल्या भावोत्कट ओव्यांचा उल्लेख केला आहे. त्या अशा-

''पहिली माझी ओवी । ओवीन जगत्र ।
गाईन पवित्र । पांडुरंग ॥ सांवळा पांडुरंग ॥१॥
दुसरी माझी ओवी । दूजा नाहीं कोठें ।
जनीं वनीं भेटे । पांडुरंग ॥२॥
तिसरी माझी ओवी । तीजा नाहीं ठाव ।
अवघाची देव । पांडुरंग ॥३॥
चवथी माझी ओवी । वैरीलें दळण ।
गाईन निधान । पांडुरंग ॥४॥

पाचवी माझी ओवी । माझिया माहेरा ।
राहे निरंतरा । पांडुरंगा ॥५॥
सहावी माझी ओवी । सहाही शिणले ।
गुरुमूर्ती भेटले । पांडुरंग ॥६॥
सातवी माझी ओवी । आठवे वेळोवेळां ।
देखिले म्या डोळा । पांडुरंग ॥७॥
आठवी माझी ओवी । अठ्ठावीस युगें ।
उभा चंद्रभागे । पांडुरंग ॥८॥
नववी माझी ओवी । संपलें दळण ।
चुकवी मरण । पांडुरंग ॥९॥
दहावी माझी ओवी । दहा अवतारी ।
यावे संवसारीं । पांडुरंग ॥१०॥

# जनाबाईंची आख्यानक कविता

संत नामदेवांना सर्वार्थांनी अनुसरले ते फक्त जनाबाईंनी. भावकविता, चरित्रकाव्य, आत्मचरित्रपर रचना, आत्मनिवेदनपर अभंग, उपदेशपर अभंग, आणि कथाकथनपर अभंग असे सर्व काव्यप्रकार हाताळून संत जनाबाईंनी आपले नामदेवांना अनुसरण्याचे दासीव्रत पूर्ण केले. जनाबाई नामदेवांच्या लौकिक जीवनातच नव्हे तर भावजीवनात, भक्तिजीवनात आणि कवी म्हणून असणाऱ्या काव्यजीवनातही व्रतस्थपणे त्यांना अनुसरत राहतात. अशा प्रकारचे आध्यात्मिक दासीपण महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्रीचक्रधरस्वामी यांची आद्यशिष्या आद्यकवयित्री महदंबा यांच्याशिवाय दुसऱ्या कुणीही समर्थपणे निभावलेले मध्ययुगीन मराठी साहित्यविश्वात तरी दिसत नाही.

आख्यानक काव्याच्या बाबतीत तर जनाबाई नामदेवांना अनुसरत त्यांच्याही कितीतरी पुढे निघून जातात ही बाब स्तिमित करणारी आहे. जनाबाईंच्या प्रतिभेचा हा पैलूही आपले ऐश्वर्य प्रकट करतो. संत नामदेवांनी २६४ चौकांच्या एका अभंगात हरिश्चंद्रराजाच्या सत्त्वपरीक्षेची कथा निवेदन केली आहे. (श्रीसंत नामदेव महाराज यांची अभंगांची गाथा-संपा. वि. स. जोग १९५७; अभंग क्र. २२५३) मराठी वाङ्मयविश्वात 'हरिश्चंद्राख्यान' प्रथम आणण्याचे श्रेय संत नामदेवांच्या अभिजात प्रतिभेकडे जाते. नामदेवांनी ते अंत:प्रेरणेने सलग अशा ओघवती भाषेत निवेदन केले. संपूर्ण कथा एकाच अभंगात निवेदन करून नामदेवांनी मध्ययुगीन मराठी साहित्यात 'हरिश्चंद्राख्यान' काव्याची परंपरा प्रारंभित केली.

तर 'जामयाची दासी' जनी आपल्या स्वामीच्या ह्या आख्यानकाव्यास वारकरी परंपरेत प्रवाहीत करण्याचे महत्त्वाचे कार्य पार पाडते. हरिश्चंद्राच्या सत्त्वपरिक्षेची कथा जनाबाईंनी २३ अभंगांतील ३३९ चौकांत निविदेन केली आहे. नामदेवांच्या एकाच अभंगातील ह्या कथाभागाची जनाबाईंनी २३ अभंगांत विभागणी केली आहे. अर्थातच विविध प्रसंगांसाठी स्वतंत्र अभंगांची जनाबाईंनी योजना केली आहे. ह्यात जनाबाईंची केवळ कथाविस्तार करण्याची भूमिका नसून कथेची आशयलक्ष्यी विभागानुसारी मांडणी करण्याची प्रेरणा आहे.

## जनाबाईंच्या हरिश्चंद्राख्यानाचा मूलस्त्रोत

हरिश्चंद्राख्यानाची कथा ऐतरेय ब्राह्मणाच्या सातव्या पंचाषिकेच्या १३ ते १६ अशा चार अध्यायांत आढळते. त्याचप्रमाणे शांखायन श्रौतसूत्र (१५/१७-२५) ब्रह्मपुराण (अ.१४) यांतून दिसते. त्यांत निपुत्रिक हरिश्चंद्राला वरुणकृपेने पुत्रप्राप्ती होते, अशी कथा शुनःशेपाच्या उपकथेसह आली आहे. 'देवीभागवतात' ह्या कथेचे उपरोक्त रुप पूर्वार्ध म्हणून येते. पद्मपुराणाच्या ३१व्या अध्यायात विष्णुपूजेच्या पुण्याईने, तर ५६व्या अध्यायात अजा एकादशीच्या पुण्यप्राप्तीने हरिश्चंद्रास राज्यप्राप्ती झाल्याचे दर्शविले आहे. मध्ययुगात नामदेव-जनाबाई यांच्या प्रतिभेने निर्मिलेल्या आणि उत्तरकालात स्थिरावलेल्या हरिश्चंद्राख्यानाची मूळ रुपसिद्धी मार्कण्डेय पुराण (अ. ७ व ८, श्लोक ३५८) आणि देवी भागवत स्कंध- ७; अ. १७ ते २७, श्लोक ५३८) अशा दोन पुराणांत झाली. दोन्हीकडील कथांत थोडाफार फरक आढळला तरी कथेचा गाभा समान आहे. हरिश्चंद्र-विश्वमित्र यांची भेट होऊन विश्वामित्रास हरिश्चंद्राने राज्यदान करणे, हरिश्चंद्र राजा, तारामती राणी आणि रोहिदासपुत्र यांची काशीत विक्री होणे, हरिश्चंद्राने स्मशानरक्षक म्हणून सेवा स्वीकारणे, सर्पदंशामुळे रोहिदासांचा मृत्यू होणे, राजा-राणीने आत्मत्यागाचा निर्णय घेणे आणि अखेर विश्वामित्र आणि देव यांच्या कृपेने कथेचा शेवट गोड होणे हे कथासूत्र स्थूल मानाने आधीच निश्चित झालेले दिसते. ही झाली संस्कृतातील हरिश्चंद्रख्यानाची पूर्वसिद्ध परंपरा.

संत नामदेवांनी ही कथा मराठीत अभंग माध्यमातून सांगताना काही कळतनकळत बदल केले. हरिश्चंद्रकथेत प्रारंभीच येणारा वरुणकृपेचा प्रसंग गाळला. राज्यदान स्वप्नात झाल्याचे दर्शविण्यात आल्याने हरिश्चंद्राच्या सत्यनिष्ठेला तीव्रता व उदात्तता प्राप्त झाली. राजाच्या काशीयात्रेला सत्त्वहरण प्रसंगमालिकेचे रूप देता आले. पत्नी तारामतीच्या वधाचे कर्तव्यभावनेने आज्ञापालन करण्यास राजा सिद्ध झाल्याचे दर्शविल्याने त्याची कठोर परीक्षेतील निश्चलता लक्षवेधक ठरली. नामदेवांनी हरिश्चंद्राच्या संस्कृत कथा परंपरेत आपल्या अभिजात प्रतिभाबलाने बदल करून तिचे पारंपारिक स्वरुप पुसून टाकले. त्यामुळे मराठीत एक अभिजात, परिपूर्ण आणि उच्च नैतिक मूल्यांचा आदर्श दर्शविणारी शोकात्म भावकथा म्हणून हरिश्चंद्र राजाची कथा स्थिरावली ती कायमच.

नामदेवांच्या हरिश्चंद्राख्यानातील रिकाम्या जागा हेरून त्यांची शिष्या जनाबाई यांनीही अधिक परिपूर्णता, औचित्यपूर्णता, प्रत्ययकारिता आणि भावपूर्णता आदी श्रेष्ठ काव्यमूल्यांच्या दिशेने ही कथा विकसित करून मराठी आख्यानकाव्यांत ती चिरंजीवी केली. मध्ययुगीन मराठी काव्यातील एक अत्युत्कट शोकात्म व उदात्त

भावकथा म्हणून ती सिद्ध होताच उत्तरकालीन श्रेष्ठ पंडित कवी मुक्तेस्वरांचेही तिच्याकडे लक्ष वेधले. आपली प्रज्ञा, प्रतिभा आणि पांडित्य यांचे सर्वांगीण संस्कार करून मुक्तेश्वरांनी ह्या मराठी भावकथेला मोठ्या थाटामाटात संस्कृत खंडकाव्याच्या सिंहासनावर आणून बसविले. अशाप्रकारे ऐतरेय ब्राह्मणातील हरिश्चंद्राच्या कथेचे मूलबीज ब्राह्मण पुराणांतून विकसित होत मराठी भाषाप्रदेशात यादवकालात प्रवेश करते झाले आणि आद्य अभंगकार व कीर्तनकार असलेल्या संत नामदेवांच्या साक्षात्कारी वाणीच्या स्पर्शाने ते एका समर्थ शोकात्म भावोदात्त कथेत परिवर्तित होऊन मराठीत स्थिरावले. जनाबाईंनी ह्या कथेचे रोपटे आपल्या भावोत्कट मनःप्रांगणात रोवून भावसिंचनाने त्याचे एका संपूर्ण कथाकल्पतरुत रुपान्तर साधले. जनाबाईंचे हे हरिश्चंद्राख्यान एवढे वेधक, प्रत्ययकारी, परिपूर्ण आणि सर्वांगसुंदर होते की मुक्तेश्वरासारख्या प्रकांड प्रतिभावंत पंडित कवीलाही त्याचे अनुकरण करण्याचा अनिवार्य मोह झाला.

कै. डॉ. ना. गो. नांदापूरकर यांनी 'मुक्त-मयूरांची भारतें' ह्या आपल्या प्रबंधग्रंथातील अखेरच्या बाराव्या उन्मेषात जनाबाई आणि पंडित कवी मुक्तेश्वर यांच्या हरिश्चंद्राख्यानांचा तौलनिक विचार केला आहे. ह्याविषयीच्या विवेचनात डॉ. नांदापूरकरांनी बाह्यांग आणि अंतरंग परीक्षण करून सूक्ष्म दृष्टीने तसेच साक्षेपी वृत्तीने शंभराहून अधिक समान स्थळे असल्याचे दर्शविले आहे.

आपल्या तौलनिक अभ्यासाच्या निष्कर्षात डॉ. ना. गो. नांदापूरकर लिहितात- ''वर दर्शविल्याप्रमाणे दोघांच्याहि रचनेंत शंभरपेक्षां अधिक समान स्थळें आहेत. त्यांत प्रसंग, कल्पना, शब्दांचा विशिष्ट उपयोग, अलंकार, म्हणी इत्यादि दोघांतहि समसमान आहेत. कुठें तर शब्दरचनाहि एकच आहे. कुठें जनाबाईंच्या शब्दांचे संस्कृतीकरण झालें आहे. तिच्या अर्धवट राहिलेल्या अथवा थोडक्यांत असलेल्या कल्पना मुक्तेश्वरी रचनेत पूर्ण आणि विस्तृत झाल्या आहेत. प्रौढोक्ति आणि उपहासाचा उपयोग दोघांतहि एकाच स्थळी आणि त्याच शब्दांनी आहे. एखादी कल्पना पुनरुक्त झाली असेल तर दोघांनीहि एकाच स्थळी आणि त्याच शब्दांनी केली आहे. इतकेंच नव्हे मुक्तेश्वरांच्या नेमक्या ह्या समान असलेल्या ओंव्यांत अभंगरचनेप्रमाणे अल्पाक्षरत्व, नादमाधुरी आणि गेयता आहे. मुक्तेश्वरी रचनेंतील ह्या विलक्षण साम्य प्रकारांचा विचार केला असतां जनाबाईंच्या परिणामावांचून ह्याचे काही कारण दिसत नाही. किंबहुना मुक्तेश्वरांचे हरिश्चंद्राख्यान म्हणजे जनाबाईंच्या आख्यानाची सुधारून वाढविलेली आवृत्ति वाटते. जनाबाईंपासून मुक्तेश्वर काही उसनवारी करतील ही कल्पना श्री. आजगांवकरांना मान्य नाहीं. पण वस्तुस्थिति त्यांच्या उलट आहे... एवंच वरील सर्व गोष्टींवरून बाह्यांग आणि अंतरंग

निरीक्षणावरून आणि संस्कृत मराठी इत्यादि प्रमाणांवरून हें फलित होतें की मुक्तेश्वरांनी आपलें हरिश्चंद्राख्यान जनाबाईच्या हरिश्चंद्राख्यानावरून घेतले आणि आपल्या प्रतिभाविलासाने पल्लवित केलें. जनाबाईचा त्यांच्यावर एवढा परिणाम झाला होता कीं त्यांनी तिची इतरहि रचना स्वीकारली असून तिच्या ऋणाचा उल्लेखहि केला आहे. (मुक्त-मयूरांची भारते, पृष्ठ क्र. ७३० - ७३१).

जनाबाईंनी नामदेवांना अनुसरून अभंग-माध्यमाची हरिश्चंद्राख्यानासाठी योजना केली असल्याने ही कथा विविध प्रसंगांत विभागली जाते. प्रत्येक अभंगात एक प्रसंग चित्रित केला जातो. अभंगाच्या अखेरीस येणाऱ्या नाममुद्रेची जनाबाई पुढील प्रसंगाचे सूचन करण्यासाठी योजना करीत असल्याने अभंग स्फुट असले तरी आंतरिक कथाधाग्याने बांधले जातात.

## जनाबाईंच्या हरिश्चंद्राख्यानाची वैशिष्ट्ये

विश्वामित्राने अत्यंत कठोरपणे हरिश्चंद्राची सत्त्वपरीक्षा घेण्याचे ठरविल्याने ह्या आख्यानास संकट मालिकेचे रूप प्राप्त होते. हरिश्चंद्र तत्कालीन समाजाच्या जीवनादर्शाचे प्रतीक ठरतो. तशीच तारामती स्त्रीधर्माचे व पुत्र रोहिदास पुत्रधर्माचे प्रतीक ठरतात. त्यामुळे ही व्यक्तिचित्रे परस्परांस पूरक ठरतात. त्यामुळे हरिश्चंद्र राजाची सत्त्वपरीक्षा ही तारामती, रोहिदास यांचीही सत्त्वपरीक्षा होते. विश्वामित्र अनेक कारस्थाने योजून ह्या कुटुंबाचे सत्त्वहरण करू पाहतो. पण अखेर त्याचाच पराभव होऊन तो फजित होतो. सत्त्वपरीक्षकाचेच अखेर सत्त्वहरण होते.

### व्यक्तिचित्रे -

जनाबाईंच्या आख्यानकाव्यातील व्यक्तिचित्रे वैशिष्ट्यपूर्ण व वेधक आहेत. ती वर्णनांचा आश्रय न करता दर्शनाच्या पातळीवर प्रकटतात. व्यक्तिचित्रांच्या बहिरंगापेक्षा त्यांच्या अंतरंगाचे सत्त्व प्रकट करण्यावर तिचा भर आहे. त्यामुळे आटोपशीर असूनही ही व्यक्तिचित्रे परिपूर्ण वाटतात.

जनाबाई व्यक्तिचित्रांच्या कृतींतून आणि उक्तींतून त्याचा स्वभाव परिपोष साधतात. व्यक्तिचित्रांसंबंधाने निवेदने करण्यापेक्षा जनाबाई कृतीउक्तींसह ही व्यक्तिचित्रे आपणापुढे सादर करतात. श्रोते व व्यक्तिचित्रे यांच्यांत त्यामुळे एक थेट व साक्षात नाते प्रस्थापित होते. कथानक पुढे सरकत असते. व्यक्तिचित्रे कृती आणि उक्तींच्या गतीने कथा घडवीत राहतात. त्यात निवेदकाचे अस्तित्वही जाणवू नये इतक्या स्वाभाविक गतीने आख्यानक वाटचाल करीत असते.

## प्रसंगवर्णने -

जी विशिष्टता व्यक्तिचित्रांची तीच प्रसंगवर्णनांचीही दिसते. कथेच्या प्रारंभी देवसभा दिसते. नंतर इंद्रसभेत वसिष्ठ-विश्वामित्रांच्या संघर्षाची ठिणगी पडते. तथापि जनाबाई देवसभा वा इंद्रसभा यांच्या ऐश्वर्याचे वर्णन करताना दिसत नाहीत. याचे कारण कथाविस्तार करणे ही जनाबाईंच्या प्रतिभेची प्रकृती नाही. जनाबाईंचे लक्ष कथासूत्रावर केंद्रित होते. त्यामुळे प्रमुख व्यक्तिचित्रांशिवाय अन्य व्यक्तिचित्रे जनाबाईंच्या आख्यानकाव्यात प्रवेश करू शकत नाहीत. त्याप्रमाणे येथे वर्णनासाठी वर्णनेही येत नाहीत. त्यामुळे अपरिहार्य तेवढेच प्रसंग, तशीच औचित्यपूर्ण अशी स्थलकालवर्णने कथेत दिसतात.

कथानकाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असणाऱ्या प्रसंगवर्णनांना जनाबाई योग्य ते स्वरुप व आकार देतात हरिश्चंद्रराजा शिकारीसाठी वनात जातो. तो प्रसंग (४३६) विश्वामित्राने हरिश्चंद्रास राज्याचे दान मागितले तो स्वप्नदृष्टान्त (४३८), हरिश्चंद्र, तारामती रोहिदास यांची काशीयात्रा (४४०, ४४१, ४४२, ४४३, ४४४, ४४५, ४४६, ४४७) अशा काही प्रसंगांची वर्णने भावोत्कट रुप धारण करतात. जनाबाई प्रसंगाकडे केवळ प्रसंग म्हणून न पाहता भावकथेचा, एक घटक या दृष्टीने पाहतात. त्यामुळे ही प्रसंगवर्णने, स्थलवर्णने वा कालवर्णने स्वतंत्रपणे आपले लक्ष वेधून घेत नाहीत हे विशेष. ह्या सर्व कथाघटकांच्या माध्यमातून आणि त्यांच्या संघटनेतून जनाबाई कथेतील भावप्रवाह गतिमान, चैतन्यपूर्ण आणि परिपुष्ट करीत जातात. त्यामुळे कथाप्रवाहावरील त्यांच्या निवेदनाची पकड कुठेही शिथिल होताना दिसत नाही.

## अभंग माध्यमातून कथानिवेदन

'अभंग' हा छंद मूलतःच स्फुट असल्याने त्यात विस्ताराला अवकाश नाही. स्फुटतेबरोबरच भावोत्कटता हा अभंगाचा प्रकृतिधर्म आहे. खरे तर अभंगाची स्फुटता ही ह्या भावोत्कटतेतूनच जन्मास येते. त्यामुळे अभंग भावपरिपूर्ण, भाववाहक आणि भावदर्शक ठरतो. त्यामुळे अभंग विलक्षण गतिमान असतो.

एखादी भावावस्था, भावस्थिती यांच्या अभिव्यक्तीसाठी पूरक असणारा अभंग कथानिविदेनासाठी स्वीकारला जातो तेव्हा साहजिकच स्फुटता, गतिमानता, उत्कटता आदी अभिव्यक्तीविशेषांची मागणी करतो. त्यामुळे अभंग माध्यमातील आख्यान निवेदन वैशिष्ट्यपूर्ण ठरते. जनाबाई आख्यान निवेदनासाठी अभंग माध्यमाची योजना तर करतातच, शिवाय त्याबरोबर येणारी निवेदनाची वैशिष्ट्येही प्रकट करतात. त्यामुळेच जनाबाईंची हरिश्चंद्राख्यातील कथा दर्शनाच्या पातळीवर प्रकटणारी एक समर्थ चित्रकथारूप धारण करते.

## सुखान्त असणारी शोकात्मिका

हरिश्चंद्राची कथा प्रारंभापासूनच शोकात्म बनत जाते. विश्वामित्राच्या क्रोधाचे सावट ह्या कथेवर प्रारंभापासून अखेरपर्यंत रेंगाळत राहते. कथानकाबरोबरच संकटमालिका सुरू होते. ही संकटे हळूहळू गंभीर होत जातात. अखेर त्यांना उग्र, भयावह व जीवघेणे रूप प्राप्त होते. हरिश्चंद्र तारामती व रोहिदास यांची ससेहोलपट शोकात्मिकेत काळोख भरत जाते. रोहिदासाचा सर्पदंशाने मृत्यू होतो. तारामतीवर जणू काळमेघ कोसळतो. 'लासी' म्हणून तिचा वध करण्याचे कर्म हरिश्चंद्रावरच सोपविले जाते. तारामती मृत्यूसाठी तर हरिश्चंद्र वधकर्मासाठी सिद्ध होतो.

अखेर विश्वामित्र अपकीर्तीच्या आशंकेने मनात भयभीत होऊन हरिश्चंद्राच्या सत्त्वधर्माची मुक्त कंठाने स्तुती करतो आणि त्याचे राज्य त्यास परत करतो. त्यामुळे सुखान्त असली तरी ही शोकात्म भावकथाच ठरते.

## जनाबाईंचे थालीपाक-आख्यान

'थालीपाक' हे नामदेवगाथेत जनाबाईंच्या नावावर नोंदविले गेलेले दुसरे आख्यानकाव्य होय. हरिश्चंद्राख्यान ह्या त्यांच्या पहिल्या आख्यानकाव्याहून ते प्रकृतिदृष्ट्या वेगळे आहे. खरे 'थालीपाका'स त्याच्या स्फुटत्वामुळे आख्यान-काव्य असे संबोधण्यापेक्षा 'कथाकाव्य' असे संबोधणे अधिक युक्त ठरेल. त्यात दुर्योधनाच्या चिथावणीमुळे दुर्वासऋषींनीं वनवासी पांडवांकडे मध्यरात्री सशिष्य जाऊन त्यांचे सत्त्वहरण करण्याच्या हेतूने इच्छाभोजनाची मागणी केली, त्या प्रसंगासंबंधीची कथा आली आहे. ही कथा गाथेत अभंग क्रमांक ४५५ ते ४६८ अशा अवघ्या चौदा अभंगांतून कथन केली जाते. हे अभंगही पुन्हा अत्यंत आटोपशीर बांध्याचे आहेत. नामदेवांची तीर्थावळी वा अन्य कथानिवेदनपर अभंगांप्रमाणे ते ऐसपैस चरणबहुसंख्यतेकडे झुकणारे नाहीत. एवढेच नव्हे तर जनाबाईंच्याच हरिश्चंद्राख्यानातील विस्तारशील, समावेशक, संथ लयीच्या आणि वळणावळणांनी कथा उलगडत नेणाऱ्या प्रौढ-भारदस्त प्रकृतीच्या अभंगांपेक्षाही थालीपाकाख्यानातील अभंग. स्फुट, गतिमान आणि लहान चणीचे वाटतात.

असे असले तरी 'थालीपाका'चा हा प्रसंग साक्षात करण्यात कथाकर्ती यत्किंचितही कमी पडलेली नाही हे विशेष. हे का व कसे घडते, ह्या प्रश्नांचा शोध घेण्यातूनच तिची निवेदनवैशिष्ट्ये लक्षात येणे शक्य असते.

प्रथमच लक्षात येणारी एक महत्त्वाची बाब अशी की जनाबाईंनी अभंगबद्ध केलेले हे 'थालीपाक'-आख्यान यादवकालीन मराठीतील एकमेव आख्यानकाव्य

आहे. जनाबाईंच्या 'हरिश्चंद्राख्याना'प्रमाणे त्यांच्या 'थालीपाका'ख्यानामागे नामदेवांची एखादी त्याच कथेवर आधारलेली आख्यानकविता उपलब्ध नाही. जनाबाई-समकालीन वा उत्तरकालीन एखाद्या कवीचेही ह्या विषयावरील एखादे स्वतंत्र आख्यानकाव्य दिसत नाही, मुक्तेश्वरासारख्या मराठीत महाभारतावर विदग्ध काव्यरचना करणाऱ्या पंडित कवींच्या काव्यग्रंथांतूनही हे आख्यान अनुषंगिक स्वरुपात येत राहते.

## पुराणकथांचे देशी भावकथांत रूपान्तर

'रुक्मिणी स्वयंवरा'ची कथा श्रीमद्भागवतातील श्रीकृष्णचरित्रातून फुटून, स्वतंत्रपणे श्रीचक्रधरशिष्या आद्य कवयित्री महदंबा हिच्या 'धवळ्यां'त प्रथमत: स्फुटत्वाने प्रकटली. 'धवळे' हे संस्कृत रुक्मिणीस्वयंवरकथामागचे आद्य विशुद्ध देशी रुप ठरले. तसेच 'हरिश्चंद्राख्यान' व 'थालीपाकाख्यान' ही संत नामदेवशिष्या जनाबाईंची आख्यानकाव्येही संस्कृत कथाभागांची विशुद्ध, स्फुट व आद्य देशीरुपे ठरतात. 'रुक्मिणी स्वयंवर' काव्याचीच पुढे एक समृद्ध आख्यानकाव्य परंपरा स्वतंत्रपणे अस्तित्वात आली. 'थालीपाका'ख्यानाची तशी परंपरा निर्माण होऊ शकली नाही. त्याची अनेक कारणे संभवतात. त्यासंबंधीची चर्चा येथे अप्रस्तुत ठरेल. जी बाब थालीपाकाख्यानाची, तीच काही प्रमाणात हरिश्चंद्राख्यानाचीही आहे. नामदेवांनी 'हरिश्चंद्राख्यान' म्हणून लिहिलेला एक प्रदीर्घ अभंग हाच काय तो जनाबाईंच्या 'हरिश्चंद्राख्यान' काव्याचा एकमेव आधार ठरतो. जनाबाईंच्या 'हरिश्चंद्राख्यान' निर्मितीमागील प्रेरणेचे मूळ त्यात आढळते एवढेच. मात्र ह्या संस्कृतकथाबीजाचा परिपूर्ण, सौंदर्यपूर्ण व रसपूर्ण आविष्कार प्रथम देशी भाषेत स्फुटत्वाने झाला तो जनाबाईंच्याच आख्यानकाव्यातून होय. त्यामुळे 'हरिश्चंद्राख्यान' आणि 'थालीपाकाख्यान' ही कवयित्री जनाबाईंची स्वतंत्र व स्वयंपूर्ण अशी आद्य आख्यानकाव्यनिर्मिती ठरते.

तात्पर्य आद्य कवयित्री महदंबा आणि संत कवयित्री जनाबाई ह्या यादवकालातील समकालीन कवयित्री आपापल्या पंथीय मार्गांनी वाटचाल करीत एकाच विशुध्द वाङ्मयीन प्रेरणेने कथाकाव्यनिर्मिती करून मराठी वाङ्मयाच्या विकासाच्या काही दिशा सूचित करीत राहतात. ही विशुद्ध वाङ्मयीन प्रेरणा म्हणजे शतकानुशतके पुराणकथन व प्रवचनमाध्यमांतून प्रवाहित होणाऱ्या, भव्योदात्त सखोल संस्कारांनी लोकजीविते तसेच लोकमने समृद्ध करीत राहणाऱ्या आणि वैश्विक जीवनादर्शांचे मानदंड उभविणाऱ्या पुराणकथांच्या स्मृतिबंधांना विशुद्ध देशी भावकथांचे रुप देणे ही होय.

## यादवकालीन विदग्ध आख्यानकाव्याहून वेगळेपण

यादवकालीन कवयित्रींच्या ह्या स्फुट भावकथा देशीपणाचे अस्सल लेणे लेवून प्रकटतात हे विशेष. त्या व्युत्पन्नता, पांडित्यप्रदर्शन, सौंदर्यलेण्यांचा सोस, रसनिर्मितीची कृत्रिम व हुकुमी साधने, संस्कृतप्रचुर भाषाशैली इत्यादी ग्रांथिकतेच्या निकषांच्या कृत्रिम बंधनांतून पूर्णत: मुक्त असणाऱ्या अशा कथा आहेत. त्या मौखिक प्रकृतीच्या वाङ्मयीन काव्यकृती आहेत. ह्या पौराणिक कथांची ह्या कवयित्रींच्या भावविश्वात जणू पुनर्रचना होते. जनाबाईंच्या वा महदंबेच्या मनाचे रंग, त्यांच्या अनुभवांचे आकार, त्यांच्या आजुबाजूच्या वास्तवाची रुपे आणि त्यांचीच भाषा स्वीकारून जेव्हा ह्या कथा प्रकटू लागतात, तेव्हा त्यांचा जणू अंतर्बाह्य कायापालट झालेला असतो. त्यामुळे त्यांना नवनिर्मितीची झळाळी व चैतन्य प्राप्त होते. मूळ पौराणिकतेचे संदर्भ वा बंधने नाकारीत ह्या कथा लोकजीवनात जणू स्वत:स समर्पित करतात आणि सामान्य माणसाच्या सुखदु:खांची कहाणी सांगू लागतात.

महदंबेच्या 'धवळ्यांत' वा जनाबाईंच्या 'हरिश्चंद्राख्यान' व 'थालीपाका'ख्यान ह्यासारख्या आख्यानांत याचा प्रत्यय तीव्रतेने येतो. ही आख्यानकाव्ये म्हणजे पौराणिक कथांच्या केवळ देशी प्रतिकृती नाहीत. तर त्या एका दृष्टीने नवनिर्मितीच असतात. नवनिर्मितीच्या प्रक्रियेशी मिळतीजुळती अशीच त्यांची निर्मितीप्रक्रिया असते. कारण मूळ पौराणिक कथा यादवकालीन कवयित्रींच्या भावजीवनातील घटना बनतात. ह्या घटनेसंबंधीच्या भावनिक क्रियाप्रतिक्रियांतून एका भावकथेचे काव्यशिल्प अलगद आकारत जाते. कवयित्रीचे ह्या घटनेविषयीचे आकलन, तिचे भावनाकार, तिची भाषा, कथेत झिरपत राहणारे तिचे अनुभवविश्व ह्या सर्वच गोष्टींचे पर्यवसान अखेर कथेच्या पृथगात्मतेत होते.

## थालीपाक : एक स्फुट कथाकाव्य

'थालीपाक' हा महाभारताच्या द्रौपदीहरणपर्वातील (अ-२६९-२७१) एक प्रसंग आहे. द्रौपदीसह वनवास भोगणाऱ्या पांडवांच्या जीवनात अवतरलेल्या एका संकटप्रसंगाचे निवेदन 'थालीपाक' आख्यानामध्ये येते. जनाबाईंच्या ह्या 'थालीपाक'रचनेस आख्यानकाव्य म्हटले जात असले तरी प्रकृतीने ते कथाकाव्य आहे. मध्ययुगीन आख्यानकाव्येही आशय व अभिव्यक्तीच्या अनुषंगाने विविध रुपे धारण करताना दिसतात. विदग्ध महाकाव्याचे आदर्श गिरविणाऱ्या प्रबंधकाव्यांहून भारत-रामायणादी आर्ष महाकाव्यांतील रसोत्कट, नाट्यात्म, जीवनादर्शपूजक व लोकरंजक घटनाप्रसंगांवर आधारलेली प्रदीर्घ आख्यानकाव्ये वेगळी मानावी

लागतात. तर त्याहूनही अशा घटना-प्रसंगांच्या कथात्म स्मृतिबंधांना व्यक्तिविशिष्ट भावबंधांची, स्फुट आणि देशी कथारुपे देण्याची प्रक्रिया वेगळी मानावी लागते. तसेच प्रदीर्घ आख्यानांच्या तुलनेने थालीपाकासारखी स्फुट, कमीत कमी प्रसंग व व्यक्तिचित्रे यांच्या साह्याने एकच एक संस्काराकार मनावर रेखणारी कथाकाव्ये निश्चितच प्रकृतीने वेगळी ठरतात. मात्र ह्या सर्वांनाच परंपरेने आख्यानकाव्ये म्हटले जाते.

जनाबाईंचे 'थालीपाक' हे कथाकाव्य अवघ्या चौदा अभंगांतून साकारते. ह्या चौदा अभंगांतील पहिला अभंग कथेचा उपोद्घात म्हणून येतो. दुसऱ्या अभंगात कथेचे आशयसूत्र थोडक्यात सांगितले जाते. 'थालीपाक ऐकतां । हरि वारी जन्मव्यथा' हे जनाबाईंनी कथाकाव्याच्या आद्य चरणातच श्रोत्यांना दिलेले आश्वासन आहे. यावरून यादवकालीन अन्य कथाकाव्यांप्रमाणेच 'थालीपाक' हे कथाकाव्यही श्रोतृसापेक्षतेने प्रकट होते. यामुळे संवादाची एक व्यापक व अस्पष्ट चौकट त्यास लाभते. श्रोत्यांनी ह्या कथांचे श्रवण आत्मोद्धारासाठी करावयाचे आहे, याची सूचना ह्या प्रारंभिक चरणातून देऊन जनाबाईंनी आपल्या भक्तिमार्गाच्या अलिखित संकेताचे एकीकडे पालनही केले आहे. तसेच 'थालीपाक' कथाकाव्याचा महाभारतीय संदर्भ देऊन त्याची पार्श्वभूमी निवेदन करणेही ह्या कवयित्रीला अगत्याचे वाटते हे विशेष. ही पार्श्वभूमी ज्या गतीने आटोपशीर स्वरुपात निवेदन केली जाते त्यावरूनही जनाबाईंच्या निवेदनपद्धतीचे सामर्थ्य, कौशल्य व औचित्य लक्षात यावे.

''थालीपाक ऐकतां । हरि वारी जन्मव्यथा ॥१॥
दुर्योधनाच्या घरासी । आला दुर्वास हो ऋषी ॥२॥
सेवें बहुत तोषविला । वर माग तू इच्छिला ॥३॥
शिष्यासह रानीं जावें । इच्छाभोजन मागावे ॥४॥
नंतर शाप द्यावा । आता जातो वर द्यावा ॥५॥
हर हर शब्द थोर केला । जाला वनात गलबला ॥६॥
नवल सर्वांसी वाटलें । जनी म्हणे ऋषी आले ॥७॥'' (अ. क्र. ४५५)

दूरदर्शनवरील आजच्या एखाद्या चित्रकथाभागाच्या प्रारंभी पूर्वकालात घडलेल्या प्रसंगांशांच्या दर्शनाने ज्याप्रमाणे कथासूत्राचे ओझरते संस्मरण घडविले जाते, त्याप्रमाणे प्रस्तुत 'थालीपाक'कथाप्रारंभी पूर्वकालीन संदर्भ गतिमान निवेदनाने जागविले जातात. तसेच 'थालीपाक' कथेवरही निवेदनाचा एक ओझरता प्रकाशझोत जनाबाई टाकून जातात. कथेच्या विकासाच्या दृष्टीने, कलात्मतेच्या

दृष्टीने असे करणे अप्रस्तुत ठरण्याची शक्यता आहे. तथापि जनाबाईंनी निवडलेली कथा एवढी पूर्वविदित व लोकप्रिय आहे की तिच्यासंबंधी मूलत: वाचकांच्या वा श्रोत्यांच्या मनात फारसे कुतूहल असतच नाही. मात्र येथे प्रश्न कथेसंबंधीच्या कुतूहलाचाही नसतो. हे 'थालीपाक' कथेसंबंधी जसे सांगता येईल, तसेच ते एकूणच मध्ययुगीन मराठी आख्यानकाव्यांसंबंधीही म्हणता येते. आर्ष महाकाव्ये व लोकप्रिय पुराणे यांतून निवडलेल्या कथाभागांवर आधारलेली ही सर्वच आख्यानकाव्ये एका दृष्टीने तत्कालीन श्रोत्यांना वा वाचकांना पूर्वपरिचित होती. तरीही त्यांचे एवढे स्वागत श्रोत्यांनी वा रसिक वाचकानी का केले असावे? ह्या आख्यानकाव्यांसंबंधी तत्कालीन रसिकांना नेमके कोणते आकर्षण वाटत होते? या प्रश्नाचे एखादे उत्तर जनाबाईंचे प्रस्तुत 'थालीपाक' कथाकाव्य देऊ शकते का याचा शोध घेणे उचित ठरेल.

आधुनिक मराठी कथेच्या लोकप्रियतेची वा यशस्वितेची जी कारण-मीमांसा केली गेली त्यात तंत्र, मंत्र, जिज्ञासा, स्वप्नरंजन, नाविन्य, बोध, सौंदर्यनुभव, जीवनदर्शन, मनोदर्शन इत्यादी बाबींना विशेष महत्त्व मिळाले. ह्या कथामीमांसेपासून मध्ययुगीन आख्यानकाव्ये कालदृष्ट्या बरीच दूर आहेत. त्यामुळे मध्ययुगीन आख्यानकाव्यांच्या प्रकृति, प्रयोजन वा निर्मितीसंबंधीचा विचार कोऱ्या मनाने करणेच योग्य ठरेल.

या दृष्टीने पाहता 'थालीपाक' ह्या कथाकाव्याचा आरंभ हा आधुनिक कथासमीक्षेला छेद देणारा, पण त्याच वेळी तिला आव्हानही देणारा ठरतो. पार्श्वभूमी- संबंधीचे निवेदन करणे वा कथेच्या प्रारंभीच संपूर्ण कथेचे ओझरते व गतिमान दर्शन घडविणे, ह्या दोन्ही गोष्टी यादृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात.

''मध्यरात्रीं ऋषिसहित । आला दुर्वास वनात ॥
पंडुसुत जागे जाले । ऋषि समस्त वंदिले ॥
धर्म भीमाकडे पाहे । सत्त्वहानि होत आहे ॥
द्रौपदीनें धावा केला । निजला देव जागा झाला ॥
ऋषि तृप्त केले वनीं । म्हणे नामयाची जनी ॥'' (अ. क्र. ४५६)

सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर प्रस्तुत अभंगात 'थालीपाक' कथेचे मोजकेच टप्पे नोंदविले आहेत. थोडक्यात हा 'थालीपाक' कथेचा कथाप्रारंभी दिलेला सारांशच म्हणावा लागेल. यानंतरच्या अभंग क्रमांक ४५७ ते अभंग क्रमांक ४६६ ह्या केवळ दहा अभंगांत प्रस्तुत कथा निवेदिली जाते. ह्या कथेचा पुढीलप्रमाणे आलेख काढता येतो.

अभंग क्र. ४५७ - मध्ये द्रौपदीचा धावा आणि संकटनिवारणासंबंधी प्रार्थना तसेच विनवणी

अभंग क्र. ४५८ - ४५९ ह्या दोन अभंगांतून येणारा श्रीकृष्णरुक्मिणी संवाद, श्रीकृष्णाचे पांडवांच्या साहाय्यार्थ भूलोकावर अवतरण.

अभंग क्र. ४६०, ४६१, ४६२ ह्या तीन अभंगांतून येणारा श्रीकृष्ण - द्रौपदीसंवाद, त्यात द्रौपदीचे संकटाविषयीचे कथन, श्रीकृष्णास लागलेली क्षुधा, रिक्त थाळीला चिकटलेले शाखापत्र सेवन केल्याने श्रीकृष्णास लाभलेली तृप्ती.

अभंग क्र. ४६३, ४६४, ४६५, ४६६ ह्या चार अभंगांतून गंगातीरावरील दुर्वास व त्यांचा शिष्यपरिवार यांनी केलेल्या भोजनप्रसंगाचे वर्णन.

अभंग क्र. ४६७, ४६८ समारोप व तात्पर्यकथन.

थालीपाक कथेचा हा आलेख पाहता तो पूर्वपरिचित वा पारंपारिक असल्याचे लक्षात येऊन त्यासंबंधी फारसे नाविन्य वाटेनासे होते. असे असले तरी जनाबाईंची ही कथाकविता अपूर्व, स्वतंत्र व एकमेव असून तिच्या अखंड आवाहनक्षमतेमुळेच ती सतत आपले लक्ष वेधून घेते.

# समारोप

संत जनाबाईंच्या काव्यकर्तृत्वाचा आलेख मांडताना तीव्रतेने जाणवणारी विशेषता म्हणजे जनाबाईंचे जीवन आणि त्यांची कविता ह्यांतील अद्वैत होय. जनाबाईंच्या जीवनाकडून त्यांच्या कवितेकडे जाता येते अथवा कवितेकडून जीवनाकडे वळता येते. यादवकालीन संतकाव्याचीच ही विशिष्टता होय.

काव्य आणि जीवन अशाप्रकारे समान्तर असल्यानेच जनाबाईंची कविता त्यांची वाङ्मयीन मूर्ती ठरते.

एक उपेक्षित जीवन घेऊन जनाबाई यादवकालीन संतमंडळात दाखल झाल्या. नामदेवांची सगुणभक्ती आणि ज्ञानेश्वरांची निर्गुणसाधना यांचे ऐक्य त्यांनी आपल्या अध्यात्मसाधनेत साधले. त्यांच्या भक्तिजीवनातील परिवर्तने चैतन्यमय, मोहक आणि स्वाभाविक वाटतात. निर्गुण साधनेतील झेप स्तिमित करते. जनाबाईंनी एका शूद्र दासीपदापासून संतपदापर्यंत प्रवास केला तो स्वयंप्रेरणेनेच होय. स्वयंप्रेरणा आणि आत्मबळ ही जनाबाईंची बलस्थाने आहेत. तर अभिजात प्रतिभा आणि तरल संवेदनशीलता ही त्यांची कवचकुंडले आहेत. त्यांतूनच जनाबाईंच्या साक्षात्कारावस्थेचा जन्म झाला. कोणत्याही श्रेष्ठ संतकवींहून जनाबाईंची सगुण-साक्षात्कारी वा निर्गुण यौगिक अवस्था कमी मोलाची ठरत नाही. ह्या साक्षात्कारी अनुभूतींमुळेच जनाबाई स्वत:च्या काळात एक दंतकथा होऊन राहिल्या. अजूनही ही दंतकथा मराठी मनांवर मोहिनी टाकते. त्यांना कोड्यात टाकते. जनाबाईंच्या गूढ साक्षात्कारी अनुभूतींचा अजूनही अर्थ लावण्याचे प्रयत्न होताना दिसतात. पण हे गूढ उमजेनासे होते. मराठी मनांना ह्या कोड्यास नकारही देववत नाही. त्यामुळे जनाबाईंच्या गूढ, धूसर, अद्‌भुत आणि चैतन्यमय अनुभवसृष्टीत हरवून जाणे हाच एक पर्याय उरतो.

जनाबाई नामदेवांच्या दासी आहेत. पण तरीही ज्ञानेश्वरांशी त्यांचे सख्यत्व आहे. ज्ञानेश्वरांच्या अदभुत आणि लौकिक जीवनाची शब्दचित्रे नामदेवांनी विस्तृत स्वरुपांत रेखाटली. पण नामदेवांनंतर ती केवळ जनाबाईंनीच, संक्षेपात का होईना, रेखाटली आहेत हे विशेष! नामदेवांच्या जीवनाच्याही त्या अखंड साक्षी आहेत. त्या

नामदेवांच्या केवळ कौटुंबिक जीवनाशीच नव्हे तर भक्तिजीवनाशीही समरस झाल्या आहेत. जनाबाईंची विठ्ठलभक्ती ही ह्या समरसतेचीच फलश्रुती होय.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर आणि भक्तश्रेष्ठ नामदेव यांच्या साह्याने प्रारंभीत होणारी जनाबाईंची अध्यात्मसाधना अखेर स्वतंत्र वाटेवर पोहोचते. नव्या दिशेने झेप घेते. त्यामुळे जनाबाईंची कविता पराधीन न ठरता स्वतेजाने तळपत राहते. विशेष म्हणजे जनाबाईंना स्वत:चे असे एक समर्थ व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे स्वत:चे एक अनुभवविश्व आहे. जनाबाई आणि विठ्ठल यांचे एक उत्कट असे प्रेमनाते आहे. ह्या नात्यातूनच जन्मणारी त्यांची साक्षात्कारी अवस्था आहे ह्या साक्षात्कारी अनुभवविश्वाला स्वतंत्र असा एक रुपाकार आहे, प्रकृतीवैशिष्ट्ये आहेत, ताल आणि तोल आहे. विशेष म्हणजे ह्या अनुभूती प्रकट करण्याची जनाबाईंची स्वत:ची अशी शैली आहे. जनाबाईंची स्वत:ची एक भाषाशैलीही आहे. त्यात त्यांच्या स्त्रीमनाचे आणि उपेक्षित जीवनस्तराच्या वास्तवाचे रंग, आकार आणि वळणे मिसळलेली आहेत. त्यामुळे जनाबाईंची कविता समकालीन श्रेष्ठ संतकवींनी संस्कारीत झालेली असली तरी ती पूर्णत: स्वयंभू आणि स्वायत्त वाटते.

एक संतकवयित्री ह्या नात्याने जनाबाईंनी सांप्रदायिक विषयांवरही अभंगरचना करून आपले सांप्रदायिक काव्यकर्तृत्व सिद्ध केले आहे. तसेच समकालीन समाजाचे आपल्या उपदेशपर अभंगांतून प्रबोधनही केले आहे. त्यामुळे समकालीन समाजाची आध्यात्मिक पातळीवर जडणघडण करण्याचे कर्तव्य जनाबाई समर्थपणे करू शकल्या आहेत.

जनाबाई उपेक्षित समाजाच्या प्रतिनिधी म्हणून लोकभाषेत लोकसंवाद साधतात, स्त्री-शूद्रांनाही भक्तिसाधनेने आत्मोद्धार करता येतो, संतपद प्राप्त करता येते हे स्वानुभवांनी सिद्ध करतात. जनसामान्यांच्या मनात विठ्ठलभक्ती प्रेरित करतात. श्रमानुभवांतूनही भक्तिसाधना करता येते असा दिलासा श्रमिक समाजाला देऊ पाहतात.

जनाबाई एक परिपूर्ण स्त्रीमन आहे. आपल्या 'स्त्री' असण्याचा त्यांना सार्थ अभिमान आहे. आपले स्त्रीपण त्यांना ओझे वाटत नाही. स्त्रीजीवन लाभल्याबद्दल त्या कुठेही खंत व्यक्त करीत नाहीत. नामयाची दासी, ज्ञानेश्वरांची सखी, श्रीविठ्ठलाची प्रिया ह्या भूमिका त्यांनी समर्थपणे निभावल्या आहेत. एवढेच नव्हे तर ज्ञानेश्वरांसारखा पुत्र आपणास असावा, त्यासाठी पुनर्जन्म घ्यावा असे त्यांना मनोमन वाटते. त्यातून त्यांच्या मनाची मातृत्वासंबंधीची उत्कट ओढच प्रकटते. सोपानदेवासंबंधी त्यांच्या भावनाही कोवळेपणाने नटल्या आहेत. समकालीन सर्व संतांविषयी त्यांच्या मनात विलक्षण आदर आहे. तथापि संत 'चोखामेळा' हाच खरा

वैष्णव होय असा त्या निर्वाळा देतात.

जनाबाईंच्या उपदेशपर अभंगांतून त्यांच्या अनुभवाचे बोल ऐकू येऊ लागतात. आपल्या आध्यात्मिक साधनेने आणि काव्यकर्तृत्वाने उपदेश करण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झाला आहे. साधकांनी आपल्या मनात ईश्वरविषयक दृढ श्रद्धाभाव बाळगावा, संत हेच देव होत अशी धारणा मनात अखंड असू द्यावी, मोक्षापेक्षा मुक्तीसाठी प्रयत्नशील असावे, देहभाव नाकारावा, अलिप्तपणे प्रपंच करावा, अखंड नामस्मरण करावे, सद्गुरुस शरण जाऊन त्याची सेवा करावी, आणि आर्त मनाने भक्तिसाधना करावी असा जनाबाईंना जनसामान्यांना उपदेश करावासा वाटतो.

जनाबाईंच्या अध्यात्मसाधनेतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झालेला ठळकपणे लक्षात येतो. हे व्यक्तिमत्त्व जेवढे मृदू आहे तेवढेच ते वज्रासमान कठोरही आहे. त्यामुळे जनाबाईंच्या कित्येक अभंगांतून तुकारामांच्या अभंगांतील वृत्ति-प्रवृत्तींची आणि काव्यविशेषांची चाहूल लागते. 'डोईचा पदर आला खांद्यावरी' यासारख्या अभंगात त्याचा प्रत्यय येऊ शकेल. जनाबाईंच्या भाषेच्या वळणांनी तुकारामांचे अनेक अभंग जाऊ पाहतात. तर भारुडांचे वळण घेणारी जनाबाईंची रचना नाथांच्या भारुड रचनांची पूर्व सूचना देते.

नामदेवांची दासी आणि ज्ञानेश्वरांची ही सखी गुरुपदेशापासून वंचित राहिली खरी. पण त्यासाठी तिने कधी खंत केली नाही. परमेश्वरालाच त्यांनी गुरु मानले आणि स्वयंबोधास गुरुपदेश मानला. आपल्या अंतःप्रेरणेने त्या प्रारंभी भक्तीची आणि उत्तरार्धात निर्गुणसाधनेची वाट चालत राहिल्या. आणि अखेर सगुण-निर्गुण ऐक्याच्या अंतिम जाणिवेपाशी येऊन थांबल्या. त्यानंतरच त्यांना सर्वच ईश्वराची रुपे दिसू लागली. 'देव खाते देव पिते' अशा समताधिष्ठित ऐक्यावस्थेत विदेही मनाने त्या वावरू लागल्या. त्यांच्या अभंगांतून आता मुक्त मनाचे धन्योद्गार ऐकू येऊ लागले.

आता जनाबाईंचे मन कृतार्थतेने भरून जाते. स्वतःसाठी आता त्यांचे काहीच मागणे उरत नाही. मात्र अभिजात संताच्या मनाने त्या ईश्वराजवळ जगताच्या उद्धाराची मागणी करू लागतात. देह असेपर्यंत मनात भक्तिभाव दृढ असावा, देवाने पुनःपुन्हा गर्भवास द्यावा आणि भक्तिसाधनेची संधी द्यावी, संतांना श्रद्धावान संतती द्यावी, सर्वांचे सर्वकाळ कल्याण असावे हे जनाबाईंचे विठ्ठलाजवळ मागणे आहे. आता जनाबाई केवळ उपकारापुरत्याच केवळ जगत आहेत.

जनाबाईंनी नामदेवांचे चरित्रनिवेदन करून त्यांच्या आत्मचरित्राचा अप्रत्यक्ष पुरस्कारच केला आहे. तसेच ज्ञानेश्वरादीसंबंधाने काही महत्त्वाच्या नोंदी केल्या

आहेत. पदे, भूपाळी, कूट आदी स्फुट रचनाही जनाबाईंच्या नावावर दिसतात.

जनाबाईंनी नामदेवांनी स्वीकारलेल्या सर्व काव्यप्रकारांचा अभंगरचनेसाठी आश्रय केला आहेच. शिवाय 'कथानिवेदनपर' अभंगांची रचना करून नामदेवांना आध्यात्मिक जीवनातच नव्हे तर काव्यजीवनातही अनुसरले आहे. अशा प्रकारे जनाबाईंनी नामदेवांचे 'दासीपण' सर्वांगांनी अर्थपूर्ण केले.

मध्ययुगीन सर्व कवयित्रींमध्ये संत जनाबाई आपल्या आध्यात्मिक अधिकारामुळे आणि समृद्ध काव्यकर्तृत्वामुळे सर्वश्रेष्ठ ठरतातच. शिवाय समग्र संतमंडळातही त्यांचे स्थान महत्त्वपूर्ण ठरते हे विशेष.

# अभ्यासाची साधने


१. **जनाबाईंचे निवडक अभंग -**
डॉ. सुहासिनी इर्लेकर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०००

२. **नामदेव गाथा -** महाराष्ट्र शासन

३. **प्राचीन मराठी संत कवयित्रींचे वाङ्मयीन कार्य -**
डॉ. सुहासिनी इर्लेकर, परिमल प्रकाशन, १९८०, औरंगाबाद

४. **मुक्त मयुरांची भारते -**
डॉ. ना. गो. नांदापूरकर मराठवाडा साहित्य परिषद, १९५६, हैदराबाद.

५. **संत नामदेव : व्यक्ती आणि वाङ्मय -**
संपा. प्रा. भालचंद्र खांडेकर, अशोक कामत, मोघे प्रकाशन, १९८८, कोल्हापूर

६. **संत जनाबाई : चरित्र आणि काव्य -**
संपा. चिटणीस व कार्यकारिणी - श्री. संत जनाबाई शिक्षण संस्था - गंगाखेड (परभणी), अनमोल प्रकाशन, पुणे १९७६.

७. **मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड पहिला**
ल. रा. पांगारकर - विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे २.

# डॉ. सुहासिनी इर्लेकर यांचे प्रकाशित ग्रंथ

काव्य :

१. तृप्ती
२. चित्रांगण (संपा)
३. अक्षर
४. गाथा
५. छांदस
६. मी भारतीय आहे
७. आजी आणि शेन वॉर्न
८. आल्या जुळून तारा

संतसाहित्य समीक्षा :

१. महदंबेचे धवळे
२. यादवकालीन मराठी काव्य-समीक्षा
३. जनाबाईंचे निवडक अभंग
४. प्राचीन मराठी संत कवयित्रीचे वाङ्मयीन कार्य
५. नाथांचे रुक्मिणीस्वयंवर
६. ज्ञानेश्वरीचे अंतरंग (संपा)
७. तुकारामांची प्रभावळ
८. नामदेवकृत ज्ञानेश्वरचरित्र
९. समर्थ रामदासांची करुणाष्टके
१०. संत जनाबाई



**डॉ. सुहासिनी य. इर्लेकर**

मध्ययुगीन मराठी संतसाहित्याच्या साक्षेपी अभ्यासक म्हणून डॉ. सुहासिनी इर्लेकर हे नाव मराठी वाङ्मयाच्या अभ्यासक्षेत्रात आता प्रतिष्ठा पावलेले आहे. त्यांचे 'महदंबेचे धवळे', 'संत जनाबाईंचे अभंग', 'प्राचीन मराठी संतकवयित्रींचे वाङ्मयीन कार्य', 'यादवकालीन मराठी काव्यसमीक्षा'; 'तुकारामांची प्रभावळ', 'समर्थ रामदासांची करुणाष्टके' इत्यादी ग्रंथ विद्वान व व्यासंगी समीक्षकांमध्ये मान्यता पावलेले आहेत. प्राचीन संतसाहित्यासंबंधी मर्मग्राही भूमिका, साक्षेपी दीर्घकालीन व्यासंग आणि आधुनिक साहित्यसमीक्षादृष्टी इत्यादी विशेषांमुळे डॉ. सुहासिनी इर्लेकर यांची ग्रंथसंपदा हा संतसाहित्यसमीक्षेचा एक वस्तुपाठ ठरला आहे.

सुहासिनी इर्लेकर ह्या निर्सगलक्षी संवेदनशील ज्येष्ठ कवयित्री म्हणूनही महाराष्ट्रात ख्यातकीर्त आहेत. 'तृप्ती', 'अक्षर', 'गाथा', 'छांदस', 'मी भारतीय आहे', 'आजी आणि शेन वॉर्न', 'आल्या जुळून तारा' हे त्यांचे प्रसिद्ध काव्यसंग्रह. ९-१० डिसेंबर २००१ रोजी कंधार येथे झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. कै. राजकुंवर काबरा मराठवाडा महिला भूषण पुरस्कार (२००२) याच्या त्या मानकरी आहेत.